म. ग्रं. सं. ठाणे.
विषय ... इतिहास ...
सं. क्र. ५२


वसाहतींची स्थापना
आणि
स्वातंत्र्य युद्ध.


लेखक– गुरुनाथ प्रभाकर ओगले.





RSFBK-0004707


सज१८३२


















REFBK-0004707

REFBK-0004707



जॉर्ज वॉशिंगटनचें अध्यक्षपदारोहण.

पान २३३.

अमेरिका

(भाग पहिला)

वसाहतींची स्थापना आणि स्वातंत्र्ययुद्ध.

लेखक व प्रकाशक

गुरुनाथ प्रभाकर ओगले, एल्. एम्. ई.

ओगलेवाडी, सें. औंध.

१९१२

किंमत दोन रुपये.

(या पुस्तकासंबंधीं सर्व हक्क कर्त्याकडे आहेत.)

मुद्रक

सदाशिव कृष्ण जोशी बी. ए., एलएल. बी.,

पेठ मंगळवार, **सिटी प्रेस**, सातारा.

वा. 24/2/33

– निवेदन –

अमेरिकेसंबंधीं भरपूर माहिती देणारें पुस्तक मराठी भाषेंत नाहीं असें आढळून आल्यामुळें लेखकानें हा प्रयत्न केला आहे. शिक्षणाकरितां अमेरिकेंत राहण्याचा सुयोग आला, तेव्हां, तेथील विचार, राहणी व काम करण्याची तडफ यांच्या योगानें प्रेरित होऊन आपल्या बांधवांस या विषयासंबंधीं कांहीं माहिती द्यावी अशी इच्छा उत्पन्न झाली. परंतु व्यवसाय निराळा पडल्यामुळें, तें काम मागें पडलें. नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या 'एडिसन' या पुस्तकाबद्दल महाराष्ट्रवाचकांकडून प्रोत्साहन मिळाल्यामुळें, हें काम हातीं घेण्यास धीर आला. वास्तविक लेखनव्यवसायांत अधिक तपश्चर्या केलेल्या माणसानें हा विषय हातीं घ्यावयास पाहिजे होता. प्रस्तुत प्रयत्न अपुरा वाटून जर कोणी अधिकारी माणसानें हा विषय फिरून हातीं घेऊन त्यावर अधिक प्रकाश पाडला तर लेखकास त्याबद्दल धन्यताच वाटेल.

या पुस्तकांत वसाहतींच्या स्थापनेपासून जॉर्ज वॉशिंगटनचे अध्यक्षपदारोहणापर्यंत, कथाभाग आलेला आहे. पुढील भागांत सिव्हिल वॉर म्हणजे आपसांतील यादवीचा शेवट, इतका मजकूर येईल, व तिसरे भागांत अर्वाचीन अमेरिकेवर माहिती देण्यांत येईल.

या पुस्तकास श्री. काशिनाथ नरसिंह केळकर, हिंदुव्यवहार धर्मशास्त्राचे विद्वान् लेखक यांनीं प्रस्तावना लिहून लेखकास उपकृत करून ठेविलें आहे. तसेंच 'किर्लोस्कर' मासिकाचे आर्ट डिपार्टमेंटनें उत्कृष्ट ब्लॉक करून दिले, श्रीयुत वाग्भट नारायण देशपांडे बी. ए. एल् एल्. बी. यांनीं उपयुक्त सूचना करून व श्रीयुत सदाशिव कृष्ण जोशी, बी. ए. एल् एल्. बी., यांनीं छपाईचें कामही लवकर करून दिलें, याबद्दल या मित्रवर्गाचा लेखक फार आभारी आहे.

ओगलेवाडी
१ सप्टेंबर १९३२

गुरुनाथ प्रभाकर ओगले.

अनुक्रमणिका

प्रस्तावना		पान १-११
प्रकरण १	प्रास्ताविक	१-१७
प्रकरण २	फ्रेंच लोकांचे प्रयत्न.	१८-२६
प्रकरण ३	वसाहतीचा काल	२७-४६
प्रकरण ४	वसाहतींतील परिस्थिति व आयुष्यक्रम	४७-७०
प्रकरण ५	इंडियन लोकांशीं युद्ध	७१-७९
प्रकरण ६	फ्रेंच लोकांची लढाई	८०-११७
प्रकरण ७	स्वातंत्र्ययुद्धाचीं कारणें	११८-१३९
प्रकरण ८	स्वातंत्र्ययुद्धास सुरुवात	१४०-१८०
प्रकरण ९	स्वातंत्र्य युद्धाची अखेर	१८१-२०६
प्रकरण १०	युद्धकालीन आर्थिक परिस्थिति	२०७-२२०
प्रकरण ११	कॉन्फेडरेशन कीं फेडरेशन ?	२२१-२३४
सूचि		२३५-२४१
शुद्धिपत्रक		२४२-२४४

चित्रानुक्रम

मुखपृष्ठ—जार्ज वॉशिंगटनचें अध्यक्षपदारोहण
पान १ नकाशा
पान ३ अमेरिकेच्या किनाऱ्यावर कोलंबसाचें आगमन
पान ६ कोलंबसाचें अमेरिकेहून स्वदेशीं आगमन
पान १५ अमेरिकन वसाहतींत जन्मास आलेली पहिली बालिका
पान २५ अन्नाच्या तुटवड्यामुळें प्लिमाउथ वसाहतीची दुर्दशा
पान ४० पेनसिल्व्हॅनिया वसाहतीचा उत्पादक विल्यम पेन
पान ४५ जार्जिया वसाहतीचा संस्थापक जेम्स ओगल थॉर्प
पान ४९ वसाहतवाल्यांकरितां वधूंची आयात
पान ७५ वसाहतींतील धर्मभोळेपणा, चेटक्यांची चौकशी
पान ७७ बेंजामिन फ्रँकलिन
पान ९८ इंडियन कुमारिकेनें केलेला स्वकुलाचा घात
पान १४४ स्वातंत्र्यसंस्थापक जॉर्ज वाशिंगटन
पान १५० स्वातंत्र्याचे जाहीरनाम्याचा ठराव कांग्रेसनें पास केला
पान १८६ एका शूर कुमारिकेनें केलेला पराक्रम
पान १८९ स्वातंत्र्याच्या युद्धाची समाप्ति, लॉर्ड कार्नवॉलिस शरण येतो.

प्रस्तावना

माझे स्नेही श्रीयुत गुरुनाथ प्रभाकर ओगले यांनीं प्रस्तुत पुस्तकास प्रस्तावना लिहिण्याची मला विनंति केली ती मी थोड्या संकोचानेंच मान्य केली. अमेरिकन स्वातंत्र्याचा इतिहास मी कॉलेजमध्यें असतांना ग्रीनच्या इतिहासांतून व इतर पुस्तकांमधून मोठ्या आवडीनें वाचला होता त्यावेळीं मनांत उद्भूत झालेल्या भावनांची माझी आठवण अद्याप ताजी आहे. तथापि या पुस्तकास माझ्यासारख्या केवळ एकाद्या इतिहासप्रेमी लेखकानें प्रस्तावना लिहिण्यापेक्षां हें काम इतिहास व राजकारण यांचा व्यासंग असलेल्या कोणा माणसाचें हातून होतें तर तें अधिक सरस झालें असतें अशी माझी भावना आहे. प्रस्तुत ग्रंथांत अमेरिकन लोकांची संस्कृति इतिहास व त्यांनीं स्थापलेलें स्वराज्य यांचा मनोरम इतिहास आला आहे पण त्यापेक्षांहि, हें पुस्तक वाचून हिंदी वाचकांच्या हल्लींच्या राजकीय मनोभूमिकेवर जो एक उद्बोधक परिणाम होतो तेंच माझ्या मतानें या ग्रंथाचें वैशिष्ट्य किंवा मर्म आहे. व त्या दृष्टीनें प्रस्तावना लिहिण्याला अधिकारी अशा एक दोघां व्यक्तींची नांवें मी ग्रंथकर्त्यास सुचविलीहि. तथापि अखेर ' हें काम मीच करावें ' असें ग्रंथकर्त्यानें स्नेहाच्या हक्कानें ' ठरवून ' टाकल्यामुळें मी यथामति प्रस्तावनेचे चार शब्द लिहित आहे. अर्थात् या निमित्तानें कां होईना पण अमेरिकेविषयीं आणखी कांहीं पुस्तकें वाचण्याचा मला योग आला याबद्दल ग्रंथकर्त्याचे आभारच मानले पाहिजेत. असो.

हिंदुस्थानचा व अमेरिकेचा संबंध काय ? हा प्रश्न कोणाहि वाचकानें स्वतःस विचारला तर त्याचे मनांत साम्यापेक्षां वैधर्म्याचीच प्रतीती अधिक येईल ! भौगोलिक दृष्ट्या पाहिलें तर अमेरिका ही हिंदुस्थानची ' पाताल भूमि ' आहे. आधिभौतिक सत्ता व सुधारणा या दृष्टीनें पाहिलें तर, हिंदुस्थानच रसातळास गेलें आहे हें कोणीहि कबूल करील !

आज हिंदुस्थान सुवर्णभूमी नसून ' सोन्याचा धूर ' अमेरिकेत दृष्टीस पडत आहे ! हिंदुस्थानांत पारतंत्र्याची रात्र पडली आहे; तर अमेरिकेवर स्वातंत्र्याचा भाग्यरवि उगवला आहे ! इकडे हिंदुस्थानांत दारिद्र्य व दुःख यांचे निखारे पिचत आहेत. तर तिकडे अमेरिकेंत कुबेराला देखील कर्ज देतील असे नवकोटनारायण न्यूयॉर्कसारख्या शहरांतून वास्तव्य करीत आहेत. हल्लींच्या काळीं जगांतील सर्व संपत्तीचा प्रवाह सहस्त्रार्जुनाप्रमाणें अमेरिकेनें अडवून धरिला आहे इतकेंच नव्हे तर, गेल्या महायुद्धाच्यापायीं झालेल्या कर्जानें वेजार होऊन इंग्लंड फ्रान्स जर्मनी वगैरे युरोपियन राष्ट्रें कर्जांत तहकुबी अगर सूट मागण्याकरितां अमेरिकेच्या पायीं लोळण घेत आहेत हें पाहिलें म्हणजे, आज सर्व जगाचे भवितव्य एका अमेरिकेनें कसें आपल्या मुठींत सामाविलें आहे तें प्रत्ययाला येतें ! विहंगम दृष्टीनें कोणी हिंदुस्थानाकडे पाहील तर त्याला जिकडे तिकडे खेडीच खेडी दृष्टीस पडून, एकीकडे वन्य वनश्री नयनाला आल्हादवीत असतां दुसरीकडे मनांत असा आचंब्यानें उद्गार निघेल की " काय हे हिंदी लोक ! व काय यांची राहणी पाहा ! भौतिक सुधारणेचा उदय जगांत झाला कीं अजून तो व्हावयास एकदोन शतकें अवधि आहे ? " पण तेंच अमेरिकेकडे पाहा. त्यांतील सुधारलेले लोक, साठसाठ मजल्यांच्या गगनचुंबी इमारती, जगाचा व्यापार हादरविणारे प्रचंड कारखाने, पंचमहाभूतांचे आक्रमण करणारी भौतिक सुधारणा इत्यादि पाहिलें म्हणजे, आधिभौतिक सुधारणेचे अमेरिकेनें अगदीं शिखर गांठलें आहे असें म्हणण्यास प्रत्यवाय वाटत नाही ! अर्थात् कोण कोठे अमेरिका व कोठे हिंदुस्थान ! ! त्याच्या भाग्यांत दक्षिणोत्तर ध्रुवाइतकें अंतर. त्यांची तुलना तरी करावयाचे कोण मनांत आणील ?

पण ' इतिहास ' हा मनुष्यजातीचा असा एक जिवलग मित्र आहे कीं संकटकाळीं धीर खचला असतां मनुष्याचे पुढें ' ऐतिहासिक ज्ञाना'चा त्रिकालदर्शी आरसा उभा करितो. त्यांत ' ऐतिहासिक ज्ञान ' ही एक दिव्यदृष्टि त्याला लाभते व नंतर तोच मनाच्या पहिल्या परिप्रश्नास प्रत्युत्तर देतो कीं " होय. आज आम्ही पाताळात व अमेरिका स्वर्गास भिडलेली

असेल! पण हें सर्व स्थित्यंतर गेल्या किती शतकांतलें आहे? दोन अडीचशें वर्षांपेक्षां याला अधिक काळ गेला नाहीं! दोन शतकांपूर्वी इंग्लंड हें किती कंगाल होते व पाटणा मुर्शिदाबाद वगैरे शहरांचे वैभव तत्कालीन लंडनपेक्षांहि कसें आधेक संपन्न होते हें क्लाइव्ह-सारख्या समकालीन इंग्रज लोकांनींच लिहून ठेविलें आहे म्हणून बरें! तींच वोटें घेऊन विपर्यास करणाऱ्या इंग्रजांच्या डोळ्यांत घालतां येतात. जपानला साठ वर्षांपूर्वी स्वतःचें असें एकहि दर्यावर्दी जहाज नव्हतें कीं कारखाना नव्हता हें कोणास सांगून खरेंहि वाटणार नाहीं. पण आज 'पश्चिमेस अमेरिका तर पूर्वेस जपान' इतकी प्रचंड सत्ता व इभ्रत या चिमुकल्या राष्ट्रानें अवघ्या साठ वर्षांत पैदा केली. हें ऐतिहासिक ज्ञानच मनुष्याच्या मनांत महत्वाकांक्षा उत्पन्न करितें. अमेरिकन लोकांनीं इंग्रजांसारख्यांशीं झगडा करून साम्राज्यापासून आपलें स्वातंत्र्य मान्य करवून घेतले! या दृष्टीनें आज स्वराज्याची पाउलवाट चालणाऱ्या हिंदी राष्ट्रास अमेरिकेच्या इतिहासापासून पुष्कळ गोष्टी शिकण्यासारख्या आहेत. One touch of nature makes the whole world kin–अशी जी इंग्रजींत म्हण आहे ती स्वातंत्र्यभावनेचे बाबतींत अगदीं खरी आहे. अमेरिकेचा इतिहास वाचतांना, आपण आपल्याच देशाचा इतिहास वाचत आहों काय अशी क्षणभर अद्वैताची भावना मनांत येते; व त्याचें प्रत्यंतर वाचकांना हें पुस्तक वाचीत असतां ठिकठिकाणीं आढळून येईल.

प्रस्तुत पुस्तकांत अमेरिकेमध्यें निरनिराळ्या युरोपियन राष्ट्रांनीं चौदाव्या शतकांत वसाहत केल्यापासून तों सतराव्या शतकाअखेर त्यांनीं 'अमेरिका हाच आपला **स्वदेश**' असें मानून स्वातंत्र्य स्थापन केलें येथपर्यंत हकीगत आली आहे. स्वराज्य अगर स्वातंत्र्य हाच सर्व उत्कर्षांचा पाया होय. अर्थात् तें स्वराज्य हस्तगत झाल्यानंतर अमेरिकेमध्यें सामाजिक राजकीय धार्मिक स्थित्यंतर कसें झालें, भौतिक सुधारणेचा परिस हातीं लागून विसाव्या शतकाच्या 'चमत्कार युगांत' केवढी क्रांति घडून आली ही रम्य नवलकथा पुढील खंडांत येणार आहे; तथापि या खंडांत

आलेल्या कांहीं गोष्टी 'इतिहास' या दृष्टीनें वाचकांस फार बोधप्रद व मनोरंजक वाटतील. उदाहरणार्थ, अमेरिकेचा शोध लावणारे दर्यावर्दी वस्तुतः हिंदुस्थानास येण्याकरितां निघाले होते; अमेरिकेलाच त्यांनीं इंडीज हे नांव दिले व आपण हिंदुस्थानचाच शोध लावला ही कल्पना कोलंबसाचे डोक्यांतून मरेपर्यंत गेली नाहीं! युरोपांतील त्यावेळची कंगाल राष्ट्रें संपत्ती-करितां इतकी हांवरी झाली होती कीं वसाहती करणें हा तत्कालीन धंद्यापैकीं एक प्रतिष्ठित धंदा झाला होता. टोळधाड यावी त्याप्रमाणें अमेरिकेच्या किनाऱ्यावर प्रथम स्पॅनिश आले, पोर्तुगीज आले, फ्रेंच आले, इंग्रज आले, डच आले, असें करितां करितां ज्या देशी इंडियन लोकांनीं त्यांचा पाहुणचार व आतिथ्य करून देशांत येऊं दिलें त्यांना या विदेशी चांचे लोकांनीं नुसतें परतंत्र केलें इतकेंच नव्हे तर, तेथील सर्व रेड इंडियन (देशी अमेरिकन) लोकांची 'मृगया' करून त्यांचा निःपात केला! "मूळ या लोकांची संख्या किती कोटी असेल तें एक परमेश्वर जाणे! आज त्यांतले फक्त अडीच लक्ष लोकच उरले आहेत!!" असा अंगावर कांटा आणणारा उल्लेख लजपतरायांच्या पुस्तकांत सांपडतो. आज तीनशे वर्षांनंतरहि तेथील इंडियन लोकांच्या स्मरणांतून ही गोष्ट गेलेली नाहीं. व इंग्रजी शब्द ऐकला कीं त्यांचे कपाळास आढी चढते! "मित्रहो, परस्पर विश्वासाच्या प्रशस्त भूमीवर आपण उभे आहों. इंडियन लोक या देशाचे मालक आहेत ही गोष्ट विसरूं नका" हा विल्यम पेन या थोर क्वेकर पुढाऱ्यानें केलेला उपदेश फुकट गेला. Ingratitude! Thy name is man हें वाक्य खोटें कसें होईल?

मुदतबंदी मजुरांची पद्धति व गुलामगिरी हीं दुसरी एक गोष्ट अमेरिकेच्या इतिहासांत आलेली आहे तिचा निर्देश मुद्दाम केला पाहिजे. "स्वातंत्र्य! गुलामगिरीचा नाश!" असें ख्रिस्त-धर्मानुयायी (?) युरोपियन राष्ट्रें आज घरादारांच्या छपरावर उभें राहून जगास कितीहि कंठरवानें सांगत असलीं तरी, मनुष्यजातीच्या रक्तानें माखलेलीं इतिहासाचीं पानें वेगळी साक्ष देत आहेत! "जग म्हणजे केवळ युरोपखंड,

व मनुष्यजात म्हणजे गोरे लोक " अशी युरोपियन लोकांच्या भूतदयेची व्याख्या ना. गोखले हें विनोदानें वर्णन करीत. विकृत इतिहासाच्या वडाची साल स्वार्थबुद्धीनें राजकारणाच्या पिंपळास चिकटवितांनां टाईम्ससारखी वर्तमानपत्र हिंदु धर्मांतील अस्पृश्यांच्या 'गुलामगिरीची' पाल्हाळिक वर्णनें करीत असतात ! पण " ख्रिस्ती धर्माचा उदय होण्यापूर्वी रोमन अगर आर्य राष्ट्रांत ज्या प्रकारची गुलामागिरी चालत होती तिचें स्वरूप अगदी वेगळे होतें ! पण नंतर ख्रिस्ती राष्ट्रांनीं रूढ केलेली गुलामगिरी इतकी अघोरी भयानक व राक्षसी होती कीं पूर्वीची गुलामांची पद्धति तुलनेमध्यें या दुसरीच्या पासंगालाहि येणार नाहीं " असें जोसेफ मॅकेब, चॅपमन कोहेन, इत्यादि पाश्चात्य ग्रंथकारांनींच स्वच्छ ह्मटलें आहे. ब्रेस, लेकी, इनग्रॅम यांचे इतिहासग्रंथ काढून पाहिले तर, ख्रिस्ती धर्माला व माणुसकीलाहि या राष्ट्रांनीं कलंक लावल्याबद्दल या इतिहास-लेखकांनीं पदोपदीं धिक्कारच केला आहे. आफ्रिकेंतून झडप घालून माणसें पळवून आणीत आणि ज्या जहाजांतून तीं अमेरिकेच्या किनाऱ्यावर येत त्याचे नांव " जीजस क्राइस्ट " असें होतें ! ! खुद्द इंग्लंडच्या एलिझाबेथ राणीच्या मालकीचें हें जहाज होतें. " पूर्वी आफ्रिकेंत गुलामगिरी नव्हती, ख्रिस्ती राष्ट्रांनींच ती तेथें प्रथम सुरूं केली " असें ऑफ्रिकेंतील प्रवासी लीव्हिंगस्टन यानें लिहून ठेविलें आहे. १७१३ सालीं स्पेनपासून तहान्वयें निग्रो गुलामांचा व्यापार करण्याची सनद इंग्लंडनें तीस वर्षाच्या करारानें घेतली. दरसाल २५००० गुलाम अमेरिकेंत येत व १७९० सालीं ही संख्या सहा लक्ष सत्याण्णव हजार इतकी होती. अठराव्या शतकांत एकट्या लंडनमध्यें ऐशी हजार गुलाम असून हा व्यापार करणारीं शंभर जहाजें होती. लिव्हरपूलमध्यें १८५ जहाजांतून पन्नास हजार गुलाम विकण्या-करितां येत. व गुलामगिरी नाहींशीं करण्याचें बिल इंग्लिश पार्लमेंटांत आले तेव्हां एकट्या लिव्हरपूलतर्फे त्याविरुद्ध दोन हजार व्यापाऱ्यांनीं आपल्या सह्या दिल्या ! पार्लमेंटचेहि अनेक सभासद स्वतः हा गुन्हा करणारांपैकीं होते. व १७८९ सालचे पाहिले बिल १६३ विरुद्ध ८८

इतक्या प्रचंड बहुमतानें नापास झालें ! गुलामगिरीच्या शत्रुत्वाबद्दल आज नाकानें वांगीं सोलणारे इंग्रज लोक " बायबलमध्येंच गुलामगिरी विहित आहे " असें त्यावेळीं समर्थन करीत होतें हें लक्षांत ठेविलें पाहिजे. हेंच काय पण " एकोणिसाव्या शतकापर्यंत एकाहि प्रमुख ख्रिस्ती पुढाऱ्यानें गुलामागिरीविरुद्ध पुकारा केला होता असें दाखवितां येणार नाहीं. " असें ब्राइस याने स्वच्छ विधान केलें असून, जोसेफ मॅकेब याचे विधान तर फारच मार्मिक आहे. तो ह्मणतो " No christian leader denounced slavery until the nienteenth century *when the age of slavery was over* ! " या वाक्याच्या अर्थावर भाष्य करण्याचेंहि कारण नाहीं !!

अमेरिकेचें साम्राज्य याप्रमाणें रुधिर-प्रांदग्ध वास्तूवर कसें उभारले आहे हें पाहिलें ह्मणजे, अमेरिकेच्या आजच्या भौतिक सुसंपन्नतेवद्दल मनांत क्षणभर तिरस्कार व वैराग्य उत्पन्न झाल्याशिवाय रहात नाहीं. यामुळें तेथील सुधारणेच्या लखलखाटात व सुखाच्या साम्राज्यांत वास्तव्य करणाऱ्या लाला लजपतराय यांच्यासारख्या एकाद्या विवेकी हिंदी प्रवाशाच्या मनांत असा विचार डोकावल्याशिवाय राहिला नाहीं कीं हें चाललें आहे हें कांहीं ठकि लक्षण नव्हे ! (" All is not well with the world ") तथापि " अंतिम दृष्टीनें पाहतां पाश्चात्य संस्कृति श्रेष्ठ कीं पौर्वात्य संस्कृतीच अधिक हितकर याचा निर्णय करणें फार कठीण आहे " असें लजपतराय यांनीं आपल्या पुस्तकांत उद्गार काढले असले तरी, मला वाटतें कीं या दोन्ही संस्कृतींचा शहाणपणानें मेळ घालण्यांतच हिंदुस्थानचा आतां तरणोपाय आहे. कारण पौर्वात्य संस्कृति श्रेष्ठ असें ठरविलें तरी भौतिक सुधारणेमुळें पाश्चात्य संस्कृतीचें जगावर जें आक्रमण होत आहे तें कोणाला कोणत्याहि उपायानें टाळतां येणें शक्य आहे काय, हाच सर्वांत मोठा बिकट प्रश्न आहे. अशावेळीं " असाधु हा साधुत्वानें किंवा अनृत हें सत्यानें जिंकतां येणें शक्य नाहीं " हाच नीतिशास्त्रांतलि प्रतियोगीत्वाचा नियमच अधिक खरा व उपयोगी ठरतो असें

मला वाटतें. अर्थात् हिंदी लोकांनीं जे अमेरिकेकडे पहावयाचें तें ' हिंदु-संस्कृत्ति विरुद्ध पाश्चात्य संस्कृति ' या दृष्टीनें नव्हे; तर जीवनकलह जिंक-ण्याकरितां खुद्द इंग्रजांच्याच अमेरिकन देशबांधवांना इंग्लंडशीं ज्याप्रकारें हक्काकरितां भांडण करावें लागलें तो आदर्शच यावेळीं हिंदी लोकांना अधिक मार्गदर्शक होईल.

व या दृष्टीनें अमेरिकेचा इतिहास हिंदी राष्ट्राला आजच्या परिस्थितींत स्फूर्तिदायक वाटेल. इंग्रज राष्ट्राचा हिंदी लोकांचा आतां चांगला परिचय आहे! धर्मानें व संस्कृतीनें परक्या अशा हिंदी लोकांचा इंग्लंडनें स्वातंत्र्य-नाश केला तें एकवेळ असो, पण याहिपेक्षां स्वतःच्या हाडामांसाचे, स्वतःच्या धर्माचे, स्वतःच्याच राष्ट्राचे, किंवहुना तंतोतंत स्वतःच्याच संस्कृतीचे राष्ट्रबांधव देशांतर करून अमेरिकेंत वसाहत करावयास गेले असतां, केवळ इंग्लंडच्या साम्राज्याविषयक हट्टानें व जुलमी कारभारानें त्यांना इंग्लंड विरुद्ध बंड पुकारण्याची कशी पाळी आली, हें मर्म ओळख-णाऱ्या वाचकांनां इंग्लंडचा खरा स्वभाव अधिक चांगल्या रीतीनें प्रतीत होण्यासारखा आहे! आयर्लंड हे तर अमेरिकेइतकेंहि दूर नाहीं; पण इंग्लं-डच्या टांचेखाली आयर्लंड आठशें वर्षें खितपत होतें! स्वतःच्या देशबांधवाना इंग्लंडच्या हातून सुखासुखी स्वराज्य मिळालें नाही. त्याकरितां अखेर युद्ध झालें व तरवारीच्या खणखणाटानें या गोष्टीचा निर्णय लागला ! बर्क, चॅथॅम यांच्यासारख्या ज्या उदारधी मुत्सद्यांना अमेरिकन लोकांच्या न्याय्य आकांक्षा हाणून पाडण्याचें नाकारलें त्यांची " Trumpet of Sedi-tion " ह्मणजे " राजद्रोही, फितवे " अशी तिसऱ्या जॉर्जकडून हेटा-ळणी होऊन, हाऊस ऑफ कॉमन्स व हाऊस ऑफ लॉर्डस् या दोन्ही-सभांनीं अमेरिकेच्या स्वातंत्र्यावर नांगर फिरविण्याचे ठराव बहुमतानें पास केले !! याप्रसंगीं इंग्रज राष्ट्राचा खराखुरा अभिमान बाळगणाऱ्या बर्क, पीट यांसारख्या मुत्सद्यांनीं केलेली आवेशपूर्ण भाषणें वाचण्यासारखीं आहेत. " Had I been an American, as I am English-


man now, I would have never laid down my arms! *never* ! *never* ! " अशा जळजळीत शब्दांनीं वार्धक्यानें जर्जर झालेल्या पिटची सिंहगर्जना पार्लमेंटमध्यें चालू होती. पण इंग्लंडनें युद्ध थांबविलें नाहीं व अखेर त्यांत अपयश येऊन आपल्याच बांधवांविरुद्ध शस्त्र धरल्याचा कलंक मात्र इंग्लंडच्या कपाळीं कायमचा लागला ! जॉर्ज वॉशिंग्टन व बेंजामिन फ्रँकलिन हे कट्टे राजानिष्ठ लोक. पण त्यांनीं या बंडाचें पुढारीपण घेतलें, इतका इंग्लंडचा जुलूम स्वार्थी व मूर्खपणाचा होता ! याबद्दल प्रस्तुत पुस्तकात ' स्वातंत्र्य-युद्धाची कारणें ' हें समग्र सातवें प्रकरण तसेंच, पृष्ठें १९६ ते २०६ हीं फार वाचनीय आहेत. यांत अनेक ठिकाणी हिंदी वाचकांना आपण हिंदी चळवळीचेंच प्रतिबिंब पाहात आहोत कीं काय असा भास झाल्याशिवाय राहणार नाहीं.

परकीयांविरुद्ध बहिष्काराची तीव्र भावनाच अमेरिकेच्या उपयोगी पडलीं. अमेरिकन लोकांनीं पुढें कायदेभंगांत पाऊल टाकलें तें त्यांच्या मानसिक भावनेचें दुसरें रूप होय इतकेंच. आपलेपणाची भावना ही ठेवावी तशी आहे. स्वाभिमान व इभ्रत यांच्या खोट्या कल्पनांना बळी न पडता अमेरिकन वसाहतींशीं इंग्लंड थोडें अधिक उदारपणानें वागते तर, डोमिनियन स्टेटसमध्यें समाधान मानून अमेरिकेनें मातृदेशाशीं असलेल्या संबंधाचा खात्रीनें अभिमान बाळगला असता. कारण इंग्रज लोकांना आपल्या साम्राज्याचा अभिमान किती कट्टा असतो हें विख्यात आहे. पण त्या अभिमानाचा इंग्लंडनेंच अंत पाहिल्यावर "Live Ireland! Perish the Empire! " या ग्रॅटनच्या सुप्रसिद्ध उद्गारांप्रमाणें अमेरिका डोमिनियन स्टेटसच्या भ्रमांतून निघून तिनें निर्भेळ स्वातंत्र्यच प्रस्थापित केलें ! आज अमेरिकेचा व इंग्लंडचा काडीचाहि संबंध राहिला नसून अमेरिका पूर्ण स्वतंत्र आहे. स्वातंत्र्य प्रस्थापनेनंतर अमेरिकेचा पहिला प्रेसिडेंट विलायतेस गेला असतां इंग्लंडच्या राजानें त्याच्याशी हस्तांदोलन करून झटलें, " पूर्वी माझ्यासारखा तुमचा कट्टा दुष्मान कोणी नव्हता. पण आज तुम्ही माझे मित्र झाला आहां ! " याचे कारण अर्थातच ' स्वातंत्र्याची किमया ' होय हें वेगळें सांगावयास नकोच !

अमेरिकेशी भांडण सुरूं होतांच एका फ्रेंच मुत्सद्यानें भविष्य केलें होतें कीं वसाहती या साम्राज्य-वृक्षाच्या फळाप्रमाणें होत. त्या पक्व होईपर्यंतच साम्राज्याला चिकटून राहावयाच्या. " प्राप्ते तु षोडशे वर्षे पुत्रे मित्रवदाचरेत् " हें न ओळखल्याकारणानें इंग्लंडला अमेरिका अंतरली व आयर्लंड फुटून निघाले. सध्यांच्या काळी आयारिश पुढारी डी व्हॅलरा यानें राजनिष्ठेच्या शपथेचा वाद निकरानें धसाला लाविला आहे याचें तरी मर्म हेंच होय ! पूर्वी इंग्लंडच्या राजाविषयीं मान्यता व त्याचा प्रतिनिधी ह्मणून फक्त एका गव्हर्नर जनरलचा अधिकार मान्य केला ह्मणजे वसाहतींच्या डोमिनीयन स्टेटसमध्यें इतर कोणतेही व्यंग अगर बंधन नव्हते. तथापि अलिकडे नुकत्याच पास झालेल्या वेस्ट मिन्स्टर ॲक्टानें वसाहतीचें जवळ जवळ पूर्ण स्वातंत्र्य इंग्लंडनें मान्य केले आहे. १९२६ च्या साम्राज्य परिषदेनें सर्व वसाहती या स्वयंसत्ताक मानून त्यांचा दर्जा समान मानला. त्या सर्वांमध्यें उरलेले बंधन ह्मणजे फक्त बादशाहांशीं निष्ठा हें होय. पण त्याचाही अर्थ स्पष्ट करण्याकरितां एक तज्ञ मंडळ नेमण्यांत आले व त्याचा अहवाल १९३० च्या सामाज्य परिषदेंत सादर होऊन हल्लीचा वेस्ट मिनिस्टर कायदा जन्मास आला. तात्पर्य हल्ली हिंदुस्थानांतील नोकरशाही डोमिनियन स्टेटस या शब्दाचा अर्थ आपल्या स्वार्थी मनाप्रमाणें कसाही करीत असली तरी, साम्राज्यांतील वसाहतीचे बाबतींत डोमिनियन स्टेटस व संपूर्ण स्वातंत्र्य यांत फारसा भेद उरलाच नाहीं हें वाचकांच्या लक्ष्यांत येईल. इंग्लंडला जसजशा अधिकाअधिक अडचणी येत गेल्या तसतसे वसाहतीचे हक्क व अधिकार वाढत गेले असा मुळीं इतिहासाचाच दाखला आहे. सांप्रत जितके स्वातंत्र्य इंग्लंडला तितकेच वसाहतीना आहे. वसाहती या राष्ट्रसंघाच्या सभासद आहेत. त्यांचे स्वतंत्र परराष्ट्रीय वकील आहेत. व्यापारी तह अगर युद्ध करण्याचा त्याना अधिकार आहे. मात्र समजा एकाद्या वसाहतीनें खुद्द इंग्लंडशीच युद्ध पुकारलें तर काय स्थिति होईल हें पाहणें मौजेचे होईल. पण ही पुढची गोष्ट होय. तात्पर्य, वसाहतीचे स्वराज्य व

स्वातंत्र्य यांतील भेद केवळ नांवांत आहे, वस्तूंत नाहीं. पण हा भेद तूर्त लक्षांतही घेण्यांत अर्थ नाहीं, कारण आपण हिंदी लोक त्या दोहों पासून खूप दूर आहोंत ! स्वराज्य मिळविण्याचे प्रयत्न करीत असतां आज आपण डोमिनियन स्टेटसची भाषा बोलतो. पण स्वराज्य प्रत्यक्ष हातीं येण्याच्या काळापर्यंत हिंदुस्थानचीं स्वराज्याची कल्पना अधिक विस्तृतहि होईल, नाही कोणी ह्मणावे ?

डोमिनियनस्टेटसचा वाद सोडला तरी प्रस्तुत पुस्तकानें आणखी एक महत्वाची गोष्ट वाचकांच्या लक्षांत येते ती ही कीं, अमेरिकन लोकांना स्वराज्य स्थापन करण्यांत धर्मभेद, प्रांतभेद वगैरे कोणत्याही अडचणी दुस्तर वाटल्या नाहींत. हिंदुस्थानला स्वराज्य देतांना, तुमच्यांत पात्रता नाहीं, तुमच्यांत जातिभेद आहेत, तुमच्यांत धर्मभेद आहेत, मुसलमानाचे समाधान तुह्मी कसे करणार ? ८०० संस्थानिकांचीं तुह्मी काय वाट लागणार ? वगैरे हजार प्रश्न उपस्थित करून सरकार लोकांच्या तोंडावर मारते. पण अमेरिकेचा इतिहास पाहिला तर अशी एक गंमत दिसते कीं अमेरिकन लोकांनीं सर्वांना जाचणाऱ्या परकीय साम्राज्य सत्तेचा प्रथम निकाल लाविला व नंतरच राज्यघटना निर्माण केली. हे प्रश्न प्रथम सोडवून दाखविल्या नंतर त्यांना स्वराज्य मिळाले असें नव्हे ! धर्मभेदासारख्या अडचणींचें कोणी निष्कारण थोतांड माजविण्यांत अर्थ नाहीं. एका ख्रिस्तीधर्मातही पक्षभेद व मतभेद हे आमच्या जातिभेदापेक्षाहीं अधिक तीव्र आहेत. आपल्या वैशिष्ट्याचा आग्रह धरणाऱ्या ८५ ख्रिस्ती धर्मपंथांचीं नावानिशी मॅक्स ऑरेल या फ्रेंच ग्रंथकारानें 'जॉनबुल अँड हिज आयर्लंड, या पुस्तकात दिली आहे. व यांची खानेसुमारी ' ख्रिस्ती ' या एका नावानें होत नाहीं तर, शिरगणतीच्या वेळीं विशिष्ट पंथभेदानेच आपला उल्लेख झाला पाहिजे असा आग्रह या लोकांनीं धरल्याचे इतिहासांत नमूद आहे ! अमेरिकेच्या ज्या अनेक स्वयंसत्ताक संस्थानांनीं एकसूत्री सजीव राष्ट्र निर्माण केले त्यांचे आर्थिक संबंध हे तरी धर्मभेद व पंथभेद यापेक्षां त्यांना अधिक बिकट व जिव्हाळ्याचे असतील कीं नाहीं ? पण



वा सर्व प्रश्नांचा निकाल त्याना समजुतीनें करता आला यांचा अर्थ, त्याना इच्छा होतीच पण सत्ताहि होती. हे आपसांतील तंटे तोडताना अनेक मुत्सद्यांचे रक्त आटलें हें खरें. पण यादवी होऊन रक्तपात झाला नाहीं हे लक्षांत ठेवलें पाहिजे. रक्तपात झाला तो इंग्रजांची सत्ता झुगारून देतानांच झाला असेल तेवढा ! जबाबदारी पडली की सर्वाना शहाणपण येतेच. पण हातांतील सत्ता न सोडणाऱ्या परकीयांशीं हा वाद करण्यांत अर्थ काय ? स्वातंत्र्य प्रस्थापित झाल्यानंतर जबाबदारीची वाट चालता चालता अमेरिकन-राष्ट्राला विविध अनुभव आले. पण जॉर्ज वॉशिंग्टन व इतर संस्थानांचे मुत्सद्दी यांच्या विवेकाने व देशभक्तीनें अखेर बिकट परिस्थितीवर कशी मात केली याचे वर्णन या स्वातंत्र्ययुद्धापेक्षांहि मनोरंजक आहे. लायोनेल कर्टिस यांनीं आपल्या " कॉमनवेल्थ ऑफ दी नेशन्स " या पुस्तकांत ते फार समर्पक व खुलासेवार दिलें आहे. असो. प्रस्तुत ओगले यांचे पुस्तक फार योग्यवेळीं लिहिले गेले असून विशेषतः अमेरिकेमध्यें कांहीं काळ ग्रंथकर्त्यानें वास्तव्य केल्यामुळें, इतिहासाची मर्मदृष्टी सुंदर भाषेबरोबरच त्यांत ग्रथित झाली आहे. या दृष्टीनें ग्रंथकाराचे पुनः एकवार अभिनंदन करूनें ही प्रस्तावना पुरी करितो.

सातारा
२५ ऑगस्ट १९३२

काशिनाथ नरसिंह केळकर

ग्रंथसूचि

ज्या ग्रंथांचे आधारें पुस्तक लिहिण्यांत आले त्यांची यादी.

1 The rise of American civilization
C. A. & M. R. Beard.

2 The United States of America
W. H. Hudson & Irwin Guerney.

3 Columbus & Columbia
Historical Pub. Company. Philadelphia.


4 The United States of America
Lala Lajapatrai.

5 A search light on America
James Truslow Adams.

6 Industrial History of The United States
by Katharine Coman.

7 Economic Developement of The United States by Isaac Lippincott.

8 The American Government by Haskin.



युनायटेड स्टेटसच्या मूळ तेरा वसाहती
व लगतचा प्रांत

अमेरिकन लोक
व
त्यांची संस्कृति

प्रकरण १

प्रास्ताविक

रोमन साम्राज्याचे आरंभापासून, पूर्वेकडील संपन्न व प्रगतिमान राष्ट्रांशीं रोमन लोकांचा व्यापार चालूं होता. पूर्वेकडील बाजारांतून, रेशीम, तलम कपडा, सौगंधिक पदार्थ, मसाल्याचे जिन्नस, हास्तिदंत, मौल्यवान गालिचे, कलाकुसरीच्या वस्तू, बहुविध रत्नें, दिव्य औषधी वगैरे नामांकित चिजांनीं रोमच्या राजधानींतील व्यापारीपेठ फुलून गेली होती. संपत्तिमान युरोपियन राजेरजवाडे, अमीर उमराव, व्यापारी व त्यांच्या गुलहौशी स्त्रिया या चैनीच्या वस्तू खरेदी करण्याकरितां वाटेल तें मूल्य द्यावयास तयार असत. रोमन साम्राज्यांतील प्यूरिटन लोकांनीं, वाटेल ती किंमत देऊन तरुण स्त्रिया किंबहुना वृद्ध स्त्रिया सुद्धां सौंदर्यविकासाचे व चैनीचे पौर्वात्य जिन्नस खरेदी करून पैशाची अतोनात खराबी करितात, यासंबंधी बरीच ओरड केली; पण तिचा कांहींएक परिणाम न होतां तो व्यापार अबाधित चालला. रोमन साम्राज्याचे लयानंतर जर्मन शिलेदारांचे काळांतही पूर्वेकडील देशांशीं व्यापार चालू राहिला इतकेंच नव्हे तर त्याची सपाट्यानें वाढ होऊं लागली; व या व्यापारांत मुसलमान व इटालियन व्यापाऱ्यांची विलक्षण प्रगति होऊन त्यांना अपरंपार संपत्ति मिळूं लागली. मॅड्रिट, लिसबन, पॅरिस, ब्रूजेस व लंडन वगैरे युरोपांतील सर्व राजधान्यांतून पूर्वेकडील मालाला भरपूर मागणी असे. पूर्वेकडील देशांशीं व्यापार करणें धाडसाचें व कटकटीचें काम होतें. पण त्यांत फायदाही

तसाच जबर असे. चौदाव्या शतकाचे अखेरीस या व्यापाराचे कामीं एक मोठें विघ्न आलें. हा सर्व व्यापार मुख्यतः तीन मार्गांनीं चाले. सर्वांत उत्तरेकडचा मार्ग भूमध्य समुद्रांतून कास्पियन समुद्रापर्यंत व पुढें तेथून भूमार्गानें थेट पेकिन्पर्यंत होता. मधला मार्ग भूमध्य समुद्रांतून आशियांमायनर, तेथून यूफ्रेटीस व तैग्रीस या नद्यांमधून इराणचे आखात व तेथून अरबी समुद्राचे मार्गानें हिंदुस्थानपर्यंत होता. तिसरा दक्षिणेकडील मार्ग भूमध्य समुद्र व तांबड्या समुद्राचे मार्गें होता. या तीनही मार्गांचे नाक्यावर म्हणजे भूमध्य समुद्राचे पूर्वेकडील भागांत तुर्क लोकांचें आधिपत्य स्थापन झालें. त्यांनीं व्यापारी मालावर जबर कर लादले, त्यामुळें व्यापाराची गळचेपी होऊं लागली. पूर्वेकडून येणाऱ्या व्यापाराचें महत्व विशेष होतें व मध्ययुगीन यूरोप सर्व ऐषआरामाचे पदार्थांचे बाबतींत पूर्वेकडील व्यापारावर अवलंबून होता. ज्याअर्थी सर्व चैनीचे व कारागिरीचे पदार्थ पूर्वेकडील देशांतून येतात त्याअर्थी तेथें सोन्याचा धूर निघत असला पाहिजे अशी केवळ धाडशी प्रवाशांचीच नव्हे, तर युरोपांतील सामान्य जनसमूहाची सुद्धां कल्पना असणें साहाजिक होतें. याच कल्पनेमुळें तत्कालीन प्रवाशांचे मनांत थेट हिंदुस्थानला जाण्याचा समुद्रमार्ग शोधून काढण्याचें आलें. स्पेन-पोर्तुगालचे राजांनीं निरनिराळ्या प्रवाशांस या कामीं फार मदत केली, व दक्षिण युरोपामध्यें दर्यावर्दी लोकांत फार लांब लांबच्या सफरी करण्याची अहमहमिका सुरूं झाली. आफ्रिकेच्या पश्चिम किनाऱ्यानें पोर्तुगीज खलाशांनीं लांब लांब सफरी सुरूं केल्या.

इ. स. १४४१ सालीं नूनो ट्रिस्टाम केप ब्लँकोपर्यंत गेला. पुढें डिनिस डायाझ हा केप व्हर्डपर्यंत गेला. इ. स. १८४६ सालीं बार्थो लोमेो डायाझ हा आफ्रिकेचे दक्षिण टोंकास वळसा घालून पुढें गेला पण येथें त्याचे खलाशांनीं अधिक पुढें जाण्याचें साफ नाकारिलें. पुढें थोडेच वर्षांनीं म्हणजे इ. स. १४९७ सालीं वास्को डी गामा यानें हिंदुस्थान गांठलें. इतकेंच नव्हे तर उत्तमोत्तम पदार्थ आपल्या जहाजावर लादून घेऊन तो पोर्तुगालला परत आला. इ. स. १४९२ सालीं कोलंबसाचे डोक्यांत अशी



अमेरिकेच्या किनाऱ्यावर कोलंबसाचें प्रथम आगमन. पान ३.

१ लें) हिंदुस्थानचा शोध लागला ?

कल्पना आली कीं, पृथ्वी ज्याअर्थीं वाटोळी आहे, त्याअर्थीं पश्चिमेकडून पूर्वेकडील हिंदुस्थान देशास तरी कां पोहोंचता येऊं नये ? ह्मणून या नवीन दिशेनें त्यानें प्रयत्न सुरूं केले. आफ्रिकेस वळसा घालून गेल्यास हिंदुस्थान फार लांब पडेल असें त्याचे मनानें घेतलें होतें. कोलंबसास त्याचे या धाडसाचे प्रवासाचे कामीं स्पेन देशाचे राजानें व राणीनें सर्व मदत करण्याचें कबूल केलें. तो तारीख ३ ऑगस्ट रोजीं स्पेनचे किनाऱ्यावरून निघाला. तो प्रथम दक्षिणेकडे निघाला व त्यानें कनेरी बेट गांठलें, व तेथून अनुकूल वाऱ्याचे दिशेनें थेट पश्चिमेकडे गेला. आक्टोबर महिन्याचे बाराव्या तारखेस त्याचे नजरेस नवीन जमीन पडली. त्याला वाटलें कीं आपण हिंदुस्थानास पोहोचलों खास ! यावेळीं तो हल्लीं बहामा या नांवानें संबोधिल्या जाणाऱ्या बेटास पोहोंचला होता. थोड्याच दिवसांत त्याला आपण पोहोंचलों तो देश मोठा नसून एक बेट आहे असें आढळून आलें. पुढें त्यानें लगतच्या ह्मणजे क्यूबा व हयाटी बेटांचा शोध लावला. हिंदुस्थानच्या किनाऱ्यालगतचींच हीं बेटें असलीं पाहिजेत असें त्याचे मनानें घेतलें व त्यांना तो ' इंडिज ' असें ह्मणूं लागला. हिंदुस्थानचा शोध लागल्यानंतर या बेटांस मग ' वेस्ट इंडिज ' असें नांव पडलें. कोलंबसानें ' वेस्ट इंडिज् ' च्या तीन सफरी केल्या. अगदीं शेवटच्याच सफरींत कायतो तो खरा मध्य अमेरिकेच्या किनाऱ्यास लागला होता. मरेपर्यंत आपण हिंदुस्थानच्याच किनाऱ्याचा शोध लावला या कल्पनेनें त्याला सोडलें नाहीं. या मुलखापासून पुढें आशिया खंड किती दूर आहे याची त्याला कल्पनाही आली नाहीं. वेस्ट इंडिजमधील सुंदर वनश्री, घनदाट अरण्यें, बहुविध रंगांच्या फळांपुष्पांनीं समृद्ध भूमि, ऊस, केळीं व ताडांचीं झाडें, उष्ण हवा, निरभ्र व नीलवर्ण आकाश, वगैरे युरोप खंडापासून पूर्ण भिन्न वातावरणांत आलेल्या कोलंबसास हें हिंदुस्थान असें वाटल्यास त्यांत नवल तें कोणतें ?

कोलंबसाप्रमाणें इतरही प्रवासी या नवीन जगाकडे निरनिराळ्या दिशांनीं जावयास निघाले. इ. स. १४९७ सालीं जॉन कॅबट हा ब्रिस्टोनहून निघाला. कोलंबसापेक्षां अधिक उत्तरकडील दिशेनें त्यानें

प्रवास करून थेट न्यूफाऊंडलंड गांठलें. तेथून पुढें सेंट लॉरेन्स नदींतून केप ब्रिटन आयलंडपर्यंत जाऊन परत युरोपास आला. दुसऱ्या खेपेस थेट लाब्राडोर पासून तों फ्लोरिडापर्यंत त्यानें उत्तर अमिरिकेच्या पश्चिम किनाऱ्यानें प्रवास केला.

अमेरिगो व्हेसपूसी नांवाच्या इटालियन गृहस्थाचें नांवच या नवीन खंडास मिळालें. 'अमेरिका' असें या नवीन खंडाचें नांव ठेवण्याबद्दल एका भूगोल शास्त्रवेत्त्या जर्मन प्रोफेसरानें पोर्तुगालचे राजास शिफारस केली. अमेरिगो व्हेसपूसी हा इ. स.१५०० शें चे सुमारास पोर्तुगालचे राजाचे मदतीनें ब्राझिलचे किनाऱ्यास येऊन पोंहोंचला. त्यानें बऱ्याच आंत-पर्यंत या देशाचा शोध लावला व उपयुक्त अशी माहिती प्रसिद्ध केली. हा देश हिंदुस्थान नसून स्वतंत्र व विस्तृत असें एक खंडच आहे ही गोष्ट अमेरिगसनेंच प्रथम जाहीर केली, ह्मणून त्याचेंच नांव या नवीन प्रदेशास मिळालें हें योग्यच झालें. पुढें हेंच नांव उत्तर दिशेकडील मुलखांस ह्मणजे हल्लींच्या युनायटेड स्टेट्सलाही लावण्यांत आलें. खुद्द कोलंबसाचें नांव त्यानें शोध न लाविलेल्या कानडांतील दुसऱ्याच एका प्रांतास त्याचें स्मारक ह्मणून देण्यांत आलें आहे. तसेंच युनायटेड स्टेट्समध्यें बरींच शहरें व संस्था त्याच्या नांवानें संबोधिल्या जात आहेत.

बालबोवा नांवाच्या स्पॅनिश गृहस्थानें १५१३ सालीं पनामा संयोगभूमि ओलांडली.)

पुढें इ. स. १५२०-२१ सालीं मागलान नांवाच्या गृहस्थानें दक्षिण अमेरिकेच्या दक्षिण टोंकास असलेल्या 'मागेलान' सामुद्रधुनींतून पॅसिफिक महासागरांत प्रवेश केला. या समुद्र प्रवासांत त्याची सफर फार शांतपणें पार पडली. कांहीं वादळें वगैरे झालीं नाहींत त्यामुळें त्या समुद्राला 'पॅसिफिक' (प्रशांत) महासागर नांव पडलें. युरोपांतून आतांपर्यंत जे लोक आले त्यांचा मुख्य हेतु मिळेल तितक्या झपाट्यानें संपत्ति मिळवि-ण्याचा होता. त्यांनीं मूळच्या रहिवाशांशीं व्यापार सुरूं केला. या प्रथमच्या व्यापारांत स्पेनचींच जहाजें विशेष दिसत असत. त्यांतील कांहीं लोकांनीं

वसाहती केल्या, व तेथील खनिज संपत्तीची माहिती करून घेतली. युरोपांतून पुष्कळ मजूरही आणण्यांत आले, त्यांच्याच्यानें काम होईना, तेव्हां आफ्रिकेंतून निग्रो लोक पकडून आणून त्यांना गुलाम ह्मणून नवीन देशांतील शेतांतून व खाणींतून कामास लावून स्पॅनिश लोकांनीं अतोनात सोनें, चांदी वगैरे पैदा केली, व थोडेच दिवसांत स्पेन देशांत संपत्तीचा पूर लोटूं लागला. अमेरिकेंत जाणारीं सर्व जहाजें स्पेनमधील सेव्हील बंदरांतून निघत. तीं सर्व सेव्हील येथील व्यापाऱ्यांचींच होतीं, व फक्त सेव्हीलच्याच व्यापाऱ्यांस नवीन वसाहतींत व्यापार करण्याचे खास परवाने देण्यांत येत असत. सोळाव्या शतकाचे प्रथमार्धांत, पेरू, मेक्सिको, व मेक्सिकोच्या आखातांतील वेटें येथेंच सर्व व्यापार चालूं होता व तो फक्त स्पॅनिश लोकांचेच हातांत होता. इतर देशांतील लोकांस स्पॅनिश जहाजें आसपास फिरकूंहि देत नसत.

इ. स. १५१३ ते १५४२ चे दरम्यान स्पॅनिश लोकांनीं मेक्सिकोचे आखातास मिळणाऱ्या नद्यांतून वर ह्मणजे युनायटेड स्टेटस्चे दक्षिण भागांतील प्रांतांत बऱ्याच आंतपर्यंत प्रवेश केला होता. पण या सफरींचा उद्देश वसाहती करून राहण्यासाठीं सुखावह जागा शोधण्याचा नसून फक्त सोनें व चांदी यांच्या खाणीच शोधण्याचा होता. दैववशात तो सफल न झाल्यामुळें त्यांना तेथून परत फिरावें लागलें.

या नवीन खंडाच्या अंतभागांत प्रवेश करून त्याचा पूर्ण शोध लावण्याचे कामीं फ्रेंच लोकांनीं वरेंच यश संपादन केलें. सेंट लॉरेन्स नदींतून कानडाचे प्रांतांत शिरून त्यांनीं सावकाशपणें तेथील मूळचे लोकांशीं ह्मणजे इंडियन लोकांशीं व्यापार आरंभिला. हळूं हळूं मिचिगन सरोवरांतून पलीकडील प्रांतापर्यंत त्यांनीं शोध लाविला. चॅप्लेन नांवाचा गृहस्थ ओटावा नदींतून पोर्ट ह्यूरॉनपर्यंत पोहोंचला, पुढें जीन निकोलस हा विसकानसीन-पासून इलिनॉयपर्यंत गेला.

जॉन कॅबट याचा मुलगा सिबॅस्टियन कॅबट यानेंहीं बापाच्या मागोमाग अमेरिकेच्या सफरी केल्या. त्यानें लाब्राडोरचे किनाऱ्यापर्यंत मजल

ांठली. त्यानंतर त्यानें न्यू ब्रन्सविक, नोव्हास्कोशिया, व मेनलँडपर्यंत प्रवास केला. सिबॅस्टियन कॅबटचे अमदानींत म्हणजे पंधराव्े शतकाचे शेवटीं नौकायनासंबंधींचे शास्त्राची माहिती वेतार्चीच उपलब्ध होती. समुद्रांतिल अन्तःप्रवाहांनीं हवेच्या उष्णतामानांत फरक होतो हें त्यावेळच्या प्रवाशांस माहीत नसावें असें दिसतें. भूमध्यरेषेपासून ठरीव अंशावर ठरीव उष्णतामान असावयाचेंच अशी त्यांची समजूत होती. इंग्लंडमधील दमट हवा व बेताची थंडी तितक्याच अंशावर असलेल्या अमेरिकेंतील प्रदेशांत असेल हा कॅबटचा अंदाज साफ चुकला. अमेरिकेच्या थंडीच्या कडाक्यानें त्याची गठडीच वळण्याचे वेतांत आली.

अमेरिकेंतील उत्तर प्रदेशांत कॅबट प्रथम जाऊन पोहोचला. इंग्लिश जहाजांतील खलाशांनीं ही भूमि प्रथम पाहिली येवढी गोष्ट त्या प्रदेशावर हक्क सांगण्यास इंग्रज लोकांस पुरेशी होती. कारण त्यावेळच्या युरोपीय कायद्याप्रमाणें म्हणजे युरोपांतील ख्रिस्ती राज्यकर्त्यांमध्यें असें ठरलें होतें कीं, इतर ख्रिस्तीधर्मविहीन राष्ट्रांतील जमीन ज्या राष्ट्राच्या प्रथम नजेरस पडेल त्यानें घ्यावी. या ठरावांत परकी राष्ट्रांतील मूळच्या लोकांस कांहीं हक्क असतात, या गोष्टीची जाणीवही नव्हती; व जसजसें नव्यानव्या प्रांतांचें आक्रमण होत गेलें तस तसा तेथील रहिवाशांचा नायनाट होत गेला. इंग्रज जहाजाचा कप्तान हातांत निशाण फडकावीत लाब्राडोरपासून केप हॅटर्सपर्यंत, इतर कोठल्याही युरोपियन राष्ट्रांचे अगोदर गेला. ब्रिटिश जहाजांतील लोकांनीं ही भूमि लांबून कां होईना, अवलोकन केली होती ही गोष्ट त्यांची तेथें मालकी स्थापन होण्यास पुरेशी होती. मग त्या गोष्टीकडे भावी इतिहासकार कोणत्याही दृष्टीनें पाहोत.

सिबॅस्टियन कॅबट याच्या कामगिरीचें, त्यावेळेचा कंजूष व आपमतलबी राजा सातवा हेनरी याचेकडून व्हावें तसें कौतुक झालें नाहीं. सातव्या हेनरीला त्याच्या कामगिरीचें महत्व पटलें नव्हतें असें मुळींच नाहीं, पण कांहीं एक बक्षीस दिलें नाहीं तरी चालण्यासारखें आहे असें त्यानें पाहिलें. मग विनाकारण खर्च कां ? त्याचा स्वभावच तसा हे



कोलंबसाचें अमेरिकेहून स्वदेशीं आगमन. पान ६.

सोन्याची अशोधित धातु

आठव्या हेनरीचे मरणानंतर, स्पेनचा राजा फर्डिनांड यानें कॅबटला स्पेनमध्यें नेलें व त्याला सर्व स्पॅनिश आरमाराचा पायलट मेजर केलें. त्याच्या कारकीर्दीत स्पेनच्या एकूणएक आरमाराचा तो पूर्ण अधिकारी होता, व त्यानें बऱ्याच सफरीही यशस्वी रीतीनें केल्या. पुढें सिबॅस्टियन कॅबट म्हातारा झाला त्यावेळीं म्हणजे इ. स. १५४८ चे सुमारास चौथ्या जॉर्जचे कारकीर्दीत त्याला इंग्लंडांत परत बोलाविण्यांत आलें, व ग्रँड पायलटचा हुद्दा देण्यांत आला.

यानंतर थोडे वर्षांनीं एलिझाबेथ राणीचे कारकीर्दीत दर्यावर्दी व्यापारास जोर चढला. अमेरिकेंतून स्पेन देशानें आणिलेली अगणित संपत्ति लोकांचे डोळ्यांवर आली होती. इतकेंच नव्हे तर तिच्या योगानें व्यापारावर बराच परिणाम होऊन देशांतील जिनसांच्या किंमती चढूं लागल्या होत्या. स्पेन देशांतील व्यापाराची पद्धत म्हणजे सर्व गोष्टींत तेथील सरकारचे तंत्रानें चालावयाचें. जहाजें व सर्व संपत्ति यांचें मालक सरकारच होतें. इंग्लंडनें या बाबतींत निराळें धोरण स्वीकारलें होतें. खाजगी रीतीनें स्थापन झालेल्या मोठमोठ्या कंपन्यांना सरकारी परवाने घेऊन व थोडेसे कर भरून व्यापार करण्याची मुभा होती.

इ. स. १५७६ च्या जून महिन्यांत फ्रोबिशर नांवाचा कुशल दर्यावर्दी, अर्ल ऑफ वारविक याच्या मदतीनें तीन जहाजांचा एक तांडा बरोबर घेऊन नवीन सांपडलेल्या देशाकडे निघाला. पाऊणशेंपेक्षां अधिक वर्षें झालीं तरी या लोकांस अद्यापि आपण पश्चिमेकडून हिंदुस्थानकडेच जात आहोंत असा भ्रम होता. फ्रोबिशरला थोड्याच वेळांत एक वादळ लागलें. त्यांत एक जहाज निकामी झालें, व दुसऱ्यानें परत पळ काढला, तरी तो बिलकूल डगमगला नाहीं. तो तसाच पुढें गेला. उत्तर दिशेनें जहाज हांकीत हांकीत तो हडसन सामुद्रधुनीपर्यंत येऊन पोहोंचला. आशिया खंडाचेंच एक टोंक आपणांस सांपडलें आहे असें त्यास वाटत होतें. त्यानें परत जातांना तेथील एक एस्किमो राहिवाशी व एक जातीचा दगड इंग्लंडला नेला. हा दगड सोन्याची अशोधित धातु आहे असें त्याला वाटत होतें. या नवीन सांपडलेल्या प्रदेशास फ्रोबिशरनें ' मेटा इन्कॉगनिटा ' असें नांव दिलें.

फ्रोबिशर, एक एस्किमो व सोन्याची अशोधित धातु घेऊन इंग्लंड-मध्यें पोहोंचला माल, लगेच जिकडे तिकडे या गोष्टीचा पुकारा झाला. सोनें सांपडलें! मग काय विचारतां? इंग्लंडचे वाहू पराक्रमानें स्फुरूं लागले, खुद्द एलिझाबेथ राणीसुद्धां फार खूष झाली. तिनें आपण स्वतः एक जहाज फ्रोबिशरला बहाल केलें. दुसरा अनेक जहाजांचा तांडाच्या तांडा 'मेटा इन् कॉगनिटा' ला निघाला. निघतांना या सर्व तांड्याचा मोठा जयजयकार करण्यांत आला. कारण आतां हीं सर्व जहाजें सोन्यानें भरून येणार होतीं! फ्रोबिशरचीं जहाजें नवीन देशाचे किनाऱ्यास येऊन पोहोंचलीं, पण यावेळीं जितक्या उत्तरेस जावयास पाहिजे होतें तितकें जातां आलें नाहीं, असें त्यांस आढळून आलें. या प्रदेशांत बर्फाचे डोंगरचे डोंगर समुद्रांमध्यें तरतांना त्याला आढळून आले. ते एका ठिकाणीं स्थिर नसून तरंगत असत. अशा डोंगरांमध्यें सांपडून जहाजांची दामटी वळते कीं काय अशी त्याला भीति वाटूं लागली. भर उन्हाळ्याचे दिवस, तरी थंडी इतकी कडक होती कीं त्याला बाहेर तोंड काढवेना. खलाशी लोक कंटाळून गेले व या ठिकाणाहून केव्हां परत फिरतों असें त्यांना झालें होतें. तो सर्व तांडा तसाच रिकाम्या हातानें इंग्लंडला परत आला. या तांड्यावर इंग्रज लोकांनीं भित्रट व नामर्द असा शिक्का मारला; पण फिरून त्यांनीं दुसरा मजबूत व सुसज्ज अशा पंधरा जहाजांचा तांडा उभा केला; व या नवीन प्रवासाचे सर्व खर्चाची तरतूद एलिझाबेथ राणीनें केली. या पंधरा जहाजांपैकीं तीन नव्या देशांत राहून बाकी बारा सोन्यानें भरून परत यावयाचीं होतीं. ठरल्याप्रमाणें हा सर्व तांडा बरेच धक्के खात खात इच्छित ठिकाणीं म्हणजे 'मेटा इन्कॉगानिटा' येथें सुखरूप पोहोंचला. चकाकित दिसणारी अशोधित धातु अत्यंत कडाक्याचे थंडींत सुद्धां मोठ्या कष्टानें त्यांनीं भरून घेतली, पण काय? दुर्दैव! त्याचे खाण्यापिण्याचे जिन्नस असलेल्या जहाजानें पळ काढला व इंग्लंड गांठलें. काय करतात बिचारे! उपाशीं मरण्याची पाळी सर्व जहाजांचे खलाशांवर येऊन गुदरली. मोठ्या कष्टानें हा खलाशी तांडा परत स्वदेशीं येऊन पोहोचला.

सर हंफ्रे जिलबर्टची कल्पना

चकचकणारी धातु कमी दर्जाचा अभ्रक व शुद्ध माती यांचें मिश्रण आहे असें आढळून आलें. व अशारीतीनें या शेख महमंदी स्वप्नाचा शेवट झाला ! ही गोष्ट इ. स. १५७९ चे सुमारास घडली.

एलिझाबेथ राणीचे कारकीर्दीत सर फ्रान्सिस ड्रेक या इंग्रजी कप्तानानें खाजगी आरमार वाळगून चांचेगिरी आरंभिली. स्पेन देशास येणाऱ्या जाणाऱ्या जहाजांवर धाड घालून त्यानें अलोट संपत्ति मिळविली. पुढें यानें आरमार अमेरिकेस गेलें. तेथेंही पॅसिफिक समुद्राचे बाजूस तळ देऊन त्यानें स्पेनच्या जहाजांस सळो का पळो करून सोडलें. पुढें याही धंद्यास कंटाळून त्यानें अमेरिकेचे पश्चिम किनाऱ्यानें उत्तरेकडे प्रवास सुरूं केला. तो थेट ओरेगामपर्यंत गेला होता. वाटेंत सॅन फ्रॉन्सिस्को येथें त्यानें एक किल्ला बांधिला, व तो तेथील इंडियन रहिवाशांचा राजा बनला. फ्रॅन्सिस ड्रेक वरोबरचे खलाशांस येथील थंड हवा मानवेना म्हणून तो पुन्हां मेक्सिकोस परत फिरला, व पुढें स्वदेशीं आला. म्हणजे इ. स. १५८० पर्यंत इंग्रजांची खास वसाहत अशी अमेरिकेंत स्थापन होऊं शकली नाहीं.

अमेरिकेच्या किनाऱ्यावर शेती आणि व्यापार करण्यासाठीं, स्वतंत्र वसाहत करण्याचें आतांपर्यंत कोणाचे डोक्यांत आलें नव्हतें. प्रथमतः सर हंफ्रे जिलबर्ट यानें ही कल्पना काढली. याच गृहस्थानें प्रथम " वायव्य दिशेनें प्रवास करून हिंदुस्थानचा मार्ग " या विषयावर एक पुस्तक लिहिलें होतें. याच पुस्तकांतलि कल्पनांनीं उत्तेजित होऊन फ्रोबिशर हा आपल्या प्रवासास उद्युक्त झाला होता. सर हंफ्रे जिलबर्ट यानें आपली कल्पना एलिझाबेथ राणीपुढें मांडली. एलिझाबेथ राणीनें त्याचे म्हणण्यास संमति दिली. इतकेंच नव्हे तर, अमेरिकेंत जाऊन न वसाहत केलेली अशी सहाशें चौरस मैल जागा काबीज कर आणि ती तुला बक्षीस घे असें सांगितलें. त्याचप्रमाणें तेथें वसाहत करून त्या वसाहतीचा मालक व गव्हरनर हो, म्हणून त्याला परवाना दिला. झालें ! इतकी परवानगी मिळतांच सर हंफ्रे जिलवर्ट व त्याचा सावत्र भाऊ सुप्रासिद्ध सर वॉलटर रॅले हे दोघे पांच जहाजांचा तांडा घेऊन १५८३ चे जून महिन्यांत अमेरिकेस गेले. अवघ्या

दोन दिवसांतच बरोबरच्या एका जहाजानें पळ काढला व तें परत इंग्लंडला आलें. जिलबर्ट व रॅले ऑगस्टमध्यें न्यू फाऊंडलंड येथें पोहोचले. हे दोघेहि बंधू किनाऱ्यावर उतरले व आपल्या राणीच्या नांवाचा जयजयकार करून त्यांनीं तो मुलुख ताब्यांत घेतला. ते उतरले होते तेथेंच एका टेकाडाचे बाजूस अभ्रकाची माती चमकत असतांना कांहीं खलाशांस दिसली. सर हंफ्रे जिलबर्टनें बरोबर एका धातुशास्त्रविशारदासही आणलें होतें. त्यानें सांगितलें कीं ही चांदीची अशोधित धातु आहे. खलाशी लोकांत बंड उद्भवलें. त्यांच्यापैकीं कांहीं ही अशोधित चांदी खोदून आणण्यास व ती जहाजांत भरण्यास निघून गेले. बाकीच्या लोकांनीं स्पॅनिश व पोर्तुगीज जहाजांवर हल्ला करून त्यांना लुटण्याची कामगिरी आरंभिली. थोडेच दिवसांत एक जहाज नादुरुस्त झाल्याचें आढळून आलें. तें तेथेंच सोडून देऊन उरलेल्या तीन जहाजांनिशीं तो दक्षिणेकडे चालला. मॅसॅचुसेट्स्चे किनाऱ्यानजीक त्यांचें सर्वांत मोठें जहाज, त्यावरील काल्पनिक चांदीची अशोधित धातु व खलाशी हे सर्वच मोठें वादळ झाल्यामुळें समुद्राच्या तळाशीं गेले. उरलेल्या दोन जहाजांनिशीं ते परत फिरले, पण दुर्दैवानें त्यांचा पाठ पुरावली. त्यांचीं दोन्हीहि जहाजें निकामीं झालीं व गळूं लागलीं. सर हंफ्रे जिलबर्टचें ' स्किवरल ' नांवाचें जहाज वादळांत सांपडून सर्व खलाशांनिशीं ' समुद्रास्तृप्यन्तु ' झालें फक्त एका जहाजानिशीं सर वॉलटर रॅले इंग्लंडास कष्टी अंन्तःकरणानें परत आला.

पण अशा रीतीनें केवळ निसर्गाचे अवकृपेनें परत यावें लागलें म्हणून त्याचा धीर खचला नाहीं; तर उलट त्याचे मनानें हें वसाहतीचें काम तडीस नेण्याची उचल खाल्ली. एलिझाबेथ राणीपासून पुन्हां त्यानें एक सनद करून घेतली, तिच्या अन्वयें तो बऱ्याच मोठ्या भूप्रदेशाचा मालक बनणार होता. तें एक स्वतंत्र संस्थानच करावयाचें ठरलें असून त्याची सर्व व्यवस्था रॅलेनें पहावयाची होती व तो प्रदेश फक्त इंग्लंडच्या राणीच्या राज्याचा भाग समजला जाणार होता. या नवीन संस्थानांत इंग्लंडमधून वसाहतवाल्यांस भरपूर जमीन व इतर वसाहत करण्यास लागणारी सर्व मदत मिळणार होती.

१ लें) इंडियन राणीचा पाहुणचार

या नवीन वसाहतीस जागा शोधावयाची ती उत्तरेकडील थंड व वर्फमय मुलुखांतील न शोधतां डिलावेटच्या समशीतोष्ण किनाऱ्यापाशीं शोधण्यांत यावयाची होती. पुढील आघाडीस दोन जहाजांचा तांडा तयार करून त्यावर फिलिप आमिडास व आर्थर बार्लो या दोन कसलेल्या दर्यावर्द्यांची कॅप्टन म्हणून नेमणूक करण्यांत आली. इ. स. १५८४ च्या एप्रिल महिन्याचे २७ तारखेस या आघाडीचे तांड्यानें कूच केलें. प्रथम कनेरी बेटापर्यंत जाऊन त्यांनीं 'वेस्ट इंडीज्' बेटें गांठलीं व त्यानंतर १३ जुलै रोजीं त्यांचीं जहाजें ओकॅकोक नांवाच्या नदींतून वर शिरलीं. समुद्र प्रशांत होता. भोंवतालच्या रम्य भूप्रदेशानें त्यांचीं मनें आकर्षून घेतलीं, एखाद्या उत्तम उद्यानांतच आपण प्रवेश करीत आहोंत असें या सर्व खलाशांस वाटूं लागलें. त्यांचीं मनें आनंदानें प्रफुल्लित झालीं. त्या प्रदेशांतील मूळचे रहिवाशी सुद्धां स्नेहभावपूर्ण व प्रेमळ असल्याचें आढळून आलें. लवकरच या पार्टीनें 'रोयानोक' नांवाच्या बेटावर वसाहत करण्याचें ठरविलें या बेटावरील 'इंडियन' राणीनें त्यांचा चांगला पाहुणचार केला. सुमारें दोन महिन्यांपर्यंत तेथें राहिल्यानंतर आमिडास व बार्लो दोघेहीं इंग्लंडास परत आले. कारण त्यांच्यामध्यें वसाहतवाल्यास योग्य ती सहनशक्ति किंवा धोरण असल्याचें दिसून आलें नाहीं. मात्र या नवीन भूप्रदेशाच्या सौंदर्याचें काव्यमय वर्णन करून इंग्लंडांतील लोकांचीं मनें त्यांनीं गुंग करून सोडलीं. या नवीन प्रांताचें नांव एलिझाबेथ राणीनें स्वतःचे चारित्र्यानुरूप 'व्हर्जिनिया' (कौमार्यभू) असें ठेविलें.

आपल्या वसाहतीच्या घोरणास सर वालटर याने १५८४ सालीं पार्लमेंटची संमति व कांहीं अधिक सवलती मिळविल्या. असें करण्यांत त्याचा हेतु केवळ अधिक सवलती मिळविण्याचा नसून आपल्या मसलतीस सार्वजनिक संमति मिळविण्याचा व तिची प्रसारणा करण्याचा होता. इकडे आमिडास, बार्लो व त्याचे बरोबरचे लोक या नवीन भूप्रदेशाची मुक्तकंठानें स्तुति करीत होते. तेथील संपत्तीचीं अद्भुत वर्णनें वाचून वसाहतेच्छु लोकांचे तोंडास पाणी सुटलें असेल यांत नवल नाहीं.

नवीन वसाहतीचे कामास जोरानें चालना देण्याचें ठरल्यानंतर रॅलेनें पुन्हां एक जहाजांचा तांडा उभारला. नवीन प्रदेशावर सर राल्फ-लेन याची गव्हरनर ह्मणून नेमणूक केली व सर रिचर्ड ग्रेनव्हील यास या तांड्याचा कप्तान करण्यांत आलें. सर राल्फ याचें एलिझाबेथ राणीशीं दूरचें नातें होतें व सर रिचर्ड हा रालेचा चुलतभाऊ होता. दोघांचेंही इंग्लंडच्या दरबारांत चांगलें वजन होतें.

या नवीन वसाहतवाल्या टोळींत मुख्यत्वेंकरून इंग्लंडांतलि बड्या लोकांचीं तरुण व हूड मुलेंच होतीं, या तांड्यांत सात जहाजें होतीं. इ. स. १५८५ च्या एप्रिल महिन्यांत निघून जून महिन्यांत ही वसाहत-वाल्यांची टोळी तेथें पोहोंचली. वाटेंत एका टोंकापाशीं मोठें वादळ झालें, त्यावरून त्या टोंकाचें नांव ' केप फियर ' असें पडलें. तेथून मोठ्या शिक-स्तीनें निघून सुमारें सहा दिवसांनीं सर्व ' रोयानक ' बेटावर सुखरूप पोहोंचले.

येथेंच वसाहत करण्याचें ठरल्यामुळें सुमारें १८० लोक या बेटावर उतरले. लवकरच त्यांनीं सभोंवतालच्या भूप्रदेशांत प्रवेश करून माहिती मिळविण्यास सुरुवात केली. एके दिवशीं कांहीं निमित्तानें मूळच्या रहिवा-शांशीं तक्रार होऊन सर रिचर्ड ग्रेनव्हील यानें इंडियन लोकांच्या सबंध गांवास आग लावून दिली व त्यांचीं मक्याचीं शेतें सुद्धां उध्वस्त करून टाकलीं. बाकीच्या वसाहतवाल्यांस या बेटावरच ठेऊन, सर रिचर्ड ग्रेनव्हील इंग्लंडांत परत आला, येतांना त्यानें एक स्पॅनिश जहाज मौल्यवान पदार्थांनीं भरून चाललें होतें तें पकडून आणलें. वसाहती करणें व चांचे-गिरी करणें हा जोड धंदा बरेच दिवस ठीक चालला होता.

वसाहतवाल्यांच्या दुष्ट वर्तनाचा इंडियन लोकांनां राग येणें साह-जिक होतें. केवळ पाहुणे ह्मणून राहिलेल्या लोकांनीं गांव व पिकें जाळून टाकिलीं, या नीच वर्तनाचा त्यांनां फार राग आला. ते युरोपच्या प्रत्येक राहिवाश्याकडे पूर्वीच्या दिलदारपणानें न पाहातां, संशयी, तिरस्कारमुद्रेनें व द्वेषबुद्धीनें पाहूं लागले. लेन व त्याचे बरोबरीचे लोक यांस तेथील

१ लें) इंग्रज प्रवाशांची दगलबाजी

इंडियन लोकांनीं, सोन्याच्या खाणी दाखविण्याचे निमित्तानें दूर जंगलांत नेलें व तेथें त्यांचा घात करण्याचा घाट घातला. मोठ्या मिनतवारीनें लेनच्या टोळीनें पळ काढला व परत रोयानक बेट गांठलें. उलट इंग्रज लोकांनीं कावा साधून त्या इंडियन टोळीचे प्रमुखास व त्याचे सहाय्यकर्त्यास दगलबाजीनें ठार केलें. अशा रीतीनें सर्व वातावरण संशयी व खुनशी बनलें होतें.

गरीब व आदरशील अशा मूळच्या राहिवाश्यांचा विश्वासघात केला, त्यांच्यावर क्रूरपणानें छापे घातले, व अन्यायानें त्यांचे खून पाडले, या गोष्टी इंडियन लोकांचे मनांतून तीनशें साडेतीनशें वर्षें झालीं तरी अद्यापि विसरून गेल्या नाहींत. इंग्रजी भाषा बोलणाऱ्याचा शब्द ऐकला कीं त्यांचे कपाळास आंठ्या पडतात, व अद्याप प्रत्येक युरोपीय माणसाकडे इंडियन लोक संशयीवृत्तीनें व द्वेषभावानें पाहातात यांत नवल तरी कसलें?

सर फ्रॅन्सिस ड्रेक हा आपल्या पॅसिफिक समुद्रांतील लीला आटोपून परत स्वदेशीं येत असतां रोयानक बेटास आला, त्याच्या बरोबर या नवीन वसाहतवाल्यांनीं परत स्वदेशीं प्रयाण केलें. रोयानक बेटावर कोणीही राहिलें नाहीं. तिकडे रॅलेनें एक नवीन जहाज भरून शिधासामुग्री रोयानक बेटाकडे पाठविली. पण तेथें त्या जहाजास एकही रहिवाशी आढळला नाहीं. नंतर ग्रेनव्हील स्वतःच एक जहाज भरून शिधासामुग्री घेऊन आला. त्यानें रोयानकचे आसपास फार शोध केला पण. कोणीहो आढळलें नाहीं. त्याला वाटलें कीं इंडियन लोकांनीं आपल्या सर्व जातभाईंचा फन्ना उडविला. मग जवळच्या लोकांपैकीं निवडक पंधरा लोक तेथें ठेऊन ग्रेनव्हील स्वदेशीं परतला.

या सर्व हकिकतीचा इंगलंडमध्यें वाईट परिणाम दिसून येऊं लागला. त्यांची परदेशांत जाऊन वसाहत करण्याची महत्वाकांक्षा थंड पडत चालली. राले या कामी स्वस्थ बसला नाहीं. अमेरिकेच्या या किनाऱ्याचीं रसभरित वर्णनें त्यानें प्रसिद्ध केलीं, व एकंदरींत चळवळ थंड पडूं दिली नाहीं. पूर्ण वसाहती करून राहण्यास आतां फारसा काल लागणार नाहीं असें त्यास वाटत होतें. थोडे दिवस राहून लोक

कंटाळून माघारीं येतात ही गोष्ट रालेच्या नजरेंत प्रामुख्यानें आली होती. त्यानें मोठंमोठीं कुटुंबेंच्या कुटुंबेंच तेथें जाऊन राहतील अशी खटपट केली व पुष्कळ लोक तयार केले. त्यांना एक नवीन सनद व पुष्कळ सवलती दिल्या व तुम्ही अमेरिकेंत जाऊन एक शहरच वसवा, त्याला माझें नांव द्या, तेथें सुखासमाधानानें राहा, व आपल्या राज्याचें कल्याण चिंतन करा असें ह्मटलें. अशा रीतीनें अमेरिकेच्या किनाऱ्यावर 'राले' शहर' बसविण्याचा त्यानें पुरा बंदोबस्त केला. इ.स. १५८७ चे जुलै माहिन्यांत ही नवीन वसाहती टोळी रोयानक येथें येऊन पोहचली. मागें सोडलेल्या पंधरा माणसांचे टोळीचा वसाहतवाल्यांनीं शोध केला, पण त्यांचा थांग लागेना. शत्रू बनलेल्या इंडियन लोकांनीं त्यांचा नाश केला असला पाहिजे असें शेवटीं ठरलें. वसाहतवाल्यांचा गव्हरनर जॉन व्हाईट म्हणून होता. त्यानें रोयानक बेटाच्या उत्तरेकडील भागांत वस्ती करण्याचें ठरविलें व सन १५८७ चे जुलै महिन्याचे २३ तारखेस 'राले' नगरचा पाया घालण्यांत येऊन वसाहतीचें काम झपाट्यानें सुरूं झालें.

मूळचे रहिवाशी व वसाहतवाले यांच्यामध्यें पुन्हां धुसफूस सुरूं झाली, व रोज चकमकी झडूं लागल्या. दोन्हीं बाजूंची थोडी अधिक प्राणहानि झाल्यानंतर त्यांच्यामध्यें तह झाला. सर वॉलटर रालेला वाटलें कीं दोन्ही राष्ट्रांमध्यें प्रेमाचे संबंध असल्याखेरीज निभाव लागणार नाहीं. त्यानें इंडियन लोकांचा अधिपति 'मान्टिओ' याच्याशीं संधान बांधलें. मान्टिओ आपल्या देशाचा राजा आहे अशी कबुली वसाहतवाल्यानीं दिली, व शिवाय त्याला इंग्लंडांतला लॉर्ड बनविण्यांत आलें ! त्याला लॉर्ड रोयानोक असें म्हणण्यांत येऊं लागलें. इंग्रजांनां वाटलें कीं मान्टिओ आपल्या कल्पतीस फसले, पण त्यांचा मूर्खपणा त्यांच्या लवकरच अनुभवास आला.

नवीन वसाहतींत हे वसाहतवाले सुखानें नांदत नसत; ते नेहमीं असंतुष्ट असत. त्यांना वाटे कीं आपल्यास भुलथापा देऊन फसवून आणलें आहे. आपल्या जवळ असलेली शिधासामुग्री संपत आली आहे. आतां हिवाळ्यांत काय खाणार ? अशी त्यांनीं कुरकूर आरंभिली; व गव्हरनरला परत इंग्लंडला जाऊन खाण्याचे पदार्थ व इतर सामग्री आणण्यास त्यांनीं भाग



अमेरिकन वसाहतींत जन्मास आलेली पहिली बालिका. पान १५.

पाडलें. जन्मभर इंग्लंडमधून शिधासामुग्री आणून येथें जगावयाचें या कल्पनेनें अद्यापि त्यांना सोडले नव्हतें ! वास्तविक पाहातां यावेळीं त्यांनीं कांहीं धान्य व भाजीपाला पेरला असता व थोडी मेहनत केली असती तर हिवाळ्यांत त्यांना शिधासामुग्रीसाठीं अडून बसावें लागलें नसतें. पण नाखूष व असंतुष्ट लोकांकडून श्रम कसे होणार ?

याच सुमारास एक महत्वाची गोष्ट घडून आली. अमेरिकेच्या किनाऱ्यावर पहिलीच इंग्लिश बालिका जन्मास आली. वसाहतवाल्यांनीं या प्रथम बालिकेचें मोठें कौतुक केलें. तिचें नांव व्हार्जीनिया डेअर असें ठेवण्यांत आलें. तिची जन्म तारीख १८ ऑगस्ट ही संस्मरणीय मानण्यांत येऊं लागली.

या वसाहतीकरितां सामग्री आणण्यासाठीं गव्हरनर व्हाईट हा इंग्लंडास परत गेला. मागें राहिलेल्या एकशेंआठ लोकांचें पुढें काय झालें याचा मुळींच पत्ता लागला नाहीं. दुर्दैवी राले शहराची एवढीच काय ती दुःखमय आठवण शिल्लक राहिली आहे.

ही इंग्रज राष्ट्राची आणीबाणीची वेळ होती. सुप्रसिद्ध व अजिंक्य समजल्या जाणाऱ्या स्पॅनिश आर्माडाची इंग्रज राष्ट्रावर स्वारी होण्याचा तो काल होता. या धामधुमींत राले वसाहतीच्या लोकांकडे दुर्लक्ष झालें असण्याचा संभव आहे. तरीपण सर वाल्टर रॅले यानें दोन जहाजें भरून शिधासामग्री वसाहतवाल्यांकडे शक्य तितक्या त्वरेनें पाठविण्याची खबरदारी घेतली होती. पण काय ! या जहाजांनीं थेट अमेरिकेला न जातां वाटेंतच वाटमारेपणा चालविला. त्याचें प्रायाश्चित्तही त्यांना स्पॅनिश जहाजांकडून लवकरच मिळालें. हीं दोन्ही जहाजें पकडलीं जाऊन बुडविण्यांत आलीं, व तिकडे अन्नाच्या तुटवड्यामुळें वसाहतवाल्यांचें पुढें काय झालें हें समजण्यास मार्गच राहिला नाहीं. इ. स. १५९० सालीं गव्हरनर व्हाईट वसाहतवाल्यांचे शोधार्थ पुन्हा अमेरिकेस आला, पण या कॉलनीच्या नाशाची दुःखद वार्ता सांगावयास देखील कोणी शिल्लक उरलें नव्हतें.

सर वाल्टर रालेनें आतां हा नाद सोडून दिला व आपल्या मिळालेल्या सवलती दुसऱ्या एका इंग्रज कंपनीस देऊं केल्या. इ. स. १६०२

सालीं पुन्हां वसाहत स्थापण्याचा इंग्रज लोकांनीं प्रयत्न केला. अमेरिकेचा शोध लागल्यास आतां जवळ जवळ शंभर वर्षें होऊन गेलीं होतीं. आतांपर्यंत स्पॅनिश, फ्रेंच, इंग्रज वगैरे लोकांचीं जहाजें प्रथम कॅनेरी बेट, नंतर वेस्ट इंडिज, असा लांबचा फेरा करून जात व त्यामुळें २००० मैल अंतर जास्त तोडावें लागत लागत असे. पण बार्थोलोमो गॉनसॉल्ड हा यावेळीं सरळ मार्गानें थेट इच्छित ठिकाणीं गेला व त्यामुळें अवघ्या सात आठवड्यांत अमेरिकेस पोहोचला. ज्यांनीं समुद्रप्रवास केला असेल त्यांना चार पांच दिवसांतच किती कंटाळा येतो याचा अनुभव असेल; पण त्यावेळीं सात आठवड्यांचा प्रवास म्हणजे अगदीं झपाट्याचा प्रवास समजला जात होता. आतांसारखीं सुरक्षित व मोठीं जहाजें त्यावेळीं नव्हतीं, शिडें लावलेल्या जहाजांनीं केवळ वाऱ्याचे शक्तीनें जावें लागत असे. शिवाय वाटेंत चांचेलोक व वादळें यांचें भय असे. कित्येकवेळां जहाजावर देवी, कॉलऱ्यासारखे रोग उद्भवत. कधीं कधीं खलाशीलोक आपसांत बंड करीत. यावरून त्यावेळच्या लोकांच्या काटकपणाची व धैर्याची कल्पना येईल. गॉन सॉल्डचे मनांत वसाहत करावयाची होती, म्हणून त्यानें बरोबर पुष्कळ लोकही आणले होते. वसाहतीकरतां सुखकर जागा शोधण्यांत त्यानें पुष्कळ दिवस घालविले, व शेवटीं एलिझाबेथ बेटांपैकीं एकावर त्यानें तळ दिला. लवकरच त्यानें तेथील इंडियन लोकांशीं व्यापार सुरू केला. थोडे दिवस ही वसाहत बरी थाटली होती, पण ज्यावेळीं गॉनसॉल्ड व्यापाराचे जिन्नस भरून आपल्या कंकॉर्ड जहाजांतून परत फिरूं लागला त्यावेळीं या वसाहतवाल्यांचें धाबें दणाणलें. ते आपणांस परत स्वदेशीं नेऊन सोडण्याकरितां गॉनसॉल्डचीं विनवणी करूं लागले, व निरुपाय होऊन गॉनसॉल्ड त्यांना परत स्वदेशीं घेऊन आला.

त्यानंतर ' स्पीडवेल ' व ' डिसकव्हरर ' हीं दोन जहाजें व्यापाराचे जिन्नस भरून सुखरूपपणें परत आलीं. यानंतर वसाहतो करून राहण्यापेक्षां अमेरिकेंत व्यापारापुरतेंच जाणें बरें असा लोकमतप्रवाह वाहूं लागला.

याप्रमाणें वसाहत करून राहाण्याचे अर्धशतकभर जे प्रयत्न ब्रिटिश लोकांनीं केले त्यांवरून त्यांचे चारित्र्यावर बराच प्रकाश पडतो. कोणतीही

१ ले) स्पॅनिश लोकांचें गुणवर्णन

गाष्ट क्रमाक्रमानें व धीमेपणानें करण्याची इंग्रज लोकांची संवय प्रामुख्यानें ध्यानांत आल्याशिवाय राहात नाहीं. अनेकवार सफरी करून थोडाथोडा पण प्रत्येक खेपेस नवानवा अनुभव त्यांनीं मिळविला होता. कित्येक वेळां त्यांचा भ्याडपणा तर कित्येक वेळां फाजील सावधगिरी त्यांना नडला खरा पण एकंदर मानानें त्यांची प्रगतीच होत होती. ब्रिटिश लोकांचे उपरि-निर्दिष्ट स्वभावामुळें त्यांचा प्रवेश अमेरिकेंत होण्यास बराच काळ लागला. पण स्पॅनिश लोकांचा प्रकार कांहीं अंशीं निराळा होता. धडाडी व निर्भयपणा हे दोन गूण त्यांच्यामध्यें प्रामुख्यानें होते. कित्येक वेळां त्यात आचरटपणा व आडमुठेपणा दिसून येई, पण इंग्रज लोकांचा भिडेपणा त्यांच्या अंगीं नव्हता हें खास. त्यामुळेंच त्यांनीं एक शतक आधाडी मारून दक्षिण अमेरिका व्यापून टाकिली. दर्यावर्दीपणाचे बाबतींत अनादिकालापासून इंग्रजांचा लौकिक चालत आला होता. त्यांच्यांत आनुवंशिक गुणांमुळें व्हायकिंग्स लोकांचें धैर्य, सॅक्सन लोकांचा काटकपणा व नॉर्मन लोकांचें धोरण हीं सर्व एकवटलीं होतीं असें दिसून येतें. एकदां नीटपणें व्हर्जिनिया व न्यू इंग्लंडमध्यें त्यांचें पाऊल रोवलें गेल्यानंतर त्यांनीं जी विलक्षण चिकाटी व सावधगिरी दाखविला तो आपल्यास क्रमा-क्रमानें दिसून येईलच.

फ्रेंच लोकांचे प्रयत्न

प्रकरण २ रें

मागील प्रकरणीं ब्रिटिश लोकांनीं अमेरिकेंत वसाहती करण्याचे कामीं केलेल्या प्रयत्नांचें वर्णन केलेलें आहे. फ्रेंच लोकांनीं या बाबतींत केलेल्या प्रयत्नांचें वर्णन या प्रकरणीं करण्याचें योजिलें आहे.

ज्या कालीं अमेरिकेंत वसति करण्याचें इतर राष्ट्रांचे प्रयत्न चालू होते त्या काळीं फ्रान्स देशाची परिस्थिति अशा नवीन कामास हात घालण्यास सर्वस्वीं अनुकूल होती यांत शंका नाहीं. पहिल्याप्रथम फ्रान्स देशानें या कामीं केव्हां आरंभ केला हें नक्की समजण्यास जरी मार्ग नाहीं तरी कोलंबसाचे प्रवासाचे पाठोपाठ नॉर्मंडी व बिटनी येथील जहाजें न्यू फाउंडलंडचे आखातांत मच्छीमारीस व व्यापारास जात असल्याचें आढळून येतें, इ. स. १५०६ सालीं एका फ्रेंचमननें केलेला सेंट लॉरेन्सच्या आखाताचा नकाशा उपलब्ध झालेला आहे. इ. स. १५०८ चे सुमारास एका फ्रेंच जहाजानें कांहीं अमेरिकन-इंडियन लोकांस पकडून आणून ते लोक बारावा लुई याचे चरणीं सादर केले. या लोकांचेकडे पाहून लुई राजा फार आश्चर्य चकित झाला. पुढें पहिल्या फ्रानसिस् राजाचे कारकीर्दीत म्हणजे इ. स. १५१८ सालीं पहिल्या प्रथम वसाहत करण्याचे प्रश्नास चालना मिळाली. पुढ पांच वर्षांनीं वायव्य दिशेच्या बाजूनें आशिया खंडाचा शोध लावण्याकरतां म्हणून एक सफर करण्याची व वाटेवरील मुलुखांचा शोध लावण्याची योजना मुक्रर झाली. त्या कामीं गिओव्हानी वेराझानो नांवाच्या इटालियन गृहस्थाची नेमणूक झाली.

गिओव्हानी आपल्या 'डॉफिन' नामक जहाजांतून 'दिप' बंदरांतून निघाला, तो प्रथम 'मॅडिरा' बेटावर पोहोंचला. पण हवा अनुकूल नसल्यामुळें तेथेंच त्याला कांहीं महिने अडकून पडावें लागलें. पुढें सुमारें

पंचावन दिवसांचा खडतर प्रवास पुरा करून त्यानें अमेरिकन किनाऱ्या-वरचें ' विल्मिंगटन् ' गांव गांठलें, तेथून तो हल्लीं जेथें न्यूयॉर्क आहे तेथपर्यंत गेला, मध्यें मध्यें तो जहाज थांबवी व इंडियन लोकांशीं व्यापार करी. इंडियन लोक नेकीचे व निरुपद्रवी आहेत असें त्याचे अनुभवास आलें, पण यांचें उसनें फ्रेंच लोकांनीं एक इंडियन मूल व एक तरुणी यांना पळवून घेऊन फेडलें. पुढें हें जहाज न्यू इंग्लंडचे बाजूस गेलें, तेथील इंडियन लोक संशयी वृत्तीचे व तुसडे असल्याचें आढळून आलें. ते लोक मणी किंवा दागिने खरेदी न करितां, चाकू, सुऱ्या, व तलवारी यांचीच मागणी विशेष करीत व त्याचेबद्दल ' सॅफ्रा-रास ' नांवाचीं सुगंधी मुळें देत असत. या मुळ्यांचे सुवासाबद्दल व औषधी गुणाबद्दल युरोपांत फार ख्याती होती. सरतेशेवटीं गिओव्हानी न्यू फाउंडलंडपर्यंत जाऊन इ. स. १५२४ सालीं परत फ्रान्सला आला. गिओव्हानीनें आपल्या प्रवासाच्या वर्णनाचें पुस्तक लिहिलें व तें पहिल्या फ्रान्सिस राजास अर्पण केलें, राजा फार खूष झाला, व डॉफिन जहाज अमेरिकेच्या ज्या प्रदेशावरून फिरून आलें त्या प्रदेशास ' न्यू फ्रान्स ' असें नांव देण्यास त्यानें परवानगी दिली.

त्यावेळीं फ्रान्स देशाशी राजकीय परिस्थिति किंचित् ओढाताणीची झाली होती. इंग्लंडचा आठवा हेनरी, फ्रान्सचा पहिला फ्रान्सिस् व जर्मनी व स्पेनचा राजा पांचवा चार्लस् यांच्यामध्यें परस्पर द्वेषाचा अग्नि धुमसत होता. प्रत्येक जण दुसऱ्या दोघांस पाण्यांत पाही. अशा परिस्थितींत फ्रान्सचें बरेंच नुकसान झालें व त्यामुळें सुमारें दहा वर्षेपर्यंत परदेशगमनाचे कार्यास हात घालतां आला नाहीं.

इ. स. १५३४ सालीं कार्टिअर नांवाच्या कप्तानानें न्यू फाउंडलंडकडे प्रयाण केलें. त्यावेळीं हवा व वारा अनुकूल असल्यामुळें अगदीं थोड्याच दिवसांत तो अमेरिकेस पोहोंचला. त्यानें न्यू फाउंडलंडचे सभोंवतीं प्रवास केला, पण आशिया खंडाकडे जाण्याचा निश्चित मार्ग न सांपडल्यामुळें त्याला परत यावें लागलें. अजून या दिशेनें आशिया खंडास जाण्याचा प्रवाशांचा नाद सुटला नव्हता.

इंग्लंडप्रमाणें फ्रान्स देशांतील तरुणांचे मनांतही परमुलखी सफरी करण्याचें वारें या सुमारास खेळूं लागलें. शेंकडों तरुण जमा होऊन त्यांनीं एक जहाजांचा तांडा उभा केला व सर्वजण इ. स. १५३५ सालीं प्रवासास व साधल्यास वस्ती करण्यास अमेरिकेस निघाले. वाटेंत वादळ झाल्यामुळें त्यांना अमेरिका गांठण्यास फार दिवस प्रवास करावा लागला. ते ऑगस्टच्या दहा तारखेस ज्या नदींतून पुढें जात होते तींस त्यांनीं सेंट लॉरेन्स असें नांव दिलें. कारण ऑगस्टची दहा ही तारीख ह्मणजे सेंट लॉरेन्सच्या सणाचा दिवस होता. दोन इंडियन लोकांचे मदतीनें या टोळीनें पुष्कळ आंतपर्यंत प्रवास केला. त्यांना एक टेकडी लागली. त्या टेकडीवर जाऊन पाहतात तों एक सुंदर खेडें दृष्टीस पडलें. त्याच्या आसपासचा देखावा नयनमनोहर होता. या दृश्यानें आनंदित होऊन त्या जागेस त्यांनीं 'मॉंटरियल्' असें नांव दिलें. हल्लींचें मॉंटरियल बंदर तें हेंच होय, या प्रदेशास फ्रेंच राज्याचा मुलुख असें संबोधून तसें जाहीर करण्यांत आलें. नंतर हे प्रवाशी परत येण्यास निघाले. दुर्दैवानें त्यांच्यामध्यें स्कर्व्ही नांवाचा रोग उद्भवला, व त्यांचेपैकीं पंचवीस लोक मृत्युमुखीं पडले. परत येण्याचे पूर्वी इंडियन लोकाचे राजानें या प्रवाशांचा मोठा पाहुणचार केला व त्यांस मेजवानी दिली. अगदीं निघण्याचे अगोदर फ्रेंच लोकांनीं या इंडियन राजास बोटीवर येण्याचें आमंत्रण दिलें, व तसा तो बोटीवर येतांच त्याला कैद करून त्यांनीं बोटी स्वदेशीं हांकारल्या. स्वदेशीं परत आल्यावर कार्टियरला आपल्या प्रवासाचे उपयुक्ततेसंबंधीं लोकांचें समाधान करतां आलें नाहीं. त्याच्या निसर्गवर्णनाकडे कोणी लक्ष देईना. त्यानें बरोबर सोनें, चांदी, वगैरे कांहींएक आणलें नाहीं, येवढें समजल्यावर लोक त्याची हेटाळणी करूं लागले. त्यांचें ह्मणणें ज्या देशांतून सोनें, चांदी आणतां येत नाहीं तो देश कसला ? पुढें पांच वर्षांपर्यंत या विषयांत कोणी लक्ष घातलें नाहीं.

कार्टिअर नंतर फ्रान्सिस डीला रोके, 'लॉर्ड ऑफ रोबरव्हाल' यानें पुन्हां अटलांटिक महासागराच्या पलीकडच्या साम्राज्यवाढीस हातभार लावण्याचा प्रयत्न केला. त्यानें एक सफरी टोळी तयार करून सेन्ट

लॉरेन्सकडे जाण्याचें जाहीर केलें. साधारणतः मुख्य अडचण पडे ती ही कीं योग्य तसले लोक या धाडशी कृत्याकरितां पुढें येत नसत. यावेळीं 'रोबलव्हाल' यांस फ्रेंच सरकारनें असें कबूल केलें कीं कैदखाने तुमच्या मदतीकरितां उघडे आहेत, परदेशीं जाण्यास जितके कैदी तुमच्याबरोबर येण्यास तयार होतील त्या सर्वांस आम्हीं बिनशर्त सोडण्यास तयार आहोंत. अशा रीतीनें माणसांचा प्रश्न सुटल्यासारखा वाटला खरा, पण भलतीच जबाबदारी अंगावर पडल्यासारखें झालें. इतक्या चोर, ठग, लबाड, बदमाष, खुनी वगैरे माणसांना ताब्यांत ठेवावयाचें कसें असें रोबरव्हाल यांस वाटल्यावांचून राहिलें नाहीं.

अशा रीतीनें पार्टी तर तयार झाली, व या वसाहतवाल्यांत फ्रान्स-मधील समाजाचा तळचा गाळ आपोआप वाहून चालावयास लागला. रोबरव्हालनीं कार्टिअरला चीफ पायलट व कॅप्टन जनरल करून आपल्या सफरीबरोबर घेतलें होतें, व त्याच्या हाताखालीं पांच गलबतें दिलीं होतीं. कार्टिअरचा प्रवास सुखकर रीतीनें पार पडून तो क्वीबेक येथें येऊन पोहोंचला. तेथें त्यानें चार्लस बुर्ग नांवाचा किल्ला उभा करण्यास सुरुवात केली. येथें या वसाहतवाल्यांनीं सबंध हिवाळा काढला. पुढें रोबरव्हाल व कार्टिअर यांचें ठीक जमेना. रोबरव्हाल कार्टिअरला फार वाईट रीतीनें वागवूं लागला. तें त्याला सहन न होऊन तो एके दिवशीं एका गलबतां-तून तेथून निसटला. तिकडे रोबरव्हाल व त्याचे गुन्हेगार साथीदार यांची गांठ पडली. त्यांनीं बंड आरंभिलें, त्यामुळें त्यांपैकीं कित्येक लोकास फांशीं देणें रोबरव्हाल यांस भाग पडलें. तसेंच बऱ्याच गुन्हेगारांस त्यांनीं फटके मारून ताळ्यावर आणलें. पुढील उन्हाळ्यांत हे सर्व लोक परत फिरले.

त्यानंतर दुसऱ्या वर्षी सर फ्रान्सिसनें दुसरी सफर केली. यावेळीं त्याला धार्मिक छळ झालेल्या लोकांचें सहाय्य मिळालें. कारण यावेळीं 'प्रॉटेस्टंट' म्हणजे 'सुधारणावादी' ख्रिस्ती लोकांचा फ्रान्सचे रोमन कॅथॉ-लिक राजानें व पाद्र्यांनीं छळ आरंभिला होता, ह्या वेळीं सर फ्रान्सिस फ्लॉरिडा व कॅरोलिना या भागांत उतरला. तेथें त्याचे प्रयत्नास कांहींसें यश

मिळालें. प्रॉटेस्टंट लोकांवर जरी फ्रान्सच्या राजाचा राग होता तरी त्यानें त्यांचे परदेशगमनास हरकत केली नाहीं. आयती पीडा बाहेर जात आहे तेंच ठीक आहे असें त्याला त्यावेळेस वाटलें.

अकराव्या चार्लस राजाची आठवण म्हणून नवीन प्रदेशाचें नांव या लोकांनीं कॅरोलिना असें ठेवलें, व पोर्ट रॉयल या ठिकाणीं किल्ला बांधिला. येथें एक २६ माणसांची लष्करी तुकडी ठेऊन सर फ्रान्सिस परत स्वदेशीं गेला, त्यावेळीं फ्रान्समध्यें युद्ध सुरूं असल्यामुळें वसाहतींतील लोकांस सामग्री पाठविण्याचें जमलें नाहीं. या लष्करी तुकडींतील लोकांनी बंड केलें, व आपल्यावरील अधिकाऱ्यास ठार मारलें. आतांपर्यंत वाट पाहून पाहून सर्व लोक थकून गेले होते. त्यांनीं एक लहानशी नौका तयार केली व समुद्रमार्गें प्रवास सुरूं केला. त्या लोकांची फार दुर्दशा झाली होती. समुद्रांत वारा नेईल तिकडे ते वहात चालले होते. सरतेशेवटीं सुदैवानें एका इंग्लिश जहाजाची व त्यांची गांठ पहून ते कसे वसे स्वदेशीं येऊन पोहोंचले.

ॲडमिरल कोलिनी यानें केलेल्या प्रयत्नांत त्याला यश लाभलें नाहीं. अगदींच नादान लोकांशीं त्याची गांठ पडली. त्यानें नवीन सफर पोर्ट रॉयलपर्यंत केली, पण थोड्याच दिवसांत तेथील वसाहत मोडून सेंट जॉन्स नदीमध्यें प्रवेश करून तेथें दुसरी वसाहत स्थापन केली, व एक किल्लाही बांधावयास सुरुवात केली. थोड्याच दिवसांत त्याच्या हाताखालील लोक त्याचींच दोन जहाजें पळवून नेऊन चांचेगिरी करूं लागले. फ्रान्सला परत जाण्याचा त्यांचा इरादा नव्हताच. हे लोक पुढें पकडले गेले. त्यांना स्वदेशीं आणून फांसावर लटकविण्यांत आलें. कोलिनीचे उरलेले लोक वसाहत मोडून पळून जाण्याचे बेतांत होते. तोंपर्यंत रीवो नांवाच्या गृहस्थाबरोबर सामुग्रीनें भरलेलें जहाज आलें व या पार्टीचा थोडे दिवस निभाव लागला. स्पॅनिश अधिकारी ' मेलेंडेझ ' यानें लगतच्या प्रान्तांत वसाहत केलेली होती, त्याला जेव्हां या फ्रेंच लोकांचा सुगावा लागला तेव्हां त्यानें या उरलेल्या लोकांवर स्वारी केली, व त्यांचा पाडाव केला. परकी लोकांनीं केलेल्या स्पॅनिश प्रदेशांतील अतिक्रमणाबद्दल या सर्व लोकांस ठार मारण्यांत आलें.

धार्मिक छळास कंटाळून परदेशीं गेलेल्या फ्रेंच लोकांवर स्पॅनिश लोकांनीं केलेला जुलूम सहन न होऊन फ्रान्स देशांतील प्रॉटेस्टंट पंथांत गडबड माजली. डॉमिनिक डी गौराजिस यानें या खुनी कृत्याचा सूड घेण्याचें ठरविलें. त्यानें फ्लारिडा येथील स्पॅनिश वसाहतीवर हल्ला करण्याचें ठरवून तो त्या तयारीला लागला. त्यानें स्वतःच्या खर्चानें सर्व तयारी केली. फक्त तीन गलबतें व निवडक पन्नास लोक बरोबर घऊन तो फ्लारिडास पोहोंचला, यावेळीं कडक हिंवाळा होता. सेंट जॉन्स नदींतील तीनही स्पॅनिश किल्ल्यांवर त्यानें एका मागून एक हल्ले केले व सर्व स्पॅनिश शिपाई पकडून त्यांना कैद केलें. शेवटीं फार दिवस येथें राहतां येणें शक्य नाहीं असें ध्यानीं येतांच या सर्व शिपायांस गुन्हेगार ठरवून त्यानें झाडांस टांगून ठार मारलें व तेथेंच एका फळीवर ' स्पॅनिश कीं राक्षस ? ' असें मोठ्यां अक्षरांनीं लिहून ठेविलें.

यानंतर इ. स. १५९८ सालीं, मार्क्विस डीला रोशे या फ्रेंच सरदारानें समुद्रापलीकडील राज्यस्थापनेसाठीं प्रयत्न केला. पुन्हां तुरुंगांतील लागतील तितके कैदी नेण्याची त्याला परवानगी मिळाली. या नूतन सुटका पावलेल्या गुन्हेगार मंडळींबरोबर मार्क्विस ' नोव्हास्कोशिया '-पर्यंत आला. येथें त्यानें बरोबर आणलेल्या चाळीस लोकांस वसाहत करावयास लाविली व स्वदेशीं परत आला. थोड्याच दिवसांत त्याला मृत्यूनें गांठलें व मागें अमेरिकेंत राहिलेल्या लोकांची वास्तपुस्त करण्यास कोणी राहिला नाहीं. पुढें सात वर्षांपर्यंत या टोळीनें नवीन वसाहतींत दिवस काढले. पुढें एका जहाजाचे कप्तानास त्यांची दया येऊन त्यानें त्यांना फ्रान्समध्यें आणून सोडिलें. झाली इतकी शिक्षा पुरे झाली असें समजून त्यांना फिरून तुरुंगांत पाठविण्यांत आलें नाहीं ही मेहेरबानीच म्हणावयाची.

एकंदरींत इ. स. १६०३ पर्यंत फ्रेंच राष्ट्रातर्फे अमेरिकेंत वसाहत होण्याचा योग आला नाहीं. या सालीं फ्रेंच सरदार पिरी डू गास्ट ऊर्फ डी मॉंटस् याला फ्रेंच सरकारनें फिलाडेलफियापासून तों मॉंट्रिआलपर्यंत सर्व मुलुख मांडलिक या नात्यानें बहाल केला होता व अमेरिकेंत जाऊन

कायम वसाहत करून राहाण्याचे व विशेषतः लोकरीचा व्यापार करण्याचे सर्व हक्कही त्याला देण्यांत आले होते. पुढील सालचे मार्च महिन्यांत त्यानें दोन मोठीं जहाजें बरोबर घेऊन अमेरिकेचा मार्ग धरिला. त्यानें नोव्हास्कोशियांत पोर्ट रॉयल येथें वस्ती केली, व लोकरीचा व्यापार आरंभिला, या व्यापारांत त्याला विशेष किफायत होऊं लागली.

यानंतर सॅम्युअल् चॅम्प्लेन यानें क्वीबेक येथें वसाहत केली, इ. स. १६०८ सालीं परत स्वदेशीं जाऊन नवीन स्थापिलेल्या वसाहतीची त्यानें चरीच जाहिरात फडकाविली. लोकरीचे व्यापाराचा जम नीट बसल्यामुळें त्याचे जाहिरातीस कोणी हरकत घेतली नाहीं. इ. स. १६१२ सालीं फ्रान्समध्यें प्रॉस्टेस्टंट धर्माच्या पक्षाची राजकारणांत सरशी झाल्या-कारणानें वसाहती वाढविण्याचें कामास बरे दिवस आले. त्यापूर्वी सॅम्युअल् चॅम्प्लेन यानें बरोबर इंडियन समाजास ख्रिस्ती धर्माचा उपदेश करण्या-करतां म्हणून कांहीं धर्मोपदेशकही घेतले होते. थोडे दिवस अमेरिकेंत त्यांचा नीट जम बसला परंतु पुढें या पाद्री लोकांमध्यें व खुद्द चँम्प्लेन याजमध्येंच तंटा सुरूं झाला. या तंट्यांत चॅम्प्लेनचा पराभव होऊन तो इंडियन लोकांस जाऊन मिळाला व तेथेंच त्यानें हूरॉन इंडियन लोकांत बरेच दिवस काढले. पुढें तीन वर्षांनीं तो वसाहतींत परत आला.

इ. स. १६२४ सालीं सेंट लुई किल्ल्याचें बांधकाम पूर्ण झालें. या किल्ल्याचे आसपास सेंट लॉरेन्स नदीचे टापूंत आतां कायम फ्रेंच अधिराज्य स्थापन झालें.

फ्रेंच लोकांप्रमाणेंच 'डच' लोकांनीं सुद्धां अमेरिकेत वसाहती करण्याचे बरेच प्रयत्न केले. पहिली डच वसाहत न्यूयॉर्क नर्जाकचे मॅन् हॅटन् बेटावर स्थापिली गेली. हडसन आखाताचा व हडसन नदीचा शोधक सुप्रासिद्ध इंग्रज हडसन याला एका डच कंपनीनें नोकरीस ठेविलें. यापूर्वी इंग्लिश जहाजांबरोबर हडसननें अमेरिकेची सफर केली होती, पण त्याचें इंग्लंडांत व्हावें तितकें चीज न झाल्यामुळें तो डच कंपनीकडे नोकरीस राहिला. या कंपनीचें नांव 'डच ईस्ट इंडिया कंपनी' असें होतें.

हडसनला ' हाफमून ' नांवाचें जहाज कंपनीनें दिलें, व त्याला हिंदुस्थानला जाण्याचा थेट जलमार्ग शोधून काढण्याचें काम दिलें. इ. स. १६०९ चे एप्रिल महिन्यांत युरोपचे उत्तर दिशेनें त्यानें आपलें जहाज हांकारलें. नॉर्वेचे टोंकावरून तो तसाच पुढें, लायलंड व नोव्हाझेंब्लाकडे गेला. परंतु तरत्या वर्फाचे डोंगराचे अडथळ्यामुळें त्याला तेथून परतावें लागलें. पूर्वेकडे जाण्याला उत्तरेकडचा मार्ग असावा तितका सुरक्षित व सुगम नाहीं असें आढळून आल्यावर तो पाश्चिमेचे बाजूनें अमेरिकन किनाऱ्यास लागला. मध्येंच एकादी खाडी किंवा दुसरा मार्ग सांपडून जर अमेरिकेच्या पॅसिफिक किनाऱ्यास लागतां आलें तर आपलें काम सिद्धीस जाण्याचा कांहीं संभव आहे असें त्याला आढळून आलें.

जुलै महिन्यांत हडसन न्यू फाउंडलंडचे किनाऱ्यास पोहोंचला. तेथून तो केप कॉड येथें आला. तेथून किनाऱ्या किनाऱ्यानें डिलावेर बे मध्यें आला नंतर तो न्यूयॉकपर्यंत येऊन पोहोंचला. तेथून तो ज्या नदींतून प्रवासास निघाला तिलाच पुढें हडसन नदी असें नांव पडलें. या नदींतून एक आठवडाभर तो पुढें उत्तरेकडे जात होता. या नदीचे दोन्हीं बाजूंस घनदाट अरण्य होतें. तो मुलुख अत्यंत सुपीक व सुंदर दिसला. मधूनमधून मक्याचीं हिरवींगार शेतें दृष्टीस पडत. तेथून तो आलबॅनी येथें पोहोंचला. त्यानंतर तो हालंडला परत निघाला. आपण केलेला प्रवास व लावलेला शोध आपल्या इंग्रज जातभाईंच्या नजरेस यावा असें त्याला मनापासून वाटत होतें, येतांना तो इंग्लंडच्या किनाऱ्यावर डार्टमथ येथें थांबला परकी जहाज समजून त्याला इंग्लंडच्या किनाऱ्यावरून पुढें जाऊं देण्यांत आलें नाहीं, आपला रिपोर्ट त्याला पत्रद्वारेंच पाठवावा लागला. त्यानंतर इंग्रज व्यापाऱ्यांनीं त्याला ' डिस्कव्हरी ' नांवाचें दुसरें जहाज दिलें, व पुन्हां तो अमेरिकेला गेला. यावेळीं फ्रोबिशर ज्या मार्गानें गेला होता तो मार्ग धरून तो हडसन बे पर्यंत गेला. तेथपर्यंत कोणतेंही जहाज आतांपर्यंत गेलें नव्हतें. तेथून पुढें जातांना त्याला सर्व बाजूंनीं अफाट समुद्र दिसूं लागला. तेव्हां त्याला वाटलें कीं आपण पॅसिफिक

महासागरांत आलों, व आतां आशिया खंडास जाण्यास फार वेळ लागणार नाहीं, पण थोडेच दिवसांत समुद्र आकुंचित होत आहे असें त्याला आढळून आलें, आपण एका आखातांत घुटमळत आहोंत असें त्याचे नजरेस येतांच त्याची निराशा झाली. आतांपर्यंत त्याची सर्व सामुग्री संपून गेली होती. त्यांतून त्याचे हातांखालील लोकांचा धीर सुटला व त्यांनीं बंड आरंभिलें. हडसन, त्याचा मुलगा, व दुसरे सात असामी या सर्वांना खलाशांनीं समुद्रांत फेंकून दिलें. अशारीतीनें या धाडशी खलाशाचा व भूगोलविशारदाचा शेवट झाला.

वसाहतीचा काल

प्रकरण ३ रें

इ. स. १६०० शें नंतर म्हणजे सतराव्या शतकाचे आरंभीं अमेरिकेच्या पूर्व किनाऱ्याची जवळ जवळ वांटणीच होऊन चुकली होती, असें म्हणण्यास हरकत नाहीं. फ्रेंच लोकांनीं उत्तरेकडचा म्हणजे कॅनडाचा पूर्व किनारा व सेंट लॉरेन्सचें आखात व्यापिलें होतें. इंग्रज लोकांनीं व्हर्जीनिया व मॅसॅचुसेट स्थानें हीं व्यापिलीं होतीं. डच लोकांनीं हडसन नदीच्या मुखाचा प्रदेश व हल्लीं जेथें न्यूयार्क आहे तो प्रदेश व्यापिला होता. स्पॅनिश लोकांनीं फ्लॉरिडा व मेक्सिको नजीकचा भाग व कॅरोलिना येथें वस्ती करून दक्षिणेकडचा भाग ताब्यांत घेतला होता. इतर देशांचे मानानें स्पेननें अधिक मोठा भाग व्यापिला होता. युरोपांतील इतर राष्ट्रांचे मानानें स्पेनची वसाहतींत व व्यापारांत फारच अधिक प्रगति झालेली होती. याचें उघड उघड कारण हें आहे कीं, त्याचा पाय सर्वांत आधीं अमेरिकेंत रोविला गेला होता. तरीपण इंग्रज लोकांच्या वसाहती हळू हळू अधिक मजबूत पायावर कशा होत गेल्या हें पुढें दिसून येईल, सुदैवानें त्यांना मिळालेला प्रांत त्यांच्या देशाच्या हवापाण्यापासून फार भिन्न नव्हता त्यामुळें थोड्या दिवसांतच त्यांना समाधान लाभलें. दुसरें असें कीं ते ज्या प्रांतांत उतरले तेथून आंतपर्यंत प्रवेश करणें फार सुगम झालें

गेल्या सबंध शतकाचे अनुभवानें फक्त अमेरिकेंत वसाहती करून राहतां येण्याची शक्यताच फक्त सिद्ध झाली होती. परंतु एकंदरींत हें काम फार अवघडच होतें, व या कामीं अडचणीही पुष्कळ होत्या. पाहिली गोष्ट म्हणजे नवीन मुलुख युरोपपासून दोन महिन्यांच्या प्रवासाच्या अंतरावर होता, त्यामुळें प्रवासांत वेळ फार जाई व खर्चही प्रमाणाबाहेर होई, तसेंच नवीन ठिकाणीं सामुग्रीही अपरंपार न्यावी लागे. घरगुती

जनावरें वगैरे नव्या प्रदेशांत नव्हतीं, किंवा तावडतोब सांपडलीं तरी नसावींत; त्यामुळें गाई, डुकरें, कुत्रीं वगैरे न्यावीं लागत. केवळ एका वर्षाचीच नव्हे तर एखादे वर्षी पीक न आलें तर उपाशीं मरण्याची पाळी येऊं नये ह्मणून, दोन दोन वर्षें पुरेल येवढी सामुग्री न्यावी लागे. त्याचप्रमाणें नवीन देशांत शेतीची लागवड करण्याची पुरी माहिती नसल्यामुळें, कित्येक वेळां पिकें अर्धवट स्थितींत नासून जात किंवा बिलकूल उगवतच नसत. पिकें बरोबर काढण्याची पद्धति उपलब्ध होईपर्यंत कांहीं काल असा जाणें हें अपरिहार्य होतें, त्याशिवाय शेत जमीन तयार करण्यास जंगल कापून टाकावें लागे व रानटी इंडियन लोकांच्या टोळ्यांपासून स्वसंरक्षण करण्यास सदैव तत्पर राहावें लागे. अशातऱ्हेनें अडचणींचे डोंगर मध्यें आडवे आले तरी त्यांतून सुद्धां त्या शूर वसाहतवाल्यांनीं मार्ग काढिला ही केवढी अनुसरणीय गोष्ट होय ?

या नवीन वसाहती वसविणें ह्मणजे अर्थात् मोठ्या भांडवलाचा प्रश्न होऊन बसला होता. थोड्याशा खटपटीनें एकाद्या राजाला खूष करून त्याच्यापासून अमेरिकेंतील वाटेल तेवढ्या प्रदेशावर तावा मिळविणें त्यावेळीं सोपें होतें, पण बरेच लोक या वसाहतींत नेऊन त्यांना जीवन सुखावह रीतीनें कंठण्याचा मार्ग उपलब्ध करून देणें सोपी गोष्ट नव्हती. प्रथम कोणी जाण्यासच तयार होत नसत. बरें, झालेच तर त्यांच्यापासूनच त्यांनां अमेरिकेंत नेणाऱ्या माणसास धेंका पोहोंचल्याचीं अनेक उदाहरणें घडलेलीं होतींच, तीं मागील प्रकरणांत नमूद केलेलीं आहेत. वसाहतींसाठीं लागणारें भांडवल मुख्यत्वेंकरून, जहाजें, हत्यारें, आउतें, व जीवनास लागणारी इतर सामुग्री, या गोष्टींकरितां लागे. सफरी करण्याचा उद्देश व्यापार करण्याचा असो, खाणी खोदण्याचा असो, लोकर व मौल्यवान पदार्थ जमा करण्याचा असो किंवा वसाहती करण्याचा असो, प्रत्येक गोष्ट मोठ्या भांडवलाखेरीज होणें शक्य नव्हतें. साधारणतः थोडा बहुत पैसा असलेले भांडवलवाले स्वतः एकट्याच्या जबाबदारीवर हें काम अंगावर घेत नसत तर समाईक भांडवलाच्या कंपनीच्या पद्धतीचा अवलंब

करीत, त्यामुळें व्यक्तिशः जबाबदारी कमी होई, व लहान भांडवल-वाल्यांची सुद्धां सोय होई. अशा रीतीनें तत्कालीन धंद्यांपैकीं वसाहती करणें हा एक मोठा धंदा होऊन बसला व त्यांत पुष्कळ भांडवलही गुंतून गेलें.

या बाबतींत स्पेन देशाची परिस्थिति मात्र अगदीं निराळ्या प्रकारची होती. तेथें वसाहती उभारणें, त्यांचो जोपासना करणें व त्यांचें संरक्षण करणें हीं सर्व कामें सरकारनें हातीं घेतलीं होतीं. वैयक्तिक धाडसास व व्यापारास तेथें प्रोत्साहन मिळालें नाहीं. स्पेनमधून अमेरिकेस जाणारा सर्व माल सेव्हिल बंदरांतूनच बाहेर गेला पाहिजे असा निर्बंध होता, त्याचप्रमाणें अमेरिकेच्या किनाऱ्यावरील व्हीर क्रूझ किंवा पोर्टोबेलो येथेंच उतरला पाहिजे असाही निर्बंध होता. बहुतेक दरसाल जहाजांचे दोन ताफे पाठविण्यांत येत. एक व्हीर क्रूझ येथें उतरे व दुसरा पोर्टोबेलो येथें उतरे. या सर्व जहाजांची व्यवस्था करणें, त्यांचें नियंत्रण करणें, व त्यांच्यामध्यें घडेलल्या बेकायदेशीर कृत्यांची चौकशी करणें, याकरितां सेव्हिल येथें सरकारी खातेंच उघडण्यांत आलें होतें. प्रत्येक व्यापाऱ्यास एक खास परवाना मिळवावा लागे. फक्त सेव्हिल येथील व्यापाऱ्यांशिवाय तो बहुतेक कोणास मिळत नसे. स्पेनमधील पूर्व व पश्चिमेकडील देशांशी व्यापार करणाऱ्या सर्व व्यापाऱ्यांना अशा तऱ्हेनें परवाना काढावा लागे; व पूर्ण सरकारी नियंत्रणाखालीं व संरक्षणाखालीं काम करावें लागे. लूसिआनामध्यें जी पहिली स्पॅनिश वसाहत झाली ती अशा तऱ्हेच्या नियंत्रणाखालींच झाली पण पुढें हळूहळूं स्पॅनिश नियंत्रणाची मगरमिठी ढिली होत चालली.

इंग्लंड व फ्रान्समध्यें मुख्यत्वेंकरून समाईक भांडवलवाल्या मोठमोठ्या कंपन्यांनींच वसाहती थाटण्याचें काम हातीं घेतलें. निव्वळ व्यापारी धोरणानें सुद्धां ही गोष्ट अत्यंत इष्ट होती. कधीं मधीं व्यापारासाठीं जाऊन आठ पंधरा दिवसांचे अवधींत अन्तस्थ प्रदेशाची माहिती होणें शक्य नव्हतें. तसेंच तेथें कोणते व्यापारी जिन्नस पैदा होतात व ते परत इंग्लंड किंवा फ्रान्समध्यें नेऊन विकण्यास परवडेल किंवा नाहीं ही सर्व माहिती

मिळण्यास, ते जिन्नस पैदा करणें, सांठवून ठेवणें व गलबतें येतांच त्यांत सुरक्षित भरून देणें येवढीं कामें करण्याकरितां तरी प्रत्येक देशास आपल्या जातभाईंची अमेरिकेस कायम वस्ती करविणें क्रमप्राप्तच होतें. वसाहती घडल्यानंतर त्यांनीं पिकविलेलें धान्य, कापूस व इतर कच्चा माल यांचा व्यापार युरोपशीं करणें ही नंतरची पायरी होती.

समाईक भांडवलाची कंपनी उभी झाल्याबरोबर तिचे चालक प्रथम एक सनद मिळवीत, ही सनद ह्मणजे ठरीव मुलखांत ठरीव तऱ्हेचा व्यापार करण्यासंबंधीं परवाना असे. तसेंच त्या परवान्याबरोबर कंपनीस कांहीं सवलती मिळत. युरोपांतून वसाहतींत माल नेण्यास अशा कंपन्यांस निर्गत जकात माफ होई, व संरक्षणाचे बाबत सरकार हमी घेई. उदाहरणार्थ, पहिल्या व्हर्जीनिया कंपनीस खालीलप्रमाणें सवलती होत्या. एका ठरीव मुलखांत व्यापार करण्याचा या कंपनीला खास मक्ता मिळाला होता. स्वतःचे संरक्षणाची व लागेल तो हत्यारी बन्दोबस्त करण्याची तिला परवानगी होती. तसेंच इंग्लंडमधून एका ठरीव संख्येपर्यंत प्रजाजनांस वसाहती करण्याकरितां नेण्याची मुभा होती. या सवलतींबद्दल उलट सरकारास कांहीं मोबदलाही द्यावा लागे. सोनें किंवा चांदी सांपडल्यास त्याचा एक पंचमांश व तांबें सांपडल्यास त्याचा एक पंधरांश भाग द्यावा लागे. कंपनी स्थापन होतांच तिला प्रथम मजूर मिळविण्याचें, त्यांना हत्यारें, अवजारें व एकाद्या वर्षापुरती सामुग्री पुरविण्याचें हें मुख्य काम प्रथम करावें लागत असे.

इंग्लंडमध्यें वसाहती करण्याचें काम मोठमोठ्या कंपन्यांनीं यशस्वी रीतीने करून दाखविल्यावर मग तेथें दुसरी पद्धति रूढ होऊं लागली. वैयक्तिक भांडवलवाल्यांस मग जोर चढला, व लागेल तितकें भांडवल घालण्यास जो तो तयार होऊं लागला. अशा श्रीमंत गृहस्थांस अमेरिकेंत मोठमोठ्या जमिनीहीही मिळत. नंतर ते आपल्या जमिनी इतरांस खंडानें देऊन त्यावर खूप फायदा मिळवीत.

फ्रान्स देशांत वसाहतीचे प्रश्नास जोराची चालना मिळण्यास मुख्य कारण ह्मणजे धार्मिक छळ हें होतें. कारण तेथील रोमन कॅथॉलिक राजा व

३ रे) लंडन व प्लिमाऊथ कंपनी

पाद्री यांनीं नवमतवादी ह्मणजे प्रॉटेस्टंट लोकांचा छळ मांडला. त्याला कंटाळून त्यांनीं कोठेंतरी लांब परदेशीं जाऊन वसाहत करण्याचें ठरविलें.

इ. स. १५६८ चे पूर्वीच फ्लॉरिडांत या धर्माचे बाबत गांजलेल्या लोकांनीं आपल्या वसाहती स्थापिल्या व इंडियन लोकांशीं व्यापारही सुरूं केला.

व्हर्जीनिया व मॅसॅचुसेट्स् या प्रांताची वस्ती व वाढ कसकशी होत गेली हें आतां पाहूं. सतरावे शतकाचे उदयानंतर वसाहतींस अधिक अनुकूल स्थिति येऊं लागली. जेम्स राजानें गादीवर येतांच अमेरिकेंतील वसाहतींस सक्रिय मदत करण्यास सुरुवात केली. पहिल्या कंपनीचें नांव 'लंडन' कंपनी व दुसऱ्या कंपनीचें नांव 'प्लिमाऊथ' कंपनी, ३४° आणि ३८° रेखांशांच्या दरम्यानचा प्रदेश थेट अटलांटिक पासून पॅसिफिक महासागरापर्यंत लंडन कंपनीस मिळाला, व ४१° आणि ४५° रेखांशांच्या दरम्यानचा प्रदेश प्लिमाऊथ कंपनीस मिळाला. त्यामधील ३° रेखांशांच्या चिंचोळ्या प्रदेशांत वावरण्याची दोघांसही मुभा दिली होती. मात्र एका कंपनीनें दुसऱ्या कंपनीचे हद्दीपासून शंभर मैलांचे आंत वसाहत करूं नये असा नियम घालून दिला होता. लंडन कंपनीची घटना करण्यामध्यें बार्थो लोमो गॉन्साल्ड हा प्रमुख होता. त्याच्या पूर्वीच्या प्रवासाचें वर्णन मागील प्रकरणीं आलेंच आहे. त्याला इंग्लंडांतील बड्या लोकांचें मोठें सहाय्यही होतें. या नवीन कंपन्यांनीं इंग्लंडच्या राजाची पूर्ण सत्ता मानावयाची होती. त्याचप्रमाणें कंपनीच्या कारभाराचें मुख्य ऑफिस लंडनमध्यें ठेविलें पाहिजे असा नियम होता. या कंपन्यांचे प्रमुखांस इंग्लंडचे राजाचे संमतीशिवाय नेमतां येत नसे. तसेंच कोणत्याही प्रमुख अधिकाऱ्यास कामावरून दूर करण्याची सत्ता पण राजाकडे ठेवण्यांत आली होती. नव्या मुलुखावर इंग्लंडचे राजाची पूर्ण राजसत्ता अबाधित चालावयाची होती. पहिल्या पांच वर्षांमध्यें वसाहतींतील मालमत्तेची समाईक सत्ता सर्वांची राहावयाची होती. त्याचप्रमाणें प्रत्येक माणसाचा इंग्लिश रहिवाशी ह्मणून हक्क अबाधित रहावयाचा होता.

पहिल्या कंपनीची दुर्दशा:—

इ. स. १६०६ चे ऑगस्ट महिन्यांत या कंपनीनें आपलें पहिलें जहाज अमेरिकेस पाठविलें. तें एका स्पॅनिश लढाऊ गलबतानें कावीज केलें. त्यानंतर दुसरें जहाज पाठविण्यांत आलें, त्या जहाजानें एक हिंवाळा कसा-बसा काढला. पुढें उन्हाळ्यांत सुमारें शंभर उतारू घेऊन दुसरें एक जहाज अमेरिकेस आलें. त्या लोकांनीं केनेबेक नदीचे मुखाशीं वसाहत स्थापून सेंट जॉर्ज नांवाचा किल्ला बांधण्यासहां सुरुवात केली. कांहीं कालपर्यंत त्यांचें बरें चाललें होतें, पण लवकरच त्यांतील अर्ध्या लोकांनीं इंग्लंडला पळ काढला. पुढें अत्यंत कडक हिंवाळा सुरू झाला, त्यांत उरलेल्या लोकांचे फार हाल झाले, दुर्दैवाची गोष्ट हा कीं त्यांच्या कोठाराला आग लागून सर्व सामुग्री जळून गेली. कांहीं उपासमारीनें व वार्‍याचे थंडीनें मृत्यू पावले.

त्या मानानें लंडन कंपनीस बरे दिवस आले असें म्हणण्यास हरकत नाहीं. इ. स. १६०३ चे डिसेंबर महिन्याचे नऊ तारखेस न्यू पोर्टहून तिचें पहिलें जहाज निघालें, तें कनेरी बेटाला वळसा घालून सुमारें चार महिन्यांनीं अमेरिकेस पोहोंचलें. या जहाजाबरोबर एकशें पांच वसाहती-लोक होते. प्रथम अमेरिकेच्या किनाऱ्यावरील रोयानक बेटास हें जहाज लागलें, पण पुढें वादळ होऊन तें जेम्स नदीच्या मुखांत शिरलें. सुमारें पन्नास मैल आंत गेल्यानंतर, इंग्लंडची पहिली वसाहत जी 'जेम्स टाऊन' तेथें ही मंडळी उतरली व त्यांनीं 'जेम्स टाऊन' बांधिलें.

सुप्रसिद्ध कॅबट यानें या जागेचा शोध लावल्यानंतर तेथें खरोखरीची वसाहत होऊन राहाण्यास एकशें दहा वर्षें मोडलीं. त्या कालची अशांत परिस्थिति, भौतिक शास्त्रांची कोती माहिती व सर्वसाधारण अज्ञान हीं ध्यानांत आणल्यास असें होणें अपरिहार्य होतें हें उघडच दिसून येतें.

जेम्स टाऊन मधील वसाहत भरभराटीस यैऊं लागली, त्याचें श्रेय लंडन कंपनीचा प्रमुख कॅप्टन स्मिथ याजकडेच बहुतांशीं येतें. हा गृहस्थ कच्चा दिलाचा नव्हता. व्हर्जीनिया वसाहतींत असतांना त्याला जबर

जखम होऊन इंग्लंडास जाणें भाग पडलें, पण तेवढ्यानें त्याचा धीर खचला नाहीं. तो फिरून इ. स. १६१४ सालीं अमेरिकेस आला व मेनचे दक्षिण किनाऱ्यास त्यानें वस्ती केली. त्यानें इंडियन लोकांशीं केलेल्या व्यापारांत त्याला चांगला फायदा होत असे, व त्यांतील बराचसा भाग आपल्या खलाश्यांस तो वाटून देत असल्यामुळें त्याचे हातांखालील लोक फार संतुष्ट असत. कॅप्टन स्मिथनें केप कॉडचे आसपासचे बऱ्याच मोठ्या प्रांताचा फार काळजीपूर्वक नकाशा तयार केला. हा नकाशा तयार करण्यांत त्यानें असाधारण कौशल्य दाखविलें होतें. त्या नकाशाच्या यथादर्शित्वाबद्दल अगदीं अर्वाचीन कारागीर सुद्धां आश्चर्य करितात. या नवीन प्रदेशास ' न्यू इंग्लंड ' असें अन्वर्थक नांव देण्यांत आलें.

याच सुमारास इंग्लंडमधील प्यूरिटन् धर्मपंथावर अत्यंत जुलूम होऊं लागला. त्या छळास कंटाळून ते लोक हॉलंडमध्यें जाऊन राहिले. या देशांतही त्यांचा बसावा तसा जम बसेना त्यामुळें त्यांनीं कोठेंतरी दूरदेशीं जाऊन राहाण्याचें ठरविलें. याबाबतींत मध्यस्थीकरितां व मिळाल्यास कांहीं मदतीकरतां त्यांनीं आपले दोन प्रतिनिधी इंग्लंडमध्यें पाठविले त्यांनीं लंडन कंपनी व प्लिमाऊथ कंपनी या दोहोंशीं घोरण बांधलें व त्यांचे मदतीनें इंग्लंडचा राजा जेम्स याची गांठ घेतली. राजानें या कामीं कांहीं एक मदत होण्यासारखी नाहीं असें सांगितलें. तथापि शेवटीं असें कबूल केलें कीं, हे लोक अमेरिकेस गेले तर आपण त्यांचे वांटेस जाणार नाहीं व त्यांस मुद्दाम त्रास देणार नाहीं. ही मेहेरबानी सुद्धां कांहीं कमी नव्हती. कारण त्यामुळें लंडन व प्लिमाउथ कंपनी यांचा मार्ग बराच सुकर झाला. जितके अधिक लोक अमेरिकेत जाऊन रहातील तितके त्यांस फायद्याचें होतें.

हॉलंडमधील प्यूरिटन् लोकांच्या प्रतिनिधींस वाटाण्याच्या अक्षता मिळाल्या तरी त्या योगानें ते निराश झाले नाहींत. जवळ असेल नसेल ती पुंजी एकत्र करून, व काय वाटेल ते हाल झाले तरी सहन करावयाच असें ठरवून दोन जहाजें अमेरिकेस जाण्यास ठरविलीं. एकाचें नांव ' स्पीडवेल ' व दुसऱ्याचें ' मेफ्लावर ' असें होतें. स्पीडवेल जहाजामधून

हॉलंडमधील प्यूरिटन् लोक इंग्लंडचे किनाऱ्यावर येऊन पोहोंचले. पुढें मेफ्लावर जहाजास बरोबर घेऊन दोन्हीही जहाजें अमेरिकेकडे निघालीं. थोड्याच अंतरावर स्पीडवेल जहाज नादुरुस्त झालें. त्यावेळीं त्यावरील कांहीं प्रवासी मेफ्लावर जहाजावर पाठविण्यांत आले, व बाकीचे परत इंग्लंडला आले. जुन्या इंग्लंडला रामराम ठोकून नव्या इंग्लंडला गेलेलें मेफ्लावर जहाज वादळांतून व वाईट हवेंतून धक्के खात खात त्रेसष्ट दिवस सतत प्रवास केल्यानंतर केप कॉड येथें पोहोंचलें. तेथेंच जहाजावर समा भरावयांत येऊन नवीन वसाहतीचें राजकीय व सामाजिक धोरण ठरविण्यांत आलें. या वसाहतवाल्यांनीं इंग्लंडच्या राजाबद्दल राजनिष्ठा जाहीर केली. वसाहतींतील सर्व लोकांस सारखा हक्क ठेवण्यांत आला व शांततेनें, न्यायानें व गोडीगुलाबीनें सर्वांनीं वागावयाचें असें धोरण जाहीर करण्यांत आलें. एका करारपत्रावर वरील धोरण लिहून त्यावर सर्व वसाहतवाल्यांनीं सह्या केल्या व जॉन कारव्हर यांस आपला गव्हनर नेमलें. अजून वादळी हवा शमली नव्हती व रहाण्यास नीटशी जागा सांपडली नव्हती. जॉन कारव्हरनें भू भागांत लांबवर फेरफटका करून एक जागा शोधून काढली व येथें ता. ११ डिसेंबर १६२० सालीं "पिल्ग्रिम् फादर्स" न्यू इंग्लंडचे किनाऱ्यावरील प्लिमाऊथचे खडकावर उतरले.

किनाऱ्यावर पाहावें तों एका बाजूस वादळी समुद्र व दुसऱ्या बाजूस अफाट माळ जमीन. हिंवाळा असल्यामुळें सर्वत्र बर्फ पडलेलें होतें. वर वादळी आकाश व खालीं अत्यंत शीत जमीन. ना घर, ना दार, ना आच्छादन. अनिवार थंडी, भुकेनें मरण्याची भीति व निराशा यांचा कडेलोट झाला होता. निष्ठुर निसर्गाशीं झगडण्यांत ह्या बहादरांनीं दाखविलेल्या धैर्यास इतिहासांत तोड मिळणार नाहीं. त्यांनीं झाडें तोडून मोठमोठ्या शेकोट्या केल्या, पर्ण कुटिका तयार केल्या व जवळ पासच्या प्रदेशांत अधिक सुखावह जागा शोधण्याचें काम चालूं ठेवलें. इ. स. १६२१ चे जानेवारी महिन्याचे ९ तारखेस न्यू प्लिमाऊथ नगराचा पाया घालण्यांत आला, प्रत्येकानें स्वतःकरतां जागा आंखून त्यावर एक एक घर उभारण्यास



अन्नाच्या तुटवड्यामुळें ह्मिमाऊथ वसाहतीची दुर्दशा.

पान ३५.

सुरुवात केली पण दैवाला तेंही पाहवेना, त्यांच्यामध्यें तापाची सांथ उद्भवली, अत्यंत पराक्रमी बाहूंचा तापाच्या कडाक्यापुढें टिकाव लागेना. ते ढिले पडल्यासारखे झाले, एकेवेळीं तर फक्त सातच माणसें तापाच्या तडाक्यांतून सुटलीं होतीं, त्यांच्यावर या सर्व वसाहतीस आसरा व अन्न पुरविण्याचें काम पडे, जवळची शिधासामुग्री तर इतकी आटोक्यांत आली कीं उपासमारीचें भय व मृत्यु हीं समोरच उभीं आहेत असा भास झाला. कित्येक दिवस पुरुष मंडळींनीं कडकडीत उपास करून जवळ शिल्लक उरलेलीं वाळलेलीं मक्याचीं कणसें बायका व तान्हीं मुलें यांस देऊन त्यांना जगविण्याचा प्रयत्न केला. अशातऱ्हेनें प्रत्यक्ष मृत्यूशीं झगडून त्यांनां कांहीं दिवस कंठावे लागले. सुदैवानें लवकरच थंडी कमी झाली, त्यामुळें भक्ष्य शोधण्याचें काम किंचित् सुकर झालें. नंतर हवेंतील उष्णतेचें प्रमाण वाढतांच पेरावें तें झटकन उगवूं लागलें. अशा दुर्निवार्य संकटांतून न्यू इंग्लंडचे इतिहासास सुरुवात झाली आहे.

न्यूइंग्लंड नंतर दुसरी महत्वाची वसाहत 'कॉनेक्टिकट' मधील होय. कॉनेक्टिकट मॅसचुसेट्सचे दक्षिणेस असलेल्या प्रांताचें नांव होतें. प्लिमाऊथ कंपनीचे हातून महत्वाची कामगिरी कांहीं झाली नाहीं, म्हणून तिच्यानंतर काऊन्सिल ऑफ प्लिमाऊथ या संस्थेनें तिचीं सूत्रें हातीं घेतलीं. तिच्यांत लॉर्ड से ॲण्ड सील, लॉर्ड ब्रुक वगैरे भागीदार होते, त्यांनीं या कॉनेक्टिकटची सनद घेतली होती. कॉनेक्टिकट प्रांताचे पश्चिमेस मॅनहॅटन येथें डच लोकांची वसाहत होती. त्यांनीं प्लिमाऊथ काउन्सिलचे अगोदरच कॉनेक्टिकट येथें वसाहत स्थापिली होती; त्यांनीं हल्लीं हार्टफोर्ड शहर आहे तेथें वसाहत स्थापिली व तिचें नांव हाउस ऑफ गुडहोप असें ठेविलें. अशातऱ्हेनें डच लोकांनीं केलेलें अतिक्रमण न्यू प्लिमाऊथ येथील इंग्लिश वसाहतवाल्यांस खपलें नाहीं. त्यांनीं डच वसाहतीवर स्वारी केली. डच लोकांचा पाडाव केला व कॉनेक्टिकट नदीचे तोंडाशीं विंडसर नांवाचा किल्ला बांधिला, व पुन्हां कोणास कॉनेक्टिकटमध्यें शिरतां येऊं नये असा बंदोबस्त केला. एवढ्यावर संतुष्ट न होतां बॉस्टन येथील वसाहतवाल्यांनीं सुमारें साठ लोक या किल्ल्याचे नजीक वसाहत करून

राहण्यास पाठवूनही दिले. अशा तऱ्हेनेंच दुसऱ्या चार दोन वसाहतींचे स्थापन झाल्यामुळें मॅसॅचुसेट्सला जोडूनच कॉनेक्टिकट प्रांत प्यूरिटन वसाहतवाल्यांच्या अंमलाखालीं आला.

रोड आयलंडवर रॉबर्ट विल्यमस् नांवाच्या मिशनऱ्यानें वसाहत कली होती. या गृहस्थाचें नांव न्यू इंग्लंडचे इतिहासांत दीर्घ कालपर्यंत प्रामुख्यानें चमकत राहील. एक अत्यंत यशस्वी वसाहत स्थापिल्यामुळेंच केवळ नव्हे तर इंडियन लोकांशीं स्नेहभाव वृद्धिंगत करून अनेक आपत्ती व मनुष्यसंहार थांबविल्याबद्दल न्यू इंग्लंडच्या वसाहतींवर त्याचे अनंत उपकार झाले आहेत. या गृहस्थाची न्यायबुद्धि अत्यंत उच्च दर्जाची होती. इंडियन असोत अथवा युरोपियन असोत त्यांना सारखाच न्याय मिळाला पाहिजे असें म्हणणारा हा मिशनरी होता. त्यावेळचे कोत्या व संशयी बुद्धीचे माणसांस त्याचेबद्दल असावा तितका आदर नव्हता ही गोष्ट अर्थात् वेगळीच. रॉबर्ट विल्यमस्नें प्रथम इंडियन लोकांतील जे दोन पक्ष एकमेकांशीं भांडत होते त्यांच्यामध्यें सलोखा घडवून आणिला. त्यांतील एका इंडियन पक्षाचें नांव ' नारागॅनसेट्झ ' व दुसऱ्याचें ' पिकॉड ' असे होतें. या दोन पक्षांत एकमेकांशीं तडजोड होऊन एकी नांदूं लागल्यानंतर त्यानें त्यांचा इंग्रज वसाहतवाल्यांशीं तह जुळवून आणला. त्यामुळें बरींच शांतता नांदूं लागली व वसाहतीचें काम झपाट्यानें वाढूं लागलें. नाहीं तर दररोज इंडियन लोकांशीं झटापटी करीत बसावें लागलें असतें, व त्यावेळीं तितकी तयारी नसल्यामुळें इंग्रज वसाहतवाल्यांस कदाचित् नामोहरम होण्याची पाळी आली असती. अशा रीतीनें दोन इंडियन पक्षांत घडून आणलेला तहच थोडे दिवसांनीं इंग्रजांच्या बोकांडीं बसणार असें दिसूं लागलें. हा एकत्र झालेला पक्ष थोड्याच दिवसांत शिरजोर झाला व त्यानें शांततेचा तह मोडून इंग्रज वसाहतवाल्यांशीं मारामाऱ्या करण्यास सुरुवात केली. अजून तिसरा एक इंडियन लोकांचा पक्ष होता, त्या पक्षाचें नांव ' मोहीगानस् ' असें होतें. त्याच्याशीं पहिल्या दोन इंडियन पक्षांनीं तह करून इंग्रज लोकांसच नव्हे तर सर्व युरोपियन लोकांस हांकून देण्याचा

मोठा कट केला. विल्यम राजर्सनें पिकॉड लोकाच्या कँपांत शिरून त्यांच्या खूप विनवण्या केल्या व त्यांस इंग्रज लोकांच्या स्नेहाची मातब्बरी समजावून दिली व तिन्ही पक्षांत फूट पाडून पिकॉड पक्षास वेगळें काढलें. अशा रीतीनें प्रथम पिकॉडस् वेगळें पडल्यानंतर संधि साधूनं ब्रिटिश वसाहत. वाल्यांनीं त्यांनां झोडपून काढून त्यांचा निःपात केला.

पिकॉड नांवाच्या इंडियन टोळीचे निःपातास विल्यम राजर्स जरी अप्रत्यक्ष कारण घडला असला तरी पिकॉड लोकांना वेगळें काढण्यांत त्याचा केवळ आत्मसंरक्षणापेक्षां दुसरा हेतु असेल असें संभवत नाहीं. त्यांच्या नाशास ब्रिटिश वसाहतवाल्यांस विल्यम राजर्सचे खास संमतीची जरूर होती अशांतला मुळींच भाग नाहीं. तो फार निर्भीड व स्वातंत्र्यप्रिय मनुष्य होता. त्याचीं धार्मिक व राजकीय मतें पूर्ण स्वातंत्र्यवादी व उदार होती. स्वतंत्रपणें विचार करण्यास व स्वतःचे मताप्रमाणें वागण्यास प्रत्येक व्यक्तीस पूर्ण मुभा असली पाहिजे. सरकारचें कर्तव्य, फक्त कर गोळा करणें, गुन्हेगारीसारख्या अपकृत्यांचा बंदोबस्त करणें, गुन्हेगारांस शिक्षा करणें, व सर्व माणसांच्या समाईक हक्कांचें संरक्षण करणें, इतकेंच असावें. धार्मिक व सामाजिक बाबतींत कायद्यानें ढवळाढवळ करूं नये, असें त्याचें मत होतें.

आकुंचित विचाराच्या व धर्मवेड्या प्यूरिटन समाजांतील लोकांस त्याचीं मतें मान्य होण्यासारखीं नव्हतीं. जोंपर्यंत गतानुगतिक व भटशाहीच्या जुलमाखालीं प्युरिटन लोक होते तोंपर्यंत त्यांनीं, ते स्वतः ज्या जुलमास कंटाळून पळून आले त्या जुलमापेक्षांही अधिक अधम कृत्यें करण्यास मागेंपुढें पाहिलें नाहीं. विल्यम राजर्सचे प्रागतिक मतांबद्दल समाजानें त्याचा छळ मांडला व त्याला प्लिमाउथ कॉलनींतून हांकून दिलें. त्याचीं मतें राजद्रोही व समाजद्रोही आहेत असें ठरविण्यांत येऊन भर हिवाळ्याच्या तोंडास त्याला बाहेर काढण्यांत आलें. मिळतील तीं कंदमुळें खाऊन व झाडांच्या ढोलींत निजून बिचाऱ्याला साडेतीन महिने बर्फमय प्रदेशांत कंठावे लागले. नंतर इंडियन लोकांच्या एका टोळीच्या आश्रयास राहून रोड बेटावरील प्राव्हिडन्स येथें तो आला, त्याच्या मताचेच दुसरे

पांच इसमही त्याला येऊन मिळाले, व त्यांनीं ही छोटेखानी वसाहत स्थापिली. ही गोष्ट इ. स. १६३६ सालीं घडली.

आतांपर्यंत अनेक वसाहती निरनिराळ्या प्रांतांत वसूं लागल्या होत्या व दिवसेंदिवस सामाजिक आयुष्य अधिक सुखमय होत चाललें होतें. याच सुमारास निवळ प्रॉटेस्टंट अशा या वसाहतींत रोमन कॅथॉलिक लोकांचा भरणा होऊं लागला होता व त्यामुळें युरोपांतील धार्मिक तंटे या नव्या जगांतही उत्पन्न होण्याचा संभव दिसूं लागला.

सर जॉर्ज कारटर नांवाचा एक कॅथॉलिक धर्माचा सरदार होता. तो फार विद्वान व परोपकारी असून त्याला लॉर्ड बाल्टिमोर असा किताब होता. या गृहस्थाचें नांव युनायटेड स्टेट्सचे वसाहतींचे इतिहासांत फार प्रसिद्ध आहे. प्युरिटन लोकांप्रमाणें कॅथॉलिक लोकांवरही जसा इंग्लंडांत जुलुम होऊं लागला तसें जॉर्ज कारटरचे मनानें अमेरिकेंत जाऊन राहाण्याचें घतलें. न्यूफाउंडलंड येथें वसाहत करून राहाण्याचा त्याचा विचार होता. त्याप्रमाणें तो इ. स. १६२३ सालीं तेथें जाऊन पोहोंचला. तेथील रुक्ष भूप्रदेश, कडक थंडी व निर्वाहाचे साधनांचा अभाव हीं पाहून तो तेथून निघून व्हर्जीनियाला आला. तेथील लोकांनीं या नवीन पाहुण्याचें स्वागत केलें, व तो जर एका करारनाम्यावर सही करील तर त्याला व त्याच्या बरोबर आलेल्या लोकांस आम्ही आमच्यांत सामील करून घेऊं असें वसाहतवाल्यांनीं कबूल केलें. सर जॉर्ज कारटर कॅथॉलिक धर्माचा असल्यामुळें वसाहतीचा धर्म पाळण्याचें त्याच्यानें कबूल करवेना. व्हर्जीनियांतील असेंब्लीनें मदत नाकारल्यामुळें त्यानें पहिल्या चार्लस राजाकडे मदत मागितली.

लंडन कंपनी यावेळीं मोडकळीस आल्यानें तिला दिलेले सर्व हक्क इंग्लंडच्या राजानें काढून घेतले होते. चार्लस् राजास कारटरचें म्हणणें पटलें, व त्यानें त्याला व्हर्जीनियाचे उत्तरेस असलेल्या पोटोमॅक नदीचे कांठचा प्रदेश बहाल केला. व्हर्जीनियांतील मूर्ख लोकांनीं केवळ धर्म-वेडामुळें व्हर्जीनिया प्रांत गमावला. कार्टरला पुष्कळच मोठ्या मुलखावर

सत्ता मिळालो. इतकेंच नव्हे तर त्याच्या सनदेइतकी खूप सवलती असलेली सनदही आजपर्यंत कोणास मिळाली नसेल. आपल्या ताब्यांत मिळालेल्या सर्व मुलखाचा ख्रिस्ती धर्मानुयायांस फायदा मिळावा मग त्यांचा पंथ कोणताही असो, असें त्याचें धोरण होतें. सर्व वसाहतींवर इंग्रजी कायद्यानुसार नियंत्रण चालावयाचें होतें. फ्री ट्रेडप्रमाणें स्वतंत्र व्यापार पद्धतीनें व्यापार चालावयाचा होता व भलते सलते कर लादावयाचे नाहींत असें ठरलें होतें. वसाहतीस लागू करण्याचे विशिष्ट कायदे करण्याचा अधिकार वसाहती प्रजेस होता.

सर जॉर्ज कारटरचे मृत्यूनंतर वसाहतीचे सर्व अधिकार त्याचे भावाकडे देण्यांत आले. त्याचें नांव सेसिल असें होतें. त्याच्याकडेच लॉर्ड बाल्टिमोर ही पदवी आली. यानंतर आणखी सुमारें दोनशेंसाठ कॅथॉलिक लोक वसाहत करण्यास व्हर्जीनियामध्यें उतरले. त्यांनी आपल्याबरोबर दुसऱ्या जॉर्ज बादशहाकडून व्हर्जीनियाचे गव्हरनरला पत्र आणलें होतें. त्यामुळें गव्हरनरला या लाकांची सोय लावणें भाग होतें पण त्यामुळें व्हर्जीनियांतील प्यूरिटन रहिवाश्यांचें पित्त खवळलें. कारण या नवीन कॉलनीमुळें ' चीसापिके ' नांवाच्या इंडियन लोकाबरोबर चालूं असलेल्या लोकरीचे फायदेशीर व्यापारांत विघ्न येणार होतें. ज्या धर्मछळास कंटाळून प्यूरिटन लोकांनीं युरोप सोडलें, तशाच प्रकारचा धार्मिक छळ त्यांनीं प्रॉटेस्टंट लोकांचा केला व मनुष्यस्वभावाचें विकृत चित्र जगाचे नजरेस आणून दिलें.

न्यू इंग्लंडमधील कांहीं वसाहतवाल्यांनीं इ. स. १६५० नंतर कॅरोलिनामध्यें जाऊन वस्ती केली, व इंडियन लोकांशीं व्यापार सुरूं केला.

डच लोकांची न्यू ॲमस्टरडॅम येथील वसाहत व तिचे लगतचे प्रदेशावरील ताबा इंग्लंडच्या राजानें केव्हांहि मान्य केला नाहीं. डच लोकांची सत्ता फारशी जोरांत नसल्यामुळें न्यू ॲमस्टरडॅमची वसाहत व तिच्या लगतचा प्रांत दुसऱ्या चार्लस राजानें आपला भाऊ ड्यूक ऑफ यार्क याला देऊन टाकिला. ड्यूक ऑफ यार्कनें आपल्यातर्फे तो मुलुख

लॉर्ड बर्कले व सर जॉर्ज कार्टरेट यांना बहाल केला. आपसांतील लढाईमध्यें वरील दोन गृहस्थांनीं दुसऱ्या चार्लस राजास फार मदत केल्यामुळें हा परकीय प्रांत त्यांना बक्षीस मिळाला होता. या गृहस्थांनीं जर्सेमध्यें वसाहतीं स्थापिल्या. इंग्लंडच्या राजानें दिलेल्या सनदांत कित्येक वेळां फार घोंटाळा उडे. एकच मुलुख कित्येक वेळां दोन गृहस्थांस बक्षीस दिला जात असे. याचें उदाहरण ह्मणजे नवीन नेदरलँडचे प्रांतावर इंग्लंडचे राजानें निकोलस याला गव्हर्नर नेमिलें होतें, पुढें थोड्या दिवसांनीं सर जॉर्ज कार्टरेट हाही त्याच प्रांताचा गव्हरनर बनून आला, अर्थात् या गोष्टीस पहिल्या गव्हरनरनें हरकत घेतली.

वसाहतींचे कालाला 'विल्यम पेन' या सद्गृहस्थाच्या नांवानें मोठी शोभा आणली आहे. 'पेन्सिल्व्हॅनिया' ची वसाहत त्याचे नांवानें स्थापिली गेली. या कॉलनीचें अद्भुत व शांततामय जीवनचरित्र वाचून नेत्रांत आनंदाश्रू आल्यावांचून राहात नाहींत, व पेनच्या अलोट नीतिधैर्याची तारीफ केल्यावांचून राहवत नाहीं. अडीचशें वर्षांपूर्वी स्वसंरक्षण हाच जेथें कायदा मानला जात होता अशा नवीन जगांत विश्वबंधुत्वाची महति गाणाराच केवळ नव्हे तर तें सुमारें पाऊण शतक व्यवहार्य करून दाखविणारा महात्मा हयात होता हें कोणास तरी खरें वाटेल काय? त्यावेळीं युरोपांत कुठल्याही दोन देशांत पूर्ण सख्य नव्हतें. त्या वेळची ही कथा वाचीत असतांना आपण एकादी कादंबरीच वाचीत आहों कीं काय असा भास झाल्यावांचून राहात नाहीं.

विल्यमपेन हा इंग्लंडांतील 'क्वेकर' नांवाच्या ख्रिस्तपंथीयांचा पुढारी होता. या पंथांतील लोक धार्मिक शिस्त फार कडक रीतीनें पाळीत, व परोपकाराची त्यांना विशेष महति वाटे. पण या लोकांचा इंग्लंडमध्यें फार छळ होऊं लागला. क्वेकर लोकांनीं सोसायटी ऑफ फ्रेंडस् ह्मणजे 'मित्र मंडळ' नांवाची संस्था चालविली होती. तिच्याही सदस्यांचा इतका छळ होऊं लागला कीं त्याला सीमाच राहिली नाहीं. कैद, हद्दपारी, व मालमत्तेची जप्ती, या तीन प्रकारच्या शिक्षा त्यांच्या नशिबीं नित्यच येऊं लागल्या. त्यावेळच्या चिन्हांवरून राजाचे मेहेरबानीनें मुद्दाम हा छळ



पेन्सिल्व्हॅनिया वसाहतीचा उत्पादक विल्यम पेन्.

कमी होईल असें मानण्यास जागा नव्हती. त्या काळीं धार्मिक छळास कंटाळलेल्या लोकांत अमेरिकेंत जाऊन वसाहती करण्याचा परिपाठच पडत चालला होता. आपणही अमेरिकेस जाऊन केवळ क्वेकर लोकांकरितांच नव्हे तर युरोपांतील सर्व दलित लोकांस स्वतंत्र करण्यासाठीं म्हणून एक मोठी वसाहत स्थापावी असें त्याला वाटूं लागलें. परिस्थिति फारशी अनुकूल नव्हती तरी सुद्धां मनाचा मोठा हिय्या करून विल्यम पेननें इंग्लंडचा राजा दुसरा चार्लस् याची गांठ घेतली व आपल्या लोकांवर होत असलेला जुलूम यथोचित वर्णन करून ज्या उदात्त हेतूनें प्रेरित होऊन त्यानें हें काम हातीं घेतलें होतें त्याची त्याला नीट समजूत पटवून दिली. त्याचा परिणाम असा झाला कीं यत्किंचितही संभव नसतां त्याच्या हातांत डलावेरच्या आसपासच्या पुष्कळ मोठ्या मुलखाची सनद पडली. डिलावेरच्या प्रांतांतील फक्त तीन परगणेच काय ते ड्यूक ऑफ यॉर्कचे मालकीचे राहिले होते.

विल्यम पेननें आपण विश्वबंधुत्वाचे तत्वावर रंग, जाति, धर्मभेद, यापासून मुक्त असा समाज स्थापन करून स्वतंत्र वसाहत करणार आहोंत, असें जाहीर केलें. इंडियन लोकासंबंधीं सुद्धां त्याला असें वाटत होतें कीं न्याय व प्रेम यांचे जोरावर त्यांच्याशीं सलोखा राखून त्यांनां आपलेंसें करून घेणें जड जाणार नाहीं. ज्या ज्या लोकांस धर्म किंवा सामाजिक मतें यासंबंधीं छळ सोसावा लागे अशा सर्व लोकांस या विश्वबंधुत्वाचे वसाहतींत येऊन राहण्यास मुभा ठेविलेली होती. विल्यम पेनच्या उदार धोरणाचा परिणामही अगदीं तात्काल दिसून येऊं लागला. अगदीं थोड्या दिवसांत तीन जहाजें भरून क्वेकर लोक नव्या वसाहतींत येऊन दाखल झाले. या लोकांबरोबरच विल्यम मार्कहॅम नांवाचा गृहस्थ आला. त्याला डेप्युटी गव्हरनर करण्यांत आलें. सर्व लोकांशीं शांततेनें व गोडीगुलाबीनें वागण्याचें विल्यम पेनचें धोरण अबाधित चालूं होतें. त्याला बहाल मिळालेल्या हद्दींत स्वीडिश लोकांनीं वसाहती स्थापिल्या होत्या व ते सुखासमाधानानें रहात होते. त्यांना विल्यम पेननें लिहिलें कीं ज्या भागांत तुम्हीं रहात आहां तेथें तुम्हास सुखानें राहातां येईल, त्याचप्रमाणें

तुम्हांस आपले कायदे करून त्याप्रमाणें चालण्याची पूर्ण मुभा आहे. आमचेकडून तुम्हांस कांहीं एक उपसर्ग होणार नाहीं. त्यानें आपल्या डेप्युटीस सांगितलें कीं इंडियन लोकांशीं अत्यंत सलोख्यानें वागून युरोपियन वसाहतवाल्यांकडून अथवा दुसऱ्या कोणाकडून त्यांनां कोणत्याही प्रकारचा त्रास न होईल असें वर्तन ठेवा, ते या देशाचे मालक आहेत ही गोष्ट विसरूं नका. इंडियन लोकांचे प्रमुख चीफ्स्ना त्यानें जातीनें पत्रें लिहिलीं, त्यांत उभय पक्षांमध्यें सलोखा व प्रेम नांदावें अशी इच्छा प्रकट केली होती, व बंधुत्वाचें नातें पाळण्याबद्दल विनंतीही केली होती.

नंतर त्यानें एक राज्यघटना तयार केली. समता व स्वातंत्र्य या तत्वांचा शक्य तितका पुरस्कार या घटनेंत करण्यांत आला होता. त्याच-प्रमाणें वसाहतवाल्यांपासून मिळेल तितका पैसा वसूल करण्याचें जें धोरण इतर प्रांतांतून चालूं होतें त्यास त्यानें अजिबात फांटा दिला. वसाहतींत निघेल तितकें उत्पन्न वसाहतींतच खर्च व्हावें असें त्याचें मत होतें. आतांपर्यंत इतकें औदार्य व प्रजेवरील इतका दृढ विश्वास कोणत्याही राज्यकर्त्यानें दाखविला नसेल. थोड्याच दिवसांनीं डिलावेरचे उरलेले तीन परगणे, विल्यमपेनच्या कर्तबगारीवर व प्रेमळ-पणावर खूष होऊन ड्यूक ऑफ यॉर्कनें नवीन वसाहतीस देऊन टाकले. अशा तऱ्हेनें डिलावेरचे आखात व नदी यांचा उत्तरेकडचा बराच भाग या नूतन वसाहतीचे मालकीचा झाला, विल्यम पेन स्वतः इ. स. १८८२ सालीं अमेरिकेंत आला. तेथें त्याच्या अनुयायांनीं त्याचें फार मोठें स्वागत केलें, त्याला भेटावयास या नूतन वसाहतींतील सर्व लोक आले असतील यांत नवल नाहीं, पण परप्रांतीय स्वीडिश, डच व इंग्रज लोकांमधील उदार-मतवाद्यांनीही त्याचें योग्य स्वागत केलें. सर्व वसाहतींत आनंदास पारावार राहिला नाहीं. त्यानें जमलेल्या समुदायापुढें समता व विश्वबंधुत्व या विषया-वर भाषण केलें व सर्वांस नीतीनें व नेकीनें वागण्याचा उपदेश केला व नंतर चेस्टर नदींतून त्यानें अन्तःप्रदेशांत प्रवेश केला व फिलाडेल-फिया हें शहर वसविण्यासाठीं योग्य जागा शोधून काढिली. पुढें तसेंच

न्यूयॉर्क, न्यूजर्से व लाँग आयलंड वगैरे ठिकाणीं असलेल्या क्वेकर लोकांस भेटून व त्यांस धीर देऊन तो आपल्या वसाहतींत परत येऊन दाखल झाला.

त्याच्या आज्ञेप्रमाणें मार्कहॅमनें इंडियन लोकांशीं प्रेमाचें नातें जुळविण्याची खटपट फार नेकीनें पार पाडली. त्या योगानें या दोन लोकांमध्यें सौख्यवृद्धि होणें अपरिहार्यच होतें. युरोपियन लोकांस जर कांहीं जमीन वगैरेची जरूर पडली तर ते योग्य किंमत देऊन विकत घेत. पूर्वीच्या कॉलनीप्रमाणें त्यांनां हुसकून देऊन, त्यांचीं घरेंदारें व पिकें जाळून, त्यांनां देशोधडीला लावून, नाहीं तर ठार मारून घेत नसत. डिलावेर नदीचे कांठीं सर्व इंडियन लोकांचे प्रमुखांचें संमेलन भरविण्यांत आलें. या संमेलनाचे प्रसंगीं पेन आपल्या कांहीं सोबत्यांसह शस्त्रविरहित व क्वेकर लोकांचा साधा पांढरा पोशाख घालून आला होता. एका वृक्षाचे खालीं उभें राहून त्यानें भाषणास सुरुवात केली. ते स्वतःहीं निःशस्त्र होते व आपल्या या उदारधि बंधूचें भाषण, आपले पद्धतीप्रमाणें एका अर्ध वर्तुलाकार रांगेंत बसून चित्त लावून ऐकत होते. पेन ह्मणालाः—' मित्रहो, परस्पर विश्वासाच्या प्रशस्त भूमीवर आपण उभे आहोंत. आपण सर्व एकाच तऱ्हेच्या हाडामांसाचे बनलेले आहोंत. आपण बंधू बंधूप्रमाणें राहिलें पाहिजे, व एकमेकांचा गैरलाभ घेतां कामा नये. जर कांहीं मतभेदाचा प्रश्न निघालाच तर पंचायतीमार्फत निकाल लावून घ्यावा. आपल्यामध्यें प्रेम व खुल्या दिलानें राहण्याची प्रवृत्तीच आपण कायम ठेविली पाहिजे.'

सर्व इंडियन प्रमुखांनीं उत्तर दिलें; जोंपर्यंत नद्या वाहात आहेत व सूर्य भूभाग प्रकाशीत आहे, तोंपर्यंत विल्यमपेनच्या प्रजाजनांशीं आह्मी शांततेनेंच वागूं.

हा करार तोंडीच ठेवण्यांत आला होता. परस्परांचा विश्वास इतका अढळ होता कीं तो कागदावर उतरण्याची जरुरीच भासली नाहीं. तो करार सर्वांनी अक्षरशः अंमलांत आणला. मारामारी किंवा दगलबाजी कोणत्याही कारणानें उद्भवली नाहीं. एकवचनी इंडियन लोक व उदारमतवादी युरोपियन लोक यांची जोड खरोखरीच प्रशंसनीय बनली. सुमारें पाऊणशें

वर्षें, जोंपर्यंत हा प्रांत सोसायटी ऑफ फ्रेंडसचे अंमलाखालीं होता तोंपर्यंत पेन सिल्व्हॅनियामध्यें रणशिंगाचा आवाज कधींही ऐकूं आला नाहीं. ही मैत्री अगदीं शेवटपर्यंत टिकली. इतर प्रांतांतील धामधूम, गैरविश्वास, खून, लढाया वगैरे कोणीकडे व हें रामराज्य कोणीकडे ? केकर लोकांचा शुभ्र कोट व विशिष्ट टोपी हीं तोफा व दारूगोळ्यांचीं कोठारें यांपेक्षां सुद्धां अधिक परिणामकारक ठरलीं. खरोखरीच ही गोष्ट इतकी अद्भुत घडली कीं, तिच्या विश्वसनीयपणाबद्दल इतिहासाचे वाचक घोटाळ्यांत पडल्यासारखे होतात, पण ती अक्षरशः खरी आहे. फिलाडेलफिया या शहराला अजून सुद्धां लोक केकर सिटी या नांवानें संबोधितात.

अशा पूर्ण अशांततेचे कालांत आपल्या प्रांतापुरती निर्भेळ शांतता लाभल्यामुळें, त्याचा पेनसिल्व्हॅनियाचे इतिहासावर फार इष्ट परिणाम घडून आला व सुबत्ता व प्रगति झपाट्यानें वाढूं लागली यांत नवल तें कसलें ?

ही वसाहत इतक्या झपाट्यानें वाढूं लागली कीं सर्वसाधारण व्यवस्थेसाठीं कायदेमंडळ नेमणें भाग पडलें. इ. स. १६८२ मे डिसेंबर महिन्यांत पहिलें कायदेमंडळ बोलाविण्यांत आलें. त्यावेळीं विल्यम पेननें मोठें कळकळीचें भाषण केलें. त्याच वेळीं नवीन वसाहतीसाठीं राजधानी म्हणून एक मोठें सुंदर शहर वसाविण्यांत आलें. इ. स. १६८३ सालीं या नगराचा पाया खोदण्यास सुरुवात झाली, व जंगल वगैरे तोडून जागा साफ करण्यांत येऊं लागली. ' फिलाडेलफिया ' याचा अर्थ ' बंधुप्रेमाचें नगर ' असा आहे.

अमेरिकेच्या दुसऱ्या कोणत्याही शहराची फिलाडेलफिया नगराइतकी झपाट्यानें वाढ झाली नसेल. जादूगारानें आपल्या पोतडींतून एकादा पदार्थ झटकन काढून दाखवावा त्याप्रमाणें हें शहर भूतलावर अगदीं अल्पकालांत चमकूं लागलें. इ. स. १६८३ सालीं जेथें फक्त तीनच घरें होतीं. तेथें दोन वर्षांत सहाशें घरें दिसूं लागलीं. शाळागृहें सुरूं करण्यांत आलीं, छापखाने अस्तित्वांत आले. पुढच्या एकाच वर्षांत या शहराची वस्ती



जॉर्जिया वसाहतीचा संस्थापक जेम्स ओगलथॉर्प.

पान ४५.

फुकट जेवावयास तरी घालीत, तेंही आतां मिळेनासें झालें व या सुटकेमुळें त्यांची स्थिति सुधारण्याचें चिन्ह दिसेना. ह्या गरीब लोकांनां राहाण्यासाठीं व त्यांच्या पोटाची कांहीं तरी तरतूद करण्यासाठीं दयाळू ओगल थार्पचें हृदय द्रवत होतें, त्यांनीं दुसऱ्या जॉर्ज राजाचें या गोष्टीकडे लक्ष वेधून या लोकांची सोय लावण्यासाठीं एक नवीन वसाहत करण्याची परवानगी मिळविली. इ. स. १७३२ सालीं सरकारी सनदेनें त्यांनां सॅव्हाना व अल्टामाहा या नद्यांमधील प्रांत मिळाला. या प्रांतास जॉर्जिया हें नांव देण्यांत आलें. जेम्स ओगलथार्पचें चरित्र इतकें शुद्ध व उदात्त होतें कीं त्याच्यावर विश्वास बसण्यास व नवीन वसाहत बसण्यास बिलकूल वेळ लागला नाहीं. तो उत्तम विद्वान असून पार्लमेंटचा मेंबरही होता. त्याचा स्वभाव परोपकारी, उदार व स्नेहमय होता. तसाच तो अत्यंत शूर व समयसूचकही होता. सॅव्हाना येथें स्थापावयाच्या वसाहतींत त्यानें स्वतः पुढाकार घेतला. प्रथम त्यानें एकशेंवीस लोकांची वसाहत तयार केली. तो. इ. स. १७३३ चे जानेवारी महिन्यांत चार्लस्टन् येथें येऊन पोहोंचला, व हल्लीं सॅव्हाना शहर आहे तेथें त्यानें वसाहत केली. रुंद रुंद रस्ते व अनेक क्रीडोद्यानें यांनीं युक्त असें एक सुंदर शहर तेथें लवकरच थाटलें. लवकरच या शहरांत मोरेव्हियन पंथाचे लोक येऊन राहिले. त्यानंतर मेथॉडिझम्चा पुरस्कर्ता जॉन वेल्सली तेथें येऊन राहिला. त्याचे मनांत इंडियन लोकांस ख्रिस्ती धर्माचीं उच्च तत्वें शिकवावयाचीं होतीं धर्मशास्त्रांतील कर्ममार्गाचा पाल्हाळिक भाग शक्य तितका सोडून देऊन तत्वांचेंच अवलंबन अधिक व्हावें असें त्याचें मत होतें. जॉन वेल्सलीचा भाऊ जार्ज व्हिटफील्ड याची या कामीं फार मदत झाली. अमेरिकन लोकांमध्यें स्वातंत्र्याचे लढाईनंतर इव्हॅन्जेलिझम्चा जो झपाट्यानें प्रसार झाला त्या तत्वाचे मूळ पुरस्कर्ते हे दोघेच होत.

वसाहतींतील परिस्थिति व आयुष्यक्रम.

प्रकरण ४ थें

इंडियन लोक व वसाहतवाले यांच्यामध्यें विचारविनिमय सुरूं होण्यास बराच काल लागला. ते एकमेकांपासून फार दूर रहात असत व दोघांचे आचार-विचारांतही विलक्षण फरक होता. संबंध येई, तो व्यापारापुरता. युरोपीय वसाहतवाल्यांप्रमाणें इंडियन लोकांनीं सुद्धां आपण होऊन समेट व सहकारित्वाचा प्रयत्न केल्याचे पुष्कळ दाखले सांपडतात. 'वांपानो आग' नांवाच्या टोळींतील सामोसेट नांवाच्या इंडियन माणसानें प्लिमाऊथ येथें येऊन तेथील वसाहतवाल्यांशीं समेट केला होता. त्याला मोडकें तोडकें इंग्रजी येत असे, कारण त्यानें पूर्वी युरोपियन लोकांबरोबर कित्येक सफरी केल्या होत्या व मार्गदर्शकाचें कामही केलें होतें. पूर्वी इंडियन लोकांची संख्या पुष्कळ होती पण मध्यंतरीं सांथीचे रोगानें त्यांचे बहुतेक लोक कसे मृत्युमुखीं पडले याचें वर्णन तो आपल्या मोडक्या तोडक्या इंग्रजी भाषेंत करी. त्यानंतर इ. स. १६१४ चे सुमारास 'स्क्वांटो' नांवाचा इंडियन इंग्रजी भाषा बोलण्यास शिकला. तह व करारनामे करण्याचे कामीं या लोकांचा फार उपयोग होई. जसजसा सहवास अधिक होऊं लागला तसतसे ते एकमेकांची भाषा समजूं व बोलूं लागले.

लोकमतानुवर्ती राज्यपद्धतीचा अवलंब करण्याचें तत्व अगदीं प्रथमपासूनच अंमलांत आलें असावें असें दिसतें. राजपक्षीय लोकांपासून अशा पद्धतीस कधीं कधीं अडथळा येत असे पण तिकडे कोणी फारसें लक्ष देत नसत. इ. स. १६३४ सालीं प्यूरिटन लोकांचे वसाहतींत प्रजामतानुवर्ती राज्यपद्धति अंमलांत आली होती, त्यावर्षी इलेक्शनचे दिवशीं

एक सुप्रासिद्ध पाद्री मिस्टर कॉटन यानें लांबलचक भाषण करून प्रजानुवर्ती राज्यपद्धति अराजक कशी ठरते हें सिद्ध करून दिलें. सर्व लोक शांतपणें भाषण ऐकत होते. पण भाषण सपतांच त्यांनीं इलेक्शनचें काम अथासांग पार पाडलेंच, व इकडे ते शास्त्रीबुवा हात चोळीत स्वस्थ बसले ! त्याच वेळीं ' बॅलट ' म्हणजे मतें घेण्याकरितां पेटींत चिठ्ठ्या टाकण्याची पद्धति अमलांत आली. त्यापूर्वी उघड तोंडी मतें घेऊन इलेक्शनचें म्हणजे निवडणुकीचें काम चाले. तरी अजून एक गोम राहून गेली होती, ती म्हणजे मतदार होण्यास प्रत्येक मनुष्य प्रॉटेस्टंट चर्चचा सदस्य असावाच लागे. स्त्रियांस मतें देण्याचा अधिकार देण्यांत आला नव्हता.

चमत्काराची गोष्ट अशी कीं ज्या मतस्वातंत्र्याकरितां आणि धर्मस्वातंत्र्याकरितां प्यूरिटन लोकांनीं मायदेश सुद्धां सोडला, त्यांना पुढे त्याच तत्वांची कदर राहिली नाहीं; इतर लोकांवर धार्मिक व सामाजिक जुलुम ते खुशाल करूं लागले. अगदीं प्रथमपासून सुद्धां लोकांत धार्मिक कुरबुरी चालूंच होत्या. धार्मिक विषयालाच अधिक महत्व मिळून, अगदीं महत्वाचे विषय जे अन्नपाणी, घरेंदारें, पीकपाणी, त्यांजकडे कित्येक वेळां दुर्लक्ष होई, पाद्री लोकांनीं झोडलेल्या पुराणावर कोणी टीका केली किंवा स्वतंत्र मत प्रतिपादन केलें कीं त्याला लोक हैराण करून सोडीत. अशाच एका प्रसंगीं रॉजर विल्यम यांस कॉलनींतून हांकून देण्यांत आलें होतें. लोक बोलतांना ' रॉजर विल्यमपेक्षांही नीच ' अशा अर्थाचे शब्द कोणाविषयीं तिरस्कारानें बोलतांना वापरीत.

प्युरिटन लोकांचे " धार्मिक स्वातंत्र्या "चा अर्थ म्हणजे सर्वांनीं त्यांचेच मताप्रमाणे वागावें असा होता. जे लोक त्यांचे मताप्रमाणें वागत नसत त्यांचा छळ होई. ॲनि हचिनसन् नांवाची एक बाई कॉलनीमध्यें नुकतीच दाखल झाली होती. एकेप्रसंगीं धार्मिक वादविवादांत बोलण्याची तिनें इच्छा दर्शविली. त्यावेळीं स्त्रिया सार्वजनिक कार्यांत भाग घेऊं लागल्या नव्हत्या. ॲनीचे म्हणणें प्युरिटन पाद्र्यास पटेना व त्यानें तिला सभेंत बोलण्याची मनाई केली, पण तिनें शेवटपर्यंत आपला हेका सोडला नाहीं. तिला



वसाहतवाल्यांनीं वर्ध्यूंचा केलेला आघात.

या गोष्टीचा फार राग आला. ती ह्मणाली, " पुरुषवर्ग फार आप्पलपोटा आहे, बायबलसारख्या ग्रंथाचा स्त्रियांनां कां फायदा मिळूं नये ? " पुढें तिला व तिचे मैत्रिणींनां वसाहतींतून हांकलून देण्यांत आलें. त्यांचे चरितार्थाची तरी कांहीं सोय आहे कीं नाहीं हेंही वसाहतवाल्यांनी पाहिलें नाहीं. विचाऱ्या रानोमाळ भटकत एका इंडियन कँपांत गेल्या. रॉजर विल्यम् त्याच इंडियन कँपांत छपून राहिलेला त्यांनां आढळला. इंडियन लोकांचे चीफनें उदारपणानें ऱ्होड आयलंड नांवाचें सुंदर बेट त्यांनां बक्षीस दिलें व तेथें त्यांनीं स्वतंत्र स्त्रीराज्य स्थापिलें.

कोत्या धार्मिक समजुतीनें जरी प्यूरिटन लोक असले मासलेवाईक प्रकार करीत, तरी एकंदरींत त्यांचे हेतू उच्च असत. त्यांनीं इ. स. १६३८ सालीं पुष्कळ देणग्या मिळवून ' हारवर्ड ' कॉलेज स्थापन केलें. ही पहिली अमेरिकन युनिव्हर्सिटी होय.

इ. स. १६३८ सालीं, स्टीफन डाय यानें प्रिंटिंग प्रेस सुरू केला. अमेरिकेंत छापिलेलें पहिलें पुस्तक म्हणजे एक पंचांग होतें, त्यांत न्यू इंग्लंडांतील वेळेप्रमाणें तारखा, मुहूर्त वगैरे छापिलीं होतीं. दुसरें पुस्तक हिब्रू बायबलांतील गीतांचें इंग्रजी भाषांतर हें होय. हें जवळ जवळ तीनशें पानांचें पुस्तक होतें, व त्याची छपाई अत्यंत ओबड धोबड होती. हळूं-हळूं युरोपांतील सर्व सुधारणा नव्या देशांत येऊं लागल्या, वसाहतींची संख्या व लोकसंख्या हीं वाढूं लागलीं, सर्वत्र सुबत्ता होऊं लागली, व निर्वाहोपयोगी वस्तूंची संख्या वाढूं लागली, सर्व तऱ्हेचे लहानमोठे धंदे सुरूं होऊं लागले.

जीवनकलहाचा प्रश्न सुटूं लागला, व वसाहती वसतिक्षम होऊं लागल्या. घरें बांधिलीं जाऊं लागलीं, पण अद्यापि एक उणीव राहिली होती. गृह स्वामिनी नसल्यामुळें वसाहतवाल्यांस जीवन रुक्ष वाटत होतें. पण ही उणीव सुप्रसिद्ध लंडन कंपनीनें फार दिवस भासूं दिली नाहीं. तिनें इ. स. १६२० सालीं, नव्वद तरुण स्त्रियांस व दुसऱ्या वर्षी आणखी साठ विवाहेच्छू तरुणींस आपले गलबतावर थारा दिला, व नूतन वसाह-

तींतील सद्गृहस्थांस कौटुंबिक आयुष्याचा लाभ मिळवून देण्याचें पुण्य पदरीं बांधून घेतलें. लंडन कंपनी हें एक व्यापारी खातें होतें. त्याला इतक्या तरुणींस फुकट आणणें कसें शक्य असेल? आणि या सौभाग्याकांक्षिणी तर निव्वळ कफल्लक होत्या. लंडनें कंपनीनें वसाहतवाल्यांकडून प्रत्येकीं सुमारें दोन हजार रुपये अगर तितक्या किंमतीचा तंबाखू वगैरे माल स्वीकारून त्याचे मोबदला एक वधू घेऊन जाण्याची परवानगी दिली. वसाहतवाल्यांची फारा दिवसांची नड भागली. या तरुण स्त्रियांस बिन-खर्चानें अनुरूप वरप्राप्ति झाली, व कंपनीचे भाड्याचे पैसे वसूल झाले. सर्व पक्षांना हा सौदा फायदेशीर झाल्यामुळें हा माल खपण्यास फार वेळ लागला नाहीं, हें सांगणें नकोच! या पुढील सालांत लंडन कंपनीस हा एक नवीन धंदाच सांपडल्यासारखें झालें, व वसाहतवाल्यांस योग्य प्रमाणांत स्त्रियांचा पुरवठा होऊं लागला.

निग्रो लोकांची आयातः—

इ. स. १६२० सालीं आणखी एक महत्वाची गोष्ट वसाहतींत घडली. ती म्हणजे त्या सालीं निग्रो लोकांचा अमेरिकेंत प्रथम प्रवेश झाला ही होय. या गोष्टीस पुढें अमेरिकेच्या इतिहासांत किती महत्व प्राप्त झालें हें दिसून येईलच. त्यावर्षी एका डच जहाजानें सुमारें वीस नीग्रो आफ्रिकेतून पकडून आणले होते. त्यांचा जाहीर लिलांव केला व कांहीं सुखवस्तू अमेरिकन लोकांनीं ते गुलाम म्हणून खरेदी केले. आपण काय करीत आहों हें त्या सद्गृहस्थांचे तेव्हां लक्षांत आलें नाहीं व बहुजन समाजाचेंही तिकडे विशेष लक्ष गेलें नाहीं. पुढें जवळजवळ पन्नास वर्षेंपर्यंतही हा प्रश्न कोणाचे नजरेंत प्रामुख्यानें आला नाहीं.

इ. स. १६२९ सालीं पहिलें जहाज अमेरिकेंत बांधण्यांत आलें तें सुमारें ४०० टन माल एकावेळीं नेतां येईल येवढें मोठें होतें. अमेरिकेंत येणाऱ्या जहाजांची ये जा तर इतकी वाढूं लागली कीं इ. स. १६४० सालीं मॅसॅचुसेटचे आखातांत दोनशें नव्वद जहाजें आलीं होतीं.

न्यू इंग्लंडमधील सर्व वसाहतींची म्हणून एक स्वतंत्र नियंत्रण सभा असावी ही जाणीव इ. स. १६३९ पासून उत्पन्न होऊं लागली. त्यासालीं

8606

सर्व वसाहतींतील निवडक प्रतिनिधींची एक सर्वसाधारण सभा झाली. पुढें इ. स. १६४३ सालीं मॅसॅच्युसेट्स वसाहतींतील प्रतिनिधीही या सभेंत दाखल झाले, सर्वच वसाहती इंग्रज राजसत्तेखालीं असल्यामुळें सभापतीस फक्त मत प्रदर्शनाचे हक्क होते. नियंत्रण सत्ता नव्हती. प्रत्येक वसाहतीस स्वतःकरितां कायदे करण्याचा हक्क असल्यामुळें या महासभेंत सर्वांना साधक बाधक अशाच विषयांचा केवळ उहापोह करण्यांत येई.

इ. स. १६४० सालीं इंग्लंडमध्यें राजसत्तेची उलथापालथ होऊन पहिल्या चार्लस राजास फांसावर लटकाविण्यांत आलें, त्यामुळें वसाहतींतही राजकीय मतभेद सुरूं झाले. व्हर्जीनियांतील लोकांचा कल प्रथमपासून राजपक्षाकडे होता. त्यावेळचा गव्हरनर सर विल्यम बर्कले हाही राजपक्षीय होता. पहिल्या चार्लसनंतर व्हर्जीनियांतील लोकांनीं दुसऱ्या चार्लस राजाची द्वाही फिरविली, पण हें कृत्य, इग्लंडांत डिक्टटर असलेल्या ऑलिव्हर क्रॉमवेलला आवडलें नाहीं. त्यानें एक लढाऊ गलबत व्हर्जीनियास पाठावलें. व्हर्जीनियांतील लोकांनीं क्रॉमवेलची सत्ता पूर्णपणें स्थापित झाल्याचें पाहिलें त्यावेळीं तह करून व त्याच्याशीं मित्रत्वाचे नात्यानें राहण्याचें कबूल करून ते मोकळे झाले. पुढें क्रॉमवेलची सत्ता लटपटून दुसरा चार्लस राजा गादीवर आला. त्याला सर्व ब्रिटिश मुलुख आपली व आपल्या भोवतालच्या हांजी हांजी करणाऱ्या लोकांची खाजगी मालमत्ताच आहे असें वाटे. आपल्या प्रभावळींतील वाटेल त्या माणसास अमेरिकेंतील मोठमोठ्या वसाहती देण्याचें त्यानें सुरूं केलें. वास्तविक त्या पूर्वीच दुसऱ्या कोणास तरी देऊन टाकिलेल्या असत, व पंचवीस पंचवीस-तीस तीस वर्षांच्या जुन्या वसाहतवाल्यांनां सुद्धां आपण कोणाची तरी खाजगी मालमत्ता आहोंत असें आढळून येई. एके वेळीं दुसऱ्या चार्लसनें संबंध व्हर्जीनिया प्रांतच दोन लॉर्डांना बहाल केला. अशा तऱ्हेच्या नित्य कटकटी उत्पन्न होत, पण त्यांतूनही वसाहतींची प्रगतीच होत चालली. मॅसॅचुसेटसमधील लोक पहिल्यापासूनच राजसत्तेविरुद्ध असल्यामुळें क्रॉमवेल डिक्टेटर होतांच त्यांनां आनंद झाला. खुद्द ऑलिव्हर क्रॉमवेलचीही मॅसॅचुसेटसवर मेहेरबानीच होती.

इ. स. १६५६ चे जूनमध्यें क्वेकर लोक वॉस्टनचे किनाऱ्यास लागले. त्यांच्यामध्यें ॲन ऑस्टिन व मेरी फिशर अशा दोन स्त्रिया होत्या, एकाएकीं या दोन स्त्रिया चेटक्या आहेत अशी वातमी पसरली. झालें ! सर्व लोक हवालदिल ह'ऊन गेले. त्या दोन्हीं स्त्रिया खरोखरीच चेटक्या आहेत कीं काय हें पाहाण्याकरितां त्यांनां उघडें करण्यांत आलें, त्यांचें सर्व सामान तपासून त्यांच्या जवळचीं पुस्तकें जाळण्यांत आलीं, व त्यांनां तुरुंगांत ठेवण्यांत आलें व नंतर त्यांनां हद्दपार करण्यांत आलें. आणखी बऱ्याच क्वेकर पंथाचे लोकांस चोप देऊन हांकलून देण्यांत आलें. जसजसा क्वेकर लोकांविरुद्ध कायद्याचा कडक अंमल होऊं लागला तसतसा त्यांनांही जोर चढला व त्यांची संख्या वाढूंच लागली. पुढें तर युनायटेड कॉलनीज व मॅसॅचुसेट्समध्यें क्वेकर पंथाचा मनुष्य आढळला कीं त्याला फांशीच देऊन टाकीत. इ. स. १६५९ सालीं चौघा क्वेकर लोकांस फांशीं देण्यांत आलें. त्यामध्यें एक बाई होती पण तिच्यावरही दया करण्यांत आली नाहीं. इतकी या वसाहतींत धर्मवेड व असाहिष्णुता हीं बळावलीं होतीं.

अमेरिकेंत जसजशा वसाहती होऊं लागल्या तसतसा इंग्लंडच्या व्यापारांत इष्ट फरक घडून येऊं लागला, व त्यामुळें अधिक वसाहती करण्यास इंग्रज लोकांस जोर आला. स्पॅनिश लोकांनीं केलेल्या वसाहती-पासून स्पेननें अतोनात संपत्ति कमाविली व त्यामुळें इंग्रजांस त्याची स्पर्धा वाटूं लागली होती, एका इंग्रज व्यापाऱ्यानें स्पेनला कसें नामोहरम करतां येईल (How spain may be abased) या विषयावर एक चोपडें प्रसिद्ध केलें, त्यांत वेस्ट इंडीजवर हल्ला करून स्पॅनिश लोकांस हांकलून द्यावें व अमेरिकन किनाऱ्यावर जहाजें बांधण्याचे कारखाने काढून तेथें थोडी फौज ठेवावी, असें प्रतिपादन केलें होतें. स्पेननें अमेरिकेंतूनं आणलेल्या सोन्याचा इंग्रजी बाजारावर परिणाम होऊं लागला त्यामुळें.एकंदर पदार्थांच्या किंमती चढूं लागल्या व व्यापारी व कारखानदार लोकांस चांगला फायदा मिळून त्यांनां आपापले धंदे करण्यास उत्तेजन मिळालें. देशांत भांडवलाची वाढ होऊं लागली होती व भांडवलवाले

केवळ स्वदेशांतच नव्हे तर इतरत्रही भांडवल गुंतवून व्यापार करण्यास व नफा मिळविण्यास सिद्ध झाले होते. पूर्वी व्याजवट्ट्याचा धंदा करणें कायद्याविरुद्ध समजलें जात होतें पण आतां रकमा कर्जाऊ देऊन व्याज घेणें न्याय्य ठरलें होतें. युरोपमधील धार्मिक छळास व राजकीय परिस्थितीस कंटाळलेले व लढाया वगैरेंपासून उद्भवणाऱ्या आपत्ती टाळण्यास इच्छिणारे पुष्कळ लोक इंग्लंडांत येऊन राहूं लागले. या लोकांनीं पूर्वी इंग्लंडांत चालू नसलेले अनेक धंदे सुरूं केले. तलम कापड, कागद, कांचकाम, व चिनी मातीचें काम असलीं कामें युरोपांतून आश्रयाकरितां इंग्लंडमध्यें आलेल्या लोकांनीं इंग्लंडांत सुरू केलीं हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. इंग्लंडांत कारखाने वाढूं लागले तसतशा दोन नवीन गोष्टी करणें प्राप्त झालें. एकतर तयार झालेल्या मालास गिऱ्हाईक शोधणें, व दुसरें कारखानदारांस निरनिराळ्या तऱ्हेचा कच्चा माल पुरविणें. या दोन्हींही गोष्टींनीं पुन्हां व्यापार वाढतच गेला, व इंग्लंडचे जहाजवाल्यांस अधिक काम मिळूं लागलें. त्यावेळच्या पुष्कळ इंग्रज लोकांनीं लिहिलेल्या व्यापाराविषयींच्या ग्रंथांचें सार असें आहे कीं 'कांहीं थोड्या कालांतच अमेरिकन इंडियन लोक ब्रिटिश मालाचे मोठें गिऱ्हाईक बनेल, त्यांतच वसाहतीकरितांही गेलेल्या लोकांच्या गिऱ्हाइकांची मोठी भर पडेल, व्यापार वाढेल तसतशी जहाजवाल्यांची व खलाशी लोकांची संख्या वाढेल, त्यांच्यांत कर्तबगारी व कौशल्य यांची वृद्धि होईल व त्यामुळें मोठें लढाऊ आरमार ठेवण्यास उत्तम संधि प्राप्त होईल. इंग्लंडांतील कारखानदारांनां कच्चा माल पुरविण्याचें काम वसाहतवाल्यांचे कडून उत्तम प्रकारें करवून घेण्यांत येईल. इंग्लंडांतील बेकार लोकसंख्या वाढत चालली आहे, त्यांना परदेशीं पाठवून त्यांच्या पोटापाण्याची तरतूद परभारें होईल. मच्छीमारीचा धंदा वाढेल व या सर्व उलाढालींवर किंचित् जरी कर ठेवले तरी सरकारी खात्यांतील शिल्लक वाढेल. व्यापारांत पुरेपूर फायदा होण्यासाठीं इंडियन लोकांस खिस्ती बनविल्यास व त्यांच्यांत युरोपियन धर्तीच्या रहाणीचा फैलाव केल्यास मोठा उपयोग होणार आहे असेंही त्यावेळीं लिहिलेल्या पुस्तकांत प्रतिपादिलें होतें.

पहिल्याप्रथम ज्या वसाहती स्थापन झाल्या त्यांना आलेल्या अडचणींचें वर्णन मागें आलेंच आहे. त्याशिवाय एक आर्थिक अडचण उद्भवली होती. सर्वच वसाहतवाल्यांकडून वसाहत कंपनीचे मालक काम घेत व त्यांनीं कमाविलेली संपत्ति एका समाईक कोठारांत ठेवीत. तिचा सर्वत्रांस सारखा उपयोग होत असे, व कांहीं शिल्लक उरल्यास कंपनीवाले घेत. थोडे दिवस ही व्यवस्था ठीक चालली, पण नंतर जे चांगले चांगले कामकरी होते त्यांनां आढळून आलें कीं आपण कितीही काम केलें तरी आपणास मिळकत ठरीवच, मग काम तरी जास्त कां करा ? म्हणून त्यांच्यांत चुकारूपणा व कामाची हेळसांड हे दुर्गुण शिरूं लागले. पुढें जे जे चांगलें व पुष्कळ काम करीत त्यांना तीन एकर जमिनीचा तुकडा स्वतःचे फायद्याकरितां लागवड करण्यास बक्षिस देण्यांत येऊं लागला. इ. स. १६०६ ते १६२५ चे दरम्यान ६००० लोक व्हर्जीनियांत गेले..

जेम्स टाऊनचे वसाहतीनंतर प्लिमाऊथ, सालेम, बॉस्टन, वगैरे वसाहती झाल्या तेथेंही भांडवलाची अडचण भासूं लागली होती. ती लंडन येथील व्यापाऱ्यांनीं दूर केली. वसाहतींत जाणाऱ्या प्रत्येक माणसास एक शेअर मोफत देत, त्याची किंमत दहा पौंड समजण्यांत येई. वसाहतींत सात वर्षें समाईक मालकीचे तत्वावर काम केल्यानंतर प्रत्येक मजुरास स्वतंत्र होतां येई, व इतक्या मुदतींत सर्व शेअरवर जो समाईक खात्यांत फायदा राहिला असेल त्यापैकीं दहा पौंडांवरचा फायदा त्याचे पदरीं एकदम पडे व तेवढ्यांत स्वतंत्रपणें शेती व धंदा करण्यास तो मोकळा होई. सात वर्षांत दुसऱ्याचे खर्चानें मिळाविलेला अनुभव या मुक्त मजुरास फार उपयोगी पडे. ही योजना तरुण मंडळींस पसंत पडेना, तरुण मंडळी स्वभावतःच जास्त काम करीत व ह्यातान्याकोतान्यांस इतकें काम होत नसे. सरते शेवटीं जेम्स टाऊनच्या सर्व रहिवाशांनीं कंपनीचें कर्ज सुमारें १८०० पौंड समाईक भांडवलांतून एकदम देऊन टाकिलें व सर्वच लोक मुदत बंदींतून स्वतंत्र झाले. ही गोष्ट इ. स. १६२७ सालीं घडली.

इंग्लिश वसाहतींची एकंदर लोकसंख्या इ. स. १६४० सालीं सुमारें पंचवीस हजार होती, व त्यापैकीं जवळ जवळ पंधरा हजार लोक एकट्या व्हर्जीनियांत होत. इ. स १७०० पर्यंत ही लोकसंख्या सुमारें दोन लक्ष वासष्ट हजार इतकी झाली होती. इ. स. १७६० सालीं ती सुमारें पंधरा लक्ष, व १७९० सालीं जवळ जवळ चाळीस लक्ष झाली.

अगदीं पहिल्यापासूनच इंग्रज व इतर वसाहतवाले यांच्यांत निकट संबंध येत गेला, व त्यांच्यात एकी व बेटीव्यवहार वाढत जाऊन त्या सर्वांचें एक स्वतंत्र राष्ट्रच बनत चाललें. त्यांच्यांत न मिसळूं शकणारे म्हणजे फक्त निग्रो लोकच काय ते वेगळे राहिले. निग्रो लोकांची संख्या प्रथम फार वाढली नाहीं; इ. स. १७१५ सालापर्यंत ती फक्त ५८००० इतकीच होती. पण पुढें मजुरांचा जसजसा तुटवडा पडूं लागला व तांदूळ व कापूस यांसारखीं पिकें काढण्यास युरोपीयांपेक्षां निग्रोच अधिक लायक व स्वस्त आहेत असें आढळून आलें तसतसे अधिक निग्रो लोक अमेरिकेंत आणण्यांत येऊं लागले. त्यांची नैसर्गिक प्रजावृद्धीही होत होती. तिचा परिणाम असा झाला कीं, इ. स. १७५४ सालीं या लोकांची संख्या दोन लक्ष साठ हजार होती. ती १७८० सालीं पांच लक्ष साठ हजार झाली.

लोकसंख्येच्या वाढीच्या प्रमाणावरून वसाहतीच्या प्रगतीचा अंदाज वाचकांस येईलच. यांत्रिक साधनांचा त्यावेळीं अभाव असल्यामुळें व निर्वाहाचे जिनसांकरितां मुख्यत्वें निसर्गावरच अवलंबून राहावें लागल्यामुळें सांपत्तिक वाढ विशिष्ट प्रमाणाबाहेर झाली नाहीं.

वसाहतींत पहिल्याप्रथम शेती, लाकडांचा व्यापार व मच्छीमारी हे धंदे सुरूं झाले. नैसर्गिक परिस्थित्त्यनुरूप व त्या वेळच्या या धंद्यासंबंधींच्या ज्ञानानुरूप प्रत्येक वसाहतीची कमीअधिक प्रगति होत गेली. इंग्रज लोकांस वसाहतींतील शेतकी हा अगदीं नवीन विषय होता. तंबाखू, मका, तांदूळ व नीळ या जिनसा पिकविण्यासंबंधीं त्यांना माहिती असणें संभवनीय नव्हतें. दुसऱ्या कित्येक पिकांसंबंधीं सुद्धां अशीच स्थिति होती

पण यदाकदाचित् एकादें पीक काढण्याचें कौशल्य हातीं आलें तर त्याला नवीन बाजार मिळण्याची खात्री असल्यामुळें, निरनिराळे प्रयोग करून पाहाण्यास त्यांना धीर आला होता. इंग्लंडला नवेनवे व्यापाराचे जिन्नस मिळाल्यास पाहिजे होते, त्यामुळें वसाहतवाल्यांस प्रयोग करून पाहाण्यास इंग्रज व्यापाऱ्यांकडून उत्तेजन मिळे. व्हर्जीनियांतील लोकांनीं प्रथम रेशीम व द्राक्षें पिकविण्याची खटपट करून पाहिली, पण त्यांत त्यांना पूर्ण अपयश आलें. त्यांनीं तुतीच्या झाडांची लागवड केली. रेशीम तयार करण्यासंबंधीं इतर भाषेंतील पुस्तकें जमवून त्यांचीं भाषांतरें करविलीं. फ्रेंच व इटालियन तज्ञ नेमून पाहिले. पण सर्व व्यर्थ. तंबाखू पिकविण्यांत लवकरच यश येऊं लागल्यामुळें व तंबाखूस किंमतही चांगली मिळत असल्यामुळें पुढें या विषयाकडे कोणी ढुंकूनही पाहीना. पण व्हर्जीनियाचे सरकारनें याविषयीं सारखी खटपट सुरूं ठेविलीच होती. जॉर्जिया व इतर वसाहतींनींही रेशीम पिकविण्याची खटपट करून पाहिली पण कोणासही यश आलें नाहीं.

न्यू इंग्लंडमधील लोकांची तांदूळ, नीळ, व ताग पिकविण्याची खटपट चालूं होती. गाई व बैल याचे ऐवजीं म्हशी व रेडे वाढविण्याचीही खटपट करून पाहाण्यांत आली, तसेंच दक्षिण भागांत दालचिनी व ऑलिव्ह फळें यांची लागवड करून पाहाण्यांत आली. वरील बहुतेक खटपटींत बरेंच भांडवल व्यर्थ गेलें, कदाचित् अधिक खटपटीने त्यांत यश आलें नसतेंच असें म्हणतां येत नाहीं, पण दुसरीं अधिक सुकर अशीं पिकें काढतां येऊं लागल्यामुळें व त्यांत फायदाही जबर पडूं लागल्यामुळें हे प्रयोग जवळ जवळ फुकटच गेले.

या नवीन जगांत आपलें बस्तान नीट बसवण्याकरितां युरोपियन लोकांनीं जी अविश्रांत खटपट चालविली होती तींत त्यांना इंडियन लोकांपासून फार मदत झाली. मका पिकविण्याच्या सर्व पद्धती ते इंडियन लोकांपासून शिकले. मक्यास प्रथम युरोपचे बाजारांत किंमत येत नसे हें खरें पण निर्वाहाचें साधन म्हणून त्याचा फार उपयोग झाला व पुढें जस-जसें पश्चिमेकडील मुलखाचें आक्रमण होऊं लागलें तसतसें मका हेंच

निर्वाहाचें प्राथामिक साधन बनत चाललें. विशेषतः ज्यावेळीं इतर पिकें अतिवृष्टि, अनावृष्टि, किंवा झंजावात यांनीं, अगर तीं पिकें काढण्याची नक्की पद्धति माहीत नसल्यामुळें, नासून जात त्यावेळीं मका हेंच जलद व हमखास उगवणारें धान्य मनुष्य व जनावरें या दोहोंनांही निर्वाहाचें साधन होऊन राही. प्लिमाऊथ येथील शेतकरी एका इंडियन मित्रापासून मका कसा पिकवावा हें शिकले. या इंडियनाचें नांव स्क्वॉन्टो असें होतें.

झाडें पाडण्याचें व जंगल तोडून शेतीची जागा निर्माण करण्याचें शास्त्रही इंडियन लोकांपासूनच वसाहतवाल्यांस शिकावें लागलें. हें काम अत्यंत किचकट व अंगमहेनतीचें होतें व तें वसाहतवाल्यांस बिलकुल आवडत नसे. ते झाडें तोडून टाकीत असत. इंडियन लोकांची पद्धत सोंपी होती. ते झाडांच्या बुंध्याभोंवतीं विस्तव पेटवून किंवा मर्मस्थानीं घाव घालून तीं मारून टाकीत. मग मोठा वारा सुटतांच तीं कोसळून पडत. मग उपयोगी भाग तेवढा कापून काढून त्याचे तक्ते किंना बहालें पाडीत व बाकी जागचे जागीं जाळून टाकीत, त्यामुळें पुष्कळ मेहनत वांचे. पडलेल्या राखेपासून जमिनी सुपीक होत. जंगल पुष्कळ असल्यामुळें त्या पद्धतीनें आर्थिक नुकसान त्यावेळीं तरी होत नसे. सुमारें २०० शें वर्षेपर्यंत वसाहतवाल्यांनीं या पद्धतीचा अवलंब केला.

न्यू इंग्लंडमधील जमीन एकंदरींत सुपीक अशी नव्हतीच. कांहीं कांहीं ठिकाणीं मका हेंच एकंदरींत निर्वाहाचें व व्यापाराचें साधन होऊन बसलें होतें. नाण्याप्रमाणेंही मक्याचा उपयोग करीत. इ. स. १६४१ सालीं एक बुशेल मक्याची किंमत चार शिलिंग ठरविण्यांत आली होती. मॅसॅचुसेटसमध्यें गहूं पिकविण्याचा प्रयत्न चालू होता. पण पीक नक्की हातीं येईलच अशी खात्री नसे. त्यामुळें मका हेंच निर्वाहाचें मुख्य साधन झालें होतें.

बहुतेक वसाहतींतून सपाटून उंच असें गवत उगवत असे. त्याचा जनावरांचे निर्वाहाचे कामीं उपयोग होई. हिवाळ्यांत बर्फ पडलें म्हणजे जनावरांचे हाल होत, त्यामुळें हिंवाळ्यांकरितां गवत अगोदर कापून

त्याच्या गंज्या रचून ठेवीत. बटाट्यांची लागवड होऊं लागली नव्हती तों-पर्यंत मुळे, गाजरें, कांदे, वाटाणे, भोपळे व इतर फळभाज्यांची लागवड करीत असत. सफरचंदांचीं झाडें पुष्कळ होतीं. सफरचंदांचा खाण्याकडे व सायडर नामक मद्य तयार करण्याच कामीं उपयोग होत असे. उन्हाळ्यांत सायडर थंड करून पीत, हिवाळ्यांत ती गरम करून त्यांत कांहीं पदार्थ घालून वापरीत, कोणाचा दफनविधि झाला ह्मणजे त्याप्रसंगीं सायडर दारूचा खप विशेष होई, अठराव्या शतकाचे आरंभापर्यंत बटाट्याची लागवड मोठ्या प्रमाणात होत नव्हती. आयर्लंडांतून प्रेसबिटोरयन धर्म-पंथाचे लोक अमेरिकेंत आले, त्यांनीं बटाट्याची लागवड करण्यास सुरुवात केली. बटाट्याचे संबंधीं बऱ्याच भ्रामक समजुती प्रथम होत्या. दरगेज खाण्यास ते हितावह नाहींत, तसेंच नित्य बटाटे खाणारा मनुष्य सात वर्षां-पेक्षां अधिक जगणें शक्य नाहीं अशा समजूत होती

प्रावरणांचीं मुख्य वस्त्रें लोंकर, ताग व अंबाडी यापासून बनवीत, कापूस वेस्ट इंडीजपासून थोड्या प्रमाणात येई. नाग, इंग्लंड व स्वीडन-मधून येई. अंबाडीपासून दोर करून ते जहाजें व मचवे यांचे शिडांसाठीं वापरीत हातरुमाल, चादरी वगैरे तागाच्य असत पण त्याना 'काम-साचीं वस्त्रें असेंच ह्मणत. दुभतीं जनावरें, शेळ्या, व मेंढ्या याची जोपा-सना व वाढ प्रथमपासूनच चालूं होती. नतर लोक घोडेही बाळगूं लागले.

मध्यप्रांतांतील वसाहतींत हवा चांगली व जमीनही अधिक सुपीक होती. गहूं, इतर धान्यें व भाजीपाला पुष्कळ पिके. अठराव्या शतकाचे मध्यापर्यंत फिलाडेलफिया शहरांत बाहेरगांवाहून सुमारें दहा ते पंधरा हजार गाड्या माल येई त्याचप्रमाणें डिलावर व श्वल् किल नद्यांतून पुष्कळ माल बाहेरगांवीं जाई. हडसन व मोहॉक खोऱ्यातून न्यूयॉर्कमध्यें धान्य व इतर माल पुष्कळ येत असे. त्यांतील बराच न्यूयॉर्कमध्यें खर्च होऊन बाकीचा परदेशीं रवाना होई. व्हर्जीनिया व मेरीलँड येथें इतर सर्व जातींचीं पिकें होत असत तरी तंबाखू पिकवण्यावर तेथील लोकांचा विशेष जोर असे. दक्षिण कॅरोलिना येथें तांदूळ व कापूस अधिक प्रमाणावर पिकत असे, पण त्यावेळीं लोकांस त्याचें तितकेसें महत्व वाटत नसे कारण

तो साफ करण्याची व त्याचा कपडा बनविण्याची कला त्यांस अवगत नव्हती, व म्हणूनच व्यापारी दृष्टीनें अद्याप कापसाचें महत्व वाढलें नव्हतें. व्हर्जीनियांत तंबाखू पिकाविण्यास कोणत्याही अडचणी आल्या नाहींत. एकतर इंडियन लोक पूर्वीपासून तंबाखू पिकवीत असल्यामुळें त्यावर कसलेही प्रयोग करावे लागले नाहींत व दुसरें पिकलेल्या तंबाखूस गिऱ्हाईक ताबडतोब मिळे. कोलंबसाचे वेळेपासूनच तंबाखूचा प्रसार युरोपमध्यें किंबहुना सर्व जगभर झाला होता, सर फ्रॉन्सिस ड्रेकनें तंबाखू ओढण्याचें साहित्य पूर्वीच इंग्लंडमध्यें आणलें होतें. जेम्स राजाला तंबाखूचा फार तिटकारा असे. त्यानें तंबाखू ओढणाऱ्यास जबर शिक्षा ठेविली होती, तंबाखू ओढणाऱ्यास वाळींत टाकणें किंबहुना देहांतशासन सुद्धां करणें एका काळीं गैर मानलें जात नसे. ही दुष्ट चाल नेत्रांस कंटाळवाणी, बुद्धीस मांद्य आणणारी व फुफ्फुसांस अत्यंत अपायकारक आहे असें तो म्हणे. तसेंच तंबाखूपासून निघणारा काळा धूर नरकांतील गंधकाच्या धुराचेंच भावंड आहे असें तो प्रतिपादन करी, इतका त्याला तंबाखूचा तिटकारा असे. तरीपण लोक राजरोस तंबाखूचा उपयोग करूं लागले व त्याचा खप वाढतच चालला, व व्हर्जीनिया व मेरीलँड या वसाहती त्यावर फार सधन बनूं लागल्या.

व्हर्जीनियाचा तंबाखूचा व्यापार अगदीं भक्कम पायावर उभारला गेला होता. तेथील हवा व जमीन दोन्हीहि तंबाखूचे पिकास फार योग्य व हितावह होती. तंबाखू पेरण्यास हवी तेवढी विस्तीर्ण जमीन मिळत होती. तसेंच ज्याप्रमाणें मोठमोठ्या कंपन्या गुलाम वगैरे बाळगून ती पिकवीत त्याचप्रमाणें व तितक्याच सुगमतेनें मजुरींतून मुक्त झालेल्या माणसाला सुद्धां अगदीं थोड्या साधनांनीं ती लहान प्रमाणावर पिकवितां येई.

तंबाखूचें वजन किंमतीचे मानानें कमी असल्यानें ती परदेशीं पाठविणें चांगल्या रीतीनें परवडत असे. ज्या गलबतांतून तंबाखू समुद्रपार नेत असत तीं गलबतें नदींतून तंबाखूच्या लागवडीच्या जागेच्या अगदीं जवळ येऊं शकत त्यामुळें वाहतुकीचा पुष्कळ खर्च वांचत असे. जसजसा

तंबाखूचा खप अधिक होऊं लागला तसतशी वसाहतवाल्यांना सुस्थिति येत चालली.

अगदीं पाहिल्याप्रथम ज्यावेळीं वसाहतवाले नुकतेच आले होते व अन्नसामुग्रीवांचून उपाशीं मरत होते त्यावेळीं सुद्धां त्यांचे नजरेस तंबाखूचे पिकाची व त्यापासून होणाऱ्या नफ्याची कल्पना आली होती. किंबहुना या बळकट आशेवरच त्यांनीं दिवस काढले होते व त्यांचा धीर टिकून राहिला होता. याच आशेवर या वसाहतींत मजूर व व्यापारी यांची अधिक गर्दी झाली. मजुरीकरितां कितीही माणसें आलीं तरी पुरीं पडेनात म्हणून निग्रो गुलामांची आयात करावी लागत असे तंबाखूचे व्यापारांत व शेतींत फायदा पडूं लागल्यामुळें इतर शेतीचे जिनसांकडे लोक दुर्लक्ष करूं लागले. तीच स्थिति लहान लहान धंद्यांचीही झाली, व त्यामुळें व्हर्जीनियांत परदेशी तयार मालाचा खप एकसारखा वाढतच चालला. तथील लोकांचे राहाणींतही या तंबाखूचे व्यापारानें फरक पडूं लागला. एकएकट्या माणसासही ती पिकवितां येई, त्यामुळें व्यक्तिस्वातंत्र्य अधिक वाढलें व लोकांत आत्मविश्वास अधिक प्रगट होऊं लागला. सुखाची राहाणी असल्यामुळें स्वातंत्र्यप्रेमही वृद्धिंगत होऊं लागलें. मोठमोठ्या मळेवाल्यांच्या इस्टेटीमुळें त्यांच्यांत पुढाऱ्यांचेंही प्रस्थ वाढत चाललें. लोक आदरसत्कारांत अत्यंत उदार होऊं लागले, आवश्यक गोष्टींकडे वसाहतवाल्यांचें पूर्ण दुर्लक्ष होऊं लागलें, वसाहतीकडून निरनिराळ्या प्रकारचा कच्चा माल येऊन इंग्लंडांतील कारखाने उत्तम चालावेत हा ब्रिटिश सरकारचा हेतु नीट तडीस जाईना, कारण याकरितां बऱ्याच सधन इंग्रजांनीं आपला पैसा वसाहती स्थापिण्याकरितां खर्च केला होता, व इंग्लंडच्या सरकारनेंही शक्य ती मदत त्याकामीं केली होती. त्याचप्रमाणें तंबाखू बेसुमार पिकूं लागल्यामुळें जीवनास अवश्य असे पदार्थ देखील पिकविण्याकडे वसाहतवाले दुर्लक्ष करूं लागले. मग नवीन पिकांवर प्रयोग करून पाहाण्याचें दूरच राहिलें. इ. स. १६८८ साली शंभर जहाजें भरून तंबाखू इंग्लंडला रवाना झाली, व अजून पन्नास जहाजें भरतील इतकी शिल्लक होती. या गोष्टीवरूनच या एकंदर पिकाची कल्पना येईल.

व्हर्जीनियामध्यें कधींकधीं थोडा तांदूळ पिकत असे, व एकेवेळीं नीळ पिकाविण्याची मोठी लाट तथें उसळली होती, परंतु फारसा उपयोग झाला नाहीं. सरतेशेवटीं हीं दोन्हीं पिकें कॅरोलिना वसाहतींत उत्तम येऊं लागलीं. माडागास्कर जातीच्या तांदुळाचें वीं थॉमस स्मिथ नांवाच्या गृहस्थानें लाविलें. दलदलीच्या जागेंत त्यापासून उत्तम तांदूळ पिकूं लागला. निग्रो लोकांशिवाय सारा दिवस चिखलांत काम करण्यास युरोपियन मजूर तयार होत नसत. शिवाय दलदल असल्यामुळें थंडी-तापाचाही उपद्रव होऊं लागे. त्यामुळें कॅरोलिनांत शेती करण्यास निग्रो मजुरांची अधिक आवश्यकता होती. इ. स. १७५४ सालीं एक लक्ष पिपें तांदूळ कॅरोलिनांतून परदेशीं गेला.

हळूं हळूं पिकांत सुधारणा होत गेल्या, वसाहतवाले प्रागतिक नव्हते असें नाहीं, पण खुद्द इंग्लंडमध्येंच शेतीचा ठिकाणा नसल्यामुळें त्यांना सुधारणा करण्यांत कांहींच मदत होऊं शकली नाहीं. वसाहतीमध्यें जे निरनिराळे पिकें काढण्याचे प्रयोग सुरूं होते त्यावरून वसाहतवाले कोणतीही सुधारणा करण्यास किती उत्सुक होते हें दिसून येतें. शेतकीच्या अवजारांमध्यें अद्यापि व्हावी तशी सुधारणा झालेली नव्हती. नुसत्या कोळप्यानें नाहीं तर कुदळीनें कसें काम भागे यार्चे आजकालच्या शेतकऱ्यांस आश्चर्य वाटेल. पण त्यावेळीं एक तर जमिनी सुपीक व न कसलेल्या होत्या, त्यामुळें प्रथम कांहीं दिवस भागलें. नांगर लांकडीच असत व तेही सर्व ठिकाणीं होतेच असें नाहीं. इ. स. १७३७ सालीं सबंध मॅसॅचुसेटस-मध्यें अवघे सदतीस नांगर होते असा दाखला सांपडतो.

पेरणीप्रमाणें कापणीच्याही पद्धती तितक्याच अडाणीपणाच्या होत्या. गहूं खुरप्यानें कापीत व घोडे किंवा बैल यांचेकडून तुडवून मळणी करीत. त्याचप्रमाणें शेतावरील माल नेण्याबाबतही कांहीं सुधारणा झाली नव्हती. माल नेण्यास बैलगाड्या असत. बहुतेक चाकांच्या जोड्या इंग्लंडांतून येत. लोखंडी धांवा असलेली चाकजोडी फार मौल्यवान समजली जाई. तसेंच ती पिढ्यानपिढ्या प्रत्येक कुटुंबांत फार महत्वाची वस्तु गणली जात

असे. वसाहतींतून मोठमोठे रस्ते तयार होईपर्यंत गाड्यांचाही व्हावा तसा उपयोग होत नसे. जेथें जलमार्ग असे तेथें बोटींतून व मचव्यांतुन माल इष्ट स्थळीं नेण्यांत येई. खतें वगैरे फारशीं वापरीतच नसत. जेथें नद्या वगैरे असत तेथील पिकांस कधीं कधीं मासळीचें खत घालीत. वसाहतींचे काळांत जनावरांची जितकी जोपासाना व्हावी तितकी होत नसे.

जमीन हवी तेवढी असल्यामुळें एके ठिकाणीं पीक येईनासें झालें तर दुसरे ठिकाणीं पेरीत, शिवाय पुढें धान्यही इतकें पिकूं लागलें कीं खाण्यास व व्यापारास पुरून उरलेलें धान्य जनावरांस घालीत. शेतकरी एकमेकांपासून फार लांब लांब अंतरावर राहात, त्यामुळें त्यांच्यामध्यें दळणवळण व विचारविनियम कमी होत असे. प्रवास करण्याची व इतर प्रांतांतील अगर देशांतील स्थिति अवलोकन करून आपल्यामध्यें सुधारणा घडवून आणण्याची संधीही क्वचितच शेतकऱ्यास मिळे. परंपरा व गत नुगतिकत्व तसेंच भ्रामक व वेडगळ समजुतीने हीं कित्येक वेळ सुधारणेच्या आड येत. अमुक दिवशीं अगर अमुक तारे आकाशात दिसूं लागले म्हणज ठरीव शेतीच्या क्रिया करावयाच्या असले मूळ देशांतील मुहूर्त व आडाखे या नवीन देशांत उपयोगास येईनासे झाले, व नवीन शोध लावण्यास असावी तितकी बुद्धिमत्ता व उदारमतवादित्व त्यांच्यामध्यें येण्यास बराच काल लागला.

जमिनीची व्यवस्था

पहिल्याप्रथम मुदतबंदीचे समाईक कोठारांतून धान्य व नित्योपयोगी जिन्नस मिळत, पण लवकरच ही स्थिति बंद होऊन मालकी हक्काच्या अगर भाडेपट्याच्या जमिनीची पद्धत अमलांत आली. त्यामुळें जमिनी पिकविणाराच्या पदरांत आपण केलेल्या मेहेनतीचें फळ पडूं लागलें. त्यामुळें जमिनीची मशागतही नीट होऊं लागली. कांहीं जमिनी मालकांच्या असत व ते लांब भाडेपट्यानें देत, त्याही जवळ जवळ मालकी हक्काइतक्याच सवलतीनें मिळत. मालकी हक्क थोडेसें भाडें वसूल करण्यापुरताच असे.

मुदतबंदीचे मजूर.

युरोपांतील ज्या मजुरांस नवीन देशांत जाऊन वसाहत करावीशी वाटे, पण गलबताचे भाड्यासाठीं व नवीन देशांत खर्चासाठीं पैसा नसे, असे मजूर मुदतबंदीचे मजूर म्हणून अमेरिकेस जात. वसाहतवाल्यांपासून फक्त अन्न वस्त्र घेऊन ते ठरीव वर्षें त्यांचें काम करीत व त्यानंतर मुक्त होत. नंतर स्वतंत्र जमिनीची लागवड करून उदर निर्वाह करीत. कित्येक वेळीं मजूर बंदींतून मुक्त होतांच ठरीव एकर जमीन लागवडीस देण्याचा करार वसाहतवालेच मजुरांशीं करीत. मुदतबंदीचे मजुरांत 'उमेदवार मजूर' म्हणूनही कांहीं तरुण मंडळींस काम मिळे. उमेदवार व मजूर यांत तत्वतः विशेष फरक नसे पण तरुण उमेदवारांस धंदे शिक्षणाच्या कांहीं सवलती मिळत. मुदतबंदीचे मजूर स्वतःच्या मुलांस बरोबर नेत त्यावेळीं मुलांच्याही मजुरीचा करार वसाहवाल्यांशीं करीत, कित्येक वेळ युरोपांतील म्युनिसिपालिट्याही गांवांतील उनाड व बेकार मुलांस मुदतबंदीचे मजुराचे करारावर अमेरिकेंत पाठवून देत. अशा तऱ्हेनें युरोपांतून येणाऱ्या मजुरांमुळे वसाहतीस लागणाऱ्या मजुरांचा प्रश्न नीट रीतीनें सुटला होता. तंबाखूच्या व्यापाराचे वाढीमुळें दिवसेंदिवस अधिक मजूर लागूं लागले. त्यामुळें मुदतबंदीचे मजुरांस करार पुरा होतांच पन्नास एकर जमीन लागवडीस देण्याचा ठराव करून देऊन मजूर आणावे लागत. व्हर्जीनिया वगैरे वसाहतींतील सामाजिक परिस्थिति नवीन येणाऱ्या मजुरांस सुखावह असे. युरोपांतिल वाढतें दारिद्र्य, इंग्लंडांतील मोठमोठ्या शहरांतील बेकार वस्ती, धार्मिक व राजकीय छळ, व तुरुंगांतील विशिष्ट कैद्यांनां परदेशांत जाण्याची ठेविलेली सवलत या सर्व गोष्टींनीं, मुदतबंदीनें मजूर पुरविण्याच्या धंद्याला ऊर्जितावस्था आली होती. इंग्लंडप्रमाणें स्कॉटलंड, आयर्लंड व वेल्समध्यें, तसेंच युरोपच्या इतर भागांतही या व्यापाराची भरभराट होत चालली. अशारीतीनें थोडा काल गेल्यानंतर वसाहतींना मजूर पुरविणें हा एक मोठा किफायतीचाच धंदा होऊन बसला. लंडन व ब्रिस्टोल हीं या व्यापाराचीं मुख्य ठिकाणें बनलीं. व्यापाऱ्यांनां, जहाजांचे मालकांना व पुष्कळ अडत्यांना हा धंदा राजरोस व कायदेशीर रीतीनें चालवितां येऊं लागला.

वसाहतींतिल मोठमोठे मळेवाले प्रथम मुदत बंदीचे मजूर मागवीत असत, पण पुढें जहाजवाले व व्यापारी स्वतःचेच जबाबदारीवर मजुरांशीं करार करीत, कारण अमेरिकेंत नेल्यावर मजुरांना निश्चित मागणी होतीच हें त्यांनां माहीत होतें. मग हळूं हळूं बेकायदेशीर प्रकारही अंमलांत येऊं लागले. कित्येक वेळां उनाड मुलांस फूस लावून पकडून नेण्यांत येऊं लागलें. इ. स. १६७० सालीं फूस लावून व पकडून नेलेल्या मजुरांची संख्या दहा हजार होती. इ. स. १६७१ सालीं एकाच व्यापाऱ्यानें आपण दरसाल पांचशेपेक्षां अधिक लोकांना फसवून अमेरिकेंत नेलें असल्याचे कबूल केलें होतें. त्याचा हा क्रम दहा वर्षें चालला होता.

मुदत बंदीचें करारपत्र 'कॉंट्रक्टच्या स्वरूपाचें असे. एकवीस वर्षापेक्षां कमी वयाचे तरुणांस अधिक वर्षें मुदत बंदी असे. एकोणीस वर्षांचे मुलांस पांच वर्षें व एकोणीसपेक्षां कमी वय असल्यास वयास चोवीस वर्षें पूर्ण होईपर्यंत नोकरी करण्याचा करार करून द्यावा लागत असे. गुन्हेगार मजुरास सातपासून चौदा वर्षें मजुरीचा करार करून देणें भाग पडे. मागणी जसजशी वाढूं लागली व प्रवासाच्या सोई अधिक होऊं लागल्या तसतशीं मुदत बंदीची वर्षें कमी होऊं लागलीं. थोडे दिवसानंतर मुदत बंदीच्या मजुरांच्या कायद्याचें पुस्तकच बाहेर पडलें. त्यांत धनी व नोकर यांचे परस्पर संबंध स्पष्टपणें नमूद केलेले होते. कामाचे तास ठरवून देण्यांत आले होते. तसेंच, अन्न, वस्त्र राहण्याची जागा व औषधपाणी हीं नीट पुरविण्याविषयीं सर्व तरतूद या कायद्यानें केली होती, व मुदतबंदीच्या मजुराचे स्वतंत्र व्यक्ति या नात्यानें सर्व हक्क मान्य केले होते.

नवीन जगांत मुदतबंदीच्या मजुरांना काम खूपच करावें लागे, व ते पुष्कळ वेळां अतिशय श्रमाचेंही असे. कित्येक मजुरांना फार खाष्ट धनी भेटत, तर कित्येकांना उदार व मायाळू धनी मिळत, पण सर्वांचें भावी सुखाकडे लक्ष असे. कांहीं मजूर उत्तम कारागीर निपजत. कित्येक अत्यंत सुशिक्षित व संभावित लोकही मायदेशास कंटाळून मजूर म्हणून आलेले असत. स्त्रीमजूरही पुष्कळ येत असत. बरेच वेळ स्त्रीमजुरांशीं मालक लग्नें

लावीत. अशा रीतीनें झालेल्या संततीशीं मुदतबंदी मजूरही मुक्त होतांच लग्नें लावीत. पूर्वी मजूर असला तरी मुक्त होतांच संभावित गृहस्थ म्हणून राहण्याची कोणासही आठकाठी नसे, व समाजही त्याच्याकडे मजूर या दृष्टीनें पाहात नसे. एकंदरींत मुदतबंदीचे मजुरींपासून सर्वांचा फायदाच होई. जहाजवाले पैसा कमावीत, वसाहतवाले पैमा कमावीत व मजूरही थोडीं वर्षें काम करून सुखा व स्वतंत्र होत. हा मुदतबंदीच्या मजुरांचा पुरवठा स्वातंत्र्याची लढाई होईपर्यंत चालू होता. पुढें मात्र या व्यवहारास कायद्यानें बंदी झाली.

निग्रो गुलाम व्हर्जीनियांत पहिल्यानें इ. स. १६१९ सालीं आले, हें मागें सांगितलें आहे. स्पॅनिश वसाहतींत निग्रो गुलामांची त्याचेही पूर्वीपासून चालत आली होती. इ. स. १६५० नंतर इंग्रज व्यापाऱ्यांचें लक्ष निग्रो गुलामांचेकडे लागलें. सुमारें वीस वर्षांत या व्यापारांत त्यांची प्रगति झाली. इ. स. १६९३ सालीं त्यांना निग्रो गुलामाचा व्यापार करण्याची परवानगी राजरोस मिळाली. इ. स. १७१३ सालीं, इंग्लंड व स्पेन यांचेमध्यें तह झाला, त्या तहान्वयें इंग्रज लोकांस निग्रो गुलामांचा व्यापार करण्याची सनद तीस वर्षें करारानें मिळाली. दरवर्षी गुलामांची ठरवि संख्या अमेरिकेंत पाठविण्यांत येऊं लागली, व या व्यापारापासून जो नफा होई तो इंग्लंड व स्पेन सारखा विभागून घेत. इ. स. १६७० सालीं व्हर्जीनियांत युरोपियन व निग्रो नोकरांची संख्या तिहीस एक या प्रमाणांत होती, तीच व्यस्त प्रमाणांत झाली. इ. स. १६९८ पासून १७०७ पर्यंत दरसाल पंचवीस हजार निग्रो गुलाम अमेरिकेंत येत इ. स. १७९० सालीं झालेल्या खानेसुमारींत निग्रो गुलामांची संख्या (६९७०००) सहा लक्ष सत्त्याण्णव हजार होती- दक्षिण भागांत युरोपियन मजुरांपेक्षां निग्रो मजूर अधिक पसंत करीत. युरोपियन मजूर पांच सात वर्षें मजुरी करून मुक्त, होई व स्वतंत्र धंदा करूं लागे. तसें निग्रो मजुरांचें नव्हतें. ते जन्माचेच गुलाम झालेले असत. युरोपियन मजूर, आपलें काम शिकतो न शिकतो तोपर्यंत त्याचीं पांचवर्षें पुरीं होत, व तो मोकळा होई. तसें निग्रोचें नसल्यामुळें कांहीं कामें निग्रोस शिकविणें व त्यांचेकडून तीं करवून घेणें अधिक परवडे.

निग्रो गुलामांचे पासून झालेली प्रजा त्याचे मालकाचींच मालमत्ता ठरे. त्यांना खायला कमी दर्जाचें अन्न देण्यांत येई. अत्यंत स्वस्त व जुनेपाने कपेड त्यांना चालत व त्यांच्या राहण्याच्या जागाही घाणेरड्या व स्वस्त इमारतींत असत. त्यामुळें निग्रो गुलामांची मजुरी अत्यंत स्वस्त पडे.

तांदुळाचे शेतांतील काम करण्यास, निग्रोंशिवाय दुसरे कोणी तयारच होत नसत. मनुष्य प्राण्याचे कसलेही हक्क बिचाऱ्या निग्रो गुलामांस नसत. मालकाच्या गुरांढोरांप्रमाणें त्यांस वागविण्यांत येई. गुलामांस चांगलें खावयास घातल्यास त्यांचेकडून जास्त काम करवून घेतां येईल या एकाच आशेनें मालकानें त्यांना बरें वागविलें तर नशीब! बाकी त्यांच्याबद्दल कोणास कसलीच कदर नसे. या परिस्थितीमुळेंच गुलामगिरीची इतकी झपाट्यानें वाढ झाली, कीं अमेरिकेंत आतां तो मोठा प्रश्न होऊन बसला आहे.

गुलामगिरीच्या व्यापारास पुढें अनेक कारणानें विरोध होऊं लागला, कित्येक ठिकाणीं गुलामांची संख्या इतकी वाढली कीं गुलामांनीं विथरून जर दंगा केला, तर त्यांच्यापासून भीति उत्पन्न होण्याचा संभव होता. कित्येक ठिकाणीं त्यावेळीं असलेल्या गुलामांचाच भाव खूप वाढावा, ह्मणून गुलामांची आयातच कमी करण्याचे प्रयत्न होऊं लागले. हळूं हळूं गुलामांचे आयातीवर कर बसविण्यांत येऊं लागला व कित्येक संस्थानांत पूर्ण बंदी करण्याचं धोरण अमलांत येऊं लागलें.

इ. स. १७६० मध्यें कॅरोलिना वसाहतीनें गुलामांची आयात पूर्ण बंद करण्याचें धोरण अमलांत आणिलें. पण इंग्लंडांत प्रीव्ही कौन्सिलनें या धोरणास नापसंती दर्शवून तें फेटाळून लाविलें. इ. स, १७१० सालीं व्हर्जीनियानें दर एक गुलामाचे मागें पांच पौंड कर ठेविला पण, त्याही धोरणास पार्लमेंटची संमति मिळाली नाहीं. इंग्रज लोकांनीं निग्रो गुलामांच्या व्यापारासंबंधीं अमेरिकेंतलि लोकांच्या मताविरुद्ध धोरण स्वीकारल्यामुळे, अमेरिकन लोकांचें मन त्यांच्याविषयीं बिथरलें. स्वातंत्र्याच्या मूळ जाहीरनाम्यांत जेफरसननें इंग्रज राज्यकर्त्यांची पूर्ण हजेरी घेतली

आहे. न्यू इंग्लंड व मध्यवर्ति वसाहतीमध्यें निग्रो गुलामगिरीचा प्रसार मोठ्या प्रमाणावर कधीं झालाच नाहीं. स्वातंत्र्याची लढाई झाल्यानंतर पुष्कळ अमेरिकन लोकांचे मनानें गुलामगिरी ही अन्याय्य गोष्ट आहे व तिच्या योगानें स्वातंत्र्यास बाध येतो, असें घेतलें. दक्षिणेंत इतके गुलाम झाले होते कीं जर गुलामांनीं बंड केलें तर त्यांचेपुढें युरोपियन वसाहतवाल्यांचा टिकाव लागणार नाहीं अशी भीति वाटूं लागली होती. इ. स. १७८९ सालपर्यंत बऱ्याच संस्थानांनीं हळूं हळूं निग्रोंची सुटका करण्यास प्रारंभ केला होता. दक्षिणेंतील संस्थानांनीं मात्र हें धोरण लवकर स्वीकारिलें नाहीं.

वसाहतीच्या वेळच्या मोठ्या धंद्यांत लांकडांचा व्यापार हा एक मोठा व्यापार होता. नद्यांचे कांठचीं मोठमोठीं अरण्यें तोडून नदींतूनच तीं समुद्रांत नेऊन तेथून परदेशांत पाठविणें त्यावेळीं फार सोपें होतें. शिवाय घरकामास व इमारती बांधण्यासही लाकूड पुष्कळ लागे. त्याचा देशांतले देशांत फार झपाट्यानें खप होई. वसाहती व व्यापार वाढूं लागला तसतसा लांकडांचा खपही अधिक होत चालला. त्यामुळें लांकडांच्या व्यापाराचीं पुष्कळ केंद्रें बनलीं. हवें तितकें लाकूड मिळत असल्यामुळें घरें बांधून मोठमोठीं शहरें वसाविणें फार सोपी गोष्ट होती. हडसन नदीतून ऑलबनी व न्यू यॉर्क येथें येणारें लांकूड न्यू यार्क शहराचे खर्चापुरतें ठेऊन बाकी युरोपमध्यें पाठवीत. डिलावेर व श्वेलकील नद्यांमधून आलेलें लांकूड फिलाडेलफिया येथें येई, व तेथून पुढें युरोपला पाठविण्यांत येई. सस्किहाना नदींतून येणारें लांकूड बाल्टिमोरमधून पुढें निर्गत करण्यांत येई. नॉर्थ कॅरोलिना व जॉर्जिया येथील लांकूड मिसिसिपी नदीच्या निरनिराळ्या मुखांतून आणून तें वेस्टइंडीजमध्यें रवाना करीत.)

न्यू इंग्लंडचा लांकडांचा व्यापार फार झपाट्यानें वाढला, त्याचें कारण तेथें दुसरा कसला व्यापार जोरांत नव्हता, त्याचप्रमाणें तेथें मोठमोठे धबधबे असल्यानें त्यांचेपासून शक्ति उत्पन्न करून, लांकूड कापण्याचें काम करून घेतां येई.

दुसरा कांहीं धनोत्पादक धंदा हातीं सांपडेपर्यंत प्रथम आलेल्या वसाहतवाल्यांना लांकडाचे धंद्यानें चांगला हात दिला. खुद्द इंग्लंडमध्येंही लांकूड फार महाग होत चाललें होतें. त्याचप्रमाणें इंग्लंडांत जोंपर्यंत दगडी कोळसा कोणी वापरूं लागलें नव्हतें तोंपर्यंत जळाऊ लांकडाचे व्यापाराची सुद्धां खूपच चलती होती. जहाजें बांधण्याचे धंद्यांतही उत्तम लांकूड पुष्कळ लागे, व त्याला किंमतही चांगली येई.

मासेमारीचा धंदाही त्या काळीं उत्तम प्रमाणांत चालूं होता, व प्रथम वसाहतवाल्यांस या धंद्यानें तात्कालिक मदत बरीच झाली असल्यास नवल नाहीं.

मच्छीमारीचा व्यापार मुख्यतः न्यू इंग्लंडमध्येंच विशेष वाढला. लांकडांच्या धंद्यापेक्षांही या धंद्यांत पैदास उत्तम होई. बहुतेक वसाहतींत मासळी पुरविण्याचें काम चाले, पण सर्वांपेक्षां न्यू इंग्लंडचाच व्यापार मोठ्या प्रमाणावर होता. न्यू इंग्लंडमध्येंच जहाजें बांधलीं जात असल्यानें व तेथील किनाऱ्यास मासळी पुष्कळ मिळत असल्यामुळें बाहेरदेशीं मासळी पाठविण्याचें काम फारच सुलभ झालें होतें. न्यू इंग्लंडमध्यें वसाहत होण्याचे पूर्वीपासून सुद्धां या किनाऱ्यावरून मासळी नेऊन युरोपांत विक्री करण्याचें काम इंग्रज जहाजवाले करीत असत इतकेंच नव्हे तर न्यू इंग्लंडमध्यें वसाहत करण्याचें मुख्य कारण, तेथें मासळी पुष्कळ मिळे हेंच होय. कॉड व देव मासे हच तेथें मुख्यतः विशेष मिळत. नद्यांतून मिळणारे मासेही पकडून आणीत. न्यू इंग्लंडनें मच्छीमारीचे धंद्यास विशेष सवलती ठेविल्या होत्या व या धंद्याची वाढ होण्यासाठीं अनुकूल कायदेही केले होते. कॉड माशांच्या तीन प्रती लावीत. उत्तमप्रतीचे मासे इंग्लंडांत पाठवीत, मध्यम दर्जाचे वसाहतींत विकीत व कनिष्ठ प्रकारचे मासे निग्रो गुलामांचें खाद्य म्हणून विकीत, ते मुख्यतः दक्षिण भागांत व वेस्ट इंडीज-मध्यें खपत. मच्छीमारीचे धंद्यांत खलाशी लोकांस भागीदारीनें दाखल करीत व एकंदर मिळकतीचा ठरीव प्रमाणांत हिस्सा त्यांना मिळे. त्यामुळें पुष्कळ खलाशी फार श्रीमंत होऊन स्वतंत्र धंदा करूं लागले व कांहींनीं

स्वतःचीं जहाजें खरेदी केलीं. यावरून या धद्याचे चलतीचें प्रमाण ध्यानांत येईल.

देव माशांचे शिकारीचें नाटुकेट हें केंद्र होतें. पण पुढें हा धंदा इतर ठिकाणींही पसरत चालला. प्रमथ मेलेले देवमासे किनाऱ्यास लागत, त्यावरूनच काम सुरूं झालें, नंतर किनाऱ्यालगतच्या प्रदेशांत देवमासे मारूं लागले, व नंतर किनाऱ्यापासून लांबलांबच्या सफरी मच्छीमार बोटी करूं लागल्या. देवमाशांपासून चरबी निघे तिचा मेणबत्या करण्याचें कामीं उपयोग करीत. त्याचप्रमाणें वंगणाचीं तेलें तयार करीत. अंबरग्रीस नांवाचें सुवासिक द्रव्य देवमाशाच पोटांतून काढीत, व हाडकांचा उपयोग कलाकौशल्याच पदार्थ करण्यांत करीत. न्यू इंग्लंडच्या इतिहासांत मच्छीमारीपासून झालेल्या नफ्याचा औद्योगिक सुधारणा करण्याचे कामीं फार उपयोग झालेला आहे. तेथें मासळीचा, व्यापारांतच केवळ नव्हे, तर नाण्याप्रमाणें देवघेवीच्या कामीं, मोठा उपयोग करण्यांत येई.

वसाहतींचे कालीं लोखंड, तांबें व शिसें, या तीन धातूंचाच काय तो व्यापार असे. त्यांत लोखंडाची प्रामुख्यानें गणना करितां येईल. लोखंडाचीं अशोधित धातु नदीनाल्यांतील गाळांतासून काढीत किंवा त्याचे खडक असत त्यांतून फोडून काढीत. त्यांवळीं लोखंड गाळण्याच्या भट्टया फारशा सुधारलेल्या नव्हत्या. ओतकाम करीत तें भट्टीतून एकदमच सांच्यांत लोखंड ओतून करीत. हल्लींप्रमाणें लोखंडाचे गट्ठे प्रथम ओतून नंतर पुन्हां वितळवीत नसत. लांकडी कोळशाचाच प्रथम लोखंड गाळण्याचे कामीं उपयोग करीत. अशोधित लोखंड शुद्ध करण्याचे कामीं भट्टींत चुन्याचा उपयोग करीत. अगदीं मोठमोठ्या भट्टयांतून आठवड्यांतून दहा वीस टनापेक्षां अधिक लोखंड निघत नसे.

तांबेंही कांहीं थोड्याशा प्रमाणांत काढीत. हडसन नदीचे आसमंतांतल्या प्रदेशांत व न्यू जर्सेमध्यें तांब्याच्या खाणी होत्या. इ. स. १७२१ सालीं १३८६ टन तांबें युरोपांत रवाना झालें. दक्षिण मिसोरी प्रांतांत शिशाच्या खाणी होत्या, त्याचा शिकारी लोकांत गोळ्या वगैरे करण्याचे कामीं खप होत असे, व थोडेसें शिसें युरोपांत पाठविण्यांत येई.

वसाहतीच्या एकंदर व्यापाराविषयीं विचार करितां असें दिसून येईल कीं ज्या प्रांतांत ज्या व्यापाराचीं साधनें अत्यंत विपुल असत, तिकडे तेथल्या लोकांचें विशेष लक्ष असे. म्हणूनच न्यू इंग्लंडमध्यें मच्छामारी व लांकडांचा व्यापार; मधल्या वसाहतींत धान्य व जनावरें; व्हर्जीनिया व मेरीलँडमध्यें तंबाखू; दक्षिण कॅरोलिनामध्यें तांदूळ व नीळः जॉर्जिया व उत्तर कॅरोलिनामध्यें जहाजें बांधण्याचा व इमारती लांकूड; व लूशिआनामध्यें नीळ, साखर, व तंबाखू यांचाच व्यापार व पुरवठा लवकर चालूं झाला व तेथील ते स्थाईक धंदे बनले.

इंडियन लोकांशीं युद्ध

प्रकरण ५ वें

ऑलिव्हर क्रॉमवेलचे कारकीर्दीनंतर इंग्लडांत दुसरा चार्लस गादीवर आला. त्यामुळें वसाहतींतही आतां नवीन राजकारणास सुरुवात झाली. पूर्वी राजाचे विरुद्ध असलेल्या पक्षाच लोकांची आतां धडगत नव्हती. ज्या जहाजानें दुसरा चार्लस गादीवर बसल्याची बातमी आणली त्याच जहाजावर दोन उमराव होते व त्यांनींच पहिल्या चार्लस राजास देहान्त शिक्षा ठोठाविली होती. मॅसॅचुसेटचे गव्हरनरनें त्यांना कोणत्याही प्रकारें त्रास दिला नाहीं. पण राजपक्षाचे बाजूचे लोकांनीं त्यांचा पिच्छा पुरविला. बॉस्टनच्या लोकांनीं या दोन राजघातक्यांनां मोठ्या शिकस्तीनें बचावलें, व त्यांना पळून जाण्यास मदत केली. ते न्यूहॅवन येथें जाऊन छपून बसले. त्यांना पकडून देणाऱ्या माणसांस मोठें बक्षीस लावण्यांत आलें होतें, पण वसाहतींतील रहिवाशी तर राहोच पण इंडियन लोक सुद्धां हें बक्षीस मिळविण्यास पुढें येईनात.

पुढें ज्यावेळीं इंडियन लोकांचा फिलिप नांवाचा राजा सर्वच वसाहतवाल्यांच्यावर उठला, त्यावेळीं विल्यम गॉफे हा छापलेल्या जागेंतून बाहेर आला व मोठ्या धैर्यानें लढून वसाहतवाल्यांची त्यानें बाजू राखली. पुढें या दोघांचें नांव मात्र ऐकूं आलें नाहीं.

दुसऱ्या चार्लस् राजानें निरनिराळ्या वसाहतींत जे तंटे होत, त्यांचा निवाडा करण्यासाठीं ह्मणून चार न्यायाधीशांचें एक रॉयल कमिशन पाठविलें. अशा तऱ्हेनें पाठविलेल्या न्यायाधीशांचे अधिकार एकवेळ वसाहतवाले मानूं लागले ह्मणजे सर्वच वसाहतींवरील आपला अधिकार निर्वेधपणें प्रस्थापित होईल असा त्यांचा डाव होता. पण वसाहतवाले कांहीं इतके

मोळसर नसल्यानें त्यांच्या ध्यानांत हा डाव फार लवकर आला. इ. स. १६६४ च्या जुलै महिन्यांत हें कमिशन अमेरिकेच्या किनाऱ्यावर उतरलें. त्याचें अमेरिकेनें असें स्वागत केलें कीं आपण केव्हां इंग्लंड गांठतों असें त्यास होऊन गेलें. हें कमिशन हात हालवीत परत आलेलें पाहून चार्लस राजा फार चिडून गेला.

फिलिपची लढाई

अमेरिकेच्या मुलुखांत युरोपीय वसाहतवाल्यांनीं जसजसें अतिक्रमण आरंभिलें तसतशी इंडियन लोकांची पिछेहाट होत चालली. युरोपीय लोकांचीं शस्त्रास्त्रें चांगलीं असल्यामुळें इंडियन लोकांचें त्यांचेपुढें कांहीं चालेना. त्यांचा दिवसेंदिवस नाश होऊं लागला. इंडियन लोकांचा राजा फिलिप यानें वसाहतवाल्यांशीं लढाई सुरू केली. इंग्रजांच्या शस्त्रास्त्रांपुढें आपला फारसा टिकाव लागणार नाहीं हें फिलिपला माहीत नव्हतें असें नाहीं. त्यानें यापूर्वीच लढाई पुकारली असती पण तो धांदणी असल्यामुळें बरेच दिवस इंडियन लोकांत एकी करून लढाईची तयारी करीत होता. वौसामान नांवाच्या इंडियन मनुष्यास कांहीं अपराधामुळें वसाहतवाल्यानीं ठार मारिलें, त्यामुळें लढाईला एकदम तोंड लागलें. इंडियन लोकांनीं आपलीं बायकामुलें सर्व नॅरागानसेट येथें पाठविलीं, व हल्लीं ब्रिस्टोल शहर आहे त्याजागीं तळ दिला.

तारीख २४ जून १६७५ रोजीं सर्व वसाहतवाल्यांनीं उपवास व प्रार्थना करून लवकरच सुरूं होणाऱ्या लढाईपासून संरक्षण व्हावें म्हणून परमेश्वराची करुणा भाकिली. सुमारें तीनच दिवसांनीं प्रार्थना करून लोक चर्चमधून बाहेर पडतात, तोंच इंडियन लोकांनीं त्यांजवर निकराचा हल्ला केला. त्यानंतर त्यांनीं वसाहतवाल्यांच्या झोंपड्या व कोठारें यांस आगी लावून दिल्या. धान्याचीं उभीं शेतें व गांवें जाळण्याचा धडा अर्थात् वसाहतवाल्यांनींच इंडियन लोकांस घालून दिला होता. सर्व वसाहतची वसाहत इंडियन लोकांनीं पेटवून दिली, फक्त कॅपटन हचिनसन् व त्याचे सोबती जेथें लपून बसले होते तेथें मात्र इंडियन लोकांस जातां येईना, कारण त्यांनीं सारखा गोळीबार सुरूं ठेविला होता. या घनघोर युद्धांत इंडि-

यन लोकांचीही प्राणहानि विलक्षण झाली. तीन दिवस अहोरात्र इंडियन लोकांनीं हल्ला सुरूं ठेविला होता. बाणाचे टोकांस तेलकट चिंध्या बांधून त्या पेटवीत व बाण नेमके रहात्या घरांवर सोडीत. घरेंच पेटूं लागल्यामुळें वसाहतवाले हवालदिल झाले. पण इतक्यांत असा जोराचा पाऊस आला कीं सर्व दिशांस पाणीच पाणी होऊन गेलें व घरें आपोआप विझलीं. थोड्याच वेळांत कॅप्टन विलार्ड मोठी फौज घेऊन आला, व त्यानें इंडियन लोकांचा पूर्ण पराभव केला. सुमारें ८० इंडियन जागचेजागींच मेलेले आढळले, जखमी किती झाले त्यांचा पत्ताच नाहीं. फिलिपनें ही लढाई पुढें जवळ जवळ वर्षभर चालू ठेविली होती.

दुसऱ्या चार्लस् राजानें वसाहतींत पाठावलेलें न्यायाधीशांचें कमिशन परत आल्यामुळें त्याची फार निराशा झाली पण पुढें त्याचे हातून वसाहतवाल्यांचे नियंत्रणाबद्दल कांहीं विशेष तजवीज होऊं शकली नाहीं. चार्लस्-नंतर दुसरा जेम्स इंग्लंडचे गादीवर आला. त्यानें सर्व कॉलनींवर म्हणून एक स्वतंत्र गव्हरनर जनरलची नेमणूक केली. जोसेफ डडले गव्हनर जनरल होऊन वसाहतींत येतांच त्यानें सर्व वसाहतींची जी साधारण सभा होती ती मोडून टाकिली, व त्यामुळें वसाहतींतील वातावरण प्रक्षुब्ध होत चाललें.

त्यानंतर सर एडमंड अँड्रोज हा गव्हरनर जनरल झाला. त्यानेंही वसाहतींतील कायद्यांची पिच्छेहाट करून ब्रिटिश अंमल चालूं करण्याचा प्रयत्न केला. दुसऱ्या जेम्सला ज्यावेळीं आपली गादी सोडावी लागली, त्यावेळीं अमेरिकन वसाहतींनींही अंड्रोजला हांकून दिलें. पुढें एक महिन्याचे आंतच सर्व वसाहतींनीं आपली सत्ता प्रस्थापित केली, इतकेंच नव्हे तर अंड्रोज व त्याचे सहकारी यांना पकडून तुरुंगांत घातलें.

सतरावे शतकाचे अखेरीस युरोपांत इंग्लंड, फ्रान्स, व हॉलंडचे दरम्यान ज्या लढाया झाल्या त्यांचें प्रतिबिंब अमेरिकन वसाहतींतही पडूं लागलें. नोव्हास्कोशिया येथील फ्रेंच वसाहतींत तंटा माजला. सुमारें आठ वर्षेपर्यंत त्यांच्यामध्यें लढाई चालूं राहिली. पुढें ज्यावेळीं इंग्लंड व फ्रान्स यांचा तह झाला त्या वेळीं अमेरिकन वसाहतींतही तह झाला.

फ्रेंच लोक नेहमीं इंडियन लोकांना इंग्रज वसाहतवाल्यांविरुद्ध चिथावणी देत, त्यांना हत्यारें, व दारूगोळा पुरवीत, त्यामुळें इंग्रज वसाहतवाल्यांना जीव नकोसा झाला होता. इंडियन लोकांची संख्या जास्त होती. तसेंच चोरून छापे घालणें व सुधारलेल्या हत्यारांचा उपयोग करणें या गोष्टीही त्यांना अवगत झाल्या होत्या. त्यामुळें वसाहतवाल्यांना नेहमीं लढाईस सज्ज अशा स्थितींत राहावें लागे, व व्यापार व शेती यांस त्यामुळें मोठा व्यत्यय येत असे. जीवित सुरक्षित राखण्यासाठीं घरांभोवतीं जाडें कुंपण घालावें लागे. शाळा-प्रार्थनामंदिरें यांभोवतीं मोठमोठ्या भिंती बांधून तटबंदी करावी लागे, नेहमीं बरोबर हत्यार घेतल्याशिवाय बाहेर जाणें धोक्याचें होतें. आणि इतकें करूनहीं प्राणहानि टाळतां येत नसे, दररोज थोडातरी रक्तपात होईच.

त्या दिवसांतील आयुष्यक्रम किती कठीण होता, हें मिसेस डास्टिन नांवाच्या बाईच्या हकिकतीवरून कळून येण्यासारखें आहे. इ. स. १६९७ सालीं इंडियन लोकांनीं मॅसॅचुसेट्समधील हावरहिल गांवावर हल्ला केला, तेथील वीस लोकांस ठार मारिलें व सुमारें वीस बायकामुलांस पळवून नेलें. त्यावेळीं या गांवांतील डास्टिन नांवाचा एक शेतकरी शेतांत कांहीं काम करीत होता. त्यानें जेव्हां गांवाकडील बाजूस गडबड ऐकिली, त्यावेळीं त्याला इंडियन लोकांचा हल्ला आल्याची शंका आली. तो ताबडतोब आपल्या घोड्यावर बसला व हातांत बंदुक घेऊन स्वतःच्या बायकामुलांच्या रक्षणार्थ एकदम घराकडे धावला. त्याला सात मुलें होतीं. पराक्रमाची शिकस्त करून त्यानें आपल्या सहा मुलांस पळून जाण्यासाठीं वाट मोकळी करून दिली व तो रस्त्याचे नाक्यास रक्षणार्थ उभा राहिला. घरीं त्याची बायको आजारी होती व एक तान्हें मूल होतें. इंडियन लोकांनीं त्याचे घरांत शिरून तें तान्हें मूल भिंतीवर आपटून मारिलें, व मिसेस डास्टिन व इतर कांहीं बायकामुलें यांस कैद करून नेलें. मिसेस डास्टिन जरी आजारी होती तरी अत्यंत धाडशी व शूर होती. थोडें अंतर कापल्यानंतर त्या कैद्यांच्या चार पांच लहान टोळ्या बनविण्यांत आल्या व त्यांस निरनिराळ्या ठिकाणीं नेण्यांत आलें. एका टोळींत मिसेस डास्टिन.



वसाहतींतील धर्मभोळेपणा – चेटक्यांची चौकशी. पान ७१.

एक दाई, व एक चौदा वर्षांचा मुलगा होतां. मिसेस डास्टिनला वाटलें कीं थोड्या वेळांत आपल्याला ठार मारण्यांत येईल. ज्या इंडियन लोकांनीं या टोळीस चालत आणलें त्यांना वाटलें कीं हीं माणसें खूप थकलीं आहेत, तेव्हां फारशी हालचाल किंवा दंगाधोपा करणार नाहींत. ह्मणून ते निर्धास्तपणें निजून राहिले. मिसेस डास्टिननें दाईस उठाविलें व दोघींनींही इंडियन लोकांच्याच कुऱ्हाडी हातांत घेऊन निजलेल्या इंडियनांस ठार मारलें व त्या परत वसाहतींत आल्या.

इ. स. १७०४ सालीं फ्रेंच व इंडियन या दोहोंनीं मिळून मॅसॅचुसेटस-मधील 'डीरिंग' गांवीं तसलाच प्रकार पुन्हां केला. त्यांनीं अचानक डीरिंगवर छापा घालून सत्तेचाळीस पुरुष ठार केले व गांवास आग लावून दिली. सुमारें दीडशें बायकामुलांस त्यांनीं कैद करून बर्फांतून चालत नेलें, रस्त्यांत थकून जसजसे हे लोक पडूं लागले तसतशीं त्यांचीं, शिरें कुऱ्हाडीनें तोडण्यांत आलीं.

त्यावेळीं धर्मवेडाचा जोर कसा विलक्षण होता याचें एक उदाहरण येथें सांगण्यास हरकत नाहीं. न्यू इंग्लंडमधील सालेम नांवाचे गांवीं दोन पाद्र्यांमध्यें वितुष्ट आलें. सॅम्युअल पॅरिस नांवाच्या पाद्र्यानें जॉन बरोज नांवाच्या दुसऱ्या पाद्र्यावर तो भुताटकीचे व चेटुकबाजीचे प्रयोग करतो व तें ख्रिस्ती धर्माचे तत्वाविरुद्ध आहे, असा आरोप आणिला. बरोज व त्याचे सुमारें दोनशें अनुयायी या सर्वांवरच सॅम्युअल पॅरिसनें वसाहतीचे डेप्युटी गव्हर्नरसमोर फिर्याद मांडिली. पॅरिसचा स्नेही कॉटन मॅथर हाही एक प्रख्यात पाद्री होता, त्यानें पॅरिसला फार मदत केली. बरोज व त्याचे स्नेही या सर्वांस अटकेंत ठेवण्यांत आलें व खटला चालूं झाला. या खटल्यांत वीस स्त्रीपुरुषांस देहान्तशिक्षा झाली व ती ताबडतोब अंमलांतही आणली गेली; सुमारें पन्नास लोकांकडून कबुली जबाब घेण्यांत आले व दुसरे दीडशें लोक संशयावरून तुरुंगांत होते व मरणाची वाट पाहात होते.


पहिले वीस लोक ठार मारण्यांत आल्यावर लोकांमध्यें विचारांची लाट उठली असें दिसतें. त्यांनीं भुताटकी वगैरे थोतांड आहे व त्यापासून कांहींही वाईट होण्याचा संभव नाहीं असें जाहीर केलें व या दुष्ट प्रकाराबद्दल फार गवगवा करून तुरुंगांत असलेल्या सर्व दुर्दैवी प्राण्याची सुटका केली. सर्वसाधारणसभेचें अधिवेशन भरविण्यांत आलें, व गव्हर्नरनें भरविलेलें कोर्टच मोडून टाकण्यांत आलें. अशारीतीनें अखेर धार्मिक बंडावर सदसद्विवेक बुद्धीचाच विजय झाला.

इ. स. १७०३ सालीं स्पेनच्या गादीचे वारसाचा तंटा सुरूं झाला, व इंग्लंड व फ्रान्स यांचेमध्यें युद्ध जुंपलें. त्याचा परिणाम तात्काल वसाहतींतही झाला. कॅनडांतील जेसुइट लोकांनीं फ्रेंच लोकांस इंग्रजांविरुद्ध चिथावून दिलें. फ्रेंच लोकांनीं इंडियन लोकांचे मदतीनें इंग्रज वसाहतींवर हल्ले सुरूं केले. इ. स १७०३ व १७०४ या दोन वर्षांत सर्व वसाहतींत धुमाकूळ माजून राहिला होता.

इ. स १७०७ सालीं मॅसॅचुसेट्समधील इंग्रज लोकांनीं हल्ला करून फ्रेंच लोकांचें पोर्ट रॉयल हें ठाणें काबीज करण्याचा घाट घातला. त्यांचें एक हजार खलाशी सैन्य तयार होतें. फ्रेंच लोकांचा कमांडर बॅरन् कॉस्टिन् यानें अप्रतिम कौशल्यानें हा इंग्रजांचा हल्ला परतवून त्यांचा पराभव केला. मॅसॅचुसेट्सचें या लढ्यांत फार मोठें नुकसान झालें व मोठें कर्ज डोक्यावर बसलें, परंतु त्यानें लढाई चालूंच ठेविली.

इ.स. १७१० सालीं मॅसॅचुसेट्सनें पुन्हां तयारी करून छत्तीस लढाऊ जहाजें बरोबर घेऊन, पोर्ट रॉयलला वेढा घातला. फ्रेंच लोकांची अन्नसामुग्री संपुष्टांत आली व शेवटीं कंटाळून सुमारें अकरा दिवसांनीं ते शरण आले. अशा रीतीनें पोर्ट रॉयल व त्याबरोबर सर्व नोव्हास्कोशिया ब्रिटिश अंमलाखालीं आला. पोर्ट रॉयलचें नांव बदलून त्यावेळच्या ॲन राणीचें नांव त्या किल्लयाला ठेवण्यांत आलें व त्याला ॲनेपॉलिस म्हणूं लागले.

शिक्षणाचे बाबतींत न्यू इंग्लंडनें अगदीं प्रथमपासूनच पुढाकार घेतला होता. त्यानें शिक्षण मोफत ठेविलें होतें व मोठ्या शहरांपासून तों



बेन्जामिन फ्रांकलिन्.

लहान खेड्यांपर्यंत शालागृहें स्थापन केलीं होतीं. त्यांचा शिक्षणाचे कामीं फार उपयोग झाला. प्रत्येक गांवानें शिक्षणाच्या कांहीं विशेष सोई करावयाचा निश्चय केला हाता. स्वातंत्र्याचें युद्ध झालें, त्यानंतरच्या खानेसुमारीवरून असें दिसून आलें कीं, सबंध न्यू इंग्लंडमध्यें लिहितां—वाचतां न येणारा असा एकही मनुष्य नव्हता. प्युरिटन लोकांच्या धार्मिक समजुतीसंबंधीं वाटेल तें म्हणा पण शिक्षणाच्या बाबतींत त्यांनीं जो विलक्षण पुढाकार घेतला त्यास इतिहासांत दुसरी तोड मिळावयाची नाहीं. त्यावेळच्या लोकसंख्येकडे व शिक्षणांतील साधेपणाकडे पाहिलें म्हणजे आतांच्याप्रमाणें तो प्रश्न मोठा बिकट होता असें वाटत नाहीं, तरीपण अठरावे शतकाचे मध्यांत न्यू इंग्लंडचे लोकांनीं जो कार्यक्रम पार पाडला त्याचें आश्चर्य वाटल्यावांचून राहात नाहीं.

मध्यभागांतील वसाहतींत शिक्षण इतकें सार्वत्रिक स्वरूपाचें नव्हतें पेनसिल्व्हॅनियानें एकंदरींत बरीच मजल मारिली होती. येथेंच बेंजामिन फ्रँकलिनचें शिक्षण झालें, येथेंच त्यानें अध्यापकाचें काम केलें, व केवळ अमेरिकेंतच नव्हे तर समुद्रापलीकडील देशांत सुद्धा त्याच्या शैक्षणिक धोरणाची प्रशंसा झाली. पोटोमॅक नदीचे दक्षिणेस शिक्षणाचा प्रसार बेताचाच होता. विशेषतः श्रीमंत लोकांचे मुलांसच शिक्षण मिळे. हळूंहळूं युरोपांतील धर्तीवर तेथें नवीन शाळा निघूं लागल्या. दक्षिणेंत शिक्षण-प्रसार विशेष नव्हता. तेथें खाजगी शाळाच विशेष प्रचारांत हात्या. स्कॉटलंडमध्यें निराश होऊन नव्या जगांत आलेले, तसेंच फ्रेंच व आयरिश देशभक्त यांनीं नवीन नवीन शाळा काढल्या व तेथेंच नवीन देशांतील धडधाकट मुलांस शिक्षण व स्वातंत्र्य या दोहोंचे पाठ नित्यशः मिळूं लागले.

दाक्षिणेकडील प्रांतांत व्हर्जीनियानें शिक्षणाचे कामीं मोठी आघाडी मारिली होती. तेथें मोठमोठे विद्वान लोक पैदा झाले. युरोपांतून आलेले पंडित तेथें शिक्षण देत असत. कांहीं खाजगी शाळा असत, कांहीं घरींच शिक्षण घेत, तर कांहीं सरकारी कॉलेजांतही जात. शिक्षणासाठीं बहुधा कोणी युरोपमध्यें जात नसत.

जेम्स व बेंजामिन् फ्रंक्लिन् या दोन्हीं बंधूंनीं इ. स. १७२१ मध्यें न्यू इंग्लंड कूरँट नांवाचें छापेखानी वर्तमानपत्र काढिलें. त्यांत मुख्यतः युरोपांतील जातिभेद विसरून सर्व अमेरिकन वसाहतवाल्यांनीं बंधुत्वाचे नात्यानें वागावें असा उपदेश असे. इ. स. १७४० मध्यें व्हर्जीनियांत एक, न्यू यॉर्कमध्यें एक, व कॅरोलिनामध्यें एक येवढींच काय तीं वर्तमानपत्रें होतीं. हीं वर्तमानपत्रें नीट न चालण्याचें मुख्य कारण, ह्मणजे त्यावेळीं फार मोठालीं शहरें नव्हतीं तसेंच लांब अंतरावर बातमी पसरविण्यास लागणारीं दळणवळणाचीं साधनेहीं नव्हतीं. बॉस्टन व फिलाडेल्फिया येथें त्यावेळीं अवघी अठरा हजार वस्ती होती. त्यावेळीं पुस्तकांचा प्रसार विशेष नव्हता, व जीं कांहीं पुस्तकें होतीं तीं साधारण प्रतीचींच होती. शिक्षणाचे कामीं खास उपयोग होईल अशीं फारच थोडीं असत.

धर्मासंबंधीं कांहीं पुस्तकें होतीं. त्यांत जुन्या मतांचेंच चर्वित चर्वण केलेलें असे, व प्रत्येक पानावर जवळ जवळ तसलाच मजकूर वाचावयास मिळे. प्रागतिक मतांचीं पुस्तकें क्वचितच आढळत. असें असून सुद्धां त्याकाळीं व त्याच प्रांतांत थॉमस जेफरसन, फ्रँकलिन, लिव्हिंगस्टोन, ॲडाम्स व हमिल्टनसारखे रथी, महारथी, अतिरथी जन्मास आले हें एक आश्चर्यच नव्हे काय? स्वतंत्र वातावरण व प्रसृत कर्तव्यक्षेत्र यांचा नवीन सुशिक्षितांवर इष्ट तो परिणाम घडून आलेला दिसत असे येवढी गोष्ट खरी.

दळणवळणाचीं साधनेंही या काळीं पुरेशीं नव्हतीं. त्यामुळें मोठीच कुचंबणा होई. वसाहतींत झपाट्याचें दळणवळण नसल्यानें त्या एकमेकांपासून जवळ जवळ असून सुद्धां इकडील बातमी तिकडे जात नसे. प्रत्येक वसाहतींत इतर वसाहतींबद्दल पराकाष्ठेचें अज्ञान असलेलें आढळून येई. अद्यापि पोस्ट व त्यासाठीं लागणारीं रस्ते वगैरे साधनें सुरू व्हावयाचीं होतीं. समुद्र किनाऱ्यावर असलेल्या शहरांत दळणवळण कांहीं अंशीं बरें होतें. किनाऱ्यावरून जाणाऱ्या लहान लहान बोटी पत्रें पोहोंचवीत, व जरूरीचे व्यवहार चालू राखीत. समुद्र व नद्यांचे पासून लांब असलेल्या अंतःप्रांतात दळणवळणाची अडचण फार असे. पुरेशा दळणवळणाचे अभावीं, प्रत्येक वसाहतींत एकलकोंडेपणा प्रामुख्यानें दिसून येई.

जुलमानें पत्करलेला हा एकांतवास एका दृष्टीनें फार उपयुक्त ठरला. 'एकांत' हें शिक्षण मिळविण्याचें मोठें साधन होय ही म्हण अक्षरशः खरी ठरली.

वसाहतवाल्यांमध्यें एकलकोंड्या राहणीनें एक प्रकारचा स्वावलंबीपणा, मजबुती व काम करण्याची तडफ अनुभवास येऊं लागली, व त्यांचा स्वातंत्र्याविषयींचा अभिमानही विशेष जागृत होऊं लागला. इ. स. १७६६ सालीं न्यू यॉर्कहून फिलाडेलफिया येथें तांग्यानें टपाल जाण्यास पुरे दोन दिवस लागत. त्यावेळीं ही प्रगतीची कमाल आहे असें लोकांस वाटत असे.

न्यू इंग्लडमध्यें जहाजें बांधण्याचा धंदा चांगला नांवारूपास येऊं लागला. इ. स. १७३८ मध्यें बॉस्टन येथील गोदींत एकेचाळीस जहाजें बांधिलीं गेलीं. तेथील लोक या कामीं आतां बरेच तरबेज झाले होते, आणि हें सर्व इंग्लंडांतील सरकार औद्योगिक बाबतींत पराकाष्ठेचें असहिष्णु असतांनां सुद्धां घडून आलें, त्यावरून न्यू इंग्लंडचे लोकांची उत्कृष्ट कार्यतत्परता दिसून येते.

लवकरच न्यू इंग्लंडमध्यें कारखाने व इतर व्यापारधंदे सुरूं झालेले दिसूं लागले, पण प्रत्येक बाबतींत ब्रिटिश बोर्ड ऑफ ट्रेड कांहीं तरी कारण काढून, कोणत्याही धंद्याचें बस्तान नीट बसूं देत नसे. न्यू इंग्लंडमध्यें एकादी लहान सहान कंपनी स्थापन झाली, किंवा एकादा धंदा निघूं लागला, कीं हें बोर्ड मध्यें आडवें येई व कोणत्याना कोणत्या सबबीवर त्याला यश येऊं देत नसे. जर यदाकदाचित् स्वातंत्र्याचे लढाईपूर्वी एकादा धंदा अमेरिकेंत अस्तित्वांत आला असला, तर तो ब्रिटिश विरोधास न जुमानतां किंवा बोर्ड ऑफ ट्रेडच्या क्षुद्र वृत्तीस भीक न घालतांच जगून राहिला असला पाहिजे असा सर्वसाधारण सिद्धांत काढण्यास कसलीच हरकत नाहीं.

जसजशी एक एक नवीन पिढी उत्पन्न होऊं लागली, तसतसा प्रत्येक वसाहतींतील निरनिराळ्या देशांतून आलेल्या वसाहतवाल्यांमधील विश्वास वाढत चालला व शांतता अधिकाधिक प्रमाणांत नांदूं लागली.

फ्रेंच लोकांची लढाई

प्रकरण ६ वें

अमेरिकेंत वसाहती स्थापण्याची इंग्रज व फ्रेंच लोकांचा स्पर्धा एकसारखी चालू होती. इंग्रज लोक किनाऱ्याच्या मार्गानें वसाहती स्थापीत होते, तर फ्रान्स अंतःप्रांतांतील आपल्या वसाहतींचा वाढ करीत होतें इंग्लंडच्या वसाहती जरी किनाऱ्या-किना-यानें होत होत्या तरी इंग्रज राज्यकर्त्यांचें ह्मणणें पडलें कीं, ज्याअर्थी इंग्रज खलाशी कॅबट यानें प्रथम या मुलखाचा शोध लाविला त्याअर्थी हा सर्व प्रदेश आमचा आहे. कॅबटनें फार तर किनाऱ्यालगतचा पन्नास ते शंभर मैलांचा प्रदेश धुंडाळला असेल पण अटलांटिक महासागरापासून चार हजार मैल दूर असलेल्या पॅसिफिक महासागारापर्यंतच्या सर्व मुलखावर आपला हक्क सांगण्यास तें पुरेसें कारण आहे असें इंग्रज राज्यकर्त्यांस वाटत असे. उलटपक्षीं फ्रान्सनें अंतर्मुलखांत (अंतःप्रांतांत) प्रत्यक्ष वसाहती सुद्धां स्थापिल्या होत्या. त्यांची पहिली वसाहत मॉंट्रिआल येथें झाली. समुद्रापासून सेंटलॉरेन्सचे मुखांतून आंत सुमारें पांचशें मैल प्रवास करून त्यांनीं ही वसाहत स्थापिली होती. सतराव्या शतकाच्या उत्तरार्धांत त्यांनीं पाश्चिमेकडे व दाक्षिणेकडे आपला मोर्चा वळविला.

युनायटेड स्टेटसचे उत्तरेस असलेल्या ग्रेट लेक्स नांवानें प्रसिद्ध असलेल्या लेक ओटारिओ, लेक ह्यूरॉन, लेक मिचिगन वगैरे सरोवरांचे कांठाकांठानें वसाहती स्थापण्याचें काम चालूं झालें. नंतर वाबाश नदीचे मुखांतून इलिनॉय, विनस्कॉसिन, व सेंट लुई येथें ते गेले. त्यानंतर त्यांनीं मिसिसिपी नदींतून दक्षिणेकडे प्रवास करीत करीत थेट मेक्सिकोचें आखात गांठलें व या मार्गावर ठिकठिकाणीं वसाहती स्थापल्या.

युनायटेडस्टेटसच्या नकाशाकडे नजर फिरविली असतां असें दिसून येईल कीं मिसिसिपी नदीचे पूर्वेस युनायटेड स्टेटसचा साधारणपणें एक

तृतीयांश भाग आहे व दोन तृतीयांश भाग पश्चिमेकडे आहे. मिसिसिपी नदीचे आसमंतांत ठिकाठिकाणीं वसाहती स्थापून एक रुंदसा पट्टा आपण ताब्यांत ठेविला व त्याचेपलीकडे जाणें इंग्रज वसाहतवाल्यांस अशक्य करून सोडल्यास युनायटेड स्टेट्सचा दोन तृतीयांश भाग निर्वेधपणें आपल्या ताब्यांत राहील असा फ्रेंच लोकांचा या अंतःप्रांतांतील वसाहती करण्यांत डाव होता.

मिसिसिपी नदींतून मेक्सिकोपर्यंत थेट जाणारा पहिला धाडसी प्रवासी ला साले हा होय. नायगरा धबधब्याचे वरचे बाजूस यानेंच प्रथम जहाजांतून प्रवास केला. त्यानें या कामाकरितां स्वतःचें जहाज बांधिलें. नंतर लेक एरी, लेक ह्यूरॉन, व ग्रीन बे, यांमधून प्रवास करीत करीत, त्यानें मिचिगन सरोवर गांठलें. नंतर सेंट जोसेफ नदींतून तो इलिनॉय नदींत शिरला. तेथें त्याचें फार हाल झाले व त्याला पुढें जाण्यासारखी परिस्थिति राहिली नाहीं, ह्मणून तो परत पायीं चालत एक हजार मैल गेला, व त्यानें पोर्ट फ्रॉन्टिनाक गांठलें. त्याचे गैरहजेरींत फादर हेनेपिन नांवाच्या गृहस्थानें इलिनॉय ओलांडून मिसिसिपींत प्रवेश केला. इ स. १६८१ सालीं ला साले हा परत मिसिसिपींत आला व त्यानें मेक्सिकोचे आखातापर्यंत प्रवास केला. तेथून तो परत फिरला व पुन्हां क्विबेक येथें येऊन फ्रान्स देशास परत आला. मिसिसिपीच्या खोऱ्यांत असंख्य वसाहती स्थापून तेथें आपलें अधिराज्य स्थापण्याबद्दल, त्यावेळचा फ्रान्सचा राजा चवदावा लुई यास त्यानें फार गळ घातली. चवदावे लुईनें त्याला चार जहाजें व सर्व सामग्रीसह दोनशें ऐशीं लोक मदतीस दिले. मिसिसिपी नदीचे दक्षिण भागांत एक मोठें अधिराज्य स्थापावें असें त्याचे मनानें घेतलें, पण जहाजांचा कप्तान व ला साले यांचें एकमत होईना. कप्तानानें जहाजें भलत्याच दिशेनें चालविलीं व मिसिसिपीचे मुखांत शिरण्याचे ऐवजीं पश्चिमेकडे टेक्सासचे किनाऱ्यास सर्व जहाजें लागलीं, मग त्यांनीं माटागोर्डा येथें आपली वसाहत स्थापिली.

ला साले याला वरील प्रकरणामुळें फार वाईट वाटलें, पण त्यानें धीर सोडला नाहीं. थोड्याच दिवसांनीं सुमारें पंधरा लोक बरोबर घेऊन

त्यानें मिसिसिपी नदीचे मुखाकडे जाण्याचा प्रयत्न केला, पण त्याची दिशा चुकली. सुमारें साठ दिवस प्रवास करून कोलोराडो नदीचे उगमापर्यंत तो येऊन पोहोंचला. त्याचे मनांत कॅनडांत जावयाचें आलें होतें, पण वाटेंत त्याचे बरोबरचे लोकांत असंतुष्टता उत्पन्न झाली व त्यांनीं त्याला दगलबाजीनें ठार मारिलें. त्याच्या टोळीपैकीं फक्त सात लोक शेवटीं मिसिसिपी नदीचे कांठच्या एका फ्रेंच वसाहतींत पोहोंचले. इ स. १७५० चे अगोदरच फ्रेंच लोकांनीं नायगरा व फ्रॉन्टिनाकपासून तों मेक्सिकोचे आखातापर्यंत मिसिसिपी नदाचे खोऱ्यांत ठिकठिकाणीं आपलीं मिशनें, वसाहती, व लढाऊ किल्ले स्थापन केले.

इंग्लंड व फ्रान्स देशांतील पिढीजाद वैरभावामुळें वसाहतींतही इंग्रज व फ्रेंच समाजांत तेढ वाढतच होती. सतरावे शतकाचे शेवटीं जेव्हां फ्रेंच लोकांचे ध्यानांत आलें कीं, आपली लोकसंख्या झपाट्यानें वाढणाऱ्या इंग्रज वसाहतींच्या एक दशांश सुद्धां नाहीं, तेव्हां त्यांना फार स्पर्धा वाटूं लागली. त्यांनीं जेसुईट मिशनरी पाठविण्याचा व मिसिसिपीचे भागांत नवीन वसाहती बांधण्याचा तडाखा सुरूं केला. अर्थातच त्याचें इंग्रज लोकांस वैषम्य वाटूं लागलें इ. स. १७५० पासून या तेढीस मूर्त स्वरूप प्राप्त होऊं लागलें. ओहाओ नदीचे आसमंतांतल्या प्रदेशांत इंडियन लोकांच्या वसाहती होत्या, तेथें त्यांचेबरोबर फ्रेंच लोक लोकरीचा व कातड्याचा व्यापार करीत असत. त्या प्रदेशांत व्हर्जीनिया व पेनसिल्व्हॅनिया प्रांतांतील फिरत्या इंग्रज टोळ्याही येऊन व्यापार करूं लागल्या. त्यामुळें दोघांत स्पर्धा उत्पन्न होऊन प्रकरण हातघाईवर आलें. लेक एरीपर्यंतचा सर्व प्रदेश आपला आहे असें इंग्रज वसाहतवाले म्हणूं लागले, व त्यांनीं लगेच आत्मसमर्थनार्थ इंग्रज वसाहतवाल्यांच्या टोळ्यांच्या टोळ्या आणून उभ्या केल्या. पुढें ओहाओ कंपनी स्थापन करून त्यांनीं तो प्रदेश आपल्या ताब्यांतच घतला. फ्रेंच लोकांनीं सुमारें तीनशें लोकांची फलटण पाठविली, व नजीकच किले बांधण्यास सुरुवात केली. इंग्रज लोकांनींही या प्रदशापर्यंतच्या रस्त्यांचा डागडुजी करून वाटेल तेव्हां अधिक लोक जमवितां यतील अशी तयारी त करू लागले.

या दान युरोपीय राष्ट्रांचे लठ्ठालठ्ठींत आपला चक्काचूर उडणार असें इंडियन लोकांचा प्रमुख हाक्किंग याला वाटूं लागलें; व त्यानें इंग्रज वसाहतवाल्यांतर्फे बेंजामिन फ्रॉंकलिन् याच्याशीं तह केला. हा तह कार्लाइल मुक्कामीं झाला पण त्याचा इंडियन लोकांस पुढें फारसा उपयोग झाला नाहीं.

इंग्रज व फ्रेंच कॉलनींतील प्रकरण जरी हातघाईवर आलें होतें तरी मूळ देशांत या गोष्टीचा पत्ता लागण्यास अर्थात् कांहीं कालावधि लागणें अपरिहार्य होतें. इंग्रज वसाहतींतील लोक मात्र खवळून गेले होते. तरी पण व्हर्जीनियाच्या गव्हरनरनें असें ठरविलें कीं कांहीं सामोपचारानें प्रकरण मिटल्यास पाहावें. त्यानें फ्रेंच अधिकाऱ्यांना एक खलिता लिहिला. त्यांत त्यांना ब्रिटिश मुलखाचे बाहेर म्हणजे एरी सरोवराचे पलीकडे ताबडतोब निघून जाण्यास बजाविलें होतें. फ्रेंच कमांडंट जनरल सेंट पेरी याच्याकडे हा खलिता घेऊन जाण्याचें काम, त्यावेळीं सर्व्हेअरचे हुद्यावर असलेला सुप्रसिद्ध जॉर्ज वॉशिंग्टन, याला सांगण्यांत आलें. कमांडंट पेरी हा एरी सरोवराचे कांठीं असलेल्या एका किल्ल्यांत राहात असे. येवढा लांबचा प्रवास करण्यासाठीं वॉशिंग्टनबरोबर फक्त चार सोबती, एक वांटाड्या व एक दुभाष्या इतकीं माणसें होतीं. रानावनांतून मार्ग काढीत काढीत वॉशिंगटन प्रथम हल्लीं पिटसबर्ग शहर आहे तेथें आला. तेथें त्यानें एका इंडियन टोळीशीं सख्य केलें व आपला मार्ग निर्भय करून तिच्याच मदतीनें तो पुढें निघाला. तेथून निब्बळ जंगलांतून प्रवास करीत, मोठ-मोठ्या नद्या ओलांडून कसाबसा तो कमांडंट पेरी राहात होता तेथें अनेक हालअपेष्टा सोशीत जाऊन पोहोंचला. फ्रेंच रीतिरिवाजाप्रमाणें कमांडंट पेरीनें त्याचें स्वागत केलें, पण त्याचा खलिता पाहून त्याला हंसूंच आलें. लष्करी हुकुमाप्रमाणें फ्रेंच हद्दीवर अतिक्रमण करणाऱ्या प्रत्येक इंग्रजास हांकून देण आपल्यास प्राप्त आहे असें पेरी म्हणाला.

अशा तऱ्हेचा जबाब मिळाल्यामुळें अर्थातच वॉशिंगटन परत फिरला. परत येतांना त्याचेबरोबर त्याचा दुभाषी जिस्ट हा एकटाच होता. ते ऑलिघेनी नदीपर्यंत मोठ्या कष्टानें येऊन पोहोंचले. त्यावेळीं या

नदीवर सर्वत्र बर्फाचें आच्छादन झालें होतें पण अतिशय धाडसानें त्यांनीं एक तात्पुरता लांकडी ताफा बांधला व त्यावरून ते नदी ओलांडून आले. त्यानंतर त्यांनी इंडियन लोकांसारखा पोषाक केला. थंडीनें कुडकुडत, दाट जंगलांतून रात्रीं अपरात्रीं मार्ग काढीत, उत्तर ध्रुवाच्या ताऱ्याचे धोरणानें वाट चालून ते एका मुक्कामावर पोहोंचतात तोंच त्यांच्यावर एका इंडियननें गोळी झाडली; पण त्यांना कांहीं एक दुखापत न होतां ते तसेच वाट चालूं लागले. पुढें पुन्हां एकदां ॲलिघेनी नदी ओलांडण्याचा त्यांना प्रसंग आला. त्यावेळीं नदी दुथडी वाहात होती, म्हणून ती ओलांडणें अशक्य झालें होतें. मग त्यांनीं त्या जागी कांहीं दिवस वाट पाहिली व नदी बर्फानें थिजून जातांच तींतून वाट काढली. नंतर पुन्हां ते जंगलांत शिरले. थोडे दिवसांनंतर ते जिस्ट राहात होता त्या वसाहतींत येऊन पोहोंचले, व तेथून परत व्हर्जीनियांत आले. या भयंकर प्रवासांतून जॉर्ज वॉशिंग्टन हा अगदीं शिरसलामत परत आल्यामुळें त्याचें फार कौतुक झालें व त्याच्या कर्तबगारीचा लोकांवर पगडा बसला.

फ्रेंच कमांडंटकडून आलेला जबाब पाहून इंग्रजी वसाहतींचे गव्हरनरने योग्य तजवीज करण्याचें आरंभलें. ट्रेंट नांवाच्या एका शूर शिपायाचे बरोबर व्हॉलंटियर लोकांचा एक मोठी तुकडी देण्यांत आली व हे लोक ॲलिघेनी व मोनांगाहीला या नद्यांचे संगमावर म्हणजे हल्लीं पिट्सबर्ग शहर आहे तेथें येऊन पोहोंचले. फ्रेंच लोकांचे धाकदपटशास व बडबडीस भीक न घालतां या नाक्याचे ठिकाणीं येऊन या टोळीनें तळ दिला, व ओहाओ नदीचे ओघानें पुढें जाण्याचा मार्ग सुगम करून ठेविला, पण इतक्या लहानशा सैन्यानें तिचा निभाव लागला नाहीं. कारण ॲलिघेनी नदीतील बर्फ कमी होतांच फ्रेंच लोक मोठाल्या गलबतांतून पुष्कळ सैन्य घेऊन आले व त्यांनीं ट्रेंटला हांकून दिलें, व ती जागा कबीज करून तेथील जंगल वगैरे तोडून त्यांनीं डूयेकन नांवाचा किल्ला बांधिला.

जॉर्ज वॉशिंगटनला आतां व्हर्जीनिया वसाहतीच्या सैन्यांत लेफ्टनंट कर्नल बनविण्यांत आलें होतें व तो फोर्ट ॲलेक्झांड्रिया येथें फ्रेंच लोकांशीं कराव्या लागणाऱ्या भावी युद्धाकरितां सैन्य जमा करीत होता.

ट्रेंटचा पराभव होऊन तो परत येईपर्यंत त्याला कमलीही कुमक जाऊं शकली नाहीं. धाकदपटशाचा कांहीं उपयोग होईना. आतां युद्ध करून आपला मुलुख परत मिळविला पाहिजे अशी स्थिति येऊन ठपली हा काल इ. स. १७५४ चा होता. अजून युरोपांतील इंग्रज व फ्रेंच यांत वार्षिक युद्ध सुरू होण्यास दोन वर्षांचा अवधि होता. तरी पण अमेरिकेंत युद्धास सुरुवात झालीच होती. या युद्धास फ्रेंच-इंडियन लढाई असें नांव पडलें.

फ्रेंच लोकांबरोबर करण्यांत यावयाचे युद्धावर जॉर्ज वॉशिंगटनची नेमणूक झाली. त्याला कर्नल करण्यांत आलें होतें. त्यावेळीं त्याचें वय अवघें बावीस वर्षांचें होतें. त्याचे हाताखालीं त्याचेप्रमाणेंच लढाईचे कामीं पूर्ण अनभिज्ञ असे शिपाई गडी होते. पावसामुळें जे कांहीं थोडे रस्ते होते ते सर्व खराब झाले होते. बाकीचे ठिकाणीं तर रस्ते मुळींच नव्हते. माणसांनाच तोफांचे गाडे ओढावे लागत व जवळ शिधासामुग्री-ही भरपूर नव्हती. अशा थाटांत या स्वारीनें आपला कंटाळवाणा प्रवास सुरूं केला. फ्रेंच लोकांनीं ट्रेंटला हांकून दिलें; त्याचे अलीकडे एक किल्ला बांधून त्या किल्ल्याचे आधारानें फ्रेंच लोकांना हुसकून देऊन ड्यूकेन येथील फ्रेंच किल्ला हस्तगत करण्याचें काम त्याचेवर सोंपविण्यांत आलें होतें. या तरुण सेनापतीजवळ इतर सामुग्री जरी बेताचीच होती तरी उत्साह मात्र अपरंपार होता, व वॉटेल ते कष्ट काढण्याची तयारी होती.

इ. स. १७५४ चे मे महिन्यांत हें सैन्य पेनसिल्व्हॅनियामधील ग्रेट मेडोज येथें येऊन पोहोंचलें. येथें येतांच वॉशिंग्टनला बातमी लागली की, फ्रेंच लोक आपण ग्रेट मेडोज् येथें येऊं अशी अटकळ बांधून अगोदर-च हल्ला करण्याकरितां पलीकडे सज्ज आहेत. वॉशिंग्टननें चटकन् मोर्चा वळवून एक सुरक्षित अशी जागा गांठिली व तेथें तो तात्पुरता आश्रय मिळेल अशी तजवीज करीत होता. त्या जागेस त्यानें फोर्ट नेसिसिटी असें नांव दिलें. त्यानंतर वॉशिंगटननें मिंगो नांवाच्या इंडियन टोळीशीं सख्य करून फ्रेंच लोक दबा धरून बसले होते तेथें चाल केली, व तोफेची पहिली सरबत्ती उडवून दिली. फ्रेंच पुढारी जूमॉन व्हिली व त्याचे दहा

लोक ठार झाले व एकवीस लोक कैद करून आणण्यांत आले. अशातऱ्हेनें फ्रेंच युद्धांत वॉशिंग्टननें प्रथम जय तर मिळविला. तेथून तो पुन्हां फोर्ट नेसिसिटी येथें यऊन मागून कुमक काय येते त्याची वाट पाहात बसला. फक्त एक सैनिकांचे तुकडीशिवाय मागून कांहींएक मदत येऊं शकली नाहीं. हा वेळपर्यंत तो पिट्सबर्गचे दिशेनें रस्ता तयार करण्यांत गुंतला होता.

मागून कांहीं एक मदत आली नाहीं हें पाहून मात्र तो विचारांत पडला. त्याचे जवळ फक्त चारशें सैनिक होते. मस्किंगम व मियामी येथील इंडियन लोक आपल्याला मदत करतील अशी त्याला फार अपेक्षा होती फ्रेंच व इंग्रज यांचें परस्पर बल ताडून पाहातां त्यांना इंग्रजांची बाजू घेऊन लढणें फायद्याचें वाटत नव्हतें. पिट्सबर्गचे दिशेनें रस्ते करण्याचें काम चालूं होतें, इतक्यांत फ्रेंच जनरल डी व्हिलियर्स हा मोठ्या सैन्यानिशीं चाल करून येत आहे अशी वाहूल लागली. फोर्ट नेसिसिटीपर्यंत तो मागें हटला व तेथेंच दबा धरून बसला. डी व्हिलियर्सचे सैन्यानें त्या जागेस वेढा दिला. त्यांतच त्याला इंडियन लोकांनींही मदत केली. या सर्वांनीं मिळून फोर्ट नेसिसिटीवर सुमारें नऊ तास हल्ला करून अनेक गोळे सोडले व वॉशिंगटनचे सैन्याचें फार नुकसान केलें. त्यांचे तीस सैनिक या झटापटींत ठार झाले. तो मोठा धीराचा माणूस होता. त्यानें प्रथम जरा नमतें घेऊन शत्रूचा मारा जसा नरम पडला तसा आपला जोराचा हल्ला सुरूं केला. शत्रूकडील दारूगोळा बहुतकरून आतांपर्यंत खलास झाला असावा हा त्याचा अंदाज खोटा ठरला नाहीं. वॉशिंगटननें परत हल्ला सुरूं केला, त्याबरोबर डी व्हिलियर्सचे बाजूनें तहाचें बोलणें सुरूं झालें, व वॉशिंग्टनची अब्रु बचावली. त्याचेजवळ किती सैन्य आहे याचा विरुद्ध बाजूस सुगावा नव्हता, ह्मणूनच वेळ निभावली. पण एकंदरींत सैन्य व दारूगोळा यांचे अभावामुळें वॉशिंगटनला परत फिरावें लागलें. वाशिंगटननें ज्या दिवशीं फ्रेंच सैन्यावर जय मिळविला तो दिवस जुलै महिन्याचा चवथी तारीख हा होता. हा दिवस अमेरिकेंत सणाप्रमाणें पाळला जातो.

फ्रेंच लोकांचा लवकर पराभव करून त्यांना हांकून दिलें नाहीं तर इंग्रज वसाहतींची धडगत नाहीं हें मत सर्वच वसाहतींत प्रचलित होत चाललें होतें. एकट्या व्हर्जिनियाचे हातून फ्रेंच लोकांचा पराभव होणें अत्यंत दुरापास्त आहे ही जाणीव इतर वसाहतींत उत्पन्न झाल्यामुळें लवकरच आलबॅनी येथें सर्व वसाहतींतर्फे एक काँग्रेस भरविण्यांत आली. या काँग्रेसपुढें दुसरें एक जरुरीचें काम होतें.

आतांपर्यंत इरॉक्वॉय इंडियन लोक त्यांच्याशीं नीट गोडीगुलाबीनें वागत होते, पण फ्रेंच लोकांचे पराक्रमाचा व वैभवाचा त्यांच्या मनांवर अपरोक्ष परिणाम घडत आहे व हे लोक जर कां फ्रेंच लोकांस जाऊन मिळाले तर आपली धडगत नाहीं हें धोरणी मुत्सद्यांस कळून चुकलें होतें. याकरितां इंडियन लोकांशीं आपलें सख्य कोणत्या उपायांनीं कायम राखितां येईल या बाबी या सभेपुढें विचार होणार होता.

आलबॅनी येथील काँग्रेसला फार मोठमोठे लोक आले होते. मॅसॅचुसेट्समतर्फे हचिन्सन, रॉड बेटांतर्फे हापकिन्स, व पेनसिल्व्हॅनियातर्फे बेंजामिन फ्रंकलिन हे गृहस्थ हजर होते.

इरॉक्वॉय इंडियन लोकांच्या निरनिराळ्या प्रमुख लोकांशीं काँग्रेसनें वाटाघाट करून पूर्वीचे तह कायम ठेऊन जरूर पडल्यास फ्रेंच लोकांविरुद्ध आपल्यातर्फे लढण्याचें त्यांच्याकडून वचन घेण्यांत आलें. त्यानंतर इंडियन लोकांच्या टोळ्या आपापल्या गांवीं परत गेल्या.

सर्व वसाहतींचें मिळून एक मध्यवर्ति सरकार असावें, त्याच्या शिवाय सारावसुली, सार्वजनिक संरक्षण व इतर सामुदायिक व्यवहार करणें कठीण होत आहे, तसेंच शत्रूपासून रक्षण करणें, शत्रूबरोबर लढाई करणें वगैरे गोष्टी एकट्या दुकट्या वसाहतीच्या आटोक्याबाहेरच्या आहेत अशा तऱ्हेचे विचार बेंजामिन फ्रंकलिनसारख्या विचारवंत व दूरदर्शी माणसाचे डोक्यांत वावरत होते, व नुकत्याच आलेल्या लढाईचे अनुभवावरून सर्व वसाहतींचे लोकांस ही गोष्ट पटली होती. ता. १० जुलै १७५४ सालीं बेंजामिन फ्रांकलिन यानें सर्व वसाहतींचे एकीकरणासंबंधीं राज्यघटना या काँग्रेससमोर मांडली. तींत खालील ठराव होते:—

(१) फिलाडेलफिया ही सर्व वसाहतींची मुख्य राजधानी असावी. (फिलाडेलफिया शहर मोठें, प्रशस्त, व मध्यवर्ति असल्यामुळें अगदीं लांबलांबच्या वसाहतींतील सभासद सुद्धां एका पंधरवड्याचे आंत येऊन पोहोंचतील असें त्यांचें ह्मणणें होतें.)

(२) सर्व वसाहतींवर एक गव्हरनर जनरल असावा व त्याची नेमणूक इंग्लंडच्या राजातर्फे व्हावी.

(३) कायदेकानू करण्याचा हक्क कॉंग्रेसला असावा.

(४) कॉंग्रेसमेंबर्स प्रत्येक वसाहतीचे सार्वजनिक सभेनें निवडावे, व त्यांची निवडणूक प्रत्येक तीन वर्षांनीं व्हावी.

(५) प्रत्येक कॉलनीतर्फे कमींतकमी दोन व जास्तींत जास्त सात सभासद असावेत. ज्या मानानें वसाहती कमी अधिक वसूल मुख्य सरकारास देतील, त्या मानानें त्या वसाहतींतर्फे सभासदांची संख्या कमी अधिक असावी.

(६) अधिकारविभागणी, लष्करी अधिकाऱ्यांची नेमणूक, व एकादा कायदा फेटाळून लावणें, वगैरेसंबंधीं हक्क गव्हरनर जनरलला असावे.

(७) उलटपक्षीं लष्कराव्यतिरिक्त इतर खात्यांतील नेमणुका करण्याचा, सैन्य जमा करण्याचा, कर बसविण्याचा, व व्यापारी धोरण व जकाती ठरविण्याचा हक्क कॉंग्रेसला असावा.

सदरहू ठरावांच्या नकला निरनिराळ्या वसाहतींच्या सार्वजनिक सभांच्या सभासदांकडे पाठविण्यांत आल्या. बेंजामिन फ्रँक्लिन् यानें खरडलेल्या या ठरावांची संभावना निरनिराळ्या वसाहतींत कसकशी झाली हें पाहिलें म्हणजे तत्कालीन लोकमत किता वैचित्र्यपूर्ण होतें हें दिसून येईल. कॉनेक्टिकट वसाहतीनें या सुधारणांवर पूर्ण नापसंती दर्शविली, मॅसॅचुसेट्सनें पूर्ण विरोध केला, न्यूयॉर्क वसाहतीनें अर्धवट पसंती दर्शविली, पण पूर्ण समाधान कोणाचेंही झालें नाहीं. बहुतेक वसाहतींचें म्हणणें पडलें कीं कोठलेंही बिल फेटाळण्याचा अधिकार जर गव्हनर जनरलकडे राहिला तर

मग आपलें स्वातंत्र्य तरी कोठें राहिलें ? तसेंच सर्व वसाहतींचे परस्पर संबंध येवढे निकट आणण्यांत सर्वांच्याच स्वातंत्र्यास धोका आहे. सर्व वसाहती एकत्र केल्यानें कदाचित् एककल्ली राजकारणास उत्तेजन मिळेल. कोणी म्हणूं लागले, सर्वच वसाहतींवर एकदम वर्चस्व स्थापण्याचा राजपक्षातफेंचा हा कांहींतरी डाव आहे. अशा एकीकरणानें प्रत्येक वसाहतीस असलेल्या अनियंत्रित सत्तेस तिला मुकावें लागेल, हें लक्षण कांहीं ठीक नाहीं. अशा तऱ्हेनें सर्वच वसाहतींत एक प्रकारचें संशयखोर वातावरण निर्माण झालें.

तिकडे इंग्लंडमध्यें कोणाला ही घटना आवडेना. फ्रेंच लोकांना अमेरिकेंतील ब्रिटिश समजल्या जाणाऱ्या मुलखाबाहेर हांकून देणें जरी अगदीं निकडीचें होतें तरीपण सर्व अमेरिकन वसाहतींचें एकीकरण होणें म्हणजे ब्रिटिश सत्तेस विघातकच आहे असें लोकमत बनूं लागलें. कोणी म्हणूं लागले कीं, अमेरिकन वसाहतींचें एकीकरण करून ब्रिटिश सरकारला हांकून देण्याचा हा सरळ कटच आहे.

इंग्लंडांतून सैन्य पाठवून व मिळेल तेवढी वसाहतींची मदत घेऊन फ्रेंच लोकांना आपल्या देशांतून हांकून लावणें येवढीच गोष्ट इंग्लिश मुत्सद्यांना सयुक्तिक दिसत होती.

इकडे फ्रेंच व इंग्लिश मुत्सद्यांमध्यें शामोपचाराची भाषा चालली होती, पण जो तो दुसऱ्या पक्षास शांततारक्षणाचें आश्वासन देत होता, पण गुप्तपणें पंधराव्या लुईनें कॅनडांत तीन हजार सैन्य पाठविलेंच, इंग्लंडही झोंपा घेत नव्हतें. जनरल एडवर्ड ब्रॅडॉक यास दोन फलटणी देऊन अमेरिकेस पाठविण्यांत आलें. त्यानें निरनिराळ्या वसाहतींच गव्हरनरांची भेट घेऊन त्यांच्यापासून मदत निश्चित करून घेतली, व इ. स. १७५५ चे मे महिन्यांत फोर्ट डयूकेनवर हल्ला करून तो ताब्यांत घेण्याचा निश्चय करून तो निघाला.

फोर्ट डयूकेनवर चढाईचा हल्ला करण्याची तयारी फार धडाडीनें व उत्साहपूर्वक झाली. इ. स. १७५५ चे जून महिन्याचे आठवे तारखेस

सर्व फौजेनें फोर्ट डयूकेनपासून बारा मैलांचे अंतरावर तळ दिला. दुसऱ्या दिवशीं मोनांगाहीला नदी ओलांडून टर्टल क्रीक येथें सर्व ब्रिटिश फौज येऊन दाखल झाला, तरी फ्रेंच लोकांस आपला कांहीं पत्ता लाग़ला नाहीं असें ब्रिटिश सेनापतीस वाटत होतें. मध्यंतरीं लहानसें जंगल होतें तें ओलांडून सर्व फौज पुढें जात होती. इतक्यांत विरुद्ध पक्षाकडून जोराचा गोळाबार सुरूं झाला. शत्रु आपल्यावर चाल करून येत आहे येवढा पत्ता लागल्यावर, फोर्ट डयूकेनचें संरक्षण करणें कठीण जाईल, असा अंदाज बांधून फ्रेंच व इंडियन फौजा सामोऱ्या येऊन फोर्ट डयूकेनपासून कांहीं अंतरावरून त्यांनीं गोळीबार सुरूं केला, व अशा रीतीनें ब्रिटिश फौजेस एकदम शत्रूस तोंड देणें भाग पडलें. लढाईचे सुरुवातीपासूनच ब्रिटिश लोकांचें नुकसान होऊं लागलें. फ्रेंच लोकानीं ब्रिटिशांना अशा ठिकाणीं गांठलें होतें कीं ब्रिटिश फौज अगदीं उघड्या जागवर होती तर फ्रेंच फौज दाट जंगलांत तळ देऊन बसली होती. मारा सुरूं होतांच ब्रिटिश फौजेनें पुष्कळ गोळे सोडले, पण आपला गोळा नेमका शत्रूवर पडतो आहे कीं नाहीं हें समजण्यास तिला मार्ग नव्हता. तिचें काम अंदाजानें चाललें होतें. उलटपक्षीं फ्रेंच शिपाई झाडांवर चढून त्यांनीं ब्रिटिश फौजेतील अधिकारी लोकांवर अचुक नेम धरला व सुमारें सव्वीस अधिकारी ठार केले, व सुमारें सातशें शिपाई मारले गेले, त्यामुळें त्यांच्यांत दाणादाण उडाली. मुख्य सेनापति ब्रॅडॉक हाही जखमी झाला व थोड्याच वेळांत मरण पावला. उरलेल्या सैन्यास सांभाळून घेऊन शिस्तीनें मागें हटण्याचें काम यावेळीं जॉर्ज वॉशिंग्टन, जो कर्नलचे हुद्यावर होता, त्याचेवर पडलें. त्यानें मोठ्या धैर्यानें आघाडी रोखून धरली, व मागील सैन्यास पळण्यास अवधि दिला. अशारीतीनें अधिक प्राणहानि न होऊं देतां त्यानें शिस्तीनें पळ काढिला. ब्रिटिश लोकांचें पुष्कळ नुकसान झालें इतकेंच नव्हे तर त्यांचा आत्मविश्वास कमी झाला मुख्य सेनापति मेल्याची ज्यावेळीं सैनिकांस वर्दी लागली त्यावेळीं फारच दाणादाण उडाली. या परत फिरणाऱ्या सैनिकांनीं तोफा, दारूगोळा व सर्व लढाऊ साहित्य जेथल्या तेथेंच टाकून प्रथम फोर्ट कंबरलंड येथें यःपलायन केलें व नंतर त्यांनीं फिलाडेलफिया गांठली.

फ्रेंच व इंडियन लोकांना, सहजासहजीं मिळालेल्या या जयाचें फारच आश्चर्य वाटलें. इंडियन सैन्यानें मेलेल्या ब्रिटिश शिपायांचे कपडेलत्ते अंगावर चढवून फार्ट डयूकेन येथें जाऊन मोठा आनंदोत्सव केला.

इ. स. १७५६ सालीं गव्हरनर शर्ले याला सर्व ब्रिटिश फौजेचें स्वामित्व मिळालें, त्याचे हातांखालीं, व्हर्जीनियानें जॉर्ज वॉशिंग्टन यास आपल्या सैन्यानिशीं, शेनँडोहा नदाचे खोऱ्यांतील फ्रेंच व इंडियन यांचा पराभव करून, त्यांना हांकून देण्यासाठीं, पाठविलें. पेनसिलव्हॅलिया प्रांतानें फ्रँकलिन् याचे हातांखालीं मोठें सैन्य देऊन क्विबेक, फोर्ट फ्रॉंटिनाक, टोरांटो, नायगरा व फोर्ट डयूकेन इतकीं ठाणीं काबीज करण्याचा घाट घातला. हा वेळपावेतों इंगलंडमधून दोन फलटणी न्यूयॉर्क येथें येऊन दाखल झाल्या होत्या.

यानंतर लॉर्ड लाऊडोन यास अमेरिकेतील सर्व सैन्याचा कमांडर इन् चीफ करण्यांत आलें, व सर्वच फ्रेंच वसाहतींवर जोराचे हल्ले करण्याचें काम चालूं होऊन मोठीच लढाई जुंपली. पहिल्या प्रथम फ्रेंचांचें, ऑस्वेगो हें ठाणें काबीज करण्यांत आलें. त्यांत सहा लढाऊ जहाजें, तीनशें बोटी, एकशेंवीस तोफा व फारच मोठी रोख रक्कम इंग्रजांस मिळाली.

याच वर्षी ऑगस्ट महिन्यांत डिलावेर येथील इंडियन लोकांनीं मोठा हल्ला करून पेन्सिलव्हॅनियांतील सुमारें एकहजार रहिवाशांस ठार केलें. कर्नल आर्मस्ट्राग हा तीनशें फौजेनिशीं क्रिटानिंग या नांवाच्या इंडियन गांवावर चाल करून गेला. तें सर्व गांव त्यानें जाळून टाकिलें व सर्व रहिवाशांस ठार मारण्यास सुरुवात केली, कांहीं थोडे लोक मात्र मोठ्या शिकस्तीनें जीव घेऊन पळाले, पण पुन्हां त्यांचेकडून कधीं फार त्रास झाला नाहीं.

इ. स. १७५७ सालीं लॉर्ड लाऊडोन यानें लुइस्बर्गवर हल्ला करण्याचा घाट घातला. त्याचेजवळ सहाहजार सैन्य जय्यत तयार होतें, व लढाऊ सामुग्रीही भरपूर होती. तो हॅलिफॅक्सपर्यंत गेल्यानंतर ॲड-मिरल होबर्न हा आपल्या सोळा जहाजांचे आरमारासह व पांच हजार फौजेसह त्याला मिळाला. इतकें असूनही त्याचे हातून पुढें जाण्याचा

धीर झाला नाहीं. कांहीं दिवस हॅलिफॅक्स येथेंच रेंगाळून तो परत न्यूयॉर्कला आला.

उलटपक्षीं फ्रेंच कमांडर मार्क्विस ऑफ मॉंटकाम हा कॅनेडियन व इंडियन मिळून सुमारें सातहजार सैन्य घेऊन न्यूयॉर्कवर चाल करून आला, व तेथील फोर्ट सेंट हेनरी किल्ला त्यानें आपल्या ताब्यांत घेतला. सुमारें ६ दिवस फ्रेंच लोकांनीं या किल्ल्यास वेढा दिला. आंतील लोकांचा सर्व दारूगोळा संपतांच त्यांनां शरण येणें भाग पडलें. या किल्ल्यांत पिण्याच्या दारूचा मोठा सांठा हातीं लागला. मग काय इंडियन सैन्यानें त्याच्यावर तडाखा मारिला, व जय आणि दारू अशा दुहेरी मदानें उन्मत्त होऊन त्यांनीं ज्या लीला केल्या त्यांना इतिहासांत तोड सांपडणार नाहीं. या धुंदींत त्यांनीं लढाईंत सांपडलेल्या सुमारें तीस कैद्यांस निर्दयपणें ठार केलें.

एकंदरींत या सुमारास फ्रेंच लोकाची चढती होऊं लागली. सबंध सेंट लॉरेन्सचे खोऱ्यांत इंग्लिश वसाहतवाल्यांचें एकहि खेडें उरलें नाहीं. इंग्रजी भाषा बोलणाऱ्या सर्व लोकांस ओहाओ नदीचे पलीकडे हांकून देण्यांत आलें. यावेळीं फ्रान्सचे ताब्यांत ब्रिटिशांपेक्षां बीसपट तरी मुलुख होताच.

ब्रिटिश लोकांचा वारंवार पराभव होण्याचें मुख्य कारण ह्मणजे त्यांच्यांतील अव्यवस्था, नादानपणा, व तुटपुंजी सामुग्री होय असें पार्लमेंटला आढळून आलें होतें. यावेळीं विल्यम पिट हा मुख्य प्रधान झाला होता त्यामुळें लढाऊ खात्यांत बरीच फिरवाफिरव होऊन एक प्रकारचा नवीन जोम उत्पन्न झाल्याचीं चिन्हें स्पष्ट दिसूं लागलीं.

लॉर्ड लाऊडन याचे हातांतील कमांडर इन् चीफची सत्ता काढून ती जनरल ॲबरकोम्बी यांस देण्यांत आली तथापि पूर्वीच्या दुय्यम अधिकाऱ्यांचे हातीं बरीच सत्ता ठेवण्यांत आली होती व त्यांच्याच विचारानें काम चालावें असें ठरविण्यांत आलें.

इ. स. १७५८ सालीं तीन ठिकाणीं निरनिराळ्या स्वाऱ्या करण्याचें ठरलें. पहिली लुईस्बर्ग वसाहतीवर, दुसरी क्रौऊनपॉईंटवर, व तिसरी फोर्ट डयूकेनवर.

६ वें) दारूगोळा कसा लांबविला ?

पहिली लुइस्बर्गवरील स्वारी दहा हजार फौजेनिशीं झाली. पहिल्याच तडाख्यास तीन फ्रेंच जहाजें गोळे फेकून जाळण्यांत आलीं. नंतर सहा दिवसपर्यंत लुईसबर्गवर भडिमार करण्यांत आला. सर्व शहराची राखरांगोळी होऊन लोक शरण आले. मागें हटण्यासही फ्रेंच लोकांस वाव न मिळूं दिल्यामुळें केप ब्रिटन व प्रिन्स एडवर्ड बेट हींही अनायासें ताब्यांत मिळालीं, अशा रीतीनें ब्रिटिश सैन्यास फार मोठा व झटपट असा विजय मिळाला.

दुसरीकडे जनरल ॲबरकोम्बी पंधरा हजार सैन्य घेऊन टिंकोडेरोगा, व क्राऊन पॉइंटवर चालून गेला. लढाई जुंपते न जुंपते तोंच इंग्लिश जनरल लॉर्ड हॉव हा मारला गेला, त्यामुळें ब्रिटिशांना थोडी माघार घ्यावी लागली, पुढें कांहीं काळ लढाई चालली पण त्यांतही ब्रिटिशांचे पुष्कळ शिपाई मेले. इतकें नुकसान आतांपर्यंत कधींच झालें नव्हतें, त्यामुळें धीर खचून त्यांना मागें परतावें लागलें.

त्यानंतर कर्नल ब्रॅडस्ट्रीट याचे हातांखालीं तीन हजार सैन्य देऊन त्याला लेक ऑंटारिओवरील फ्रांटिनाक किल्ल्यावर पाठविण्यांत आलें. अवघ्या दोन दिवसांत तो किल्ला सर करण्यांत आला व ताबडतोब त्याचा विध्वंस करून हें सैन्य परतलें. टिंकोडेरोगा येथील हल्ल्यांत झालेल्या पराभवाचें अशा रीतीनें उट्टे निघाल्यामुळें इंग्लिश सैन्यांत एक प्रकारचें समाधान दिसून येऊं लागलें.

मेजर स्टार्बो नांवाच्या एका अंमलदाराने अवघ्या दहाच लोकांनिशी इंडियन लोकांच्या सैन्याची एक तुकडी व बरींच लढाईची सामुग्री घेतलेले एक फ्रेंच जहाज चाललें होतें, त्यावर हल्ला केला व त्यांतील सर्व लोकांस समुद्रांत फेकून किंवा ठार मारून त्या जहाजांतील दारूगोळा व शिधा-सामुग्री लांबविली. ती हकीगत फार मजेदार आहे.:—प्रथमतः त्यानें आपल्या लहानशा बोटीस एका फ्रेंच बोटीजवळ आणलें व तेथील ऑफिसर लोकांस आपले बोटीवर मोठ्या प्रेमानें बोलाविलें. मग त्या ऑफिसरांशीं गप्पागोष्टी करीत त्यांना खूप दारू पाजली. ते किंचित् बेसावध दिसूं लागतांच त्यांना कैद करून किनाऱ्यावर सोडून दिलें व ती लहान फ्रेंच

बोट आपले ताब्यांत घेतली. त्याला फ्रेंच भाषा फार उत्तम येत असल्या-मुळें या लहान फ्रेंच बोटींत बसून वर सांगितलेल्या सैन्य नेणाऱ्या फ्रेंच बोटीजवळ आपली बोट नेली व ती वरील ऑफिसरांस बोलावून आपण क्विबेक येथें सरकारी कामाकरतांच जात आहों असा बहाणा केला व नंतर त्याचे लोकांनीं खलाशी लोकांवर एकदम बंदुकीचा मारा केला व जहाजही पेटवून दिलें. आगीचा डोंब उठतांच खलाशांनीं उड्या टाकिल्या व कांहींस त्यांनीं गोळ्या घालून ठार मारिलें. अशा तऱ्हेनें अगदीं थोड्या वेळांत तें जहाज ताब्यांत येऊन सर्व शिधासामुग्री उपटली व तें जळकें जहाज खेंचून घेऊन नुकत्याच काबीज केलेल्या लुइसबर्ग या ठिकाणीं येऊन तो दाखल झाला.

फ्रेंच लोकांवरील तिसरी स्वारी एकोणिस हजार सैन्यानिशीं जनरल फोर्बस्‌नें फोर्ट डयूकेनवर केली डयूकेनवरील या दुसऱ्या स्वारींतही कर्नल वॉशिंग्टन आपल्या व्हर्जीनियांताल तुकडीस घेऊन हजर होता. मेजर ग्रँट हा एक मोठी टोळी घेऊन थेट फोर्ट डयूकेनकडे गेला, पण यावेळीं तो शत्रूच्या अगदीं माऱ्यांतच जाऊन अडकला व त्याचे एकतृतीयांश लोक ठार झाले. ब्रॅडॉकच्या सैन्याप्रमाणें याही सैन्याची वाताहत होते कीं काय असा प्रसंग येऊन ठेपला. पण वॉशिंगटन मोठ्या सैन्यासह यत आहे असें जेव्हां कळलें तेव्हां शत्रुसैन्याचें धाबें दणाणलें. त्यानें फोर्ट डयूकेनला आग लाविली व लहान लहान होड्यांमधून ओहाओ नदींतून पळ काढला. अशा रीतांनें तिनांपैकीं दोन ठिकाणीं ब्रिटिश सैन्यास पूर्ण जय मिळाला व फ्रेंचांचा दाणादाण झाली.

दुसऱ्या वर्षी ह्मणजे इ. स १७५५ सालीं ब्रिटिश सैन्याची संख्या सुमारें ५०,००० पर्यंत झाली, व गतसालीं मिळालेल्या विजयामुळें त्याला पुन्हां हुरूप आला. कांहीं झालें तरी फ्रेंच लोकांस पूर्णपणें जिंकिल्याशिवाय थांबावयाचें नाहीं असें सर्व वसाहतींसही वाटूं लागलें, या वर्षी फ्रेंच लोकांवर तीन स्वाऱ्या करण्याचें ठरलें, जनरल प्रिडो यांस नायगरा येथें पाठविण्यांत आलें. मुख्य सेनापति जनरल ॲमहर्स्ट हा गेल्या वर्षी जेथें

पराभव पावला होता तेथें, ह्मणजे फोर्ड टिंकोडेरोगा व क्रांऊन पॉइंट-कडे चाल करून गेला, व जनरल वूल्फ हा सेंट लॉरेन्स नदीमधून क्विबेक-वर चाल करून गेला.

नायगरावरील स्वारींत जनरल प्रिडो हा तोफेचा गोळा लागून मेला, व त्याची जागा सर विल्यम जॉनसन यानें घेतली. त्यानें जोराचा हल्ला चढवून फ्रेंच सैन्याची दाणादाण उडविली व सहाशें लोक कैद करून नायगरा सर केला.

टिंकोंडेरोगा येथील लढाईंत ब्रिटिशांचें सैन्यबलच इतकें मोठें होतें कीं, फ्रेंच लोक लढाईचे भानगडींत न पडतां किल्ल्याला आग लावून क्रॉऊन पॉइंटकडे पळून गेले, पण तेथेंही त्यांचा पाठलाग झाल्यामुळें सॉरेल नदींतून ते अन्तर्मुलखात गले.

तिसऱ्या स्वारीवर जनरल वूल्फ गेला होता, त्याचेजवळ आठ हजार खडें सैन्य व चाळीस जहाजें हे तीं. सेंट लॉरेन्स नदींतून प्रवास करून त्यानें थोडंच दिवसांत क्विबेक नर्जाकचा प्रदेश गांठला, व तेथें सैन्याचा तळ दिला. माऱ्याकरितां योग्य जागा शोधून काढून त्यानें क्विबेक शहराच्या खालच्या व वरच्या भागांवर भडिमार केला. पण क्विबेक किल्ला व गांव अजून त्यास दाद देईना. तो सर करण्यासाठीं कांहीं तरी निराळी योजना करणें अत्यंत जरूर होतें. मग त्यानें सेंट लॉरेन्स नदींतून रात्रीं हल्ला केला पण कांहीं जम बसेना. त्यानें नंतर सेंट लॉरेन्समधून आपलें सैन्य उत्तरेस थोडे अंतरावर नेलें, व तेथें सुरक्षित ठेवून थोड्या लोकांनिशीं योग्य माऱ्याची जागा कोणती याचा अंदाज काढला. त्या जागेस " वूल्फस कोव्ह " असें ह्मणतात. या उंच टेकाडाचे जागीं चढण्यास त्याचे सैन्यास फार त्रास पडला, पण सूर्योदयापूर्वीच त्यानें मारा सुरूं केला. अचानक दुसऱ्याच बाजूनें वूल्फचें सैन्य येऊन पोहोंचतांच फ्रेंच गांगरून गेले. एक तासाचे माऱ्यानेंच फ्रेंच सेनापति मॉंटकाम याची गाळण उडाली व त्याचे सैन्यानें व मदतीस आलेल्या इंडियन सैन्यानेंही फारसा दम धरला नाहीं. जनरल वूल्फ नुकताच तापांतून उठला होता तरी स्वतः लढत होता.

त्याला प्रथम मनगटावर गोळी लागली. नंतर त्याला दुसरी जखम झाली तरीही त्याने तिकडे लक्ष न देतां लढाई चालूंच ठेविली. इतक्यांत एक गोळी त्याच्या छातींतून निघून गेली. पडतां, पडतां 'पळाले-पळाले' असा आवाज त्याच्या कानांवर आला. म्हणून त्यानें विचारलें, 'कोण पळाले ?' यावर फ्रेंच पळाले हें उत्तर ऐकून त्याला फार समाधन वाटलें व तो म्हणाला, "मग हरकत नाहीं, आतां मी सुखानें मरेन."

तिकडे फ्रेंच जनरल मँटकाम्चीही अगदीं तशीच अवस्था झाली होती. त्याला तोफचा गोळा लागून जबर जखम झाली होती. त्यानें आपल्या डॉक्टरला विचारलें ' मी किती वेळ जगेन ? ' फार तर कांहीं तास ! ' असें उत्तर ऐकतांच तो म्हणाला, " फार उत्तम ! क्विबेक किल्ला शत्रूनें काबीज केला ह ऐकण्यास मी जगणार नाहीं. "

सुमारें पांच दिवसांनीं ब्रिटिश लोकांनीं क्विबेकचा पूर्ण ताबा घेतला. पुढील वर्षी क्विबेक किल्ला परत हस्तगत करण्याचा फ्रेंच लोकांनीं प्रयत्न केला पण त्यांस यश आलें नाहीं. नंतर थोड्याच दिवसांनीं, जनरल ॲमहर्स्ट या ब्रिटिश सेनापतीनें, फ्रेंचांचें शेवटचें ठाणें जें मॉंट्रियाल शहर तेंही घेतलें, अशा रीतीनें सबंध कॅनडा इ. स. १७६० सालीं ब्रिटिश अंमलाखालीं आला.

फ्रेंच लोकांचा अमेरिकेंत पराभव होण्याचें मुख्य कारण म्हणजे, फ्रान्सनें आपल्या वसाहतींस करावी तितकी मदत केली नाहीं, घरसोडीचें राजकीय धोरण व तुटपुंजा तयारी अशा नेहमीं अवस्था असल्यामुळें निर्भेळ असा विजय त्यांना कधींच लाभला नाहीं. त्यांच्या ताब्यांत मुलुखही इतका होता कीं कोठेंही कडेकोट बंदोबस्त ठेवणें फारच कठीण जाई. निरनिराळे किल्ले एकमेकांपासून फार दूर असल्यामुळें एका ठिकाणापासून दुसऱ्या ठिकाणीं तात्कालिक मदत पोहोंचणें दुरापास्त होई.

ब्रिटिश वसाहतींचे ताब्यांत मुलुख बराच कमी होता. त्यांच्यांत दळणवळणही बरें होतें व ज्यावेळीं ब्रिटिश पार्लमेंटनें जोर धरला व सपाटून मदत करण्याचें अंमलांत आणलें त्यावेळीं फ्रेंचांचा रॅमिोड होण्यास

मुळींच अवधि लागला नाहीं.

जमिनीवरील लढाई जरी इ. स. १७६० पर्यंत आटोपली होती तरी आरमारी लढाया इंग्लंड व फ्रान्सच्या वसाहतींत चालूंच होत्या. इ. स. १७६३ सालीं पॅरिस येथें तह होऊन मिसिसिपीचे पूर्वेस असलेला सर्व मुलुख ब्रिटिशांना मिळाला. म्हणजे एका सबंध साम्राज्याइतका मुलुख फ्रान्सनें गमावला. त्याचवेळीं स्पेनशीं लढाई चालूं होती, तींत स्पेनचा पराभव होऊन स्पेनला आपला सबंध फ्लॉरिडा प्रांत ब्रिटिशांचे ताब्यांत द्यावा लागला. स्पेनचे ताब्यांत मिसिसिपीचे पाश्चिमेस असलेला मुलुख मात्र राहिला.

इ. स. १७६० पर्यंत फ्रेंच लोकांशीं झालेल्या लढाईंतून ब्रिटिश सेना मुक्त होतें तोंच पूर्व टेनेसीमधील चीओकी नांवाच्या इंडियन लोकांनीं फोर्ट लंडनवर अचानक छापा घातला व तेथील सर्व सैनिकांस निःशस्त्र केलें. पण येवढ्यावरच त्यांची जयतृष्णा शमन न होऊन त्यांनीं पकडलेल्या सर्व ब्रिटिश लोकांची कत्तल केली. या गोष्टीनें ब्रिटिश वसाहती चिडून गेल्या व या इंडियन टोळींचें पारिपत्य करण्याकरितां त्यांनीं जनरल ग्रँट व मॉंटगॉमरी यांस पाठविलें. त्यांनीं इंडियन लोकांचा योग्य बन्दोबस्त करून त्यांस त्या प्रांतांतून हांकून लावलें.

फ्रेंच लोकांकडून मिळालेल्या मुलखांत नीट बंदोबस्त ठेवण्यासाठीं व तो पूर्णपणें अंमलांत आणण्यासाठीं ब्रिटिश सैनिकांच्या लहान लहान टोळ्या निरनिराळ्या ठिकाणीं पाठवाव्या लागत. त्यांचेकडून इंडियन लोकांस वारंवार त्रास होई, त्यामुळें सर्वच इंडियन लोक चिडून गेलेले होते. त्यांतून नुक्तेच पराभूत झालेले फ्रेंच लोकही त्यांना अधिक चिथावून देत, त्यामुळें सर्वच इंडियन लोकांनीं एकंदर निरनिराळ्या ब्रिटिश वसाहतींवर चोरटे हल्ले करण्याचा उपक्रम केला.

इ० स० १७६१ च्या उन्हाळ्यामध्यें सीनिका व बायांडोट येथील इंडियन टोळ्यांनीं एकत्र जमून डिट्राइटवर जोराचा हल्ला केला, परंतु तेथील ब्रिटिश अधिकारी कर्नल कॅंबेल यानें त्यांचा पराभव करून त्यांना हांकलून

दिलें. असा प्रकार वरचेवर होत असल्यानें तेथें फारशी शांतता नांदणें दुरापास्त होतें.

ओटावा येथील इंडियन लोकांचा नायक पाँटिआक यानें ऑलिघेनी व मिसिसिपी यांमधील सर्व इंडियन लोकांना एकत्र करून त्या प्रांतांतील सर्वच ब्रिटिश किल्ल्यांवर हल्ला करण्याची जंगी तयारी केली. इ. स. ७ मे १७६३ रोजीं एक मोठा हल्ला करावयाचा असें त्यानें ठरविलें होतें, पण अगदीं आयत्या वेळीं कांहीं टोळ्यांचे नायकांनीं दगा दिल्यामुळें सर्वच बेत फिसकटला.

खुद्द पाँटिआक, इंडियंन टोळीचा मुख्य नायक हा डिट्राइटवर हल्ला करणार होता. डिट्रॉइट येथील सर्वच शिपायांची कत्तल करण्याची त्यानें कडेकोट तयारी केली होती, पण तेथेंही त्याला अपयशच आलें. अगदीं हल्ला करण्याचे थोडावेळ पूर्वी 'आजिबवे' नांवाच्या इंडियन टोळींतील एक मुलगी कांहीं कातडीं नजर करण्याचे निमित्तानें ब्रिटिश ऑफिसर मेजर ग्लॅडविन् यांजकडे आली. कातडीं नजर करण्याचे निमित्तानें मेजर ग्लॅडविन यांची एकांतांत गांठ पडतांच तिनें इंडियन हल्ल्याचा सर्व बेत ग्लॅडविन यांस कथन केला. मेजर ग्लॅडविननें यत्किंचितही वेळ फुकट न दवडतां सर्व किल्ल्यास जय्यत तयारी करण्यास इषारा दिला. त्यावेळीं सर्व सैनिकच नव्हे तर डिट्राइट येथील नागरिकही लढ्यांत सामील झाले. अचानक छाप्याचा बेत फसल्यामुळें इंडियन लोकांची दाणादाण झाली, एकंदरींत फोर्ट पिट् व डिट्राइट हे दोन किल्ले मात्र इंडियन लोकांनीं काबीज केले, व प्रत्येक ठिकाणीं असलेल्या ब्रिटिश फौजेची त्यानीं कत्तल करून टाकिली.

क्विबेकच्या वेढ्यानंतर इंग्लंड व फ्रान्स या देशांमधील जमिनी वरील युद्ध बहुतेक आटोपून त्या बाबतींत जरी इंग्लंड पूर्ण यशस्वी झालें होतें तरी समुद्रावरील लढाईची कटकट अद्यापि मिटली नव्हती. इ. स. १७६३ पर्यंत या दोन देशांत बारीक सारीक आरमारी कटकटी चाल-ल्याच होत्या. त्या सालीं पॅरिस येथें या दोन राष्ट्रांमध्यें तह झाला. त्या



इंडियन कुमारिकेनें केलेला स्वकुलाचा घात. पान १८.

तहाअन्वयें फ्रेंच लोकांची सत्ता मिसिसिपी नदीच्या पूर्व भागांतून व दक्षिणेकडे थेट मेक्सिकोपर्यंतचे भागांतून पूर्णपणें नष्ट झाली. त्याच सुमारास स्पॅनिश लोकांबरोबरही ज्या लढाया चालूं होत्या, त्यांत स्पॅनिश राष्ट्राचा पराभव होऊन त्यानें फ्लॉरिडाचा पूर्व व पश्चिम भाग ब्रिटिश लोकांस तह्यान्वयें देऊन टाकिला. त्याच तहांत ब्रिटिश लोकांनीं, फ्लॉरिडाचे मुलखाबद्दल स्पॅनिश लोकांस मिसिसिपी नदीचे पश्चिमेकडीस सर्व मुलुख फ्रेंच लोकांकडून देवविला. अशारीतीनें स्पेनला अधिक मुलुख मिळून कांहीं कालपर्यंत स्पेनची सत्ता मिसिसिपीचे पश्चिमेकडील मागांत स्थिर झाली. बिचाऱ्या फ्रेंच लोकांस मात्र एका मोठ्या साम्राज्याइतका मोठा मुलुख ममावून स्वस्थ बसावें लागलें.

वरील लढायांस अमेरिकन इतिहासांत ' फ्रेंच व इंडियन लढाया ' असें ह्मणतात. त्यांचे योगानें इंग्रजी भाषा बोलणाऱ्या लोकांचेंच साम्राज्य मिसिसिपीचे पूर्व भागांत सुरूं झालें व ब्रिटिश लोकांच्या स्वातंत्र्याच्या कल्पना, कायदेकानू व इतर संस्था तेथें प्रस्थापित होऊं लागल्या व त्याच कल्पनांचे योगानें या नवीन बनत असलेल्या राष्ट्रांचें पूर्ण स्वतंत्र राष्ट्र कसें निर्माण झालें याचा मनोरम इतिहास पुढील भागीं येईलच.

वसाहतींसंबंधीं कायदे व इंग्लंडचे वसाहतींसंबंधीं धोरण:—

एकाद्या राष्ट्राच्या साधन संपत्तीची वाढ होणें हें तेथील सरकारी धोरणावर कसें अवलंबून असतें हें अमेरिकेच्या इतिहासावरून उत्तम दिसून येतें. उद्योगधंदे व व्यापार या बाबतींत होणारे कायदे अमेरिकेंत ब्रिटिश सरकार व वसाहतवाले या दोहोंचे तर्फे होत. ब्रिटिश सरकार जे कायदे करी ते साम्राज्याचे म्हणजे इंग्लंडचे फायद्याकरितां करी, व वसाहतवाले कायदे करितांना आपल्या वसाहतींच्या फायद्यापुरतीच दृष्टि ठेवीत. त्यामुळें ब्रिटिश सरकार व वसाहतीसरकार यांमध्यें पुष्कळ वेळ विरोध उत्पन्न होई. ब्रिटिश कायद्यांचा हेतु, इंग्लंडला लागणाऱ्या कच्च्या मालाची पैदास वसाहतींत व्हावी; वसाहतींत जर कांहीं एकाद्या नव्या धंद्यास सुरुवात झाली, तर त्याचा उपसर्ग इंग्लंडला पोहचूं नये, व

वसाहतींत व्यापार करण्याचा हक्क युरोपांतील इतर राष्ट्रें इतकेंच नव्हे तर साम्राज्यांतील इतर वसाहती यांनाही न मिळतां, फक्त इंग्लंडांतील व्यापाऱ्यांसच मिळावा व तो व्यापारही ब्रिटिश जहाजांतूनच व्हावा, असा होता. उलट पक्षीं वसाहतवाले जे कायदे करूं इच्छीत त्यांचा हेतु, वसाहतींत उद्योगधंद्याची वाढ होऊन वसाहतींस लागणाऱ्या नित्योपयोगी जिनसा तेथल्या तेथेंच तयार व्हाव्या व त्या पाहिजे तितक्या स्वस्त व सुलभपणें मिळाव्या असा असे, त्यामुळें वरचेवर अनवस्था प्रसंग येई.

वसाहतींतिल लोकांनीं केलेल्या कायद्यांमध्यें, उद्योगधंद्यासाठीं पुष्कळ सवलती दिल्या जात असत व त्याप्रमाणेंच जेथें वसाहतीचे हितसंबंधास धोका पोहोचण्याचा संभव असे, तेथें बरेच व्यापारी निर्बंधही उत्पन्न करण्यांत येत. उद्योगधंद्याचे वाढीस वसाहतींचे कायद्यानेंच उत्तेजन मिळे इतकेंच नव्हे पण पुष्कळ वेळीं खासगी संस्था व कित्येक वेळीं खासगी व्यक्तीही मोठें प्रोत्साहन देत. वसाहतीसंबंधीं जे कायदेकानू करण्यांत येत त्यांचे खालील प्रमाणें वर्गीकरण करितां येईल.

(१) विविक्षित जरूरीच्या कच्च्या मालाचें संरक्षण करण्याकरितां केलेले कायदे. उदाहरणार्थ जनावरें मारल्यानंतर, कातडीं कमावण्याचें साधन जवळपास नसल्यामुळें पुष्कळ वसाहतवाले कातडीं फेकून देत असत. अशा रीतीनें पुष्कळ चामडें फुकट जाई तें जाऊं नये ह्मणून त्यासंबंधीं इ. स. १६४० सालीं कायदा करण्यांत आला त्या कायद्याचें अन्वयें कोणीही कातडें फेंकून दिल्यास त्याला सुमारें बारा पौंड दंड ठोठावण्यांत येई. प्रत्येकानें कातडीं संभाळून ठेवून लॉ कातडीं कमाववायाचे कारखान्यांत नेऊन पोंचविलीं पाहिजेत असा निर्बंध होता.

(२) नित्योपयोगी वस्तू तयार करणाऱ्या लोकांस उत्तेजन देण्याकरितां केलेले कायदे–या कायद्यान्वयें, रोख बक्षिसें, तैनाती मालाचे पैदासीवर अमुक एक रक्कम, माल तयार करितांना नुकसान आल्यास भरपाई, व्याजानें अगर बिन व्याजानें कर्जाऊ रक्कम, कारखान्यांकरितां मोफत जागा, व भांडवल उभारण्याकरितां सोडती काढण्याच्या सवलती, वगैरे

दिल्या जात. बऱ्याच वसाहतींनीं ताग, अंबाडी, लोंकर व रेशीम यांची पैदास केल्यास त्याकामीं येणारी तूट भरून देण्याची हमी घेतली होती. मेरीलँड संस्थानांत, कोणी घरगुती उत्तम तागाचें कापड बनविल्यास त्याला चांगलें बक्षिस देण्यांत येई. विन्थ्रॉप नांवाच्या गृहस्थास याच संस्थानानें लोखंड तयार करण्याचा कारखाना काढल्यास तीन हजार एकर जमीन बहाल करण्याचें कबूल केलें होतें. त्याचप्रमाणें जो कोणी लोहारी भट्टी चालवील त्याला शंभर एकर जमीनही देण्याचें ठरविलें होतें. न्होड बेटावरील वसाहतीनें उत्तम शिडास लागणारा कपडा तयार करणाऱ्यास तीन हजार पौंड कर्जाऊ देण्याचें कबूल केलें होतें.

(३) विशिष्ट वस्तू बाहेर न जाऊं देण्यासाठीं केलेले कायदे— कित्येक वेळीं, लोखंड, लोंकर, ताग व चामडीं वगैरे जिन्नस बाहेर प्रांतीं न जाऊं देतां त्यांचा वसाहतींतले वसाहतींत उपयोग व्हावा म्हणून कायदे करण्यांत येत.

(४) निर्गत व आयात होणाऱ्या मालावर जकात घेण्यासंबंधीं कायदे वेळोवेळीं वसाहतींतर्फे करण्यांत येत.

(५) वसाहतींत जहाजें बांधणारांस किंवा वसाहतींतील जहाजांचे मालकांस विशेष सवलती देण्यासंबंधीं कायदे.

(६) निरनिराळ्या प्रांतांमध्यें दळणाच्या गिरण्या, लांकूड कापण्याचे कारखाने व तत्सदृश दुसरे अनेक कारखाने काढणाऱ्या लोकांस ज्या ज्या प्रांतापुरते मक्ते देण्यासंबंधीं केलेले कायदे.

वसाहतींनीं केलेल्या वरील कायद्यांनीं एकंदर व्यापारावर व त्यांचे स्वतःचे सांपत्तिक स्थितीवर थोडा फार परिणाम होई पण सर्व वसाहतींत कायदे सारखे नसल्यामुळें व मुख्य व्यापारी धोरण ठरविण्याचें काम ब्रिटिश पार्लमेंटकडे असल्यामुळें त्यांचा व्हावा तितका उपयोग होईना. वसाहतींची वाढ जसजशी अधिक होऊं लागली तसतशी ब्रिटिश कायद्यांची मगरमिठी वसाहतवाल्यांस अधिक जाणवूं लागली.

इंग्लंडचें वसाहतीसंबंधींचें जें धोरण तें 'मर्कंटाइल थियरी' या नांवानें प्रसिद्ध आहे. व्यापारोत्तेजक धोरण (अर्थात् इंग्लंडचा व्यापार वाढविण्याचें धोरण) असा त्याचा साधारण अर्थ आहे. त्यावेळीं युरोपांतलि इतर देशांचेंही आपल्या वसाहतीसंबंधानें असलेंच धोरण होतें. सांपत्तिक महत्त्वाकांक्षा व मुख्यत्वेंकरून इंग्लंडची राजकीय मजबुती वाढवून तें संबंध युरोपांत अत्यंत प्रबळ राष्ट्र व्हावें हा हेतु याच्या बुडाशीं होता. हें धोरण साधण्यासाठीं जे जे उपाय अमलांत आणण्यांत आले त्यामुळें वसाहतीमधील उद्योगधंद्यांचें सर्वच नियंत्रण व्यापारी धोरणास अनुसरून होऊं लागलें, व्यापारी धोरणाचीं मुख्य सूत्रें खालीलप्रमाणें होतीं.

(१) इंग्लंडांतील व्यापाऱ्यांस मुबलक भांडवलाचा पुरवठा.

(२) इंग्लंडांतील उद्योगधंदे चालावेत ह्मणून सुदृढ व कर्तबगार मजूर निपजावेत ह्मणून केलेली योजना.

(३) कृषिविषयक धंदे व नित्योपयोगी वस्तू व व्यापारोपयोगी वस्तू तयार करणारे कारखाने चालविण्याची व त्यायोगें इंग्लंड कोणत्याही परराष्ट्रावर अवलंबून राहूं नये ह्मणून केलेली योजना.

(४) मुख्यतः व्यापारोपयोगी व प्रसंग पडल्यास लढाई करण्यास योग्य अशा प्रचंड आरमाराची तरतूद.

ब्रिटिश दर्यावर्दी व्यापारास फार उत्तेजन देण्यांत आल्यामुळें उत्तम खलाशी निपजूं लागले, व समुद्रावर बरेच लोकांचा निर्वाह चांगल्या तऱ्हेनें होऊं लागला, त्यामुळें बेकारी कमी होऊं लागली होती. प्रसंगोपात् युद्ध उद्भवल्यास इंग्लंडांतील शेतीस व तद्विषयक इतर धंद्यासही उत्तेजन देण्यांत येई. कारखान्यांची वाढ होऊं लागल्यामुळें बेकारी कमी होऊं लागली. या संपत्तीचा उपयोग फौजा व आरमार याकडे करून व्यापारास अधिक बळकटी आणण्यास सुरुवात झाली. वसाहती निव्वळ इंग्लंडास लागणारा कच्चा माल पुरविण्याकरितां व इंग्लंडांत तयार होणारा पक्का माल विकत घेण्याकरितां आहेत असा ब्रिटिश लोकांत विश्वास उत्पन्न होऊं लागला. युरोपांतील मुख्य मुख्य राष्ट्रें स्वतःचे उपयोगास लागणारा माल तयार करूं लागल्यामुळें इंग्लंडांत तयार झालेला माल वसाहतीचे

६ वें) वसाहतींचे बोकांडीं जाचक कायदे

माथीं मारल्याशिवाय तरणोपाय नाहीं असें ब्रिटिश मुत्सद्यांस आढळून आलें व त्या दृष्टीनें वसाहतींचा एकंदर राज्यकारभार आंखण्याचें धोरण स्पष्टपणें अमलांत येऊं लागलें, व त्या धोरणास अनुसरून जाचक असे कायदे वसाहतींवर लादण्यांत येऊं लागले.

वसाहतींसंबंधीं इंग्लंडांत झालेल्या कायद्यांचा वसाहतींचे सांपत्तिक स्थितीवर अनिष्ट परिणाम होऊं लागला. विशिष्ट कच्चा माल तयार करण्याकरितां वसाहतवाल्यांस उत्तेजन देण्यांत येई व क्वचित् धाक दपटशाही देण्यांत येई. उलट ज्या तयार मालाची इंग्लंडचे तयार मालाशीं स्पर्धा होण्याचा संभव दिसूं लागे त्या मालावर जबर नियंत्रण बसविण्यांत येई. इंग्लंडमध्यें पिकलेल्या गव्हाशीं स्पर्धा होऊं नये म्हणून वसाहतींतून जाणाऱ्या गव्हावर जकात ठेवण्यांत आली. त्याचप्रमाणें मासळीच्याही व्यापारावर नियंत्रण ठेवण्यांत आलें. अमेरिकेंतील खारविलेल्या मांसाचे विक्रीस बंदी झाली, अशा अनेक कारणांमुळें वसाहतींचा युरोपांतील इतर देशांशी व्यापार वाढूं लागला पण त्या व्यापारावरही नियंत्रण करण्यांत येऊं लागलें. वसाहतींतून बाहेर जाणाऱ्या मालाकरितां लागणाऱ्या जहांजांच्या वाहतुकीसंबंधीं कायदे करण्यांत आले, तरी पण डच लोकांच्या जहाजांतून जाणाऱ्या मालाची वाहतूक अधिक होऊं लागली, त्यामुळें नॅव्हिनेशन ॲक्ट नांवाचा कायदा इ. स. १६४५ सालीं करण्यांत आला. त्याच कायद्यास पुन्हां इ. स. १६५१, १६६३, १६७२, व १६९६ सालीं अधिक जुलमी कायद्यांची पुस्ती जोडण्यांत आली.

वसाहतींतीलउद्योगधंद्यांचे नियंत्रणासंबंधीं जे कायदे करण्यांत येत ते ' बोर्ड ऑफ ट्रेड व प्लँटेशन्स ' नांवाच्या प्रीव्ही कौंऊनसिलचे कमिटीकडून सुचविण्यांत येत असत. अमेरिकेंतील ब्रिटिश लोकांचे हितसंबंध पाहण्याचें खास काम याच कमेटीकडे होतें. या कमिटीचे अध्यक्षांना वसाहतींतील लागवडीकडे लक्ष पुरविणें, शेती, व्यापार व उद्योगधंदे यांचें निरीक्षण करणें, वसाहतींसंबंधीं तक्रारी अर्ज स्वीकारणें व इंग्लंडचे हितसंबंधाकडे लक्ष देऊन त्यांचा निकाल देणें वगैरे गोष्टींबाबत सर्व अधिकार

असत. निरनिराळ्यावेळीं वसाहतींचे गव्हर्नरांकडून आलेले रिपोर्ट पाहिले ह्मणजे वसाहतींची औद्योगिक वाढ कशी खुंटत चालली होती तें स्पष्टपणें दृष्टोत्पत्तीस येतें. वसाहतींतील उद्योगधंद्यासंबंधीं कमिशनरचें पहिलें कर्तव्य ह्मणजे त्यांपासून इंग्लंडला जास्तींत जास्त किती वसूल मिळेल याची चौकशी करणें, हें होतें.

अगदीं पहिल्यापासूनसुद्धां वसाहतींतील लोकांस इंग्लंडांतून आलेला माल रोख पैसा देऊन खरेदी करणें जड जाई, त्यामुळें वसाहतींतच बनलेला माल कांहीं मोबदला देऊन खरेदी करणें त्यांना अधिक सोईचें होई. शिवाय इंग्लंडांतून आलेल्या नित्योपयोगी व चैनीच्या वस्तूंस किंमतही फार पडे. म्हणून प्रथम मॅसॅचुसेट संस्थानानें वसाहतींतच कांहीं उद्योगधंदे सुरू व्हावे म्हणून प्रयत्न केला. इ. स. १६४० सालीं सर्व ग्रामाधिकाऱ्यांस संस्थाननें, ताग पेरणें, तो कमावणें त्याच्यापासून सूत काढण्याकरितां चरखे बनविणें, तसेंच सर्व शाळांतील मुलांस तागाचें, लोकरीचें व कापसाचें सूत बनविण्यास शिकविण्याविषयीं हुकूम केला इतकेंच नव्हे, तर इ. स. १६५६ सालीं प्रत्येक ग्रामाधिकाऱ्यास असें फर्माविण्यांत आलें कीं प्रत्येक कुटुंबांतून एक किंवा दोन माणसांनीं दर आठवड्यास तीन पौंड प्रमाणें सूत एका वर्षांतून ३० आठवड्यापर्यंत नियमानें काढलेंच पाहिजे व जर काढलें नाहीं तर कमी पडणाऱ्या प्रत्येक पौंड सुतामागें एक शिलिंग याप्रमाणें दंड भरला पाहिजे !

त्यावेळीं कापड बनविण्याकरितां लागणारा कच्चा माल पुरेसा होत नसे. इ. स. १६२९ सालीं युरोपांतून तागाचें बीं आणून त्याची लागवड करण्यांत आली. कापसापासून सूत करण्याचें तेथील लोकांस लवकर जमेना, ह्मणून कापूस तागाशीं मिसळून सूत करण्यांत येई. इंग्लंडांतून कच्ची लोकर किंवा मेंढ्या आणविण्याची ट्रेड कमिशनरनें बंदी केली होती, फक्त लोंकरीचें तयार कापडच तेथून येई. त्यामुळें लोंकर स्पेन देशांतून आणविणें प्राप्त होतें व ती अर्थातच फार महाग पडे व तिच्यावरही केव्हां बंदी होईल त्याचा नियम नव्हता. ह्मणून मॅसॅचुसेट संस्थानानें, वसाहतींतच ज्या कांहीं थोड्या मेंढ्या होत्या त्यांचें पूर्ण संरक्षण व त्यांची वाढ करण्याचें फर्मान

काढलें, तसेंच इंग्लंडांतून येणाऱ्या प्रत्येक वसाहतवाल्यास येतांना जमेल तितक्या अधिक मेंढ्या बरोबर आणण्याबद्दल वसाहतवाल्यांकडून आग्रहाचीं पत्रें जात.

लवकरच पुरेशा कच्च्या मालाची व्यवस्था होतांच, प्रत्येक घर एकेक विणकामाचा कारखानाच बनला व तेथें बायका लोकरीचें सूत काढून आपणास लागतील तसले कपडे विणूं लागल्या. लवकरच चोळ्या, जाकिटें, पायमोजे, गंजिफ्राक, विजारी व सर्व तऱ्हेचा साधारण प्रतीचा कपडा बनूं लागला. याचा कित्ता लवकर डच व स्वीडिश वसाहतींनीं गिरविण्यास सुरुवात केली. पेन्सिल्व्हॅनिया वसाहतीनें उत्तम कपडा तयार करणारांस फार मोठीं बक्षिसें देऊं केलीं होतीं, त्यामुळें फिलाडेलफिया येथें उत्तम विणकर निपजले व तेथील लोंकरी मालाची ख्याती होऊं लागली.

जोंपर्यंत प्रत्येक कुटुंबांत लागणारा किरकोळ कपडा घरचेघरीं बनविण्यांत येई तोंपर्यंत तिकडे कोणाचें विशेष लक्ष्य गेलें नाहीं पण जसजसा उत्तम कपडा बाजारांतही येऊन विकूं लागला तसतशी इंग्रज कापडाचे व्यापाऱ्यांस पोटदुखी होऊं लागली. त्यावेळचे न्यूयॉर्कचे गव्हर्नर लॉर्ड कॉर्नबरी नांवाचे गृहस्थ होते. त्यांनीं बोर्ड ऑफ ट्रेडला केलेल्या रिपोर्टांत खालील मजकूर आहे.

" लाँग आयलंड व कॉनेक्टिकट येथें लोकरीचा कपडा तयार होऊं लागला आहे अशी मला खात्रीलायख बातमी मिळाली आहे. लाँग आयलंड येथें तयार झालेला सर्जचा कपडा मी स्वतः पाहिला आहे. तो कोणालाही वापरतां येईल इतका सुंदर आहे. आतां जर ते सर्जसारखा कपडा विणूं लागले तर थोडे दिवसांतच साधारण सर्व जातींचा व पुढें लवकर उत्कृष्ट तलम कापडा विणूं लागतील. तसेंच येथें उत्तम फुलर्स अर्थ व पाइप क्ले. सांपडते, त्यापासून काय परिणाम होणार आहे हें जाणण्याचें माझ्यापेक्षां अधिक लायख गृहस्थांचे मतावर मी सोंपवितों. या बाबतींत माझें मत मी प्रदर्शित करीत आहे त्याची मला क्षमा असावी. माझे मतें वसाहती ह्या मुख्य झाडाचे फांद्यांप्रमाणें आहेत व त्यांनीं मुख्य झाड जें इंग्लंड त्यावर अवलंबून व त्यास नमून असावें. इंग्लंडांत इंग्रज लोक ज्याप्रमाणें कारखाने

काढतात त्याप्रमाणें या लोकांना येथेंही काढूं दिल्यास व त्याकडे दुर्लक्ष केल्यास, मग फार दिवस असें होणें शक्य नाहीं (ह्मणजे वसाहती मुख्य झाडाचे फांद्यांप्रमाणें राहणें शक्य नाहीं.) जर या लोकांना असें दिसून आलें कीं आपल्या देशांत तयार झालेल्या कपड्यानें, इंग्लंडहून आलेल्या कपड्याइतक्याच सुखावह व सुंदर तऱ्हेनें शरीर भूषवितां येतें, व त्याबाबत इंग्लंडवर अवलंबून राहण्याची जरूरी नाहीं, तर त्याचा परिणाम असा होईल कीं, अगोदरच इंग्लंडचे लोकांवर ज्यांची विशेष प्रीति नाहीं त्यांना आपल्या अंतःकरणांतील उत्कट इच्छा व बेत तडीस नेण्यास फारसा अवधि लागणार नाहीं. वसाहतींत कशा तऱ्हेचे लोक आहेत याचा आपण विचार केल्यास मी ह्मणतों त्यासंबंधीं आपणास आश्चर्य वाटणार नाहीं ''

वरील रिपोर्टाचा लवकरच परिणाम दिसून आला. पार्लमेंटांतील लॉर्ड कमिशनरनें ' वूलन ॲक्ट ' ह्मणजे लोंकरीसंबंधीं कायदा इ. स. १६९९ सालीं पास केला. त्या कायद्यानें, कॉलनींतून बाहेर देशीं, किंवा एका वसाहतींतून दुसऱ्या वसाहतींत, किंवा एका गांवाहून दुसऱ्या गांवीं सुद्धां, विक्रीकरितां लोकरीचा कपडा पाठविण्यास बंदी केली. शिवाय दुसऱ्या वर्षी इंग्लंडांतून जाणाऱ्या लोंकरीचे कपड्यावर वसाहतींत जकात घेतली जाऊं नये असा बंदोबस्त केला. या कायद्यानें पुढें शंभर वर्षें जवळ जवळ लोंकरीचे का-डाचे धंद्याची पूर्ण गळचेपी केली. वसाहतींत इंग्लंडांतून येणाऱ्या सर्व मालापैकीं अर्धा अधिक लोकरीचा कपडाच असे. ही गोष्ट ध्यानांत घेतल्यास या कायद्याचें स्वरूप किती भयंकर होतें हें दिसून येईल.

चामड्याचे धंद्याचे बाबतींतही तशीच गोष्ट होती. स्वयंशासित अशा कोणत्याही समाजाला, विशेषतः थंड देशांत, चामड्याची जरूर किती आहे हें सहज समजण्यासारखें आहे. वसाहतींत अगदीं प्रथमपासून सुद्धां शिकार केलेल्या हरणांचीं व मेंढ्यांचीं कातडीं कमावून त्यापासून जोडे, बूट व पायांस बांधण्याचे पट्टे वगैरे जिनसा तयार करीत असत. न्यू इंग्लंडमध्यें पहिला चामडीं कमविण्याचा कारखाना इ. स. १६२९ सालीं निघाला. मॅसचुसेटमधून एका चांभारास आणवून त्याला पन्नास एकर जमीन व

दहापौंड वेतन देऊन लिन् येथें ठेवण्यांत आलें होतें. या ' लिन् ' येथील कारखान्यांत उत्तम जोडे व बूट निघूं लागले व सर्व वसाहतींत त्यांची प्रसिद्धी होऊं लागली.

चामड्यांचा भरपूर पुरवठा व्हावा म्हणून मॅसचुसेट संस्थाननें खास कायदे करून चामडीं फुकट कुजून जाऊं नयेत, सर्व कमवून उपयोगांत आणण्यांत यावींत असा बंदोबस्त केला होता. अशारीतीनें बूट-जोडेच नव्हे तर चामड्यांचे व्यापारास कांहीं वर्षें उत्तेजन मिळालें पण पुढें झालेल्या ब्रिटिश कायद्यानुसार सर्व बाहेर देशीं पाठविण्यांत येणारीं चामडीं, फक्त ब्रिटिश जहाजांतूनच, व इंग्लंडलाच पाठविलीं पाहिजेत असा निर्बंध झाला.

विशेषतः बीव्हर नांवाच्या जनावराचें मऊ लुसलुशीत चामडें टोप्या करण्याचे कामीं वापरीत. त्याच्या सुंदर टोप्या बनत व सर्व वसाहतींतून त्याच वापरल्या जात. इंग्लिश टोप्या कॉलनींत खपेनात, त्यामुळें लंडन येथील फेल्टच्या टोप्याचे कारखानदारांनीं पार्लमेंटचें या कामीं लक्ष्य वेधलें. न्यू इंग्लंड व न्यूयॉर्क येथून दरसाल दहाहजार टोप्या परदेशी सुद्धां जाऊं लागल्या व शिवाय खुद्द बॉस्टनमध्यें टोप्यांचे सोळा कारखानदार झाले आहेत अशी त्यांनीं ओरड केली. या टोप्या इंग्लंडास फारकरून जातच नसत पण वेस्ट इंडीज, आयर्लंड, स्पेन, व पोर्तुगाल येथें पाठविण्यांत येत असत. वरील देशांत ब्रिटिश टोप्यांचे व्यापारांत वसाहतवाले चढाओढ करितील व आपला व्यापार बुडेल या भयानें इ. स. १७३१ सालीं कायदा करण्यांत आला. त्यामुळें, तयार किंवा कच्ची रंगविलेली किंवा न रंगविलेली फेल्टस् किंवा टोप्या, जहाजावर अगर घोड्यावर किंवा गाडीवर पराठिकाणीं पाठविण्याचे निमित्तानें लादणें, गुन्हा ठरविण्यांत आला, तसेंच असला गुन्हा करणारास पांचशें पौंड दंड प्रत्येक गुन्ह्यामागें ठरविण्यांत आला. तसेंच सात वर्षें उमेदवारी केल्याशिवाय कोठल्याही वसाहतवाल्यास टोप्या करण्याचे धंद्यांत नोकर ठेवण्याची बंदी केली, व नीग्रो लोकांस या धंद्यांत मुळींच कामास ठेवूं नये अशी सक्त ऑर्डर काढण्यांत आली. या कायदेबाजीनें टोप्या करण्याच्या धंद्यास वसाहतींत मूठमाती मिळाली.

दक्षिणेकडे ज्या वसाहती होत्या तेथें मुख्यत्वेंकरून शेतीचेच धंदे चालल्यामुळें व लोकसंख्येंत नीग्रो लोकांचीच भरती असल्यामुळें तेथें फारशी नित्योपयोगी जिनसांची पैदास होतच नसे. तेथील वसाहत सरकारनें, कच्चा माल पैदास करण्यासाठीं व त्यापासून टोप्या, लोकरीचें कापड, पायमोजे वगैरे करण्यासाठीं पुष्कळ उत्तेजन देऊन पाहिलें, पण तेथें अगदीं कमी दर्जाच्या कापडाशिवाय कांहीं उत्पन्नच होऊं शकलें नाहीं. तेथील लोकांच्या चैनी राहणीबद्दल व निष्काळजीपणाबद्दल बेव्हरले नांवाच्या गृहस्थानें खालील उद्गार काढले आहेत. " हे लोक आपला सर्व तागाचा, कापसाचा व लोंकरीचा कपडा, तसेंच रेशमी कपडा, टोप्या, व चामड्याचे सर्व जिन्नस इंग्लंडमधून आणवितात. वास्तविक येथल्याइतका उत्तम ताग व अंबाडी जगावर कोठेंही पिकत नसेल. त्यांच्या मेंढ्यांवर शुभ्र विपुल व सुंदर लोंकर निघते, पण ती हे लोक केवळ मेंढ्यांस बरें वाटावें म्हणूनच काढून टाकतात; रेशमी किड्यांस जरूर असलेलीं तुतीचीं झाडें तर येथें रानोमाळ जंगली झाडांप्रमाणें वाढतात व त्यावर रेशमी किडेही उत्तम पोसले जातात, असें अनुभवास आलें आहे. त्यांच्या टोप्यांचीं कातडीं तर खुद्द येथूनच रवाना झालेलीं आहेत. कातडीं तर येथें इतकीं विपुल आहेत कीं तीं बहुतेक सडूनच जातात. क्वचित् त्यांचा उपयोग करण्यांत येत असेल तर, पावसानें घरें गळूं लागलीं म्हणजे जिनसांवर आच्छादन घालण्याचे कामीं, नाहीं म्हणावयाला मोठा गाजावाजा करून थोडीशी चामडीं येथें कमवितात पण त्यांचें केवळ नोकर लोकांचे जोड्यांचे पलीकडे कांहीं बनत असेल तर शपथ ! जोंपर्यंत विलायती जोडे विकत मिळताहेत तोंपर्यंत ह्या देशी जोड्यांकडे कोणी ढुंकूनही पाहात नाहीं. कदाचित् कोणी हरणाचे कातड्यापासून कांहीं वस्त्रप्रावरण बनविलें तर महत्भाग्य ! खरोखर हे लोक इतके नादान आहेत कीं, जरी यांच्या देशांत उत्तम लांकडांचे ढीगच्या ढीग सडून जात आहेत तरी लांकडांच्या बनविलेल्या चिजा सुद्धां हे विलायती घेतील. कपाटें, खुर्च्या, टेबलें, स्टुलें, पेट्या, गाडीचीं चाकें, इतकेंच नव्हे तर लांकडीपळ्या, झाडण्यासुद्धां झाडून विलायती ! धिःकार असो या लोकांच्या आळसाला व परावलंबित्वाला. "

६ वें) लोखंडाचे कारखाने

न्यूइंग्लंडांतील लोकांपेक्षां या दक्षिणेकडील वसाहतवाल्यांचे गिऱ्हाइकीनें इंग्लंडांतील व्यापारांचें उखळ चांगलेंच पांढरें झालें.

लोखंडाचे कारखाने :— इंग्लंडांतून लोखंडी जिन्नस म्हणजे खिळे, मोळे, शेतीचीं आउतें, बंदुका, नांगर व जहाजांची सामुग्री, सांखळ्या वगैरे आणाविण्यास फार पैसा लागे, त्यामुळें अगदीं आरंभापासूनच वसाहतवाल्यांनीं या जिनसा वसाहतींत बनविण्याचा उपक्रम केला. किनाऱ्यालगतच्या गाळांत लोखंडी अशोधित धातूचा सांठा भरपूर आहे असें आढळून आलें होतें, त्यापासून चांगलें लोखंड पैदा होईल अशी खात्री होती. इ. स. १६४३ सालीं जॉन विनथ्रॉप यानें इंग्लंडहून कांहीं कारागीर व पुरेसें भांडवल आणून लिन् येथें एक भट्टी सुरूं केली व लोखंड काढण्याचें काम चालूं झालें. तेथें लगतचें भट्टीस लागणारा लांकडी कोळसा व भट्टीचे पंखे चालविण्याकरितां लागणारी पाण्यापासून मिळणारी शक्ति हीं दोन्ही सुलभ होतीं. तेथें दररोज सात टन ओंतीव लोखंड निघूं लागलें. तेथें लवकरच लोहारी भट्या सुरू करण्यांत आल्या व त्यांपासून कोयते, खुरपीं, शेतीचीं आउतें हीं निघूं लागलीं. शिवाय लांकूड कापण्याच्या कारखान्यांतील सर्व यंत्रसामुग्री तेथेंच बनवूं लागले. त्यामुळें त्या कारखान्याची फार प्रसिद्धी झाली. तेथें सुमारें पंचवीस वर्षेपर्यंत हा धंदा चालू होता. पुढें तेथील अशोधित धातू व लांकूड हीं संपुष्टांत आल्यामुळें तो कारखाना ब्रेनट्री येथें नेण्यांत आला. या कारन्यास तीन हजार एकर जमीन मोफत देण्यांत आली होती. हा कारखाना सुमारें दहा वर्षेपर्यंत चालला. पुढें मग ठिकठिकाणीं पुष्कळ कारखाने निघूं लागले. खिळे करण्याचा धंदा ध्यू इंग्लंडांतील शेतकरी लोकांस एक दुय्यम धंदाच होऊन बसला. खिळ्यास लागणारी तार अगर पट्टी शेजारीं असलेल्या कारखान्यांतून आणीत व फावेल तेव्हां खिळे बनवून शेतकरी लोक विकत. एका दिवसांत एक शेतकरी सुमारें दोन हजारपर्यंत खिळे तयार करी.

अमेरिकेंत जितकें लोखंड पैदा होत असे तितक्या सर्वाचाच तयार जिन्नस करण्याकडे उपयोग नसे. त्यांतील बराच भाग इंग्लंडला, मोठमोठ्या

गठ्ठ्यांचे स्वरूपांत रवाना होत असे. शिवाय अशोधित लोखंडही बऱ्याच मोठ्या प्रमाणांत रवाना होई. खुद्द इंग्लंडमध्यें जरी बरेंच लोखंड पैदा होई तरी, त्याला लागणाऱ्या कच्च्या अशोधित लोखंडाच्या भरपूर सांठ्याचा शोध अद्यापि तेथें लागला नव्हता. त्यामुळें रशिया व स्वीडन मधून तें पक्क्या अगर कच्च्या स्वरूपांत आणवावें लागत असे. त्यामुळें इंग्लिश लोखंडी कारखानदारांनीं असा बेत केला कीं, अमेरिकेंत लांकूड व लोखंडी अशोधित धातु तसेंच धबधब्याचे पाण्याची शक्ति पुष्कळ मिळण्यासारखी आहे, तेथूनच इंग्लडला लागणारें सुमारें २० हजार टन लोखंड बिडाच्या स्वरूपांत तयार करवून इंग्लंडला आणवावें ह्मणजे तें बरेंच स्वस्त पडेल; तसेंच तें मग, युरोपांतील इतर देशांतून आणावयास नको, सर्व व्यवहार साम्राज्यांतच होईल. त्यांनीं तसा पार्लमेंटला अर्ज केला व पार्लमेंटनें इ० स० १७५० सालीं कायदा करून अमेरिकेंतून आणविल्या जाणाऱ्या बिडावर आयात जकात माफ करण्याची सवलत त्यांना दिली. त्याचा फायदा असा झाला कीं इतर युरोपियन बंदरांत जास्ती जकात भरावी लागत असल्यामुळें बहुतेक सर्व अमेरिकन लोखंड लंडनच्या बंदरांत उतरूं लागलें व अमेरिकेंतील कच्च्या लोखंडाची मागणी वाढली, पण ब्रिटिश कावा तेथेंच थांबला नाहीं, तर पुढें असा कायदा करण्यांत आला कीं इंग्लंडच्या बादशाच्या अंमलाखालीं असलेल्या अमेरिकन वसाहतींत कोणीही लोखंडाचे रूळ, पट्टा, बार, पत्रे वगैरे कोणताही व्यापारी तयार माल करितां कामा नये. फक्त बीड तयार करावें व इंग्लंडलाच इंग्रजी जहाजांतूनच पाठवावें. अशा तऱ्हेनें लोखंडापासून तयार जिन्नस बनविण्याच्या धंद्याचें वसाहतींतून उच्चाटन झालें.

तंबाखूच्या नियंत्रणा संबंधीं कायदा इ. स. १६२१ सालीं पास झाला. त्या कायद्यानें असें ठरविण्यांत आलें होतें कीं, परदेशीं तंबाखू पाठवितां कामा नये, सर्व तंबाखू इंग्लिश जहाजांतून फक्त इंग्लंडच्याच कोणत्यातरी बंदरावर पाठविला पाहिजे. तेथें त्याच्यावर दर पौंडामागें तीन पेन्स जकात घेतली जात असे. युरोपांतील इतर देशांत तंबाखू इंग्लंड

मधूनच पाठविला जात असे, त्यामुळें इंग्रज व्यापाऱ्यांची चंगळ चालली होती. पुढें तंबाखूचा सांठा इंग्लंडमध्यें वाढल्यामुळें तंबाखूचा भाव फार खालीं पडला. युरोपांतील इतर बंदरांत तंबाखूस भाव बरा येई पण तेथें माल पाठविण्याची सक्त बंदी होती. खुद्द वसाहतींत किनाऱ्याकिनाऱ्यानें मालाची विक्री करावी तर तेथेंही दर पौंडास एक पेनीप्रमाणें कर ठेविला होता. हा कर लोक नेहमीं चुकवीतच असत. या परदेशीं व्यापार करण्याचे नियंत्रणामुळें जकात चुकवून धंदा करण्याचे व्यवहारास फार ऊत आला होता. परदेशी जहाजें लांब अंतरावर माल भरण्याकरितां येऊन उभीं रहात. तेथें रात्रीं अंधारांतून तंबाखूसारखा माल भरून होडगीं जात व खुशाल चढल्या भावांत माल विकून परत येत. मुख्य कायदाच जुलमी असल्यामुळें त्याची अशा तऱ्हेनें पायमल्ली करण्यांत कोणास आपण कांहीं गैर करितों असें वाटत नसे. किनाऱ्यावरील व्यापाराचे टेहळणीकरितां लढाऊ जहाजें असत पण त्यांचेकडून कांहीं विशेष कामगिरी झाली नाहीं. कांहीं खलाशी या चोरट्या व्यापारांत असे तरबेज झाले होते कीं, एखादा सौदा चोरून पटविला कीं, ते त्याबद्दल फुशारकी मारीत व सांपडण्याची वेळ आलीच तर खुशाल आपलें होडकें किनाऱ्यालगत बुडवून टाकीत व नंतर सावकाश तें वर काढीत.

नौकानयनाचा कायदा (नॅव्हिगेशन ॲक्ट) इंग्लंडची ड्च जहाजवाल्यांशीं समुद्रावरील व्यापारांत जी चढाओढ चालली होती तिचें पर्यवसाग वरील कायदा पास होण्यांत झालें. इ० स० १६५१ सालीं कॉमवेलच्या पार्लमेंटनें हा कायदा पास केला व पुढें १६६१ सालीं त्याला अनेक पुस्त्या जोडण्यांत आल्या. या कायद्यानें असें ठरविण्यांत आलें होतें कीं, इंग्लंड किंवा इंग्लंडच्या वसाहती येथें उतरणारा व आशिया, आफ्रिका व अमेरिका खंडांतून येणारा कोणताही माल, फक्त ब्रिटिश जहाजांतूनच आणला पाहिजे. खुद्द युरोपांतून जर माल आला असेल तर तो ज्या देशांतून आणला असेल तेथल्या किंवा, फक्त इंग्लिश जहाजांतून आणला पाहिजे. इंग्लंडला येणारा माल ज्या देशांत तो बनविला असेल तेथून तो

थेट आला पाहिजे, मध्यें इतर देशांच्यातर्फे येतां कामा नये. तसेंच जर कोणी हा नियम मोडील तर त्याचें जहाज व त्यावरील सर्व माल जप्त करण्यांत येईल. या कायद्यानें डच लोकांशीं युद्ध उद्भवलें व त्याचा परिणाम त्यांचे हातून अमेरिकेंतील न्यू ॲमस्टरडाम (हल्लींचें न्यू यॉर्क) ही वसाहत जाण्यांत झाला व त्यामुळें डच लोकांचा अमेरिकेशीं व्यापार संपुष्टांत आला. हा सर्व व्यापार इंग्लंडमध्यें बांधलेल्या किंवा अमेरिकेंतील वसाहतींत बांधलेल्या जहाजांचे वांट्यास आला. हा व्यापार पुरा पाडण्याइतकीं जहाजें दोन्हीही राष्ट्रांजवळ नसल्यामुळें जहाजांचा नूर वाढला, पण पुढें जहाजें बांधण्याचे धंद्यास अमेरिकेंत जोर चढल्यामुळें तितकेंसें नुकसान आलें नाहीं.

इंग्लंडपेक्षां जहाजें बांधण्याच्या सोई अमेरिकेंत अधिक होत्या. तेथें जहाजें बांधण्याचें लांकूड उत्तम, स्वस्त व मुबलक मिळे. डोलकाठ्यांसाठीं फरलांकडाचे अखंड सोट मिळत. त्याचप्रमाणें देवदाराच्या झाडांपासून टरपेंटिन, राळ व डांबर मिळे, त्यांचा जहाजें बांधतांना फार उपयोग होई. तसेंच ताग मुबलक असल्यामुळें दोरखंडें तयार करण्याचीही सोय उत्तम होती. वसाहतवाल्यांनीं जहाजें बांधण्याचे कामांत फार झपाट्यानें प्रगति केली. नद्यांपासून धबधब्यांचे रूपानें पुष्कळ शक्ति उत्पन्न होत असे, तिचा लांकडें कापण्याचे कामीं फार उपयोग होई. न्यू इंग्लंड, न्यू यॉर्क, पेनसिलव्हॅनिया, व्हर्जीनिया, मेरिलँड व साउथ कॅरोलिना वगैरे सर्व वसाहतींत जहाजें बांधण्याचें काम सुरूं झालें. नैसर्गिक सुबत्ता व आळस या दोन गोष्टींमुळें दाक्षिणेकडील वसाहतींनीं कधीं जहाजें बांधण्याची तसदी घेतली नाहीं. वास्तविक पहातां त्यांच्याइतकी जहाजें बांधण्याची नैसार्गिक सोय इतर वसाहतींना नव्हती.

ब्रिटिश पार्लमेंटच्या स्वार्थ बुद्धीस अजून आळा पडला नव्हता, त्यानें इ. स. १६६३ सालीं एक नवीन कलम नॅव्हिगेशन कायद्यास जोडलें. त्यांत ब्रिटिश वसाहतींतून कांहीं जिन्नस इंग्लंडखेरीज इतर कोणत्याही देशास पाठवावयाचे नाहींत असा निर्बंध होता. त्या पदार्थांत कापूस, नीळ, रंगाचे कामीं उपयोगांत येणारीं काष्ठें, साखर, तंबाखू, व आलें

इतक्या पदार्थांची भर पडली. या सर्व पदार्थांवर इंग्लंडमध्यें उतरतांच जकात घेतली जाई व नंतर ब्रिटिश व्यापाऱ्यांचें कमिशन पदरांत पडल्यावर ते युरोपांतील इतर ठिकाणीं जाऊं देत. पुढें पुढें या जिनसांची यादी वाढतच गेली. काकवी, तांदूळ व आरमारी सामुग्री या जिनसांचा या यादींत इ. स. १७०५ सालीं; तांबें, व बीव्हर जनावरांचें चामडें, यांचा इ. स. १७२२ सालीं; व माशांचे कल्ले, कातडीं, लांकूड, कच्चें रेशीम व पोटॅश यांचा १७६४ सालीं समावेश झाला.

वरील माल भरलेल्या जहाजांकडून प्रथम ब्रिटिश बंदरांत उतरून जकात वगैरे भरून नंतर पुढें जाऊं असा करार करून घेतला जाई.

इ. स. १६६३ सालीं वसाहतींचे मागें दुसरें एक शुक्लकाष्ठ लावण्यांत आलें. वसाहतींत बाहेर देशाहून येणारा सर्वच माल प्रथम इंग्लंडांत आणून त्याच्यावरील जकात कमिशन भरून नंतर तो वसाहतींत आयात केला पाहिजे असा नवीन कायदा करण्यांत आला. मात्र कांहीं बाबतींत या कायद्याची अंमलबजावणी फार कडकपणानें करण्यांत येत नसे. विशेषतः आयर्लंडांतून जाणाऱ्या मालावर जकात न घेतां तो परभारें जाऊं देत.

इंग्लंडच्या वसाहतींसंबंधीं व्यापारी धोरणाचा मुख्य हेतु उघडच होता. वसाहतींतून बाहेर देशीं पाठविण्यांत येणारा सर्व माल इंग्रज जहाजवाल्यांखेरीज दुसऱ्या कोणास नेतां येत नसल्यामुळें जहाजांच्या वाहतुकीमधील परदेशी चढाओढ बंद पडली, त्याचा फायदा घेऊन इंग्रज बोटीवाल्यांनीं वाहतुकीचे दर सपाटून चढविले व अतोनात नफेबाजी सुरू केली. सर्व माल ब्रिटनचे किनाऱ्यावर प्रथम उतरून ब्रिटिश गोदामांतून सांठविला गेल्यामुळें इंग्रज व्यापाऱ्यांची व अडत्यांची पण चंगळ उडाली. इंग्रज कारखानदारांना कच्चा माल स्वस्त मिळूं लागला व तयार मालाला वसाहतींच्या गिऱ्हाइकीचा मक्ताच मिळाल्यामुळें तो हवा तेवढा महाग विकतां येऊं लागला.

सर्वच व्यवहार या कायद्यावरहुकूम चालला असता, तर अमेरिकन वसाहतवाल्यांस फार मोठें नुकसान आलें असतें; कारण एक तर कच्चा माल ब्रिटिश व्यापारी पाडून भावांत मागत असत व दुसरें तयार माल

खरेदी करणें कॉलनींतील उद्योगधंदे धुळीस मिळाल्यामुळें, त्यांना प्राप्तच होतें व तो वाहतुकीचे चढल्या भावामुळें, व विलक्षण नफेबाजीमुळें त्यांना भलताच महाग पडे. या जुलमी कायद्यांची अंमलबजावणी करण्याचें बरेंच कठीण जाई. वसाहतवाल्यांनीं जकात चुकवून व परकी जहाजांत चोरून माल चढविण्याचें धोरण बिनधोक अंमलांत आणलें. या चोरट्या व्यापारांत फिकायत पुष्कळ होऊं लागल्यामुळें अगदीं संभावित गणले जाणारे वसाहतींतिल व्यापारी सुद्धां या धंद्यापासून अलिप्त नव्हते. कांहीं कांहीं लोक प्रतिकाराचें साधन म्हणून चोरटा धंदा करणें देशाभिमानाचें आहे असें समजत असत. वसाहतींतील कारखाने व उद्योगधंदे यांनीं यत्किंचित् जर का तग धरला असला तर तो केवळ या चोरट्या धंद्यामुळेंच होता, हेंही तितकेंच खरें आहे. जकात व नियंत्रण चुकवून माल रवाना करण्याची लवकरच एक स्वतंत्र पद्धतीच अंमलांत आली. फ्रान्स व हॉलंड येथें तंबाखू जकात चुकवून रवाना करण्यांत येऊं लागला. मालानें भरलेलीं इतर राष्ट्रांचीं गलबतें समुद्रांत किनाऱ्यापासून थोड्याशा अंतरावर येऊन उभीं रहात व तयार मालाची आयात व कच्चा मालाची निर्गत होडकीं, तांफ, व लहान लहान मच्छीमारी बोटी यांतून खुशाल आड मार्गानें चाले. इ. स. १७०० सालीं सुमारें एक तृतीयांश आयात व निर्गत व्यापार चोरून करण्यांत आला असा दाखला सांपडतो. वसाहतींतील लोकमत बेकायदेशीर व्यापारास अनुकूल असल्यामुळें, ब्रिटिश सरकारचें नियंत्रण व टेहळणी यांचा व्हावा तितका उपयोग झाला नाहीं.

काकवीविषयीं कायदा (मोलॅसिस ॲक्ट)—आणखी एका कायद्यानें वसाहतींवरील जुलमांत भर घालण्यांत आली. या कायद्यानें वसाहतवाल्यांच्या वेस्टइंडीज्शीं असलेल्या व्यापारास धक्का बसला. वसाहतवाले बारबेडॉस, जमेका, फ्रेंच लोकांचे ताब्यांत असलेलीं बेटें व डच गयाना यांशीं व्यापार करीत. त्यांपैकीं पहिलीं दोन ह्मणजे बारबेडॉस व जमेका हीं ब्रिटिश लोकांचे ताब्यांत होतीं. तीं दोन्ही बेटें वसाहतींत उत्पन्न होणारा सर्व माल घेऊं शकेनात, त्यामुळें फ्रेंच मुलुख व डच गयाना येथें माल पाठविणें प्राप्तच होतें. शिवाय फ्रेंच लोक आपले धंद्यांत अधिक कुशल

असल्यामुळें तेथून साखर व काकवी अधिक किफायतशीर खरेदी करितां येई. फ्रेंच वसाहतींतील काकवीपासून होणाऱ्या दारूस फ्रान्स देशांत बंदी झाल्यामुळें बारबेडॉस व जमेका या ब्रिटिश बेटांतील साखरेस व काकवीस कोणी विचारीना. या बेटांतील इंग्रज मळेवाल्यांनीं पार्लमेंटास अर्ज केल्यावरून पार्लमेंटमध्यें एक बिल पास झालें. या बिलानें इंग्लंड, आयर्लंड व अमेरिकन वसाहती येथें ब्रिटिश बेटांशिवाय इतर ठिकाणांहून येणारी साखर व काकवी यांस मज्जाव करण्यांत आला, व त्याचप्रमाणें घोडे व लांकूड परकी वसाहतींत विकण्याची अमेरिकन वसाहतींस बंदी करण्यांत आली. पण हाऊस ऑफ लॉर्डसचे आग्रहावरून पूर्ण बंदी काढण्यांत येऊन त्याचे जागीं दारू व इतर मादक पेयें यांवर दरग्यालनी नऊ पेन्स, व काकवी व तत्सम पदार्थ यांवर दरग्यालनीं सहा पेन्स, व साखरेवर दर हंड्रेडवेटला पांच शिलिंग याप्रमाणें जबर जकात परकी ठिकाणाहून येणाऱ्या या जिनसांवर बसविण्यांत आली. याप्रमाणें फ्रेंच व डच इंडींजशीं असलेला व्यापार वसाहतवाल्यांचे हातचा गेला असता पण जकात चुकाविण्याच्या कलेचा उत्कर्ष होत गेल्यामुळें त्याचा तितकासा परिणाम जाणवला नाहीं व चोरून मारून पुष्कळच व्यवहार घडत असे. मोलॅसिस ॲक्ट इ. स. १७३१ सालीं पास झाला. अशा तऱ्हेनें दिवसेंदिवस वसाहतींतील व्यापाराचा कोंडमारा होऊं लागला. प्रत्येक व्यवहारांत कसला तरी कायदा आड येई. कच्चा माल स्वस्त दरांत विकणें भाग पडे व पक्क्या मालास विलक्षण किंमत पडे. त्यामुळें वसाहतींत नेहमीं नाण्याची टंचाई भासूं लागली. स्पेनशीं व्यापार बिनहरकत चालू होता, तोंपर्यंत पुष्कळसें स्पॅनिश चांदीचें नाणें खेळतें राही व पण तेंही आतां बंद झालें होतें. नाण्याच्या तुटवड्यामुळें वसाहतींतील अंतर्गत व्यवस्थेवरही त्याचा परिणाम होऊं लागला. इ. स. १६९० सालीं लुईसबर्गवर केलेली स्वारी निष्फळ ठरून, लढाईवरील शिपाई ज्यावेळीं परतले त्यावेळीं त्यांचे पगार चुकविण्याची पंचाईत येऊन पडली. स्वारीवर निघतांना शिपाई जी लूट मिळवून आणतील तींतील मोठा भाग त्यांना द्यावयाचें ठरलें होतें पण पराभव झाल्यामुळें, जीव बचावून परत येतां येतां पुरेवाट झाली. त्यावेळीं मॅसचुसेट

येथील स्थानिक सरकारनें ४०,००० पौंड किंमतीचे कर्जरोखे काढले; पण पुरेशी पत नसल्यामुळें या रोख्यांचा भाव २५-३० टक्क्यांनीं उतरला, पुढें स्थानिक सरकारनें कर वगैरे भरतांना या रोख्यांचें चलन पूर्ण किंमतीनें स्वीकारण्याची हमी घेतल्यामुळें भाव दर्शनी किमतीस येऊन ठेपले. इ. स. १७११ सालीं कॅनडावर केलेल्या स्वारींतही यश न आल्यामुळें पुन्हा नवीन कर्ज उभारण्यांत आलें, पण या बाबतींत न्यू यॉर्क, पेन्सिल्व्हेनिया, न्होड आयलंड, कनेक्टिकट वगैरे वसाहतींनीं योग्य भाग घेतला होता. एका दृष्टीनें हें कर्ज वसाहतींमधील एकीचें दृढीकरण होण्यास कारणीभूत झालें.

सर्व सुसंघटित राष्ट्रांमध्यें कागदी नोटा काढून खजिन्यांतील तात्पुरती तूट भरून काढण्याचा व्यवहार राजमान्य समजला जातो. जोंपर्यंत पुढील वर्षाच्या वाढत्या उत्पन्नांतून फेड होण्याची आशा असते तोंपर्यंत असें करण्यांत कोणालाही धोका नाहीं. पण वसाहतींचा पाय दिवसेंदिवस उत्पन्नाचे मानानें मागेंच खेंचला जात असे. त्यामुळें कर्जरोख्यांचे भाव तोलून धरणें फार कठीण जाई. पडत्या भावाचा परिणाम जे व्यापारी असले रोखे खरेदी करीत त्यांना नुकसान येण्यांत होत असे. दिवसेंदिवस न्याण्याचा तुटवडा भासूं लागला व व्याजाचे दरही १०-१२ टक्क्यांपर्यंत चढले.

ह्या परिस्थितीवर मॅसचुसेट्स वसाहतीनें एक नवीन तोड काढली. जमिनी तारण गहाण ठेऊन घेऊन वसाहत सरकार कर्जदारास अगदीं सवलतीचें कर्ज देऊं लागलें. हें कर्ज कागदी नोटांचे रूपानें असे व दरसाल या कर्जाच्या एक पंचमांश इतकी रक्कम कर्जदारानें फेड करावी व पांच वर्षांत पूर्ण फेड करावी असा करार असे. अशा रीतीनें कागदी नोटांचा कर्जरूपानें पन्नास हजार पौंडांपर्यंत प्रसार झाला व पुढें या कर्जरोख्यांची रक्कम २६०००० पौंडपर्यंत फुगली. इतर वसाहतींनींही या योजनेस आपआपल्या प्रांतांत चालना दिली. परंतु या सर्व गोष्टींपासून इष्ट परिणाम घडून आला नाहीं. शेतकरी लोकांकडून वरचेवर कर्जफेड झाली नाहीं, त्यामुळें कर्जरोख्यांचा भाव कायम राहीना.

६ वें) गव्हर्नरला पगाराबद्दल धमकी

निरनिराळ्या वसाहतींचे गव्हर्नरांनीं या कर्जरोख्यांचे प्रसारास विरोध केला पण त्याकडे वसाहतींनीं लक्ष्य दिलें नाहीं. कायदेमंडळानें खुद्द गव्हर्नरांचा पगारच न देण्याची धमकी दिली व अशा रीतीनें लोकमतास त्यांची संमति मिळवली. खाजगी कर्जाची फेड वसाहतीच्या कर्जरोख्यांत केल्यानें ती कायदेशीर समजली जाई व धमकीनें या बाबतींत विरोध केल्यास त्याबद्दल त्याला दंडाची शिक्षा होई. या जबरदस्तीबद्दल वसाहतींतील व्यापाऱ्यांनीं व लंडनच्या पेढीवाल्यांनीं फार ओरड केली. इ. स. १७५१ सालीं वसाहतवाल्यांनीं यापुढें कर्जरोखे काढूं नयेत असा ठराव झाला, पण एकंदरींत वसाहतवाल्यांना ती गोष्ट आवडली नाहीं. अशा रीतीनें वसाहतींत कायदेशीर जुलूम–जबरदस्ती चालूं असल्यामुळें वसाहतवाले इंग्लिश सत्तेस कंटाळून गेले व त्यांच्यामध्यें असंतोषाची वृद्धि होऊं लागली. आपला देश स्वतंत्र झाल्याशिवाय या जाचांतून आपली सुटका होणें अशक्य आहे अशी त्यांची खात्री होऊं लागली. स्वातंत्र्याचें युद्ध जाहीर होण्यापूर्वी असंतोष कसा पसरत गेला व राज्यक्रांति होण्यास इष्ट परिस्थिति कशी उत्पन्न झाली होती हें यावरून स्पष्ट दिसून येईल.

स्वातंत्र्ययुद्धाचीं कारणें

प्रकरण सातवें.

फ्रेंच व इंडियन युद्धा ' मुळें अमेरिकन वसाहतींवर फार महत्त्वाचे परिणाम झाले होते. पॅरिस येथील तहामुळें फ्रेंच लोकांनीं सेंट लॉरेन्स नदीचें व ग्रेट लेक्सचे आसमंतांतील सर्व प्रदेशाचा ताबा सोडून दिला, तसेंच मिसिसिपी व ॲलिघेनी या द्यांचेमधील अत्यंत सुपीक प्रदेशही त्यांना इंग्रज वसाहतवाल्यांचे ताब्यांत द्यावा लागला व अशा रीतीनें इंग्रजांचा पूर्ण विजय झाला. फ्रेंच लोक इंडियन लोकांस चिथावून ब्रिटिशवसाहतींवर हल्ला करण्यास लावीत, तीही पीडा आपोआप बंद झाली. इंडियन लोकांसही कळून चुकलें कीं, आतां या परकी लोकांचा पगडा आपल्या देशावर बसल्याशिवाय रहात नाहीं, ह्मणून त्यांनीं इंग्रज व फ्रेंच लोकांनीं आक्रमिलेल्या मुलुखापलीकडील गिरिकंदरांत आपलें निवासस्थान कायम केलें. स्पेन देशापासून क्यूबा व फिलिपाइन बेटें इंग्रजांनीं लढाईत जिंकलीं होतीं, तीं त्यांचीं त्यांस परत देण्याचे बोलविर फ्लॉरिडा प्रांत ब्रिटिशांचे ताब्यांत देण्यास स्पेन तयार झाला. अशा रीतीनें एका मोठ्या सलंग प्रांतावर ब्रिटिश लोकांना ताबा मिळाला व त्यांनीं महत्त्वाचे ठिकाणीं ब्रिटिश फौजा ठेविल्या. अशा रीतीनें फोर्ट डयूकेन, नायगारा, व डिट्रॉइट वगैरे जागीं चांगला बंदोबस्त ठेवण्यांत आल्यामुळें परकीय वसाहतवाले व इंडि-

यन लोक यांच्यापासून आतां पूर्ण शांतता लाभेल ह्मणून वसाहतवाल्यांस आशा वाटूं लागली होती.

सात वर्षांच्या सतत युद्धामुळें वसाहतवाल्यांचे अंगीं स्वसंरक्षण करण्यास आवश्यक असें लढाऊ सामर्थ्य आपोआपच आलें होतें. कारण वसाहतींनीं स्वतःच्या खर्चानें पोसलेलें पंचवीस हजार सैन्य ब्रिटिश सैन्याचे मदतीस दिलें होतें, तसेंच वसाहतवाल्यांनीं आपलीं चारशें जहाजें लढाईचे कामीं दिलीं होतीं व त्यांनीं शत्रूच्या वाहतुकी जहाजांना अतोनात त्रास दिला व हें शेवटीं आरमारी लढाईत जो शेवटचा विजय झाला त्याचें मुख्य कारण होतें. ब्रिटिश पार्लमेंटनें वरील मदतीबद्दल वसाहतवाल्यांची मुक्तकंठानें वरचेवर स्तुतीही केली होती.

एकत्र लढत असतां अमेरिकन शिपायांस ब्रिटिश फौजेचे गुणावगुण सहजच समजून आले. ब्रिटिश शिपायांत शिस्त वगैरे गुण कांहीं प्रमाणांत अधिक असत, पण याच देशांत जन्म पावल्यामुळें आपल्या आसपासचा मुलूख, लोक, व इंडियन लोकांशीं लढण्याची पद्धति वगैरेंबद्दल अमेरिकन शिपायांस अधिक माहिती असे, तसेंच अमेरिकन शिपाई काटकपणांत ब्रिटिश शिपायांस हार जाण्यासारखा नव्हता हीही गोष्ट उघड उघड दिसून येऊं लागली. त्यामुळें ब्रिटिश शिपायांबद्दल अमेरिकन शिपायांस फारसें महत्व अगर भीतीही वाटत नव्हती.

अशा रीतीनें अमेरिकन वसाहतवाल्यांत एक प्रकारचा आत्मविश्वास उत्पन्न होऊं लागला होता. सभोंवतालच्या परिस्थितीचा विचार त्यांच्या मनांस पीडा देऊं लागला होता, जुलुमाबद्दल उत्पन्न होणारी चीड त्यांचे मनांस जाणवूं लागली होती, प्रतिकाराचा मार्ग ते शोधीत होते, आत्मविश्वास त्यांचे ठायीं उत्पन्न होण्यास प्रत्यक्ष लढाईच कारण झाली होती, व त्या लढाईंत त्यांनीं जयही मिळविला होता. मानवी जीवनाची जी स्थिति

तींच राष्ट्राच्या जीवनाचीही आहे. त्यांना बाल्य, तारुण्य व प्रौढावस्थाही आहे. मान-अपमान व राग-लोभ हीं जशीं वैयक्तिक तशीं सामुदाईकही आहेत, मग प्रत्यक्ष खिसे कापले जाऊं लागले व पोटास चिमटा बसूं लागला ह्मणजे व्यक्तीप्रमाणें राष्ट्रही खडबडून जागें होऊन प्रतिकाराचे मार्ग शोधूं लागलें, तर त्यांत नवल कसलें ?

वसाहतवाल्यांची प्रत्येक बाबतींत कुचंबणा होऊं लागली होती. व्यापाराच्या, शेतीच्या, व कारखानदारीच्या प्रत्येक बाबतींत कसला तरी कायदा आडवा येई, त्यामुळें आर्थिक अडचण येई, येवढेंच नव्हे तर आपल्याच देशांत एकही गोष्ट करण्याचें स्वातंत्र्य आपल्यास नाहीं याबद्दल वसाहतवाल्यांस अपमान वाटणें स्वाभाविक होतें.

सप्तवार्षिक युद्धानंतर इंग्लंडचे ताब्यांत खुद्द अमेरिकेंतच नव्हे तर हिंदुस्थानांतसुद्धां इतका मुलुख आला कीं इंग्लंड एक मोठें साम्राज्य बनलें व एवढ्या विस्तृत साम्राज्याचा बंदोबस्त नीट ठेवण्यास लागणारा फौजफाटा ठेवणें व त्यासाठीं पैशाचा बंदोबस्त करणें अगत्याचें होऊन बसलें होतें. विशेषतः अमेरिकन वसाहतवाले जकातीविषयक कायद्यांचें राजरोस अतिक्रमण करीत, त्यामुळें त्या कायद्यांमुळें होणारा फायदा मुळींच होत नसे व वसुलांत तूट येई. या गोष्टींचा पुरा बंदोबस्त झाला पाहिजे असें पार्लमेंटचें म्हणणें होतें. वसाहत-वाल्यांच्या बेकायदेशीर वर्तनाचा बीमोड करण्याकरितां दहाहजार ब्रिटिश रेग्युलर सैन्य अमेरिकेंत ठेवण्यांत यावें व त्याच्या खर्चाची रक्कम वसाह-तींचे उत्पन्नांतून कापून घ्यावी असा त्यावेळचे मुख्य प्रधान लॉर्ड ग्रेन्व्हिल व बोर्ड ऑफ ट्रेडचे अध्यक्ष यांनीं ठराव केला व त्याला तिसरे जॉर्ज बादशहा यांनीं पूर्ण पाठिंबा दिला. आपण केलेल्या कायद्यांचें उल्लंघन झाल्यास जार्ज बादशहास फार चीड येई पण केलेला कायदा न्याय्य आहे कीं नाहीं याचा विचार करण्यास त्याला कधीं फुरसत मिळत नसे.

पार्लमेंटला वसाहतींचे राज्यकारभारांत हात घालण्याचे काय अधिकार आहेत यासंबंधीं स्पष्ट कायदा अद्यापपर्यंत झाला नव्हता. आतांपर्यंत अंतर्गत राज्यकारभारांत अमेरिकन वसाहतवाल्यांस साधारण इंग्रज लोकांपेक्षां अधिक अधिकार होते असें ह्मणण्यास प्रत्यवाय नाहीं. कलोनियल असेंब्ली ह्मणजे वसाहतवाल्यांची मुख्य सभा आतांपर्यंत अंतर्गत व्यवहारासंबंधीं कायदे करी व सर्व व्यवस्था नीट चालत असे. फक्त कोठें प्रश्न आलाच तर ब्रिटिश व्यापारी घोरणास धोका पोंहोचण्याचा प्रसंग आला तरच येई. वसाहती-सरकारचे धोरणानेंच सर्व करवसुली व त्याचा विनियोग होई. ब्रिटिश पार्लमेंटनें जे कायदे केले होते ते कॉलनींतील सर्व व्यापाराचा मक्ता फक्त इंग्लंडकडेच रहावा या दृष्टीनें केले होते व वसाहतींचे बंदरांतून ज्या जकाती बसविल्या होत्या त्यांचा हेतु ब्रिटिश मालाशीं स्पर्धा करणाऱ्या मालाची वसाहतींमधून हकालपट्टी करण्याचा होता; पण अंतर्गत जकाती किंवा कर पार्लमेंटनें आजपर्यंत वसाहतींवर बसविल्याचें उदाहरण नव्हतें, इतकेंच नव्हे तर पूर्वीचे ब्रिटिश मुख्य प्रधान वॉलपोल व पिट् या दोघांनीं अशा तऱ्हेचे कर बसविणें गैरशिस्त आहे ह्मणून तसल्या सूचना पूर्वी धुडकावून दिल्या होत्या. पण सप्तवार्षिक युद्धांत इंग्लंडला सुमारें चौदा कोटी पौंड कर्ज झालें होतें व त्याची फेड कशी करावी हा प्रश्न येऊन पडला होता. शिवाय नवीन काबीज केकेल्या मुलखाचा बंदोबस्त ठेवण्यास किती पैसा लागणार होता त्याचा अंदाजच नव्हता. खुद्द ब्रिटिश लोकांवरही कराचा बोजा चाढतच चालला होता व त्यांच्यांत अधिक असंतोष वाढूं देणें इष्ट नव्हतें, उलटपक्षीं वसाहतवाल्यांची लोकसंख्या वाढत होती व त्यांच्यांत सुबत्ता नांदत आहे असें इंग्रज मुसत्द्यांस वाटत होतें व शिवाय वसाहतींच्या स्वातंत्र्यासाठींच झालेल्या लढाईचा खर्च वसाहतींनींच द्यावयास पाहिजे असें ब्रिटिश पार्लमेंटचें ह्मणणें होतें.

इ. स. १७६४ सालीं 'शुगर ॲक्ट' नांवाचा कायदा पास झाला. १७६३ च्या मोलॅसिस ॲक्टाचीच ही सुधारून वाढविलेली आवृत्ति होती. मोलॅसिस् ॲक्टापासून ब्रिटिश सरकारला कांहीं एक फायदा झाला नाहीं,

कारण कर जबर असल्यामुळें व्यवहार बंदच झाला व जो होई तो चोरून मारून ह्मणजे जकात चुकवून होई. ही चूक पुढें दुरुस्त करून शुगर ॲक्ट अमलांत आणला. या कायद्यांत साखरेवरील जकात पूर्वीच्या अर्ध्यानें ठेविली होती. हेतु हा कीं लोक इतकी जकात खुशीनें भरतील. पण त्यांत अशी एक सुधारणा केली होती कीं, साखरेच्या जोडीस दुसऱ्या अनेक चिजा बसविल्या होत्या. उदाहरणार्थ कॉफी, दारू, नक्शीचें कापड, रेशीम व फ्रेंच बनात या सर्वांवर जकात लादण्यांत आली होती. वरील जकाती माफक असल्यामुळें व या सर्व वस्तू श्रीमंत लोकच वापरीत असल्यामुळें जकात सहज वसूल होईल अशी अपेक्षा होती. शुगर ॲक्टच्या कायद्याचे प्रस्तावनेंत सदरहू कायदा, वसाहतींचे संरक्षणार्थ लागणारे पैशाची तरतूद करण्याकरितां आहे असें ह्मटलें होतें.

काकवीवरील जकात जरी एका ग्यालनवर तीन पेन्सप्रमाणें होती तरी त्यामुळें काकवीची किंमत सुमारें वीस टक्क्यांनीं वाढली व दारू गाळणारांचा नफा बहुतेक नाहींसा झाला, कारण काकवीची किंमत वाढली तरी दारूची किंमत मुळींच वाढली नाहीं, यामुळें दारू गाळण्यांत फायद मुळींच पडेना. वेस्ट इंडीजशीं काकवीचा व्यापार बंद झाल्यामुळें काकवी-बद्दल वेस्ट इंडीजला उलट पाठविण्याचा मालही अर्थात् बंद झाला, त्यामुळें जहाजांस काम नाहींसें झालें व तीं तशींच बंदरांत पडून राहूं लागलीं, अथवा दुसरीकडे काम शोधूं लागलीं. दारूचा व्यापार बसल्यामुळें माला-च्या किंमती उतरूं लागल्या, व लोकांत बेकारीही वाढूं लागली. मॅसचुसेट-मधील मासळीचा व्यापारही बंद पडूं लागला, कारण बहुतेक सर्व मासळी काकवीच्या मोबदल्यांत जात असे, वेस्ट इंडीजमधून काकवी येणें बंद होतांच मासळीस कोणी विचारीना. दोन तृतीयांशापेक्षां अधिक व्यापार मासळीचे धंद्यांत कमी झाला. या अन्यायाबद्दल त्यावेळचे मॅसचुसेटचे गव्ह-र्नर बेर्नार्ड यांनीं पार्लमेंटला तक्रार अर्ज पाठविला होता व त्यांत दर ग्यालनास एक पेनीपेक्षां अधिक जकात असूं नये असें ह्मटलें होतें.

वेस्ट इंडीजशीं व्यापार बंद झाल्यानें वसाहतींत जें स्पॅनिश चांदीचें नाणें खेळतें राही तेंही बंद झालें व हे सर्व कर रोख पैशांनीं भरावयाचे

असल्यानें फारच त्रेधा होई, कारण ज्या जकातीमुळें जवळचा खेळता पैसाच नाहींसा झाला ती जकात रोख नाण्यांत भरण्यास नाणेंच शिल्लक नव्हतें. याच वेळीं वसाहतींनीं अधिक कागदी नोटा काढूं नयेत असें पार्लमेंटनें नियंत्रण घातलें होतें. एकंदरींत वसाहतींचें कल्याणाचे दृष्टीनें हें नियंत्रण कदाचित् योग्य असलें तरी आतांचा समयच असा होता कीं या नियंत्रणानें असंतोषांत भरच पडली व वसाहतवाल्यांचा कोंडमारा होऊं लागला.

तीन हजार मैल अंतरावर असलेल्या सहानुभूतिशून्य राज्यकर्त्यांस वसाहतींतील लोकांची कशी कुचंबणा झाली होती याची कल्पनाही नीटशी नव्हती.

शुगर ॲक्टची अंम्मलबजावणी नीटशी होत नव्हती, आतांपर्यंत फक्त दोन हजार पौंड वसुली करण्यास ब्रिटिश ऑफिसरांस आठ हजार पौंड खर्च आला होता. आतां ही अंम्मलबजावणी अधिक कसून व्हावयाची होती. कस्टम खात्यांतील आफिसरांनीं सारा वेळ जकात कट्टयावरच राहिलें पाहिजे. असे हुकूम सुटले व तपासणी कसून करण्याबद्दल ताकीत मिळाली. जकात चुकवून आणलेला माल कोठें तरी लपविला आहे असा संशय आल्यास वाटेल त्या घराची झडती घेण्याची परवानगी जकातआफिसरांस मिळाली, किनाऱ्याचे संरक्षणास ठेविलेल्या सर्व लढाऊ गलबतांवर जकात चुकवून कांहीं जहाजें व्यापार करीत आहेत असा संशय आल्यास झडत्या घेण्याचें काम सोंपवून देण्यांत आलें. लष्करी बंदोबस्ताचे कोर्टास जकात चुकाविल्याबाबतचे खटले ज्यूरीचे मदतीशिवाय चालवून लोकांस शिक्षा ठोठावण्याचा अधिकार मिळाला, परंतु शुगर ॲक्टपासून कांहीं एक उत्पन्न होईना.

इ. स. १७६५ सालीं स्टँप अक्ट नांवाचा कायदा वसाहतींवर लादण्यांत आला. असला कायदा इंग्लंडमध्यें चालूं होता व त्यापासून उत्पन्नही उत्तम येई. मुख्य प्रधान ग्रेनव्हिल यांनीं असा कयास बांधला कीं हा कायदा वसाहतींस लागूं केल्यास सुमारें एक लक्ष पौन्ड उत्पन्न होण्यास

हरकत नाहीं. या कायद्याचे अन्वयें अर्ध्या पेनीपासून तों दहा पौन्डां-पर्यंतचे स्टँप काढलेले होते व ते प्रसिद्ध केलेल्या नियमांप्रमाणें कर्जखातें, दस्तऐवज, लायसेन्स, करारनामे, मृत्युपत्रें, गहाणखतें, वाक्षिसपत्रें, तसेंच सर्व तऱ्हेचे अर्ज, छापील मजकूर, पुस्तकें, क्यालेंडरें, व चोपडीं वगैरे सर्व ठिकाणीं लावण्यास कायद्यानें भाग पाडलें होतें. हे स्टँप विकण्याकरितां सर्वत्र माणसें नेमण्यांत आलीं होतीं, व स्टँप न लावल्यास पांचपासून पन्नास पौंडांपर्यंत दंडाची शिक्षा कायद्यांत सांगितली होती. किरकोळ वर्तमानपत्रें किंवा पंचांगें विकणारे सुद्धां या स्टँप ॲक्टापासून सुटले नव्हते. वर्तमानपत्रास किंवा पंचांगास सुद्धां स्टँप लाविला नाहीं तर दोन पौंड दंड होई, व खोटे स्टँप तयार केल्यास मृत्यूचीच शिक्षा होती.

इतका कडेकोट बंदोबस्त जरी स्टँप ॲक्टनें करून ठेविला होता तरी त्यापासून यावा तितका वसूल मुळींच येईना. लोकांनीं स्टँप विकतच घेण्याचें नाकारलें. पुष्कळ लोक करारनामे कागदावर लिहीतच नसत, तोंडी करारावर काम चालूं लागलें. हा नवीन स्टँप लाविलेला कागद देश-भक्त वकील हातींच धरीत नसत. वर्तमानपत्रें छापण्याचींच बंद झालीं व छापत तीं स्टँपाचे ऐवजीं मृत्यूचा अस्थियुक्त मुखवटा स्टँपाचे जागीं छापूं लागलीं. स्टँप असलेल्या पेट्या जाळण्यांत येऊं लागल्या किंवा समुद्रांत फेकून देण्यांत येऊं लागल्या.

साऊथ करोलिनामध्यें स्टँप लावण्याचे लोकांनीं नाकारल्यामुळें कोर्टेंच बंद ठेवण्यांत आलीं. बॉस्टन येथील स्टँप विकणाऱ्या माणसांस तंबी देऊन लोकांनीं नोकरी सोडण्यास लावलें. तेथील स्टँप ऑफिसला आग लावण्यांत आली व लेफ्टनंट गव्हर्नरचें घरही जाळण्यांत आलें. न्यूयॉर्क येथेंही पुष्कळ खटपट झाली पण स्टँप लावण्याचें कोणी कबूल करीना. सर्व किनाऱ्यावरील शहरांत ही चळवळ हां हां म्हणतां पसरली.

स्टँपॲक्टला जो विरोध झाला तो एकतर पैशाच्या अडचणीमुळें झालाच, कारण या कायद्यामुळें पुष्कळ व्यापारी लोकांचें प्रत्यक्ष पैशाकडून नुकसान होणारच होतें पण मुख्यतः वसाहतवाल्यांचा विरोध निराळ्याच तत्वाकरितां होता. त्यांचें ह्मणणें, ज्या ब्रिटिश पार्लमेंटमध्यें आपल्या

तर्फेंची बाजू मांडण्यास कोणीही नाहीं त्या पार्लमेंटला आह्मांवर कर बसविण्याचा अधिकार नाहीं. वसाहतवाल्यांच्या या ह्मणण्यास पिट् व बर्क या दोन उदारमतवादी इंग्रजांचाही पाठिंबा होता. खुद्द तिसरे जार्ज यांचा किंवा त्यांचे प्रधान मंडळाचा लोकमतावर फारसा विश्वास नव्हता, मग तें इंग्लंडचें असो अथवा वसाहतीतील असो. इ. स. १७६६ सालीं तेरांपैकीं नऊ वसाहतींनीं, आपल्या हक्कांसंबंधीं एक लांबलचक अर्ज तिसऱ्या जॉर्ज बादशहाकडे पाठविला होता पण नेहमींप्रमाणेंच त्या अर्जाची वासलात लागली.

अर्ज करून दाद लागत नाहीं अशी जेव्हां वसाहतवाल्यांची खात्री झाली तेव्हां इंग्रज व्यापाऱ्यांचे कानास चिमटा घेऊन तरी आपली दाद लागते कीं काय हें पाहण्याचें वसाहतवाल्यांनीं ठरविलें. ' नॉन् इंटरकोर्स ' नांवाचें धोरण त्यांनीं अमलांत आणलें. अलीकडील बहिष्काराचे चळवळीप्रमाणें कांहीं अंशीं ही चळवळ होती. स्टँप ॲक्ट व इतर जुलुमी कायद्यांचा पुरा बंदोबस्त होईपर्यंत इंग्लंडमधून कसलाही माल आणवावयाचा नाहीं असा न्यूयॉर्कचे व्यापाऱ्यांनीं आपसांत करारनामा काढला. बॉस्टन व फिलाडेल्फिया येथील व्यापाऱ्यांनींही अशीच चळवळ आरंभिली. किरकोळ व्यापाऱ्यांनीं असा ठराव केला कीं, ज्या वस्तूंवर बहिष्कार जाहीर झाला त्या वस्तू मुळींच विकावयाच्या नाहींत व शिवाय गिऱ्हाइकांनींही असा ठराव केला कीं, होतां होईल तों देशी वस्तूंवरच काम चालवावयाचें. ' डॉटर्स ऑफ लिबर्टी ' ह्मणून स्त्रियांची संस्था होती तींतील प्रत्येक स्त्रातंत्र्य कन्यकेनें, कसलाही इंग्रजी माल वापरावयाचा नाहीं व कपडा तर अमेरिकेंत तयार झालेलाच वापरावयाचा असा निश्चय जाहीर केला. देशाभिमानी वसाहतवाल्यांनीं सूत काढण्याचे सामने चालूं केले, व एका दिवसांत जी स्त्री सर्वांत अधिक सूत काढी तिला मोठमोठीं बाक्षिसें देण्याचें ठरविलें. इ. स. १७६८ सालीं केम्ब्रिज (मॅसचुसेट्स्) येथील युनिव्हर्सिटींत जो पदवीदान समारंभ झाला त्याला आलेल्या सर्व वसाहतींतील विद्यार्थ्यांनीं फक्त वसाहतींत तयार झालेले स्वदेशी कपडे घालूनच आपआपल्या पदव्या ग्रहण केल्या. दुसऱ्या वर्षीं न्होड आयलंडमधील विद्यार्थ्यांनींही हाच कित्ता गिरविला.

हळूं हळूं परदेशांतून येणाऱ्या मालाची जागा पटकावण्यासारखा स्वदेशी माल वसाहतींतच तयार करण्याचा पद्धतशीर उपक्रम वसाहतवाल्यांनीं आरंभिला. इ. स. १७५१ सालीं बॉस्टन येथें 'उद्योग धंद्यांचे वाढीकरितां व गरीब लोकांस कामें मिळवून देण्याकरितां' ह्मणून एक संस्था स्थापन झाली होती. पुढें इ. स. १७६४ सालीं मॅसचुसेटसचे जनरल कोर्टानें सुमारें पंधराशें पौन्ड देणगी देऊन एक कारखाना चालूं करण्यास उत्तेजन दिलें, त्यानंतर न्यूयॉर्क व फिलाडेलफिया येथें स्वदेशी माल तयार करणाऱ्या व त्यांची विक्री करणाऱ्या संस्था निघूं लागल्या. या व इतर दुसऱ्या शहरांतून लवकरच अगदीं इंग्रजी मालाप्रमाणें उत्तम तागाचें व लोकरीचें कापड निपजूं लागलें. या कामीं लोंकर व ताग यांचा लवकरच तुटवडा भासूं लागला. त्यामुळें शेतकरी लोकांस ताग व लोंकर उत्पन्न करण्याबाबत वसाहती उत्तेजन देऊं लागल्या. ज्यांच्यावर उत्तम लोंकरीची पैदास होते अशीं कोकरें मारणें निंद्य समजण्यांत येऊं लागलें व कोणी कोकराचें मांस विकूं लागला तर त्याची समाजांत हेटाळणी झाल्याखेरीज रहात नसे.

वसाहतींतील गव्हर्नरांचे या नवीन चळवळीसंबंधांत जे रिपोर्ट गेले त्यांत या नवीन चळवळीचें फारसें महत्व नाहीं, त्या सहज दडपून टाकितां येतील असाच उल्लेख असे, पण अमेरिकन लोकांनीं या कामीं केलेली चळवळ पाहून प्रधान मंडळाचे मनावर इष्ट परिणाम घडून आला. इंग्रजी मालाची मागणी अजिबात बंद झाली. अमेरिकन लोकांस नको असलेला माल घेऊन जाण्यास जहाजवाले धजत नसत. नको असलेल्या मालाबरोबर कदाचित् आपलें जहाजही बुडवून टाकतील अशी त्यांस भीति वाटत होती, कांहीं जहाजें अर्धवट माल भरून जात तर कांहीं तशींच ब्रिटिश बंदरांत नांगरून पडत. अमेरिकन गिऱ्हाईक हातचें गेल्याबद्दल कारखानदारांना वाईट वाटूं लागलें, व कांहींना कारखानेही बंद ठेवावे लागले. इंग्लंडांत हजारों लोक बेकार झाले, वसाहतींतिल असेंब्लीचे सभासदांनींच नव्हे तर खुद्द इंग्रजी व्यापाऱ्यांनीं व मजुरांच्या संस्थांनीं पार्लमेंटला हे जुलुमी कायदे रद्द करून सुव्यवस्था स्थापन करावी ह्मणजे व्यापारांचें

नुकसान होणार नाहीं, असे अर्ज केले, तसेंच कारखानदारांना अमेरिकेंत वसूल करण्याच्या मालाबद्दलच्या बाकया वसूल करणें फार जड जाऊं लागलें, व त्यांनींही हे कायदे रद्द करण्याबद्दल आग्रह धरिला. बोर्ड ऑफ ट्रेड कडेही रोज हे कायदे रद्द करण्याची खटपट करण्यासाठीं, अर्जांचीं पुडकींच्या पुडकीं येऊं लागलीं.

स्टँप ॲक्ट ज्यावेळीं लागूं केला त्यावेळीं त्यासंबंधानें पार्लमेंटांत फारसा वादविवाद झालाच नाहीं, पण तो बंद करण्याची ज्यावेळीं सूचना आली, त्यावेळीं पार्लमेंटांत जो वादविवाद झाला व जो धुमाकूळ माजला त्याला इतिहासांत इतर ठिकाणीं तुलना सांपडणें कठीण आहे. स्टँप ॲक्ट-काढून टाका म्हणणारा पार्लमेंटचा विरोधी पिट् यानें हा ठराव मांडला. त्यांत समूळ, पूर्णत्वानें व ताबडतोब काढून टाकावा असे स्पष्ट शब्द होते व तसेंच हा कायदा काढून टाकण्याचें कारण म्हणजे तो तत्वतःच चूक म्हणून काढून टाकण्यांत यावा असें म्हटलें होतें. तरी पण पिट्ला सुद्धां, वसाहतींवर ब्रिटिश सरकारला वाटेल ते कायदे लादण्याचा अधिकार आहे व तसेंच वसाहतींत वाटेल त्या मालाचें नियंत्रण करणें, कारखाने व उद्योगधंदे बंद करणें, किंवा इतर वाटेल तशी व्यवस्था लावणें हा ब्रिटिश पार्लमेंटचा पूर्ण अधिकारच आहे असें वाटत होतें. वसाहत-वाल्यांच्या खिशांत हात घालून प्रत्यक्ष पैसा बाहेर काढून त्यांचे खुशी-शिवाय घेणें, येवढ्या एकाच गोष्टीचा पार्लमेंटास अधिकार नाहीं असा त्याचा समज होता. ही तरी मेहरबानीच. पिटच्याच शब्दांत त्याचीं मतें पहा.

' Let the sovereign authority of this country, over the colonies, be asserted in as strong terms as can be devised, and be made to extend to every point of legislation whatsoever; that we may bind their trade, confine their manufacture, and exercsie every power whatsoever–except

that of taking their money out of their pockets without their consent.' ही झाली अत्यंत उदार अशा पिट-सारख्या ब्रिटिश पुढाऱ्याची गोष्ट, मग इतरांचीं मतें वसाहतींबद्दल कशीं असतील तें वाचकांनींच ठरवावें.

त्यावेळीं बेंजामिन फ्रँकलिन् लंडनमध्यें पेन्सिल्व्हेनिया संस्थानतर्फे वकील झणून होता. त्याची अमेरिकन लोकांना या स्टँपॲक्टबद्दल काय वाटत आहे यासंबंधीं पार्लमेंटरी कमिटीपुढें साक्ष घेण्यांत आली. त्यानें स्पष्ट सांगितलें कीं, या कायद्यास अमेरिकन वसाहतवाले कधींच मान वांकविणार नाहींत. तो झणाला, ' माझ्या मतें स्टँप ॲक्ट झणजे सरकारला भरपूर कर दिल्याशिवाय कोणी व्यापार करूं नये, एकमेकांत व्यावहारिक अदलाबदल करूं नये, कांहीं विकत घेऊं नये, विकूं नये, कर्ज काढूं नये, कर्ज फेडूं नये, लग्न करूं नये, किंवा मृत्युपत्रही करूं नये, असला हा आमचे पैसे उपटण्याचा कायदा आहे, हा पाळला तरी तोटा होतो व न पाळला तर खटला होऊन नुकसान होतें. अशा तऱ्हेच्या कायद्यास मान वांकविल्यास त्यापेक्षां अधिक हानिकारक व अधिक जुलमी कायदे आमच्या डोक्यावर लादले जातील, पुढच्या वर्षीं झणजे इ. स. १७६६ सालीं हा स्टँप ॲक्ट ताबडतोब रद्द झाला. रद्द करण्याचे जाहीरनाम्यांत झटलें होतें कीं, " या कायद्यान्वयें बऱ्याच लोकांची गैरसोय होत असल्याचें दिसून आल्यामुळें व आमच्या राज्यांतील व्यापारास धोका पोंहचण्याचा संभव दिसून आल्यामुळें तो बंद करण्यांत येत आहे. "

अशा रीतीनें स्टँप ॲक्ट जरी मागें घेण्यांत आला तरी त्यांतील मूलभूत तत्व जें लोकांच्या संमतीवांचून त्यांच्यावर कर बसविणें तें तसेंच राहिलें, कारण लवकरच ' डेक्लेरेटरी ॲक्ट ' नांवाचा नवीन कायदा अमलांत आला. त्याला वसाहतींवरील हक्क प्रस्थापित करण्याचा कायदा असें झणतां येईल. या कायद्यांत झटलें आहे कीं, ' अमेरिकेंतील कॉलनीज व मळे, हे, ग्रेट ब्रिटनचे पार्लमेंटचे हातांखालीं व त्यावर अवलंबून असणारे मुलुख झणून पूर्वीपासूनच आहेत, हल्लींही आहेत व पुढेंही अगदीं हक्कानें असतील व त्यावर ग्रेटब्रिटनचे पार्लमेंटची व राजाची अनियंत्रित सत्ता

चालेल. ' स्टँप ॲक्ट रद्द झाला, त्याचे विजयामुळें, अमेरिकेंत आनंदीआनंद झाला होता. साऊथ कॅरोलिनाचे लोकांनीं पुन्हां ब्रिटिश कपडे अंगावर घालून राजाचा वाढदिवस साजरा केला व अंगावरील देशी कपडे गरीब-गुरिबांस वांटून दिले. न्यूयॉर्क व बॉस्टन येथील व्यापाऱ्यांनीं पुन्हां ब्रिटिश कापड व माल मागविण्यास सुरुवात केली. तथापि एकंदरींत ब्रिटिश पार्लमेंटचें समाधान झालें नाहीं. वसाहतींपासून कराचे रूपानें पुष्कळ पैसा काढल्याशिवाय आपला अधिकार वसाहतींत चालतो असें समजण्यास त्याला कांहीं आधार नव्हता. इ. स. १७६६ सालचे अखेरीस पार्लमेंटनें शुगर ॲक्ट किंचित् सौम्य करून पुन्हां सुरूं केला. त्यांत काकवीवरील कर दर ग्यालनामागें फक्त एक पेनी ठेविला होता, व अशा रीतीनें तरी लोक नवीन कारभारास संमति देतात कीं काय हें ब्रिटिश सरकार पहात होतें. शिवाय ज्या लोकांनीं करभारास नापसंती दाखविली त्यांना शिक्षा व्हावी ह्मणून म्यूटिनी ॲक्ट नांवाचा कायदा लागूं केला. ज्या ज्या भागांत करबंदीची चळवळ झाली होती तेथें तेथें ब्रिटिश फलटणी ठेवण्यांत आल्या, व त्या त्या भागांतील शिपायांस जळण काढूक, दिवाबत्ती, व राहण्यास जागा पुरविण्याचें नागरिकांस भाग पाडण्यांत आलें. ह्या जबरदस्तीचा तर लोकांस विशेषच राग आला. विशेषतः न्यू यॉर्क, बॉस्टन व चार्लस्टन येथील लोकांचे असेंब्लीनें या नवीन जुलुमास मान वाकवूं नये, अशा तऱ्हेची लोकांस सल्ला दिली.

अशा तऱ्हेनें लोकांनीं आपल्या सत्तेचा उपमर्द केल्यामुळें ब्रिटिश सरकार अधिक चिडलें व त्यानें अधिक जबरदस्तीचे उपाय अमलांत आणण्यास सुरुवात केली. न्यू यॉर्क येथील लोकांची असेंब्ली बंद ठेवण्यांत आली व तेथें बंडाच्या कायद्याची सक्त अंमलबजावणी चालू करण्यांत आली. व्यापारी कायद्यांची अंमलबजावणी कसून करण्याकरितां जकातीकमिशनरांच्या नवीन नेमणुका विलायतेंतून करण्यांत आल्या व त्यांना भरपूर सत्ता देण्यांत आली. तसेंच कांचमाल, छापखान्यांची शाई व कागद, चहा, दारू, तेल व फळफळावळ वगैरे वसाहतींत आयात होणाऱ्या मालावर जकाती

लादण्यांत आल्या. या जकातींपासून होणारे उत्पन्नांतून, ब्रिटिश सरकारचे अमेरिकेंतील गव्हर्नर, एजंट व इतर सरकारी ऑफिसर यांचे पगार देण्यांत यावयाचे होते, व या जकातींवर लोकांचे असेंब्लीची सत्ता बिलकुल चालावयाची नव्हती. ज्या कायद्यान्वयें ह्या जकाती बसविण्यात आल्या होत्या त्याला 'टाऊनशेंड ॲक्ट' असें ह्मणतात, ह्या जकाती जबरदस्त नसल्या तरी सर्व प्रकारचे नित्योपयोगी पदार्थांवर असल्यामुळें सर्व लोकाचे चरितार्थाचा खर्च वाढला व महागाई भासूं लागली.

खड्या लष्कराचे खर्चापेक्षांसुद्धां, गव्हर्नर व इतर ब्रिटिश अधिकारी यांचेवर असेंब्लीची कसलीच सत्ता चालावयाची नसल्यामुळें, वसाहतींतील लोकांस एक नवीनच अपमानास्पद प्रसंग आपल्यावर गुदरला असें वाटल्यास नवल नाहीं. बरें, हे नवीन अधिकारी तरी कसलेले हुशार लोक असत असें ह्मणावें तर तेंहीं बरेच वेळ नसे. ते कोणा तरी लॉर्डांचे कानष्ठ चिरंजीव असावयाचे, व त्यांचे हातून बंदोबस्तही बेताचाच ठेवला जाई, कारण ते कामाची टंगळमंगळ करीत असत, कॅरोलिना वसाहतींत तर या नालायख अधिकाऱ्यांमुळें, गुन्हेगारी व बेकायदेशीर व्यवहार यांना सुमतीऊत आला होता.

स्टँप ॲक्ट पास झाल्याचें कळतांच सुखावह दारूचे कोठारांत ठिणगी पडावी तसें सर्व अमेरिकेंतील वसाहतींत झालें. जिकडे तिकडे राजकीय सभा भरण्यास सुरुवात झाली, उत्तम वक्त्यांना जिकडे तिकडे मान मिळूं लागला. वर्तमानपत्रांतून या करांचे अनौचित्याबद्दल लेख फडकूं लागले. प्रत्येक शहरीं सभांतून पास झालेले ठराव पार्लमेंटकडे पाठविण्यांत येऊं लागले. हा कायदा अंमलांत राहूं नये, ताबडतोब रद्द व्हावा या हेतूनें खटपट करण्यासाठीं कित्येक वसाहतींनीं आपले प्रतिनिधी लंडन येथें पाठविले. हा कर बसवितांना ब्रिटिश पार्लमेंटची विचारपरंपरा खालीलप्रमाणें होती:— 'सप्तवार्षिक युद्ध इंग्लंडनें वसाहतींकरितां केलें, त्याअर्थीं वसाहतींनाच त्याचा फायदा मिळाला आहे, ह्मणून त्याचा सर्व खर्च वसाहतींनीच सोसावा हें योग्य आहे, व वसाहतींना स्टँपडयूटी भरून थोड्या वर्षांत हें कर्ज फेडणें शक्य आहे.'

७ वें) काय पेटवायचें तें ठाऊक आहे !

वसाहतींतील लोक ह्मणत, 'सर्व वसाहती इंग्लंडच्याच असल्याकारण.नें त्यांचें संरक्षण करणें हें इंग्लंडचें कामच आहे, शिवाय या युद्धांत वसाहतींनीं सैन्य व पैसा या दोन्ही रूपानें ब्रिटिश सरकारास द्यावयाची तितकी मदत दिलेलीच आहे इतकेंच नव्हे तर ब्रिटिश सरकारास जो इतका अफाट मुलुम लढाईंत मिळाला तो मिळण्यांत वसाहतवाल्यांचेंच रक्त सांडलें आहे, व ब्रिटिश सरकारास उलट फायदाच झाला आहे. कानडाचा सर्व मुलुख तर ब्रिटिश सरकारास निव्वळ नफ्यांत पडला आहे. हा नवीन कर भरण्यांत वसाहतवाल्यांचें निव्वळ आर्थिक नुकसानच नसून त्यामुळें त्यांचे स्वातंत्र्यास बाध येत आहे! वसाहतवाले असें ह्मणत कीं ' निव्वळ तत्वाकरितां आह्मास हा कायदा नको आहे. ब्रिटिश पार्लमेंटमध्यें जोंपर्यंत आमचे प्रतिनिधी नाहात तोंपर्यंत आमच्यावर कसलाही कर बसविण्याचा त्यास अधिकार नाहीं. पुनः जर युद्ध करण्याचा प्रसंग आला तर आह्मी तें स्वतः करूं, आह्मांस कोणाच्या मदतीची अपेक्षा नाहो '. या करासंबंधींच्या प्रारंभींच्या वादाववादात ब्रिटिश मुत्सद्दी विल्यम पिट यानें वसाहतवाल्यांची वाजू घेतली होती, पण पुढें विल्यमपिटला लॉर्ड चॅथॅम अशी पदवी मिळून तो लॉर्ड बनला, व स्टँप ॲक्ट पास झाला. हाऊस ऑफ लॉर्डस्मध्ये एकमत होऊन स्टँप ॲक्ट पास झाला होता. त्याचवेळीं तिसऱ्या जॉर्ज बादशहास वेड लागल्यामुळें या बिलावर सही होऊं होऊन शकली नाहीं, पुढें कांहीं दिवसांनीं राजाचेबदल जें कौन्सिल नेमलें होतें त्याची सही या बिलावर झाली. यावेळीं बेंजामिन् फ्रँकलिन् इंग्लंडमध्यें होता. त्यानें आपल्या एका अमेरिकन मित्रास पत्र लिहितांना लिहिलें कीं,' आतां अमेरिकन स्वातंत्र्याचा सूर्य अस्तास गेला आहे. उद्योगधंदे व काटकसर यांचा दीप पेटवून त्याचेवर आपल्यास काम निभावून घेणें प्राप्त आहे.' त्याचे मित्रानें त्याला परत उत्तर लिहिलें कीं, 'आपण शांत असा, आतां काय पेटवायचें तें आह्मांस नीट माहीत आहे.' यावरून त्यावेळचे लोकक्षोभाची नीट कल्पना येण्यासारखी आहे.

बंडाचा वणवा पेटला !– अशा तऱ्हेची या नवीन कायद्यानें केलेली लोकमताची पायमल्ली या नवोदित व स्वातंत्र्यप्रेमी राष्ट्रास खपली नाहीं.

मेघांचा कडकडाड व्हावा व मोठी वीज पडावी तशी स्थिति हा कायदा पास झाल्याचें ऐकतांच वसाहतींत उत्पन्न झाली. जे अभिमानशून्य शिळपट लोक होते ते नाशिबास दोष देऊं लागले व दुःख करूं लागले, पण जे जिवंत रक्ताचे होते त्यांना संताप चढला, त्यांच्या मनोवृत्ती अनावर झाल्या व त्यांनीं साधेल त्या मार्गानें प्रतिकार करण्याचें ठरविलें. आणि मोठमोठ्या शहरांत लोकांच्या टोळ्या हवालदिल होऊन रस्त्यांतून फिरूं लागल्या व कांहीं कांहीं ठिकाणीं अत्याचार होऊं लागले.

फिलाडेलफिया व बॉस्टन शहरीं शोकदिग्दर्शक आवाजांत चर्चच्या घंटा वाजूं लागल्या, व लोक ह्मणूं लागले कीं, ' स्वातंत्र्याचें हें मृत्युगीतच वाजत आहे ' न्यूयॉर्क शहरीं जंगी मिरवणूक निघाली. तेथें एका मोठ्या फळ्यावर मृत्यूचा अस्थिमय मुखवठा चिकटविण्यांत आला. त्यावर ' इंग्लंडचा मूर्खपणा व अमेरिकेचा सत्यानाश ' अशा अर्थाचा मजकूर लिहिला होता. हा फळा मिरवणुकीबरोबर फिरविण्यांत आला. निरनिराळे वक्ते येऊन आगींत तेल ओतल्याप्रमाणें भाषणें करीत होते. व्हर्जीनियाचे असेंब्लीचा पॅट्रिक हेनरी नांवाचा तरुण मेंबर होता, त्याचा क्रोध अनावर झाला व त्यानें पुष्कळ इतर मेंबरांस पुढाकार घेऊन पार्लमेंटास विरोधी भाषणें करण्याचा उपदेश केला पण कोणी तयार होईना, मग तो स्वतःच पुढें झाला. एका कायद्याचे पुस्तकांतील पान जोरानें फाडून तो ह्मणाला ' व्हर्जीनियांतील प्रत्येक माणूस इंग्रज रक्ताचा आहे व इंग्लंडांतील इंग्रज माणसांत असलेले एकूणएक अधिकार त्यास असले पाहिजेत. आपल्यावर बसत असलेल्या एकूणएक करांबद्दल पसंती नापसंती दर्शविण्याचा हक्क ज्याप्रमाणें प्रत्येक इंग्रजास आहे तसाच तो प्रत्येक अमेरिकन माणसासही असला पाहिजे ' आपल्या इच्छेविरुद्ध बसलेल्या कायद्यास विरोध करणें प्रत्येक वसाहतवाल्याचें पवित्र कर्तव्य आहे व जो असें न करील तो आपल्या देशाचा शत्रु आहे अशा तऱ्हेचे ठराव असेंब्लीपुढें आले, त्यांवर कडाक्याचे वादविवाद झाले, व सभेंत धुमाकूळ माजून राहिला. व्हर्जीनियाची असेंब्ली सर्वांत जुनी व नांवाजलेली होती व कांहीं तरी निर्णय देणें तिला प्राप्त होतें. या सभेंत युनायटेडस्टेटसचे भावी दोन प्रेसि-

डेट जातीनें हजर होते. एक जॉर्ज वाशिंगटन व दुसरा थॉमस जेफरसन्. दोघेही वादविवाद शांतपणें ऐकत होते. इतक्यांत पॉट्रिक हेनरीची स्वारी कडाडली, व तो फार जहाल भाषा बोलूं लागला व त्यांत त्यानें तिसऱ्या जॉर्ज बादशहासंबंधीं अनुदार विधानें केलीं. इतक्यांत सभेंत ' राजद्रोह ' ' राजद्रोह ' असा पुकारा कांहीं मेंबर लोकांनीं केला. तथापि त्यावेळीं उचित असे ठराव पास करून घेण्यांत आले, पण दुसऱ्या दिवशीं पॉट्रिक हेनरी सभेंत नव्हता त्याचा फायदा घेऊन आदल्या दिवशींच्या सभेंतील कांहीं ठरावांची भाषा सौम्य करण्यांत आली. ह्या सर्वांत जुन्या असेंब्लीनें घेतलेला पुरस्कार पाहून इतर असेंब्लींवर त्याचा इष्ट परिणाम होऊं लागला.

पहिली कलोनियल काँग्रेस—निरानिराळ्या असेंब्लींत नवीन कायद्याचे विरोधी ठराव होऊं लागले. बॉस्टनचे असेंब्लींत जेम्स ओटिस नांवाच्या सभासदानें सर्व वसाहतींची संयुक्त कांग्रेस बोलवावी असा ठराव आणला. प्रत्येक वसाहतीनें राजाची परवानगी न घेतां संयुक्त काँग्रेसला एक प्रतिनिधि पाठवावा आणि या काँग्रेसनें राष्ट्रानें प्रतिकाराचा कोणता मार्ग स्वीकारावा याची शहानिशा करावी. एकंदर नऊ वसाहतींनीं आपले प्रतिनिधी इ. स. १७६५ चे आक्टोबर महिन्याचें सातवे तारखेस न्यू यॉर्क येथें पाठविले व तेथें पहिली कलोनियल काँग्रेस भरली. या काँग्रेसमध्यें एकंदर अठ्ठावीस प्रतिनिधी होते व तिचा अध्यक्ष मॅसॅचुसेटसमधील टिमथी रगल्स नांवाचा गृहस्थ होता. बरीच भवति न भवति होऊन शेवटीं अगदीं सौम्य पण स्पष्ट अशा शब्दांत ठराव पास झाले. त्यांत ' सर्व अमेरिकन वसाहतवाले इंग्रज रक्ताचे आहेत व इंग्रज लोकांप्रमाणेंच त्यांच्या संमतीशिवाय त्यांच्यावर कोणताही कर बसवितां येणार नाहीं ' असें म्हटलें होतें. पार्लमेंटचे हाऊस ऑफ कॉमन्स व हॉऊस ऑफ लॉर्डस या दोन्ही सभांकडे या सभेचे ठरावांचे मसुदे पाठविण्यांत आले. त्याचप्रमाणें खुद्द बादशहांकडेही एक अर्ज करण्यांत आला होता.

तारीख एक नोव्हेंबरपासून स्टँप ॲक्ट अमलांत यावयाचा होता. ब्रिटिश अधिकाऱ्यांचे अगदीं सुरुवातीपासून योग्य अम्मलबजावणी व्हावी म्हणून कसून प्रयत्न चालू होते. आतांपर्यंत सर्व स्टँप छापले जाऊन

जिकडे तिकडे रवाना झाले होते. पण प्रत्येक ठिकाणीं कोणी ते खरेदीच करीना व कांहीं ठिकाणीं लोकांनीं त्यांचा नाश करण्यास प्रारंभ केला. अशारीतीनें तारीख एक नोव्हेंबर १७६५ हा ब्रिटिश खजिन्यांत नवीन वसूल येण्याचा प्रारंभींचा दिन न ठरतां सर्व वसाहतींभर सुतकाचा दिवस म्हणून मानण्यांत आला.

प्रथम सर्व कायदेशीर व्यवहारच बंद पडला व सर्व सरकारी ऑफिसें बंद ठेवण्याची पाळी आली. लग्न ठरलेलीं वधूवरें सुद्धां लग्नाचे करारास स्टँप लावावयाचा नाहीं म्हणून तशींच परत जात व अविवाहित स्थितींत राहण्याचें पतकरीत.

पुढें व्यवहार सुरू झाले पण कोणी स्टँप ॲक्टाचे कायद्यांत सांगितल्याप्रमाणें स्टँप लावील तर शपथ.

या सुमारास 'सन्स ऑफ लिबर्टी' नांवाची संस्था सुरूं झाली. या संस्थेचा उद्देश कोणत्याना कोणत्या उपायानें ब्रिटिश जुलमी कायद्यांचे अंमलबजावणींत घोटाळा माजेल असें करावयाचें, असा होता. न्यूयॉर्क, बॉस्टन व फिलाडेलफिया येथील व्यापारी मंडळींनीं असा ठराव केला कीं, स्टँप ॲक्ट रद्द होईपर्यंत ब्रिटिशमाल म्हणून मागवावयाचा नाहीं.

इ. स. १७६६ चे मार्च महिन्यांत स्टँप ॲक्ट रद्द झाला, त्यामुळें सर्व अमेरिकाभर आनंद झाला. पण हा आनंद लवकरच मावळला, कारण पुढें टाऊनशेंड ड्यूटीज म्हणून नवीन कर लागू झाले. त्यांची माहिती मागील प्रकरणीं आलीच आहे.

टाऊनशेंड ड्यूटीजचे कायद्यामुळें अमेरिकन लोकमतांत पुन्हां खळबड उडाली, व पुन्हां ब्रिटिश मालाचे बहिष्कारास सुरुवात झाली. वसाहतींतील सर्व वर्तमानपत्रें ब्रिटिश पार्लमेंटचे हेटाळणीनें भरलेलीं असत. इ स. १७६८ सालीं मॅसचुसेटसचे असेंब्लीनें एक पत्रक प्रसिद्ध करून इतर सर्व असेंब्लीजकडे पावून दिलें. त्यांत या नवीन कायद्यांच्या प्रतिकाराचे उपाय सुचविले होते. या प्रकाराबद्दल मॅसचुसेटसच्या असेंब्लीची ब्रिटिश अधिकाऱ्यांनीं फार कानउघाडणी केली व हें पत्रक

परत घेण्यास व तें प्रसिद्ध केल्याबद्दल दिलगिरी प्रदर्शित करण्यास भाग पाडलें.

या गोष्टीचा व्यापारी लोकांस फार राग आला, त्यांनीं आपलें बहिष्काराचें धोरण जोरांत पुढें चालविलें. इतकेंच नव्हे तर सरकारी जकाती चुकवून बेधडकपणें माल आयात करणें सुरूं केलें. इ. स. १७६८ सालीं एक मालानें भरलेली बोट जकात चुकवून जात असतांना कस्टम अधिकाऱ्यांनीं पकडली. त्याबरोबर बरीच गडबड माडली. लोकांनीं कस्टमचे अधिकाऱ्यांवर हल्ला केला व त्या आधकाऱ्याना जाव बचावण्यासाठीं कॅसल विल्यम यथें पळून जावें लागलें. लवकरच जिकडे तिकडे बंडाळी सुरूं होते कीं काय अशा भीति वाटूं लागली. जनरल गेज यांची त्या बंडाळीचा बीमोड करण्याचे कामीं नेमणूक करण्यांत आली. तो तारीख एक ऑक्टोबर १८६८ सालीं मॅसचुसेट शहर काबीज करावें अशा थाटानें शहरांत शिरला व लोकांवर जरब बसविण्याचें काम त्यानें सुरूं केले. त्याचेबरोबर सुमारें सातशें सैनिक होते.

इकडे पार्लमेंटचें डोकें ठिकाणावर नव्हतें, पार्लमेंटनें १७६९ सालीं मॅसचुसट्सचे सर्वच लोकांवर बंडखोरीचा छाप मारला व त्यांपैकीं जे सबळ सांपडतील त्यांना पकडून इंग्लंडला पाठविण्याबद्दल हुकूम सोडला. तेथें या गुन्हेगारांचा लष्करी कायद्याप्रमाणें चौकशी व्हावयाचा होती. मग मात्र आगींत तेल ओतल्याप्रमाणें झालें. मॅसचुसेट्सच्या जनरल असेंब्लीनें या ब्रिटिश हुकुमाविरुद्ध ठराव केला व इतर वसाहतींच्या असेंब्लीज्नींही तसेंच केलें.

नॉर्थ कॅरोलिनामध्यें प्रत्यक्ष बंडासच सुरुवात झाली. पण तेथल्या गव्हर्नरानें मोठ्या शिताफीनें बंडखोरांस पर्वताचे पलीकडे हांकून दिलें. त्याच हांकून दिलेल्या लोकांनीं टेनेसी वसाहत स्थापन केली

बॉस्टन येथील कत्तल—निरनिराळ्या अमेरिकन शहरांमध्यें ब्रिटिश शिपाई व अमेरिकन नागरिक यांच्यामध्यें फारसें प्रेम दिसून येत नव्हतें. ब्रिटिश शिपायांस अमेरिकन नागरिकांकडे तुच्छतेनें पाहण्याची व स्वतःच्या बडेजावाखातर वाटेल तेथें नागरिकांचा पाणउतारा करण्याची

खोडच लागून गेली होती. इ. स. १७७० सालीं या शिपायांनीं न्यूयॉर्क येथील एका उद्यानांत स्थापन केलेला ' लिबर्टी पोल ' ह्मणजे स्वातंत्र्याचा झेंडा कुऱ्हाडीनें तोडून टाकला. त्यावरून तंटा उपस्थित होऊन लोकांनीं शिपाई लोकांस चांगला चोप दिला. बॉस्टन येथील कांहीं उपद्व्यापी लोकांनीं, शहराचे संरक्षणाकरितां ठेवलेल्या कॅपटन प्रेस्टनचे तुकडीवर हल्ला केला व त्यांस भलभलत्या शिव्या दिल्या व तुमची छाती असेल तर गोळीबार करा असा सवाल केला, त्याबरोबर कॅपटन्प्रेस्टनचे शिपायांस चीड येऊन त्यांनीं गोळ्या झाडल्या, त्या झटापटींत तीन वसाहतवाले ठार झाले व बरेच जखमी झाले. या प्रसंगास अमेरिकन इतिहासांत बॉस्टन येथील कत्तल असें नांव आहे.

आतांपर्यंतच्या अनुभवानें इंग्लंडांतील राज्यकर्त्यांस अमेरिकेसंबंधानें कांहीं तरी निराळ्या प्रकारचें राजकारण केलें पाहिजे इतकें ठाऊक होतें. कांहीं तरी सवलती दिल्याशिवाय लोक ताळ्यावर येणार नाहींत हें स्पष्ट दिसूं लागलें होतें ह्मणून पार्लमेंटनें आतांपर्यंत वसाविल्या होत्या त्या चहाखेरीज इतर सर्व प्रकारच्या जकाती माफ करण्यासाठीं १७७० सालीं टाऊनशेंडॲक्ट रद्द केला व १७७२ सालीं एक कायदा पास झाला, त्यांत मॅसचुसेट येथील सरकारी अधिकाऱ्यांचा पगार तेथील असेंब्लीस न विचारतां तेथीलच खजिन्यांतून घेण्यांत यावा, असा हुकूम होता. त्यालाही वसाहतवाल्यांनीं नेहमींप्रमाणें विरोध केला. इतक्यांत ' गास्पी नांवाचें सरकारी जहाज प्रॉव्हिडन्स येथील वसाहतवाल्यांनीं भर बंदरांत पकडून, त्याच्यावर चढून, तें जाळून टाकल्याची बातमी इंग्लंडमध्यें येऊन पोहोंचली.

टाऊन शेंड ॲक्ट रद्द झाल्यामुळें वसाहतींतील नागरिकांस आपला एकप्रकारें जय झाल्याप्रमाणें वाटूं लागलें व ब्रिटिश मालास पहिल्याप्रमाणें मागणी जाऊं लागली व एक प्रकारचें समाधान उत्पन्न झाल्याचें चिन्ह दिसूं लागलें. पण चहावरील जकातीसंबंधीं मात्र व्यापाऱ्यांचे मनांत अद्यापि तेढ राहून गेली होती. चहाचे बाबतींत ईस्टइंडिया कंपनीखेरीज इतर कोणाचा चहा अमेरिकेंत येऊं द्यावयाचा नाहीं व या एका बाबतींत तरी पूर्ण मक्ता आपल्या हातांत राखावयाचा याविषयीं पार्लमेंटचें ठाम

मत झालें होतें कारण आतांपर्यंत चहाचा खप विलक्षण वाढला होता. वसाहतींत येणारा सर्व चहा इंग्लिश बंदरांत प्रथम उतरून तेथें त्यावर जकात भरून मगच वसाहतींत पाठविला पाहिजे असा निर्बंध घातला होता. वसाहतवाल्यांनीं ह्या कायद्यास धाब्यावर बसविलें. एकंदर पंधरा लक्ष पौंड चहा वसाहतींत खपे, पण त्यांतील नऊ दशांश चहा वसाहतवाले जकात चुकवून हॉलंडमार्गें किंवा थेट हिंदुस्थान व चीन देशांतून आणवीत. त्यावर तोड म्हणून व आपला कायद्याचा अंमल चालविण्याकरितां म्हणून ब्रिटिश चहा अमेरिकन व्यापारी जर आणतील तर त्यावर त्याला दर पौंडामागें एक शिलिंग ड्यूटी परत देण्याचा डाव ब्रिटिश सरकारनें खेळून पाहिला, कारण या नव्या युक्तीनें जकात चुकवून आणलेल्या चहापेक्षां सुद्धां जकात भरून आणलेला चहा स्वस्त पडे. अशा तऱ्हेनें ईस्टइंडिया कंपनीचा चहा प्रथम अमेरिकेंत घुसडण्यापासून ब्रिटिश सरकारला तात्कालिक आर्थिक लाभ कांहींच राहिला नव्हता, तरीपण अमेरिकन लोकांचे पचनीं आपला अधिकार पाडावा हाच हेतु या खटपटीचे बुडाशीं होता. उलटपक्षीं वसाहतवाले हा सर्व डाव ओळखून होते. त्यांनीं कांहीं झालें तरी ब्रिटिश चहाच आपले किनाऱ्यावर उतरूं द्यावयाचा नाहीं असा निश्चय केला. इ. स. १७७३ चे डिसेंबर महिन्याचे सोळावे तारखेस बॉस्टन बंदरांत ब्रिटिश चहा उतरल्याची वर्दी तेथील नागरिकांस लागली. लगेच नगरांत एक मोठी सभा भरविण्यांत आली, तिला शहरांतील एकूण एक लोक आले होते. या सभेंत सॅम्युएल ॲडॅम्स व जोशिआ क्विन्सी यांचीं भाषणें झालीं. सुमारें पन्नास नागरिक रेड इंडियन लोकांचा पोषाक करून आले होते सायंकाळ होतांच हे सर्व लोक चहानें लादलेलीं जहाजें नांगरून पडलीं होतीं तेथें गेले व जहाजांवर चढून त्यांनीं चहानें भरलेल्या मोठमोठ्या तीनशें पेट्या समुद्रांत फेंकून दिल्या, या प्रसंगास अमेरिकन इतिहासांत ' बॉस्टन टी पार्टी ' अशी संज्ञा आहे. न्यू यॉर्क व फिलाडेलफिया येथेंही चहानें भरलेलीं जहाजें पाठविलीं होतीं तीं तशींच खालीं न करितां लंडनला परत पाठवून देण्यांत आलीं. चार्लस्टन येथें व्यापाऱ्यांकडून चहा जबरदस्तीनें काढून घेऊन लोकांनीं एका कोठारांत कुलूप लावून ठेवला व तेथेंच तो सडून गेला.

या प्रसंगाची हकिगत जेव्हां पार्लमेंटला कळली तेव्हां पार्लमेंटनें या कृत्यांचा सूड घण्याचें ठरविलें, बॉस्टन बंदर व्यापाराकरितां बंद करण्यांत आलें. या बंदरांत बादशहांच प्रजाजनांस सुरक्षितपणें व्यापार करता येणें अशक्य झाल्यामुळें, व सरकारी जकातींच वसूल सुरक्षितपणेकरितां येणें अशक्य झाल्यामुळें, हें बंदर बंद करण्याकरितां लढाऊ जहाजेंहीं ठेवण्यांत आलीं. तेथील कस्टम हाऊस सालेम येथें नेण्यांत आलें. केवळ परदेशी व्यापारावरच अवलंबून असणाऱ्या या शहरांत थोडेच दिवसांत शुकशुकाट झाला सालेम शहरीं कस्टम हाऊस नेण्यांत आलें खरें, पण तेथील लोकांनीं ही पीडा परिहरण्यास आपण तयार नाहीं असें बजावलें. मार्बल हेड येथील व्यापाऱ्यांनीं बॉस्टन येथील व्यापाऱ्यांस आपलीं गोडाउन्स फुकट वापरण्यास दिलीं.

मॅसॅचुसेटस् वसाहतीची सनदच रद्द केली व यापुढें ही वसाहत म्हणजे फक्त बंडखोरांचा जमाव आहे असें ठरविण्यांत आलें व जे लोक कायदेशीर कामांत अडथळा आणतील त्या सर्वांस पकडून लंडनला पाठवून देण्याबद्दल मॅसचुसेटसचे गव्हर्नरास पूर्ण अधिकार मिळाले. व्हर्जीनिया येथील असेंब्ली रद्द करण्यांत आली होती, पण तिचे सभासद गुप्तपणें जमून त्यांनीं काम काज चालू ठेविलें होतें.

इ. स. १७७४ चे सप्टेंबर महिन्यांत दुसरी कलोनियल कांग्रेस फिलाडेलफिया येथें भरली. या कांग्रेसला अकरा वसाहतींनीं आपले सभासद पाठविले होते. या सभेनें तीन जाहीरनामे काढले. एक राजे-साहेबांकडे पाठविला, दुसरा इंग्रज लोकांस उद्देशून होता, व तिसरा कानडाचे लोकांस उद्देशून होता, त्याशिवाय सर्व वसाहतींतर्फे सर्व ब्रिटिश व्यापाऱ्यावर बहिष्कार घालण्याचा ठरावही पास झाला. ही हकीकत पार्लमेंटकडे गेल्यावर जनरल गेज यास या उद्धट लोकांस शिक्षा करण्याकरितां म्हणून पाठविण्यांत आलें. त्याचेबरोबर दहा हजार ब्रिटिश शिपाई होते. बॉस्टन नेकवर हल्ला करून ब्रिटिशांनीं तेथें तात्पुरता किल्ला उभा केला. केंब्रिज व चार्लस टाऊन येथील दारूगोळा व लष्करी स्टोअर बॉस्टन येथें आणण्यांत आलें.

७ वें) सभाबंदीची तंबी !

जनरल असेंब्लीस पुन्हां सभा न भरविण्याबद्दल ताकीद देण्यांत आली. जनरल असेंब्लीची गुप्तपणें सभा भरून त्यांत ब्रिटिशांविरुद्ध लढा-ईंत प्रतिकार करितां यावा म्हणून बारा हजार खडें सैन्य वसाहतींतर्फे उभें करण्याबद्दल ठराव पास झाला.



स्वातंत्र्य युद्धास सुरुवात

प्रकरण ८ वें

लढाईस सुरुवात—जनरल गेज यानें बॉस्टन बंदर ताब्यांत घेतांच बॉस्टन येथील नागरिक शहराबाहेर खटार गाड्यांत सामान घालून निघून जाऊं लागले. या सर्व खटारगाड्यांत लढाई करण्याची सामुग्री सांठवून गुप्तपणें त्या बॉस्टनपासून सतरा मैलांवर असलेल्या कंकॉर्ड गांवीं रवाना होत होत्या. वसाहतवाल्यांस या गुप्त लढाईचें महत्व फार होतें, कंकॉर्ड येथील लढाऊ सामानाची वर्दी ब्रिटिश सैन्यास लागतांच, तेथें चाल करून जाऊन ही सर्व लष्करी सामुग्री हस्तगत करण्याचा हुकूम ब्रिटिश सैन्यास सुटला. कर्नल स्मिथ व मेजर पिटकेर्न हे कंकॉर्डवर चाल करून निघाल्याचें समजतांच सर्व बॉस्टन शहर घंटानाद करून जागें करण्यांत आलें व वसाहतवाल्यांपैकीं दोन गृहस्थ विल्यम डॉवस व पॉल रिव्हेर हे घोड्यावर बसून लेक्सिंग्टन येथें सुमारें एकशेंतीस बंदुकवाले लोक या कंकॉर्डवर हल्ला करण्याकरितां जाणारे लोकांस अडथळा करण्यास सज्ज झाले. सायंकाळपर्यंत ब्रिटिश सैन्य आलेंच नाहीं पण सायंकाळीं मेजर पिटकेर्नचे हातांखालील लोक येऊन पोहोचतांच एक चकमक झडली व त्यांत वसाहतवावाल्यांचे सोळा स्वयंसेवक जखमी झाले व त्यांतील कांहीं मृत्यू पावले. अशा तऱ्हेनें पहिली चकमक लेक्सिंगटन येथें झडून स्वातंत्र्ययुद्धास राजरोस सुरुवात झाली.

त्यानंतर ब्रिटिश शिपाई कंकॉर्ड येथें सरळ चालून गेले. पण त्या-वेळेपर्यंत तेथील लढाऊ सामानाचा सांठा नागरिकांनीं हलवून दूर सुरक्षित ठिकाणीं नेऊन ठेविला होता, त्यामुळें ब्रिटिशांचे हातीं कांहीं लागलें नाहीं. ब्रिटिफ फौज कंकॉर्ड येथील दारूगाळ्याचा सांठा तपासून पहात असतां एकदम वसाहतवाल्यांचें सैन्य तिच्यावर चालून गेलें. दोन ब्रिटिश

शिपाई या झटापटींत पडले व बाकीचे लेक्सिंगटनचे मार्गें परत बॉस्टनकडे पळून गेले. या लढाईंत नॉर्थब्रिज हें ठिकाण वसाहतवाल्यांनीं ताब्यांत घेतलें. बंदुकांचे बार ऐकूं येतांच सर्वच दिशांनीं वसाहतवाल्यांचें सैन्य येऊं लागलें, सुमारें सहा मैल रस्त्यांवर शत्रूंस पळून जातां जातां पुरेवाट झाली व त्यांत त्यांचें सुमारें दानशें त्याहत्तर शिपाई मारद झाले. वसाहतवाल्यांचे सुमारें पन्नास लोक मेले व चौतीस जखमी झाले कंकॉर्डचे लढाईंत मिळालेल्या विजयाची बातमी चोहीकडे हां हां म्हणतां पसरली व त्यामुळें वसाहतवाल्यांस मोठें स्फुरण चढलें. सर्व देशभर युद्धाचें वारें दुमदूमून राहिलें. तरुण मंडळी स्वतःचे खर्चानें स्वयंसेवक बनून बॉस्टन येथें सैन्यास मिळूं लागली. येणेंप्रमाणें सुमारें वीस हजार स्वयंसैनिक लढाई करण्याकरितां तयार झाले. बॉस्टन शहराभोंवतीं खंदक खणून वसाहतवाल्यांनीं तात्पुरता किल्ला तयार केला. सेनापति गेज व त्याचे शिपाई यांस समुद्रांत हाकून देण्याचा वसाहतवाल्यांनीं आपला निश्चय बोलून दाखविला. न्यू हॅमशायरहून कॅपटन जॉन स्टार्क हा आपलें सैन्य घेऊन आला. इस्त्रायल पटनाम् हा तर अवघ्या अठरा तासांत शंभर मैल अंतर तोडून लढाईस येऊन मिळाला होता. र्‍होड आयलंडहून कर्नल नॅथानल ग्रीन व न्यू हॅवनहून बेनेडिक्ट आर्नोल्ड आपआपल्या सैन्यासह येऊन दाखल झाले.

टिकॉंडेरोगावर हल्ला.— व्हेर मॉंट येथील ईथॅन आलन नांबाचा योद्धा टिकोंडेरोगा नांवाच्या ब्रिटिश किल्ल्यावर अवघ्या जवणे तीनशें वसाहतवाल्या शिपायांनिशीं चाल करून गेला. तो टिकोंडेरोगा किल्ल्याचे समोर असलेल्या लेक जॉर्ज सरोवराचे काठीं येऊन पोंचला. दुसऱ्या दिवशीं अवघ्या त्र्यायशीं लोकांसह त्यानें तें सरोवर ओलांडून किल्ल्यावर हल्लां केला व मोठ्या शिताफीनें तो ताब्यांत घेतला व तेथील सर्व पलटणी निशस्त्र करून कैद केल्या. अचानक हल्ला आल्यामुळें किल्ल्यावरील मोठमोठ्या पलटणी सुद्धां भेदरून जाऊन वसाहतवाल्यांचे स्वाधीन झाल्या. या धाडशी प्रयत्नांत वसाहतवाल्यांस अजब यश आलें, व किल्ल्यांतील सर्व सामुग्री व दारूगोळ्याचा मोठा सांठा हातीं आल्यामुळें त्यांना पुढील कार्यक्रमांत मोठी मदत झाली. पुढें दोन दिवसांनीं याच सैन्यानें काऊन

पॉइंट नांवाचें नाकें हस्तगत केलें, त्यामुळें लेक जार्ज येथील ब्रिटिश सत्ता पूर्णपणें नष्ट झाली.

या अपयशानें चिडून जाऊन ग्रेट ब्रिटननें जनरल हॉव, क्लिन्टन व बर्गाइन या अधिकाऱ्यांचे हातांखालीं आणखी दहा हजार सैन्य बॉस्टन येथें पाठविलें. जनरल गेज आतां मोठी स्वारी करून आसपासचा मुलुख, गावें, शेतें, घरें वगैरे जाळून बेचिराख करून टाकणार आहे अशी सर्वत्र अफवा उठली. या अफवेचा आधार घेऊन बसाहतवाल्यांचें सैन्य जय्यत तयारी करून बंकरहिल येथें शत्रूंची वाट पहात दबा धरून बसलें. बसाहतवाल्यांच्या सैन्याचें आधिपत्य कर्नल विल्यम प्रेस कॉट याजकडे होतें त्याचे हातांखालीं बाराशें सैन्य होतें.

अगदीं रातोरात अमेरिकन लोकांनीं इतकें सैन्य जमा करून लढाईची तयारी केलेली पाहून ब्रिटिश सेनापति कॅपटन गेज चकितच झाला. त्यानें जनरल हॉव यास बसाहती सैन्यावर चाल करून जाण्यास सांगितलें. ब्रिटिश सैन्य अगदीं जवळ येऊन ठेपेपर्यंत बसाहतवाल्यांनीं एकही गोळी सोडली नाहीं पण तें आटोक्यांत येतांच बंदुकीचा असा विलक्षण मारा केला कीं, हॉवच्या सैन्यास मागें परतावें लागलें. शत्रूच्या माऱ्याच्या किंचित् पलीकडे जाऊन हॉवनें आपल्या सैन्याची पुन्हां जुळवाजवळ केली व मोठ्या निश्चयानें परत हल्ला केला. पण या हल्ल्यांतही ब्रिटिशांस यश मिळालें नाहीं. बसाहतवाले अचूक नेम मारीत व असा जोराचा मारा करीत कीं, ब्रिटिश सैन्याची दाणादाण उडे व त्यास पळण्याशिवाय दुसरा मार्गच रहात नसे. बसाहतवाल्यांजवळ दारूगोळा व अन्नसामुग्री फारच बेताची होती. तिसरा हल्ला ब्रिटिशांकडून झाला, त्यावेळीं त्यांच्याजवळ गोळ्या शिल्लक नव्हत्या. त्यांनीं दगड फेंकण्यास सुरुवात केली व बंदुकीच्या दस्त्यानेंच ठोकाठोकी सुरू केली पण त्यास मागें परतावें लागलें. या लढाईत ब्रिटिशांचे दहाशेंचोपन शिपाई निकामी झाले व बसाहतवाल्यांचे चारशेंवीस लोक निकामी झाले. अशा तऱ्हेनें स्वातंत्र्ययुद्धाची पहिली निकराची लढाई झाली. या लढाईंत जरी बसाहतवाल्यांना पूर्ण यश आलें नाहीं

तरी तीमुळें त्यांचें धैर्य न खचतां उलट वृद्धिंगत झालें. खेड्यांतून आलेलें, स्वत:घोड्यावरून व कधीतरी पोषाक करून लढणारें हे बसाहतना सैन्य पूर्ण शिस्तीच्या व्यवस्थित पाषाखाच्या ब्रिटिश सैन्याबरोबर उत्तम तऱ्हेनें लढूं शकतें ही गोष्ट आतांपर्यंतच्या लढायांत उत्तमपणें दिसून आली होती. या घनघोर युद्धाची बातमी, बसाहतींतून ताबडतोब जाऊन पोहोंचली. प्रत्येक ठिकाणीं विलक्षण उत्साह दिसून येई. जिकडे पहावें तिकडे स्वातंत्र्याची भाषा ऐकूं येई व लोक विलक्षण स्वार्थत्याग करण्या-साठीं उत्सुक आहेत असें आढळून येई.

ज्या दिवशीं टिकोंडेरोगा येथील किल्ला सर झाला त्याच दिवशीं फिलाडेलफिया येथें कलोनियल काँग्रेस भरली होती. वॉशिंगटन, जॉन ॲडॅम्स, सम्युअल ॲडॅम्स, बेंजामिन फ्रँकलिन्, पॅट्रिक हेन्री व जेफरसन हे सर्व देशभक्त त्या कांग्रेसला हजर होते. हे सर्व निरनिराळ्या पक्षाचे होते, पण शौर्यांत कोणी कोणास हार जाण्यापारखें नव्हतें. त्यांनीं एक-मतानें इंग्लंडच्या राजास एक खलिता पाठविला. त्यांत म्हटलें होतें कीं, "अमेरिकन बसाहतींना अन्याय, लूट व अपमान या तिहींचा प्रतिकार करण्याकरितां केवळ निरुपायानें लढावें लागत आहे. गुलामगिरीपेक्षां बसाहतवाले लढाईंत मृत्यु आला तरी आनंदानें सहन करितील !'

या कांग्रेसचे सुरुवातीस भाषण करितांना जॉन ॲडॅम्स म्हणाला कीं, 'सध्यांचे परिस्थितीकडे लक्ष देतां सर्व अमेरिकन सैन्यास एक सेनापति ताबडतोब नेमणें प्राप्त आहे व याकामीं ज्याला शिपाईगिरीचा चांगला अनुभव आहे अशा गृहस्थाची म्हणजे जॉर्ज वाशिंगटन याची नेमणूक त्या जागीं करण्यांत यावी.' येवढी मोठी मानाची जागा मिळाल्यावरोबर जॉर्ज वाशिंगटन यांचें हृदय विनयानें सगद्दित झालें.

बंकरहिलचे लढाईचे अगोदर फक्त दोनच दिवस काँग्रेसनें जॉर्ज वाशिंगटन याचे नेमणुकीस मान्यता दिलेली होती. यावेळीं त्यांचें वय फक्त त्रेचाळीस वर्षांचें होतें. शूर योद्धा, निःस्सीम देशभक्त व हुशार राजकारणी अशी त्याची अगोदरच ख्याती झाली होती. त्याचा जन्म

व्हर्जीनियांत झाला होता. वयाचे अकरावे वर्षापासून आपल्या मातेचे पोषणाची जबाबदारी त्याच्यावर येऊन पडली होती. त्याला शाळेंतील साधारण शिक्षण मिळालें होतें. कॉलेजचें शिक्षण त्याला लाभलें नव्हतें. सर्व्हेचें त्याने खास शिक्षण घेतलें होतें व त्या विषयाचा त्याला फार नादही होता. वयाच्या सोळाव्या वर्षीच त्याच्या चुलत्यानें साऊथ पोटोमॅक नदीचे खोऱ्यांतील जमिनीची मोजणी करण्यास पाठविलें होतें. ओहाओ कंपनींत लष्करी नोकरीत असतांना, ब्रॅडॉकचे सैन्याची धूळधाण होत असतांना, त्यानें त्याचा बचाव करून तें शिस्तीनें मागें परतून घेतलें, त्यामुळें त्याचा लौकिक झाला होता.

कमांडर इन् चीफचा हुद्दा मिळतांच मोठ्या तातडीनें त्यानें केंब्रिज् येथील सैन्याचें आधिपत्य स्वीकारलें. त्यापुढें स्वातंत्र्याचे लढाईचा शेवट होऊन वसाहतवाले विजयी झाले तोंपर्यंत एकंदर वसाहती सैन्याची जबाबदारी जॉर्ज वाशिंग्टनकडे होती.

अगदीं काँग्रेसच्या सुरुवातीस कांग्रेसनें वीस हजार खडें सैन्य ठेवण्याचा ठराव केला. पण या सैन्याचे खर्चाची तरतूद काय करावयाची हा मोठा प्रश्न येऊन पडला. सहकारी तत्त्वावरील वसाहतींचे राज्याचे कल्पनेतील मुख्य अडचण तिला आतां जाणवूं लागली. प्रत्येक वसाहत आपआपल्यापुरता वसूल करी, जकाती बसवी, व एकंदर राज्यकारभार करी पण आतांपर्यंत लढाई करावयाची झाली तर काय व्यवस्था करावी हा प्रश्नच काँग्रेसपुढें आला नव्हता. ह्या मुख्य प्रश्नाची तरतूद झालेली नसल्यामुळें वरचेवर वसाहतींचें राज्य व सैन्याचे अधिकारी यामध्यें कटकटी उत्पन्न होत.

सैन्याचें आधिपत्य स्वीकारतांच वाशिंगटनचे हातांखालीं चौदा हजार वसाहती सैन्य जमा झालें. त्याला कवाईत व शिस्त या दोन्हींचीही ओळख नव्हती, इतकेंच नव्हे तर शिस्तींत वागण्याची इच्छा पण त्याचे ठिकाणीं दिसून येईना. दारूगोळा व लढाऊ सामानाचीही तरतूद भरपूर नव्हती.



स्वातंत्र्यसंस्थापक जॉर्ज वॉशिंगटन.

८ वें) कानडानें केलेली निराशा

वाशिंगटननें या सैन्याचे तीन भाग पाडले. एक भाग आर्टीमस वार्ड याचे ताब्यांत देऊन त्याला रॉक्सबरी येथें स्थाइक केलें. दुसरा भाग चार्लस ली याचे ताब्यांत देऊन त्याला प्रॉसपेक्ट हिल येथें ठेविलें. तिसरा भाग स्वतःचे हातांखालीं घेऊन तो केम्ब्रिज येथें राहिला. बंकर हिलचे लढाईनंतर ब्रिटिशांनीं बॉस्टन शहरचा ताबा घेण्याचा प्रयत्न केला पण वसाहतवाले एक हातभरही मागें हटेनात व ब्रिटिश सेनापतींची खात्री होऊन चुकली कीं, उघड्या लढाईत जय मिळणें कठीण आहे.

जिकडे तिकडे हा वेळपावेतों ब्रिटिश सत्ता लोकांनीं झुगारून दिली होती व ह्मणण्यासारखा अडथळाही वसाहतवाल्यांस या कामीं केला नाहीं. व्हर्जीनिया-गव्हर्नरानें मात्र एक युक्ति काढली. त्यानें गुलाम होते त्या सर्वांस स्वातंत्र्य देण्याचें कबूल केलें व ब्रिटिशांशीं राजनिष्ठ असलेल्या लोकांचा संघ निर्माण करून वसाहतवाल्यांत फूट उत्पन्न करण्याचा प्रयत्न केला, पण या कामीं त्याला यश आलें नाहीं.

वसाहतवाल्यांना कानडा आपल्याशीं सहकार्य करून ब्रिटिश सत्ता झुगारून देण्याचे कामीं मदत करील ह्मणून मोठी आशा होती पण ती अगदीं फोल ठरली. जनरल शूलर व मॉंटगॉमरी या वसाहती-ऑफिसरांस सेंटजॉन्स व मॉंटरीयाल हे किल्ले घेण्यासाठीं पाठविण्यांत आलें होतें. जनरल मॉंटगॉमरीनें ब्रिटिश फलटणीपासून सेंट जॉन्सचा किल्ला हस्त-गत केला, व थोडे दिवसांत मॉंटरीयालचाही किल्ला हस्त-गत झाला. त्यानंतर जनरल मॉंटगॉमरीनें क्विबेकवर अवघ्या तीनशें शिपा-यांनिशीं हल्ला केला. केंब्रिज येथील सैन्यापैकीं एक हजार लोक बरोबर घेऊन त्याच वेळीं कर्नल आर्नोल्डही क्विबेकबर चाल करून येत होता.

क्विबेकला गांठीपर्यंत कर्नल आर्नोल्डचे फारच हाल झाले होते. आर्नो-ल्डचे व मॉंटगॉमरीचे मिळून अवघे नऊशें शिपाईच काय ते लढण्यासारखे उरले होते. त्या दोघांनीं मिळून क्विबेकवर निकराचा हल्ला केला पण शत्रू-च्या जय्यत तयारीपुढें त्यांचें कांहीं चाललें नाहीं. त्यांनीं वीस दिवसपर्यंत

वेढा कायम ठेविला पण किंवा किल्ला अतिशय दुर्गम असल्यामुळें व आयत्या-वेळीं मॉंटगॉमरीस गोळी लागल्यामुळें त्यांना मागें हटणें भाग पडलें. मॉंट-गामरीचे मृत्यूनें हतबल झालेलें सैन्य मागें हटलें तोंच आर्नोल्ड यासही भयंकर जखम झाली व पुढें त्या सन्यांत देवींची सांथ पसरली व सर्वच लोकांचा पराभव होऊन मागें हटावें लागलें. या स्वारीनें कानडा कायमचा ब्रिटिश राज्यास मिळाला व पुढें वसाहतींवर हल्ले कर-ण्यास तें एक सुरक्षित ठिकाण ब्रिटिश सैन्यास आयतें उपयोगीं पडलें.

कांग्रेसनें जॉर्ज बादशहास लिहिलेल्या खलित्याचें उत्तर आतांपर्यंत आलें होतें. वसाहतवाल्यांचा युद्धांत पाडाव करून त्यांना जेरीस आणून कायमचें नमवून टाकण्याशिवाय गत्यंतर नाहीं अस पार्लमेंटनें ठरविलें. पण या आत्मघातकी विचारानें अमेरिकन स्वातंत्र्याचा दिवस किंचित् लवकर उगवला असें म्हणण्यास हरकत नाहीं. बंकरहिलचे लढाईनंतर जन-रल गेज याचे जागीं जनरल हॉव हा सेनापति झाला, व त्यानें बॉस्टन येथें तळ दिला. सबंध हिंवाळाभर वॉशिंगटन बॉस्टन शहरास वेढा देऊन बसला होता. उन्हाळ्याचे तोंडास वॉशिंगटनचे मनांत बॉस्टनवर प्रत्यक्ष हल्ला करावयाचें आल होते, पण इतरांस ही कल्पना पटली नाहीं. ते म्हणाले, 'डॉरचेस्टर हाइटस् ही माऱ्याची जागा काबीज करून आपण बसावें म्हणजे तेथून वाटेल तेव्हां बॉस्टनवर हल्ला करून ब्रिटिश सैन्यास हांकून देतां येईल !' त्याप्रमाणें वसाहती सैन्यानें डॉरचेस्टर हाइट्स् ही जागा ताब्यांत घेतली व तेथें तळ दिला. आतांपर्यंत अमेरिकन सैन्य कां पलीकडे सर-कत आहे यार्चा दादसुद्धां जनरल हॉव यास नव्हती पण दिवस उजाड-तांच जेव्हां वसाहतवाल्यांनीं जोराचा मारा केला तेव्हां डॉरचेस्टर हाइट्स् ताब्यांत घेणें किंवा पळून जाणें याखेरीज त्यास दुसरें गत्यंतर नव्हतें. त्यानें अडीच हजार सैन्यास डॉरचस्टर हाइटस्वर हल्ला करण्यास फरमावलें. वाशिंग्टन ब्रिटिश सैन्याच्या हालचाली नीट पहात होता. त्याच दिवशीं गतवर्षी झालेल्या बॉस्टन येथील कत्तलीचा वर्षादिन असल्यामुळें वसाहत सैन्यासहा फार स्फुरण चढलें होतें. आतां बंकराहिलप्रमाणेंच जोराचें

युद्ध जुंपणार इतक्यांत मोठें वादळ झालें, व तें सुमारें एक दिवसपर्यंत चालू होतें. दुसरे दिवशीं सकाळपर्यंत वसाहतवाल्यांनीं आपल्या सैन्याची अधिक मागणी केली, त्यामुळें जनरल हॉव यास लढणेंच शक्य झालें नाहीं व त्याला पळ काढावा लागला. अशा रीतीनें न्यू इंग्लंडची राजधानी ब्रिटिशांचे हातून कायमची सुटली.

जें ठिकाण आपल्या ताब्यांत ठेवतां येणें शक्य नाहीं त्याची निदान जातां जातां जाळपोळ तरी करतां येते. वॉशिंगटननें, ब्रिटिश जनरलशीं पत्रव्यवहार करून बॉस्टन शहराचा जाळपोळीपासून बचाव केला. व उलट पळून जात असतां ब्रिटश सैन्यास त्रासही दिला नाहीं. तारीख सतरा मार्च १७७६ रोजीं सर्व ब्रिटिश लष्कर जहाजावर चढून बॉस्टनहून निघून गेलें व त्याच्यावरोबर ब्रिटिश लोकांस फितलेल्या सुमारें पंधराशें वसाहतवाल्यांनाही पळून जावें लागलें. ता २० मार्च रोजीं विजयी वॉशिंगटगनें मोठ्या थाटांत बॉस्टन येथें प्रवेश केला. वॉशिंगटनचे विजयाची सर्वत्र फार वाहवा झाली व त्याचे सन्मानार्थ एक मेडल पाडण्यांत आलें.

दुसरीकडे सुरू झालेल्या लढाया—बॉस्टन येथील विजयामुळें न्यू इंग्लंड ब्रिटिशांचे तावडींतून सुटलें, पण केवळ न्यू इंग्लंड म्हणजेच कांहीं सर्व अमेरिका नव्हे हें जाणण्याची न्यू इंग्लंडचे वसाहतवाल्यांनीं बुद्धिमत्ता दाखविली नाहीं. त्यांना वाटलें आपण सुटलों, आतां दुसऱ्या वसाहती आपआपल्यापुरतें पाहून घेतील. न्यू इंग्लंडच्या बचावाकरितां ज्यांनीं आपले प्राणसुद्धां अर्पण केले असते, अशा उत्कट देशाभिमानी लोकांस सुद्धां इतर वसाहतींचे बचावाकरितां धावून जाणें किती अगत्याचें आहे ह्याची नीटशी कल्पना नव्हती. या गोष्टीची जाणीव वॉशिंगटन ज्यावेळीं बॉस्टन येथील सैन्य हलवून न्यू यॉर्कचे बचावाकरितां तिकडे वळला त्यावेळीं वाशिंगटनला होऊन चुकली. जरी बॉस्टनचा बचाव झाला तरी शत्रूचा मोर्चा न्यू यॉर्ककडे वळल्यानें न्यू यॉर्कवर मोठी आपत्ति आली होती व ती टाळण्याकरितां जनरल ली यास वाशिंगटननें कनेक्टिकट येथील लढाऊ तुकडीबरोबर पाठविलें होतें. सर हेनरी क्लिंटन न्यू यॉर्कवर मारा करणार त्याच बेतास जनरल ली न्यू यॉर्क येथें पोहोंचला. न्यू यॉर्क येथील नागरि-

कांनीं स्वयंसेवकांचें पथक अगोदरच उभारलें होतें, इतक्यांत त्यांना जनरल लीची कुमक येऊन पोहोंचली. ब्रिटिशांचे तर्फे सर पीटर पार्कर व लॉर्ड कॉर्नवालीस हेही अडीच हजार सैन्यानिशीं ब्रिटिश फौजेस मिळाले. त्यांनीं चार्लसटनवर हल्ला केला व तो किल्ला सर करण्याचें ठरविलें. पण कॅरोलिनांतील सैन्यही तसेंच चिवट होतें, तें लवकर हार जाण्याचें लक्षण दिसेना. ब्रिटिश जहाजांनीं समुद्राचे मार्गानेंही हल्ला करून पाहिला पण त्यांचा टिकाव लागला नाहीं. चार्लसटनचा बचाव उत्तम झाला, ब्रिटिशांचे दोनशें शिपाई पडले व बसाहतवाल्यांचे फक्त बत्तीसच लोक पडले. ब्रिटिश सैन्य चार्लस्टन सोडून न्यू यॉर्कचे दिशेनें चाल करूं लागलें.

ब्रिटिश लोकांचा आतां सर्व मारा न्यू यॉर्कवर होणार हें ठरूनच गेल्यासारखें होतें. वॉशिंगटनचे सैन्यांत जरी आतांपर्यंत सुमारें सत्तावीस हजार लोक जमले होते तरी खरोखर उपयोगी सैन्य त्याच्यापाशीं बारा तेरा हजारांपेक्षां अधिक नव्हतें. शिवाय सैन्यापाशीं भरपूर दारूगोळा नव्हता, शिधासामुग्री नव्हती व शिस्त वगैरेही उत्तम नव्हती. सर्वच बाजारबुणगे व स्वयंसेवक सैन्य, तें कधीं हुकूम मानी तर कधीं अडून बसे. अशा विविध अडचणींतून वॉशिंगटन यास आपला मार्ग आखावयाचा होता, उलटपक्षीं ब्रिटिश लोकांपाशीं पैसा, दारूगोळा व शिधासामुग्री भरपूर होती. त्यांचें सैन्य कवाइती होतें व त्यांच्यांत शिस्तही वाखाणण्या-सारखी होती

एका लहानशा जर्मन संस्थानांतून ब्रिटननें सतरा हजार लढाऊ सैन्य पगारी ठेवून घेतलें होतें, तें अमेरिकेंत रवाना करण्यांत आलें. परकी शिपाई वसाहतवाल्यांवर घालून त्यांचा पराभव करून वसाहतवाल्यांची पुरी घूळधाण उडविण्याचा तिसऱ्या जॉर्जचा निश्चयच झाला होता. त्या-शिवाय पंचवीस हजार ब्रिटिश सैन्य जय्यत तयार करून अमेरिकेंत पाठ-विण्यांत आलें होतें व खर्चाचे कामीं दहा लक्ष डॉलरची स्पेशल मंजुरी देण्यांत आली होती.

८ वें) समेटाची आशा नष्ट होत चालली

आतांपर्यंत ज्या चकमकी झाल्या त्यांवरून लवकरच सलोखा होईल व इंग्रज लोकांबरोबर तडजोड होईल असें मानण्यास जागा होती. कोणीही पूर्ण स्वातंत्र्याची कल्पना मनांत आणीत नसे पण दिवसेंदिवस याही कल्पनेंत फेरबदल होऊं लागला. अमेरिकन लोकांचा राग राजा व प्रधानमंडळ यांजवरच जास्त होता. ब्रिटिश राज्यसंस्थेबद्दल त्यांना तितकासा तिटकारा वाटत नव्हता. खुद्द वॉशिंगटन यास सुद्धां इ. स. १७७६ पर्यंत मुख्य राष्ट्राशीं वसहतींनीं तुटून राज्यकारभार करणें चमत्कारिक वाटत होतें. परंतु युद्धांत जसजसा वसाहतवाल्यांचा अधिकाधिक नाश व नुकसान होऊं लागलें तसतसा ब्रिटिश राजसत्तेविषयींचा जिव्हाळा कमी होऊं लागला व पूर्ण स्वातंत्र्याची तहान वसाहतवाल्यांना लागूं लागली. अजूनही कांहीं जुनीं खोडें होतीं, त्यांच्या अंगांवर पूर्ण स्वातंत्र्य ह्मणतांच कांटा उभा राही. आतांपर्यंत ज्या प्रमुख लोकांस राजनिष्ठ ह्मणवून घ्यावें असें वाटत होतें त्यांना सुद्धां स्वातंत्र्याची कल्पना अधिकाधिक रुचूं लागली. दिवसेंदिवस सलोखा होण्याची आशाही कमी होऊं लागली होती. लोकांनीं असेंब्लीज्नां स्वातंत्र्य जाहीर करण्याबद्दल तगादा लावला; व असेंब्लीज्नीं काँग्रेसकडेही हेंच मागणें मागितलें.


काँग्रेसनें प्रथम प्रत्येक वसाहतीला जी राज्यपद्धति स्वातंत्र्य व सुरक्षितता यांशीं सुसंबद्ध अशी अमेल ती चालूं करण्यास परवानगी दिली व स्वतंत्रपणें कांग्रेसनें लोकमत अजमावण्याचें काम चालूं ठेवलें.

इ. स. १७७६ चे जून माहिन्याचे सातवे तारखेस रिचर्ड हेनरी ली या व्हर्जीनियातर्फेच्या सभासदानें काँग्रेसपुढें स्वातंत्र्याचा ठराव आणला, त्यावर पुष्कळ वादविवाद झाला, व स्वातंत्र्यवादी पक्षाचें बहुमत झालें. पुढें चार दिवसांनीं ता. ११ जून रोजीं, थॉमस जेफरसन, जॉन ॲडाम्स, बेंजामिन फ्रँकलिन्, रॉजर शेरमान् व राबर्ट लिव्हिंगस्टोन यांची कमिटी नेमली गेली व तिनें रीतसर स्वातंत्र्याचे जाहीरनाम्याचा मसुदा करावा असें ठरलें. त्याप्रमाणें पहिल्या जुलैस या कमिटीनें आपला रिपोर्ट प्रसिद्ध केला. दुसऱ्या तारखेस रिचर्ड हेनरी ली याचा ठराव जशाचा तसा मंजूर

झाला, व पुढें दोन दिवस आणखी स्वातंत्र्याच्या ठरावावर वादविवाद होऊन तारीख चार जुलै १७७६ रोजा दुपारीं २ वाजतां काँग्रेसनें स्वातंत्र्याचा ठराव जगजाहीर केला, जुलै महिन्याचे चवथे तारखेस अमेरिकेंत मोठा उत्सव होतो व त्या दिवसास ' स्वातंत्र्यदिन ' असें ह्मणतात.

या स्वातंत्र्यदिनाच्या उत्सवानें दाही दिशा दणाणून गेल्या होत्या. फिलाडेलफिया येथील नागरिकांनीं ताबडतोब ब्रिटीश निशाण खालीं पाडलें व रस्त्यांत जाळून टाकिलें. विल्यम्स्बर्ग, चार्लस्टन व सेव्हाना येथें मोठमोठ्या जयप्रदर्शक होळ्या पेटाविण्यांत आल्या व लोक या होळ्यांसमोर जमून, भाषणें करूं लागले व नागरिकांना उत्साह वाटेल अशीं आश्वासने देऊं लागले. बॉस्टन येथील नगर मंदिरांत हा स्वातंत्र्याचा जाहिरनामा वाचून दाखविण्यांत आला. न्यू यॉर्क येथील तिसऱ्या जॉर्ज बादशहांचा पुतळा खालीं पाडण्यांत आला व त्याच्यावर बंदुकीच्या गोळ्या झाडण्यांत आल्या. वॉशिंगटननें वसाहती सैन्याच्या प्रत्यक तुकडीस स्वातंत्र्याचा जाहीरनामा वाचून दाखविण्याबद्दल फर्मावि‍लें होतें.

स्वातंत्र्याचे जाहीरनाम्याचा मतितार्थः— ह्या नवीन जाहीरनाम्यांत काय काय सांगितलें होतें तें पाहूं. (१) प्रत्येक मनुष्याचे हक्क समान आहेत. (२) प्रत्येक मनुष्यास जीवित सुरक्षित राखण्याचे, स्वातंत्र्याचे, आणि आपल्या सोईस येईल तो धंदा करून राहण्याचे मूलभूत हक्क आहत. (३) मानवी राज्यव्यवस्था राजपुत्र किंवा राजे यांचे सुखसोईकरितां जन्मास आली नसून तिचा उद्देश फक्त लोकांचें कल्याण करणें येवढाच आहे. (४) ज्यावेळीं एकादी राज्यव्यवस्था स्वातंत्र्याचे आड येते, त्यावेळीं त्या राजव्यवस्थेंत फेरफार करण्याचा किंवा ती अजिबात नष्ट करण्याचा अधिकार लोकांस आहे. (५) जॉर्ज बादशहा (तिसरे) यांनीं लोकांच्या स्वातंत्र्याचा घात केला व त्यामुळें ते प्रजेच्या रोषास पात्र आहेत. (६) इंग्लंडचे राजे व त्यांचें प्रधानमंडळ यांनीं चालविलेली जबरदस्ती शेंकडों उदाहरणांनीं सिद्ध करितां येण्यासारखी आहे. (७) वरचेवर वसाहतींनीं आपणावर होत असलेल्या जुलुमाबद्दल दाद मागितली



स्वातंत्र्याच्या जाहिरनाम्याचा ठराव काँग्रेसनें पास केला.

आहे. (८) या सर्व मागण्या तुच्छता व तिरस्कार दाखवून फेटाळल्या गेल्या आहेत. (९) गुलामगिरींत खितपत पडण्यापेक्षां नाकारून आम्हांस तरवारीस घात घालणें भाग पडत आहे. (१०) म्हणून स्वातंत्र्य जाहीर करण्याचा आम्हांस पूर्ण अधिकार आहे व तो तसा असला पाहिजे. या आमच्या जाहीरनाम्याचीं अब्रु राखण्याकरितां कॉंग्रेसचा प्रत्येक सभासद जरूर पडल्यास आपलें जीवित, मालमत्ता व यश याची आहुति द्यावयास तयार आहे.

कॉंग्रसनें स्वातंत्र्याचा जाहीरनामा काढण्यापूर्वीच लोकांच्या मनांची पाहिजे तितकी तयारी झाली होती व कांहीं ठराव त्यांनीं अमलांतच आणावयास सुरुवात केली होती. ब्रिटिश सत्तेचा जुलूम व निष्ठुरता यांना कंटाळून त्यांच्या मनांचा पूर्वीच निश्चय कायम झाला होता, व पूर्ण स्वातंत्र्याच्या उपभोगाकरितां सर्वच नागरिकांचीं मनें स्वातंत्र्योत्सुक झाल्यास नवल कसचें ? विशेषतः थामस पेन याचें (Commonsence) (व्यवहारज्ञान) नांवाचें चोपडें वाचून वाचकांचीं डोकीं भडकून गेलीं होतीं व राजसत्तेचा केव्हां नायनाट करूं असें त्यांस होऊन गेलें होतें. स्वातंत्र्याचा जाहीरनामा बाहेर पडतांच प्रत्येक नागरिकास, झगडे युनायटेड स्टेट्स् ऑफ अमेरिकेचे प्रजाजनांस, मायदेशासाठीं प्राण, धन, किंवा यश अर्पण करण्याचा मोह झाला असल्यास आश्चर्य नाहीं.

आतां पहिला प्रश्न म्हणजे एका मोठ्या राष्ट्राशीं लढाई करून स्वतंत्र राष्ट्रांच्या यादींत आपली जागा पटकावावयाची. प्रश्न कांहीं लहान सहान नव्हता. एका बलाढ्य राष्ट्राशीं प्रसंग पडला होता. जुलै महिन्याचे आरंभास जनरल हॉव यानें नऊ हजार सैन्य स्टॅटन बेटावर जमा केलें होतें. तेथें क्लिंटन व कॉर्नवालीस हे चार्लस्टनहून नुकतेच मार खाऊन आलेले त्यास मिळाले. जनरल हॉवचा भाऊ अडमिरल हॉव हाही इंग्लंडहून नुकताच येऊन दाखल झाला होता. त्यामुळें न्यू यॉर्क शहराचे आसपास सुमारें तीस हजार ब्रिटिश फौज जमा झाली होती. यापैकीं निम्म्याहून अधिक, फ्रेडरिक दि ग्रेटकडून भाडोत्री घेतलेलें जर्मन सैन्य होतें. वॉशिंग-

टनच्या सैन्याची या सैन्यावर कोणत्याही बाबतींत वरचढ होण्यासारखी नव्हती. एकतर संख्येंत तें फार कमी होतें. त्यांना कवाइती शिक्षण किंवां शिस्तही वाखाणण्यासारखी नव्हती. अन्नपाण्याचा सांठा किंवा दारू-गोळाही बेताचाच जवळ होता, व लढाईचा अनुभव फारच थोड्यांस होता.

स्वातंत्र्याचा जाहीरनामा बाहेर पडतांच, इंग्रज लोकांस फार अंचबा वाटला. आतांपर्यंत ब्रिटिश राज्यकर्त्यांची अशी समजूत होती कीं, कांहीं आडदांड, आपमतलबी व निर्धन चळवळ्ये लोक मात्र नसती गडबड माजवीत आहेत, त्यांना सहज चिरडून टाकतां येईल व नंतर मोठमोठ्या शिक्षा फरमावतां येतील. पण आतां पहावें तों सर्व राष्ट्रच उलटलेलें दिसलें, व तेंही वोटल तो स्वार्थत्याग करावयास तयार झालेलें पाहतांच प्रधान मंडळाचें धाबें दणाणल्यास आश्चर्य कसलें? युरोपांतील प्रत्येक देशांतील राज्यकर्त्यांस व लोकांसही या स्वातंत्र्याचे ठरावानें चकित करून सोडलें. युरोपियन इतिहासांत याच्यासारखें दुसरें उदाहरण कोठें घडलेलें नव्हतें. या अचानक गोष्टीनें युरोप खडबडून जागें झालें व इंग्लंडचे मुत्सद्यांस कांहीं तडजोडीचा मार्ग निघतो कीं काय हें पाहण्याची किंचित् उशीराच कां होईना पण बुद्धि सुचली.

अमेरिकन लोकांशीं कांहीं तडजोड करतां आल्यास पहावी असें प्रधानमंडळानें ठरविलें, पण अमेरिकन लोक तडजोडीस तयार होतील कीं नाहीं याबद्दल प्रधानमंडळास शंका होती. लॉर्ड हॉव व त्याचा भाऊ ॲडमिरल हॉव हे बेंजामिन फ्रँकलिन् इंग्लंडमध्यें असतांना त्याचे स्नेही झाले होते, त्यांनीं बेंजामिन फ्रँकलिन यास ब्रिटिश सरकार व अमेरिकन लोक यांचेमध्यें मध्यस्थी करण्याबद्दल विनविलें. आतां काल फिरल्यामुळें हॉव बंधू आपल्या देशातर्फे अमेरिकन लोकांशीं तडजोडी-ची भाषा बोलण्यास एका पायावर तयार झाले होते. बेंजामिन फ्रँकलिन्वर आपलें वजन आहे अशा कल्पनेनें हॉव बंधू मनांत मांडे खात होते पण बेंजामिन फ्रँकलिन याचेकडून नम्र भाषेंतच पण सडेतोड उत्तर आलेलें पाहून त्यांची मति कुंठित झाली. आपण याउप्पर आमचे शत्रू आहांत असा फ्रँकलिनचे पत्राचा मतितार्थ होता.

त्यानंतर लॉर्ड हॉवनें जॉर्ज वाशिंगटन यास पत्र लिहिलें. त्या पत्रावर जॉर्ज वाशिंगटन याचे नांवावर त्याचा हुद्दा कमांडर इन् चीफ असा लिहिला नव्हता ह्मणून त्यानें तें पत्र न स्वीकारतां परत केलें. दुसऱ्या पत्रावर जॉर्ज वाशिंगटन इ. इ. इ. असा पत्ता लिहिला होता. इत्यादि इत्यादि शब्दाचा अर्थ कमांडर इन् चीफ असाही होऊं शकेल असें पत्र घेऊन आलेला जासूद ह्मणाला. पण तेंही पत्र स्वीकारण्यांत आलें नाहीं. तुमचे सर्व अपराधांस क्षमा करून शांतता स्थापित करण्याचा अधिकार तुह्मास देण्यांत आला आहे असा हॉवकडून निरोप आला, पण आह्मी कसलाही गुन्हा केला नसल्यामुळें आपल्यापासून आह्मी क्षमेची बिलकुल अपेक्षा करीत नाहीं असा वाशिंगटनकडून रोखठोक जबाब मिळाला.

लॉंग आयलंड येथील लढाई—सामोपचाराच्या भरंवसा अर्थात् वसाहतवाल्यांनीं दाद दिली नाहीं त्याबरोबर लॉर्ड हॉव व ॲडमिरल हॉव या दोघांनीं युद्धाची तयारी आरंभिली. तारीख २७ ऑगस्टला दहा हजार सैनिकांनिशीं ब्रिटिश लोकांनीं लॉंग आयलंडवर प्रवेश केला. त्यावेळीं ब्रुकलिन बेटाजवळ सुमारें सात आठ हजार अमेरिकन सैन्य जमा झालें होतें व तेथेंच लढाई जुंपली पण या लढाईचा कांहीं एक निकाल लागला नाहीं. दोन्ही पक्षांकडे बरेंच नुकसान झालें पण कांहीएक निकाल लागेना. अमेरिकन सैन्याची डावी बाजू जनरल पटनॅम याजकडे होती. त्यानें कांहीं ठरीव ठिकाणची नाकेबंदी करावयाची ती केली नव्हती, त्यामुळें तेथून शत्रूस यावयास मार्ग मिळाला व त्यानें त्याला घेरलें. या लढाईंत अमेरिकन लोकांचे तीन सेनापती कैद झाले, व सुमारें एक हजार सैन्य निकामी झालें. वॉशिंगटनला ज्यावेळीं ही बातमी समजली त्यावळीं त्याची फार निराशा झाली, तो तांतडीनें ब्रुकलिन येथें गेला व स्वतः सैन्याचें आधिपत्य स्वीकारून मोठ्या शिकस्तीनें त्यानें माघार घेऊन आपल्या सैन्याचा बचाव केला. त्यानें न्यू यॉर्ककडे परतण्याचें ठरविलें व तसें करणें अत्यंत दुर्घट होतें. सर्व रात्रभर उजाडण्याचे आंत सर्व सैन्य बोटीवर हळू हळू चढवून तो मोठ्या शिताफीनें पसार झाला.

सकाळीं उठून ब्रिटिश सेनापति पहातात तों कांहीं एक हालचाल दिसेना. कांहीं मेंडक्या तोडक्या बंदुका हातीं लागल्या तेवढ्या घेऊन ब्रिटिश सैन्यास स्वस्थ बसावें लागलें. अमेरिकन सैन्यानें अगदीं सहज हातांवर तुरी दिल्यामुळें ब्रिटिश सेनापतीस डोके खाजवीत कांहीं काल स्वस्थ बसावें लागलें.

लॉंग आयलंडवर मार खाया लागल्यामुळें अमेरिकन सैन्याची वाताहत होते कीं काय अशी भीति वाटूं लागली. सैन्यांपैकीं बरेच लोक निकामी झाले होते ते घरीं गेले. दुसऱ्या कोणाची मुदत संपली होती ते जावयास सिद्ध झाले व नवीन भरती होण्यासें चिन्ह दिसेना. मोठी पंचाईत येऊन पडली पण अशा स्थितींतसुद्धां वॉशिंगटन यानें अत्यंत परिश्रम करून सैन्यांत शक्य तितका बंदोबस्त राखण्याचा प्रयत्न केला.

आतांपर्यंत ब्रिटिश सैन्य न्यू यॉर्क शहरापासून अवघ्या तीन मैलांवर येऊन ठपलें. वॉशिंगटन यानें हारलम हाइटसपाशीं आपला तळ दिला होता. तारीख पंधरा सप्तंबर रोजीं दोनही पक्षांचे लोक इतके जवळ येऊन भिडले कीं त्यांच्यांत थोडीशी चकमक झडली व त्यांत ब्रिटिश लोकांचे सुमारें शंभर सैनिक दगावले.

पुढें एक महिन्यानें जनरल हॉव यानें वेस्टचेस्टरनजीक आपला तळ दिला. त्याचे मनांत वाशिंगटनचे सैन्याचे डावे बाजूवर हल्ला करून, पूर्वेकडील संस्थानांतून त्याला मिळत असलेली मदत बंद पडेल अशा तऱ्हेचीं जागा अडवून बसावें असें होतें पण हा त्याचा बेत वॉशिंग नने ओळखला व हारलेम नदीचे कांठीं त्यानें ब्रिटिश फौजेशीं सामना दिला. हॉवनें केलेल्या तोफेचे भडिमारास वसाहतवाल्यांनीं योग्य प्रत्युत्तर दिलें. पुढं वॉशिंगटन यास मागें हटणेंच इष्ट वाटल्यावरून तो नार्थ कॅसलचे टेकाडाकडे वळला व जनरल हॉव हा न्यू यॉर्ककडे परतला.

लवकरच अमेरिकन सैन्य हडसन नदी ओलांडून फोर्टली नांवाचा किल्ला सर करून बसलें. त्याचवेळीं कर्नल मॅगो ह्याचे हातांखालीं तीन हजार सैन्य असून तो फोर्ट वॉशिंगटन येथें दबा धरून बसला होता व जनरल ली चार हजार सैन्यानिशीं नार्थ कॅसल येथें तळ देऊन बसला होता.

यापुढें अमेरिकन सैन्यावर अनेक अरिष्टें कोसळलीं. ता. १६ नोव्हेंबर रोजीं फोर्ट वॉशिंगटन ब्रिटिश सैन्यानें हस्तगत केला. सर्व फौज कैद करून तिला न्यू यॉर्कचे तुरुंगांत डांबून टाकलें. पुढें दोन दिवसांत लॉर्ड कार्नवालीस यानें फोर्ट ली हा किल्लाही सर केला. आतां फक्त वॉशिंगटनजवळ तीन हजार सैन्यच राहिलें होतें. त्या सन्यास घेऊन तो हडसन नदींतून नेवार्कपर्यंत गेला. कॉर्नवॉलिसचे सैन्यानें त्याचा पाठलाग केल्यानें त्याला प्रिन्सटनपर्यंत पळून जावें लागलें व पुढें डिलावेर नदींतून ट्रेन्टन् येथपर्यंत जावें लागलें. मुख्य सेनापतीच्या अंगीं असलेलें धैर्य व समयसूचकता जर नसती तर तें सर्व सैन्य बेपत्ता झालें असतें अगर नाहीसें पावलें असतें.

दिसेंबर महिन्याचे आठ तारखेस वॉशिंगटन डिलावेर नदीचे पलीकडे पोहोंचला. लार्ड कार्नवालीस याचे जवळ नदी ओलांडण्या सारख्या नांवा वगैरे नसल्यामुळें, पुढें हिवाळ्यांत नदी गोठून कठीण होईपर्यंत तो तसाच वाट पहात राहिला. ट्रेंटन ही जागा फार महत्वाची होती, तेथें कार्नवालीसचे सैन्यानें तळ दिला. नदी गाठतांच पलाकडे जाऊन, फिलाडलफिया शहर काबीज करून तेथें असलेल्या सर्व अमेरिकन सैन्याचा पाडाव करून ब्रिटिश सत्ता पुन्हां स्थापन करण्याचा लॉर्ड कॉर्नवालीसचा विचार नक्की झाला होता. अमेरिकन लोकांस या गोष्टीचा आगाऊच अंदाज आल्यामुळें त्यांनीं काँग्रेस फिलाडेलाफियाहून बाल्टिमोर येथें नेली.

मध्यंतरीं ॲडमिरल पारकर याचे सैन्यानें न्यू इंग्लंडचे किनाऱ्यावर भाडिमार केला. ज्या दिवशीं वॉशिंगटननें डिलावेर नदी ओलांडली त्याच दिवशीं ब्रिटिश सैन्याने व्हाइट बेटावर गोळीबार केला, व ब्लॅकस्टोन नदींत अमेरिकन आरमार अडवून धरिलें. वॉशिंगटननें जनरल ली यास डिलावेर नदीचे पलीकडे आपल्यास येऊन मिळण्यास लिहिलें होतें, पण तो येऊन पोंचला नाहीं. वाटेंत त्याला ब्रिटिश घोडेस्वारांचे फलटणीनें पकडून न्यू यॉर्क येथें नेलें. त्याचे मागें जनरल सुलिव्हान यानें अमेरिकन सैन्य

ताब्यांत घेऊन तो वॉशिंगटन याचे सैन्यास येऊन मिळाला. एकंदर मिळून सुमारें दहा हजार सैन्य वॉशिंगटनजवळ होतें आणि तो प्रसंग तर अत्यंत आणीबाणीचा होता. वॉशिंगटन व त्याचें सैन्य जिवावर उदार होऊन येईल त्या दिव्यांतून पार पडण्यास सिद्ध झालें. वॉशिंगटनचें सैन्य ब्रिटिश सैन्याचे तोडसि तोड देण्यासारखें नव्हतें, त्यामुळें वसाहतींत एक प्रकारची नैराश्याची छट। पसरत चालली होती. असल्या आणीबाणीच्या प्रसंगांनीं वॉशिंगटनच्या चरित्रास उदात्त व उज्ज्वल स्वरूप आणलें आहे. असल्या विकट प्रसंगांतून पार पडणें म्हणजे त्याला नित्याची गोष्ट होऊन बसली होती, व माघार घेणें त्याला जन्मांत ठाऊक नव्हतें. त्यानें एक नवीनच बेत केला.

ब्रिटिश सैन्य जिकडे तिकडे पसरलेलें होतें, युरोपांतून भाडोत्री आणलेलें सैन्य अस्ताव्यस्तपणें पडलेलें असें. ब्रिटिश सैन्यांत किंचित् बेसावधगिरी उत्पन्न झाली होती, त्याला कारण मागील लढायांत त्याला सहजासहजीं विजय मिळाला होता व अमेरिकन सैन्याशीं अलीकडे मोठी चकमक झडलीच नव्हती. पोर्ट ट्रेंटन येथील ब्रिटिश छावणीवर वॉशिंगटननें डिलावेर नदी ओलांडून व सर्व अमेरिकन सैन्य एकत्र करून जोराचा मारा करण्याचा बेत केला.

अमेरिकन सैन्याचे तीन भाग पाडण्यांत आले. एका भागाकडे ब्रिस्टोल येथें नदी उतरून आसपासचे ब्रिटिश सैन्यावर भडिमार करण्याचें काम सोपविण्यांत आलें. दुसऱ्या भागास ट्रेंटनपलीकडे जाऊन तळ देण्यास सांगितलें होतें. हेतु हा कीं, शत्रूला त्या दिशेनें पळून जाण्यास मार्ग सांपडूं नये. वाशिंगटन स्वतः चोवीसशें सैन्य व दोन निवडक सेनापती यांसह ट्रेंटनचे वरचे अंगास नऊ मैलांपाशीं डिलावेर नदी उतरून आला व अचानक ट्रेंटनवर छापा घालण्याचा त्याचा विचार होता. क्रिस्टमसचे रात्रीं सर्व ब्रिटिश सैन्य बेसावध होतें व मजा करीत होतें, त्याचवेळीं वॉशिंगटननें छापा घालून मोठा विजय मिळविला.

८ वें) ब्रिटिश सैन्यावर अचानक छापा

त्यावेळीं डिलावेर नदी अर्धवट गोठलेल्या स्थितींत होती, त्यामुळें ती ओलांडणें अत्यंत बिकट असल्यामुळें शत्रूस विशेष हालचाल करितां येईना. दुसरे दिवशीं सकाळीं वॉशिंग्टननें ट्रेंटन हें शहर आपले ताब्यांत घेतलें, व तेथील फौज कैद करून दारूगोळा व लष्करी सामान काबीज केलें. या लढाईंत अमेरिकेचा एकही शिपाई दगावला नाहीं. ब्रिटिशांकडील थोडे लोक दगावले व कांहीं जखमी झाले. सुमारें नऊशें ब्रिटिश शिपाई कैद झाले पण हें सर्व जर्मनींतून भाडोत्री आणलेलें सैन्य होतें. या लढाईंत वाराशें बंदुका व सहा तोफा आणि बराच दारूगोळा वॉशिंग्टनला मिळाला.

या अचानक छाप्यामुळें बेसावध असलेलें ब्रिटिश लष्कर सावध होऊन प्रिन्स्टन येथें एकत्र झालें. आपला बहुतेक विजय झाला असें समजून विलायतेस परत जात असलेल्या लार्ड कार्नवालीसला ही बातमी न्यू यॉर्क येथें समजली. तो तांतडीनें प्रिन्स्टन येथें परत आला व शत्रूनें घेतलेली जागा परत मिळविण्याचे कामास लागला.

अशा रीतीनें स्वातंत्र्याचे लढाईचें पहिलें साल संपलें. अगदीं दहा दिवसांचे अगोदर जनरल हॉव हा आतां लढाई संपली व डिलावेर नदी किंचित् गोठतांच फिलाडेलफिया काबीज करून व इतर ठिकाणीं किरकोळ बंदोबस्त करून ब्रिटिश सत्तेचा सर्व वसाहतींवर विजय होऊन ब्रिटिश निशाण सर्व मुलूखभर फडकत राहील अशा सुखस्वप्नांत होता. बहुतेक काम आटोपून कार्नबालीस विलायतेस निघाला होता, त्यावेळीं हें अवचित आलेलें विघ्न पाहून ते दोघेही हतबुद्ध झाले असल्यास नवल नाहीं. लोकांच्या देशाभिमानानें विलक्षण उलट खाल्ल्यामुळें याउप्पर आपल्याला एकतरी ठाणें सुरक्षितपणें धरून बसतां येईल कीं नाहीं यासंबंधीं त्या दोघांस शंका वाटूं लागली.

नवीन वर्ष उजाडलें त्या दिवशीं वॉशिंग्टन ट्रेंटन शहरीं पांच हजार सैन्यानिशीं तळ देऊन बसला होता. लॉर्ड कार्नवालीस उत्तम योद्धा असल्यामुळें तो सहजासहजीं वाशिंग्टनचे सैन्यास हार जाईल असा प्रकार

नव्हता. तो प्रिन्स्टननजीक येऊन पोहोंचला व त्यानें एकदम अमेरिकन सैन्यावर हल्ला करण्याचें मनांत आणलें. ब्रिटिशांजवळ सैन्य भरपूर होतें व सामुग्रीही चांगली होती तारीख एक जानेवारी रोजीं दोन प्रहरीं दोन्ही पक्षांत लढाईस आरंभ झाला. वाशिंगटननें ताडलें कीं या लढाईंत जर पराभव झाला तर पळून जाण्याससुद्धां सुरक्षित जागा नाहीं. म्हणून त्यानें आसान पिकपर्यंत शिस्तीनें मागें हटण्याचें ठरविलें. सायं-काळीं कॉर्नवालीसनें प्रिन्स्टन शहर काबीज केलें. नंतर रात्र पडली म्हणून सकाळपर्यंत त्यानें मुक्काम केला. वॉशिंगटननें रातोरात तेरा मैल पुढें सरकून प्रिन्स्टन शहरावर हल्ला केला. सकाळीं उठून कॉर्नवालीसचे आज्ञेप्रमाणें ब्रिटिश लष्कर पुढील मुक्कामीं कूच करण्यास व वॉशिंगटनचे शिपाई प्रिन्स्टनमध्यें शिरण्यास एकच गांठ पडली. प्रिन्स्टन शहराचे सरहद्दीवर मोठी लढाई जुंपली. ब्रिटिश माऱ्याखालीं वॉशिंगटनचें सैन्य टेंकीस आलें पण त्यानें तसेंच नेटानें युद्ध चालविलें. थोड्याच वेळांत युद्धाचा रंग पालटूं लागला व सुमारें चारशें शिपाई युद्धांत पडल्यामुळें ब्रिटिश लोक मागें हटूं लागले, अमेरिकन लोकांचेंही या लढाईंत तितकेंच नुकसान झालें होतें. पण विजयश्रीनें त्यांनाच माळ घातली.

प्रत्यक्ष कॉर्नवालीसशीं गांठ असल्यानें मिळालेल्या विजयानें वॉशिंगटन चढून गेला नाहीं. तर अधिक सावधपणें लढूं लागला. दुसरे दिवशीं कॉर्नवालीसनें फिरून जोराचा मारा केला तेव्हां अमेरिकन सैन्यानें त्याला बगल दिली व तें मॉरिसटाऊन येथें जाऊन बसलें. कॉर्नवालीस न्यू ब्रन्सविक येथें परतला. गेल्या दहा दिवसपर्यंत वसाहतवाल्यांना बराच विजय मिळालेला पाहून न्यू जर्से येथील लोकांस धीर आला, व अधिक स्वयंसेवक लढण्यास तयार होऊं लागले. कॉर्नवालीसनें आपलें सैन्य न्यू ब्रन्सविक येथें एकत्र केलें.

उन्हाळ्याचे सुरुवातीस म्हणजे एप्रिल महिन्यांत ब्रिटिश सैन्यानें पीक्स्किल येथें हल्ला करून अमेरिकन लोकांची बरीच युद्धसामुग्री लांबविली.

ट्रायनची कनेक्टिकटवरील अमानुष स्वारी— तारीख २५ एप्रिल रोजीं जनरल ट्रायन या ब्रिटिश सेनापतीनें कनेक्टिकटवरील स्वारीस सुरुवात केली. ट्रायननें आपल्या स्वागींत इतका अमानुषपणा चालविला होता कीं, ब्रिटिश जनरल हॉव ह्यानें सुद्धां ट्रायनच्या अमानुष व क्रूर कृत्यांची फार निर्भत्सना केली, व त्याच्या कृत्यांनीं ब्रिटिश राजनीतीस काळिमा आणिला आहे असें ह्मटलें. ट्रायननें डॅनबरी, नारवॉक आणि फेअर फील्ड हीं गांवें बेचिराख केलीं, टाप्पान येथील एका अमेरिकन सैन्याचे तुकडीची त्यानें कत्तल करून प्रत्यक शिपायास ठार मारलें, व त्याचप्रमाणें वायन येथील दुसरी सैनिकांची टोळी तडजोडीचें बोलणें करण्यास तयार असतांना देखील तींतील सर्वांना ठार मारलें. वाटेल तेथें जाळपोळ व लूट करून त्यानें धुमाकूळ मांडला होता. त्याच्या या अमानुष छळांतून बेनिडिक्ट आर्नोल्डसारखे देशभक्त सुटून आल्यामुळें त्यांच्यावर कांहीं विशेष दैवी कृपा आहे असें लोक समजूं लागल्यास आश्चर्य नाहीं.

सांपडतील तितकीं घरें व धर्मशाळा जाळून व नागरिकांचा सर्व मार्गांनीं छळ व उपमर्द करून कनेक्टिकट प्रांतांताल एकूण एक गांवें उध्वस्त करण्याचा व लुटण्याचा ट्रायननें निश्चयच केला होता. या अमानुष छळास तोंड देण्याकरितां सहाशें लोकांचे अमेरिकन टोळीनें निश्चय केला. बेनेडिक्ट आर्नोल्ड व वूस्टर या पुढाऱ्यांचे अंमलाखालीं त्यांनीं ट्रायनचा डॅनबरी येथें प्रतिकार करण्याचें ठरविलें. अमेरिकन स्वयंसेवकांची टोळी संतापानें इतकी बेहोष झाली होती कीं अवघ्या चारशें लोकांसह तिनें ट्रायनचे सैन्याचे पिछाडीस हल्ला करून चाळीस लोक गारद केले.

ट्रायन लढाईचे भानगडींत न पडतां पुढेंच चालला होता पण पुढच्या बाजूनें बेनेडिक्ट आर्नोल्डचे लोकांनीं त्याच्यावर हल्ला केला त्यामुळें त्याला लढाईला तोंड देणें भाग पडलें.

यावेळीं आर्नोल्डचीही परिस्थिति चमत्कारिक झाली होती. त्याला मागें किंवा पुढेंही पळण्यास वाव राहिला नाहीं, तो धैर्यानें तसाच लढत

राहिला, इतक्यांत त्याचा सहकारी वूस्टर हा लढाईंत पडल्याची बातमी त्याला समजली, तरीही तो डगमगला नाहीं, वूस्टरचेही लोक आपल्या पाठीशीं घेऊन तो शत्रूवर तुटून पडला. समोरून गोळ्यांचा वर्षाव चालूं होता. आर्नोल्डच्या घोड्यास अनेक जखमा होऊन तो जायबंदी झाला तरी आर्नोल्डला एकही गोळी लागली नव्हती व तो पायींच लढत होता. इतक्यांत एका जबरदस्त शिपायानें आर्नोल्डचे हातांस धरून, तुम्ही आमचे कैदी आहांत असें तो ह्मणाला. आर्नोल्डनें चलाखी करून बंदुकीचा दस्ता त्या शिपायाचे छातीस लगावून तो जंगलांत पसार झाला, तो पुढें कित्येक दिवस सांपडला नाहीं.

दोन्हींकडील पक्षांची या लढाईंत मनस्वी प्राणहानि झाली. पुढें थोडेच दिवसांनीं बेनेडिक्ट आर्नोल्ड ह्यानें सुमारें पांचशें लोकांसह ट्रायनचे सैन्यावर चाल केली व त्याला असें सतावून सोडलें कीं त्याचे तीनशें शिपाई ठार झाले व बराच दारूगोळा अमेरिकन सैन्याचे हातीं पडला व ट्रायनचे सैन्यास पळ काढून जावें लागलें.

तारीख २२ मे रोजीं अमेरिकन सैन्यातर्फे कर्नल मीग्ज हा लॉंग आयलंड ओलांडून लॉंग आयलंडावरील ब्रिटिश फौजेवर चालून गेला व तेथील सर्व फलटण त्यानें कैद केली व बराचसा दारूगोळा व लढाऊ सामान लांबविलें.

नवीन वर्षाचे सुरुवातीपासूनच वॉशिंगटनचे मनांत हडसन नदीवर आपलें सर्व लष्कर एकत्र करण्याचें होतें. त्यानें बेनेडिक्ट आर्नोल्ड याचे हातांखालीं सैन्यास शिस्त व कवाईत शिकविण्याचें काम दिलें. मे महिन्याचे सुरुवातीस वॉशिंगनटनें ब्रिटिश कँपापासून दहा मैलांवर तळ दिला, जनरल हॉवनें त्याला तेथून धुडकावून लावण्याचा प्रयत्न केला पण तो साध्य झाला नाहीं. नेहमीं चकमकी झडत पण शेवटीं ब्रिटिशांना मागें हटावें लागलें व न्यूजर्से सोडून शेवटीं स्टॅटन आयलंडपाशीं जाऊन त्यांनीं तळ दिला.

या वेळीं अमेरिकन कॉंग्रेस बाल्टिमोरहून पुन्हां फिलाडेलफिया येथें आणण्यांत आली. सर्व देशभर एक प्रकारचा आत्मविश्वास

फैलावलेला आढळून येत होता. शत्रूला समरांगणावर जरी अजून चारी मुंड्या चीत करण्यांत आलें नव्हतें तरी तो मागें हटत होता हें समाधान कांहीं कमी नव्हतें. देशभक्त राष्ट्रीय निशाणाखालीं जमा होऊं लागले होते पण भेकड होते, त्यांना आपलें कसें होईल याचीच चिंता लागून राहिली होती. खुद्द फिलाडेलफिया येथेंही भेकड लोकांची संख्या कांहीं कमी नव्हती. ब्रिटिश लोकांची पिच्छेहाट होण्याचे अगोदर दोनच महिने राजनिष्ठ लोकांनीं मिळून तिसऱ्या जॉर्ज बादशहास आयुरारोग्य मिळावें म्हणून ईशप्रार्थना केली होती पण आतां सर्वच पारडें फिरलें होतें. आज तर स्वातंत्र्याच्या जाहीरनाम्याचा प्रथम वाढादिवस होता व सर्व शहरभर मोठ्या अभिमानानें स्वातंत्र्योत्सव साजरा होत होता.

फ्रान्स देशाची नवीन राष्ट्राबद्दल सहानुभूति—अमेरिकन कांग्रेसपुढें आतां एक नवीनच प्रश्न प्रामुख्यानें आला होता. तो म्हणजे परराष्ट्रीय संबंधाचा. इतर युरोपियन राष्ट्रांनीं अमेरिकेचें स्वातंत्र्य मान्य केल्याशिवाय व सहानुभूति दाखविल्याशिवाय अमेरिकेची विशेष प्रगति होणार नाहीं हें सभासद जाणून होते. स्वातंत्र्य जाहीर होऊन एक वर्ष होऊन गेलें, अद्यापि अमेरिकन लोक ब्रिटिश राजसत्तेस हार नेलेले नव्हते इतकेंच नाहीं तर, एक दोन वसाहतींतून त्यांनीं ब्रिटिशांना पार हाकलून दिलें होतें. या गोष्टींचा इतर राष्ट्रांच्या मनांवर परिणाम झाल्यावांचून राहिला नव्हता. अगदीं स्वातंत्र्याचे जाहीरनाम्याचे प्रथम दिवसापासून फ्रेंच लोकांची अमेरिकन लोकांबद्दल फार सहानुभूति होती. यावेळीं इंग्लंड व फ्रान्स या देशांमध्यें शांततेचें वातावरण होतें तरी सुद्धां नवीन उदय पावणाऱ्या राष्ट्राबद्दलची फ्रान्सची सहानुभूति झांकली जाण्याइतकी अल्प नव्हती. फ्रान्सचे प्रधान मंडळास ब्रिटिशांशीं लढाई उकरून काढावयाची नव्हती, तरीसुद्धां इंग्रजांचे प्रत्येक अपजयाबरोबर त्याचा आनंद वृद्धिंगत होई. पण पुढें पुढें तर फ्रेंच लोक उघड मदत करण्यास तयार झाले. तुह्मांस लढाई वगैरे चालविण्याकरितां कर्ज पाहिजे असल्यास आह्मी देऊं असें फ्रेंच प्रधान मंडळानें अमेरिकन लोकांस कळविलें. आह्मी तुह्मांस

हत्यारें वगैरे पाहिजे असल्यास पुरवठा करूं असेंही सांगितलें. इ. स. १७७७ सालीं फ्रेंच राष्ट्रानें चोरून मारून किंवा उघड रीतीनें मिळून एकंदर २० हजार बंदुका व हजार पिपें बंदुकींची दारू पुरविली.

यावेळीं फ्रान्स देशांत सुद्धां प्रजासत्ताक राज्याची इष्टता लोकांना पटूं लागली होती व त्या कल्पनेला चालना मिळावी ह्मणूनच त्यांना अमेरिकेस मदत करण्याची स्फूर्ति आली असावी असें दिसतें. जिलबर्ट मोटिअर मार्क्विस ऑफ लाफाएट याला तर अशी प्रबल इच्छा उत्पन्न झाली कीं स्वतःच एका गलबतावर बसून फ्रेंच आरमारी खात्याची नजर चुकवून अमेरिकन लोकांचे मतदीकरितां तो निघाला. त्याला बॅरॅन डी काल्व व इतर कांहीं स्नेहीही येऊन मिळाले. व त्याची बोट इ. स. १७७७ चे एप्रिल महिन्यांत साउथ कॅरेलिंना येथें पोहोंचली. तो एक सामान्य शिपाई ह्मणून नोकरीस राहिला पण पुढें लवकरच त्याला मेजर जनरलचा हुद्दा मिळाला.

आतां लष्करी दृष्टीनें ब्रिटिश ऑफिसरांना अधिक परिणामकारक मार्ग शोधून वसाहतवाल्यांची गळचेपी केली पाहिजे हें उघड दिसत होतें. जवळच्या कानडाचे हद्दींतील राजनिष्ठ नागरिकांच्या सान्निध्याचा फायदा घेणें त्यांना प्राप्त होतें, तेथून सेंट लॉरेन्समधून जहाजांच्या साह्यानें वाटेल तिकडे आरमारी हल्ले करणें विशेष सोपें होतें.

जनरल बर्गाइन यानें कानडांत, कॅनेडियन हेसियन व इंडियन लोकांचें सुमारें दहा हजार सैन्य जय्यत तयार केलें. त्याचा विचार उत्तरेचे बाजूनें आलबानी व न्यूयॉर्कवर जंगी हल्ला करून न्यू इंग्लंडचा मध्यवर्ती व दाक्षिणेकडील वसाहतींचा संबंध तोडून टाकावा व त्यांना एकटे पाडून ठोकावें असा होता. तारीख एक जून रोजीं ही स्वारी लेक चॅप्लेनपर्यंत येऊन पोंचली व तारीख १६ जून रोजीं ब्रिटिश सैन्यानें क्राऊन पाईंट सर केला, व तारीख पांच जुलै रोजीं टिकोंडेरोगा किल्ला ब्रिटिश सैन्यानें परत घेतला. तेथील तीन हजार अमेरिकन सैन्य पळून गेलें पण त्यानेंच पुढें थोड्या अंतरावर ब्रिटिश सैन्यास रोखून धरलें. दुसऱ्या दिवशीं ब्रिटिश सैन्यानें व्हाइटहॉल हें ठिकाण घेतलें, व अमेरिकन लोकांचा दारूगोळा सर केला.

अशा रीतीनें ब्रिटिश सैन्याचा ठिकठिकाणीं विजय होत चालला. टिकोंडेरोगाचा किल्ला जो वसाहतवाल्यांनीं महत्प्रयासानें मिळविला होता तोही हातचा गेला, तरी सुद्धां त्यांचें धैर्य खचलें नाहीं. ते ब्रिटिश सैन्यावर चोरून मारून हल्ले करून त्यांला चैन पडूं देत नसत. त्यामुळें ब्रिटिश सैन्य वरेंच जेरीस आलें होतें. तारीख दहा जुलै १७७७ रोजीं अमेरिकन सेनापति कर्नल बार्टन यानें जनरल प्रेस्कॉट याजवर न्होड आयलंड येथें मोठा हल्ला केला, प्रेस्कॉट नजीकच्या एका शेतांत रहात असे व हल्ला अचानक झाल्यामुळें त्याचे सैन्याची मुळींच तयारी नव्हती. कर्नल बार्टन निवडक चाळीस लोकांनिशी जनरल प्रेस्कॉट रहात असे तेथून अगदीं थोड्या अंतरावर दबा धरून बसला. रात्रीं अचानक त्या घरावर छापा घालून त्यानें जनरल प्रेस्कॉट यास कैद केलें व त्याला घेऊन तो बोटीवर चढला. त्यानें हें काम इतक्या गुपचूप व झटपट केलें कीं ब्रिटिश लढाऊ जहाजांचे अगदीं जवळून त्याची बोट गेली तरी कोणास पत्ता लागला नाहीं. कांग्रेसनें बार्टनच्या शौर्याबद्दल त्याला एक मानाची तरवार बक्षीस दिली.

बेनिंगटनची लढाई—तारीख तीस जुलै रोजीं जनरल बर्गाईननें फोर्ट एडवर्ड सर केला. पण येथें त्याचे जवळची शिधासामुग्री संपत आल्यामुळें, त्यानें दोन फलटणी शत्रूचे गोटांत शिरून तेथून पाहिजे ती सामुग्री परत आणण्याकरितां पाठविल्या. जनरल फिलिप शूलर या अमेरिकन सेनापतीची व त्यांची बेनिंगटन येथें गांठ पडली. व मोठी लढाई जुंपली. त्यावेळीं वसाहती सैन्य इतक्या निकरानें लढलें कीं शत्रूस लेक्सिंटन व बंकरहिलच्या लढाईची आठवण आली. शिधासामुग्री तर राहोच पण जीव बचाऊन परत जातां जातां ब्रिटिश सैन्याची तिरपिट उडाली, व त्यांचे आठशें लोक जायबंदी झाले. अशा तऱ्हेनें अमेरिकन लोकांनीं ब्रिटिश लोकांवर जंगी विजय मिळाविल्यामुळें वसाहतवाल्यांच्या उत्साहास पारावार नाहींसा झाला. हें नवीन राष्ट्र विजयोत्सवानें दुमदुमून गेलें.

फोर्ट शूलरवर जनरल सेंट लेजर यास ब्रिटिश सेनापतीनें पाठविलें होतें, त्यानें फोर्ट शूलर सर केला होता. तेथें जनरल हार्किमर नांवाच्या

अमेरिकन अधिकाऱ्यानें स्थानिक सैन्य जमा करून हल्ला परतविण्याचा प्रयत्न चालविला पण त्यास यश आलें नाहीं. याच सुमारास बेनेडिक्ट आर्नोल्ड हा प्रकट झाला. त्याचेबरोबर फार थोडे पण निवडक लोक होते, व तेवढ्यांचे सहाय्यानें फोर्ट शूल्डर शत्रूकडून परत मिळविण्याचा निर्धार त्यानें केला होता. एका अर्धवट मनुष्यास पकडून त्यानें कैदी करून ठेवलें व त्याचे मनावर आपलेपाशीं फार मोठें सैन्य आहे ही गोष्ट बिंबविली. नंतर कांहीं निमित्तानें तो ब्रिटिश कँपाकडे पळून जाईल अशा बेतानेंच त्याला मुक्त करण्यांत आलें. तो जो गेला तो थेट ब्रिटिश छावणींत तेथें त्यानें बेनेडिक्ट आर्नोल्ड हजारो सैन्य घेऊन छावणीकडे चालून येत असल्याचें सांगितलें. बेनडिक्ट आर्नोल्डचा तडाखा ब्रिटिश ऑफिसरांस माहीत होता. शिवाय त्याच्यासंबंधीं अद्भुत गोष्टी प्रसिद्ध असल्यामुळे इंडियन सैन्य घाबरलें व त्यानें पळ काढण्यास सुरुवात केली. त्यामुळें इतर ब्रिटिश सैन्यासही माघार घ्यावी लागली.

लवकरच फोर्ट एडवर्ड येथील कँपांत बिटिशांच्या मुख्य सेनापतीलाही पराजयाची बातमी समजली.

जवळची शिधासामुग्री संपून गेल्यामुळें व दोन ठिकाणीं लोक शिधा सामुग्री लुटून आणण्याकरितां पाठविले ते मार खाऊन परत आल्यामुळें जनरल बर्गाइन् यास कॅनडाहून सर्व सामुग्री येईपर्यंत म्हणजे एक महिनाभर स्वस्थ बसावें लागलें. सर्व ठिकाणांहून विजयाच्या बातम्या येऊं लागल्यामुळें अमेरिकन सैन्यासही किंचित् धैर्य आलें व त्याचा नवीन सैन्यभरतीवर उत्कृष्ट परिणाम होऊं लागला. जिकडून तिकडून खंदे वीर आपापल्या सेना घेऊन जनरल शूलरच्या निशाणाखालीं दाखल होऊं लागले. न्यू इंग्लंडतर्फे जनरल लिंकन आपलें सैन्य घेऊन आला. दक्षिणेकडून कर्नल मॉर्गन आला, जनरल गेट्स उत्तरेकडून आला. हे सर्व खंदे वीर होते व त्यांनीं स्वातंत्र्याचे लढाईत अनेक पराक्रम केलेले होते.

अगोदरपासूनच जनरल बॅर्गाइन् यास पराभवाचीं स्वप्नें पडूं लागलीं होतीं. एक दणदणीत लढाई करून शत्रूस जेरीस तरी आणलें पाहिजे नाहीं तर शत्रूस पाठ दाखवून पळून तरी गेलें पाहिजे याखेरीज त्याला

गत्यंतर उरलें नव्हतें. तो हडसन नदी ओलांडून साराटोगा येथें तळ देऊन राहिला होता. वसाहतवाल्यांचें सैन्य तेथपर्यंत जाऊन भिडलें, व लढाईल तोंड लागलें. मध्यरात्रीपर्यंत घनघोर युद्ध झालें पण अमुक पक्षाचा जय झाला असें नक्की होईना. अपजयापेक्षां बरोबरी पतकरली या न्यायानें अमेरिकनांस ही गोष्ट इष्टच होती. पण बर्गाइनजवळचा अन्नपाण्याचा सांठा अचानक संपला, त्यामुळें त्याचें भाडोत्री सैन्य ताबडतोब त्याला सोडून गेलें. उलटपक्षी अमेरिकन सैन्यांत भरती होत होती व त्याला वाढती मदत मिळत होती. बर्गाइनच्या हलाखीच्या स्थितीची वातमी ब्रिटिश छावणींत पोंचतांच न्यूयॉर्कहून ब्रिटिश मुख्य सेनापति क्लिंटन यानें बर्गाइन यास वांचविण्याची पराकाष्ठा केली. पण वेळेंच त्याला मदत पोंचली नाहीं. सरतेशेवटीं निराश होऊन बर्गाइननें शेवटचा निकराचा हल्ला केला, त्यांत त्याचे अत्यंत जिव्हाळ्याचे अधिकारी व निवडक असे सातशें लोक कामीं आले. बर्गाइनचा अगदीं उजवा हात असा ब्रिटिश जनरल फ्रेजिअर हा या युद्धांत ठार झाला व त्याच्या हाताखालचे लोकांनींदि पळ काढला. अमेरिकन बाजूनें जनरल आर्नोल्ड हा लढत होता, त्याला पूर्ण जय मिळाला.

बर्गाइन यास परत फिरण्यावांचून गत्यंतर नव्हतें, तो परत साराटोगा येथें गेला. येथें गेट्स व लिंकन या अमेरिकन योद्ध्यांशीं त्याला तोंड द्यावें लागलें. आतां शरण जाण्याखेरीज दुसरा उपाय बॅगाईन यास राहिला नाहीं. बर्गाइन यानें गेट्सनें काढलेल्या तहनाम्यावर सही केली व तो अमेरिकन सैन्याचें स्वाधीन झाला. या लढाईंत सबंध ब्रिटिश लष्कर ह्मणजे पांचहजार आठशें शिपाई कैद करण्यांत आलें. त्यांत सहा पार्लमेंटचें मेंबर्स होते. बेचाळीस पितळी तोफा हातीं लागल्या. पांचहजार बंदुका व अनेकविध लढाऊ सामान अमेरिकनांचे हातीं लागलें. या लढाईनें ब्रिटिश सत्तेस जोराचा, निश्चित स्वरूपाचा व शेवटचा धक्का बसला.

शत्रु पक्षाचे सेनापतींस जनरल गेट्सनें मोठ्या इतमामानें शेताचरील आपले घरीं नेलें, व त्यांचे दर्जास उचित असाच या सन्मान्य

कैद्यांचा बंदोबस्त ठेवला, व अशारीतीनें आपला मोठेपणा जगाचे निदर्शनास आणून दिला.

रणक्षेत्राचे दुसऱ्या बाजूसही अमेरिकन लोकांनीं आपली अब्रु चांगली संभाळली होती. जनरल हॉव यानें न्यूयॉर्कहून बरोबर १८ हजार सैन्य घेऊन फिलाडेलफिया शहरावर चाल केली. तो जमिनीवरील मार्ग सोडून डिलावेर नदींतून येत होता. डिलावेर नदींत अमेरिकनांनीं मारा करण्याची तयारी केली होती, त्यामुळें पुन्हां बेत बदलून तो चेसापेकी नदींतून जमिनीच्या मार्गानें फिलाडेलफियाकडे येऊं लागला. वाशिंगटननें विल्मींगटन येथें जाऊन आघाडीचें ठाणें दिलें. तेथें त्यानें बारा हजार सैन्य जमा केलें. जनरल हॉव याचे सैन्यापेक्षां आपलें सैन्य लढाईच्या कामांत कच्चें आहे हें त्याला ठाऊक होतें पण लढल्या वांचून गत्यंतरच नव्हतें, कारण मुख्य राजधानीवरच शत्रु चाल करून येत होता.

ब्रँडीवाईनची लढाई—चेसापेकी नदींतून एल्कनदीच्या मार्गे मेरी लँड-मध्यें जनरल हॉवचें सैन्य उतरलें, व तेथून तें फिलाडेलफियाकडे जामिनीचे मार्गे चाललें. मध्येंच मार्गावर ब्रँडीवाईन नांवाची लहान नदी होती तिचें काठीं तळ देऊन वॉशिंगटननें ब्रिटिश सैन्याचा मार्ग रोखून धरला. ब्रिटिश सैन्य ब्रँडीवाईन नदी उतरून जाण्याचा प्रयत्न करूं लागतांच, अमेरिकन सैन्यानें हल्ला सुरूं केला. पण हा वेळपावेतों बरेंच ब्रिटिश सैन्य पुढें निघून गेल्यामुळें, अमेरिकन लोकांना चेस्टरपर्यंत रातोरात पुढें जावें लागलें. या धांवपळींत अमेरिकन लोकांचें बरेंच सैन्य दगावलें व जनरल लाफाएट यास जबर जखम झाली. काऊंट पुलास्की या योद्ध्यानें जें कौशल्य दाखविलें त्याबद्दल काँग्रेसनें त्यास शाबासकी देऊन ब्रिगेडियर नेमिलें. वाशिंगटन्नें नंतर थोडी माघार घेऊन श्वेलस्किल पर्वत ओलांडून तो जर्मनटाऊनपर्यंत पोहोंचला. तारीख पंधरा सप्टेंबर रोजी त्यानें हॉवच्या सैन्याशीं फिरून सामना दिला. आतां लढाईस अगदीं जोर चढणार तोंच जोराचा पाऊस आला. बंदुकीची दारू भिजल्यामुळें गोळीबार

करतां येणें अशक्य झालें. हॉवचें सैन्य फिलाडेलफियाकडे कूच करून गेलें व त्यानें तें शहर अनायासें काबीज केलें.

फिलाडेलफिया शहर हातचें गेल्यामुळें कॉंग्रेसनें आपलें ठाणें प्रथम लँकेस्टर येथें आणि नंतर यॉर्क येथें नेलें अद्यापि वॉशिंगटनचे मनानें फिलाडेलफिया परत काबीज करून, प्रिन्स्टन व ट्रेंटन येथील लढ्यांप्रमाणें ब्रिटिशांना नामोहरम करण्याचें होतें. तारीख तीन आक्टोबर रोजीं त्यानें जर्मन टाऊन नांवाच्या फिलाडेलफिया शहराच्या एका भागावर हल्ला केला. पण त्यांत त्यास यावें तसें यश आलें नाहीं, व प्राणहानीहि बरीच झाली- ब्रिटिशांकडीलही पांचशेंवर लोक प्राणास मुकले. त्यांनाही फिलाडेलफिया मध्यें राहण्याचें धोक्याचें वाटत होतें. कारण डिलावेर नदीवर अद्यापि अमेरिकन लोकांचा ताबा होता, तेथून जलमार्गें हल्ले करणें सोपें होतें. ब्रिटिश लोकांनीं फोर्ट मर्सर नांवाच्या डिलावेर नदींतील किल्ल्यावर हल्ला केला पण अमेरिकन लोकांनीं त्यांना परतून लाविलें, नंतर ब्रिटिशांनीं मडआयलंड नांवाच्या किल्ल्यावर हल्ला केला पण तेथेंही त्यांना यश मिळालें नाहीं. ते पुन्हां फोर्ट मर्सर येथें परतून फोर्टमर्सर त्यानीं मोठ्या शिकस्तीनें आपल्या ताब्यांत घेतला व डिलावर नदी जनरल हॉवच्या पूर्ण ताब्यांत आली.

अशारीतीनें पराभव झाल्यामुळें वॉशिंगटन श्वेलस्किल पर्वताचे पलीकडे व्हाइटमार्श नांवाचे ठिकाण होतें तेथें जाऊन बसला. येथें त्याचे सैन्याचे अन्नपाण्यावांचून फार हाल होऊं लागले. थंडीही विलक्षण असल्यामुळें लोक फार त्रासून गेले, वसाहतींकडून जितक्या जलद मदत यावी तितकी आली नाहीं.. वॉशिंगटन अडचणींत आहे अशी बातमी लागतांच त्याचेवर जोराचा हल्ला करण्याचें जनरल हॉव यानें ठरविलें. फिलाडेलफिया, येथें ज्या घरांत जनरल हॉव याचें ऑफिस होतें तें घर लिडिया डॅरा नांवाच्या बाईचें होतें. जनरल हॉव याचें लढाईसंबंधीं खलबत चाललें असतां या बाईनें, बरोबर बातमी काढली व कांहीं कामानिमित्त बाहेरगांवीं जात आहे असें सांगून ती घोड्यावर स्वार झाली व ताबडतोब तिनें वॉशिंगटनचे कँपांत येऊन ब्रिटिश लोक चाल करून येत आहेत म्हणून बातमी दिली. जनरल हॉव जों वॉशिंगटनचे कँपवर चालून

जातो, तों त्यास जिकडे तिकडे तोफा रोंखून शत्रू जय्यत आहे असें आढळून आलें, त्यामुळें अचानक हल्ल्याचा त्याचा बेत फसून हॉवला परत फिलाडेलफिया गांठावीं लागली.

श्वेल स्किल नदीचे उजवेतीरीं व्हॅली फोर्ज नांवाच्या ठिकाणीं वॉशिंग-टननें तळ दिला. आतां हिंवाळा जबरदस्त पडला होता. अन्नसामुग्री पुरीशी नव्हती. कपडेलत्ते व बूटजोडे यांची वाण पडूं लागली, त्या देश-भक्त सैन्याच्या बचावाकरितां व सुखसोई करितां वॉशिंगटननें पराकाष्टा केली. लाकडांच्या ठोकळ्यांच्या झोंपड्या ताबडतोब बांधण्यांत आल्या व शक्य तितकी सैन्याची सोय लावण्यांत आली. पण हिंवाळाच जबरदस्त, व शिवाय तीन चार महिने टिकणारा, त्यामुळें त्याला फारसें यश आलें नाहीं. हे दिवस त्याच्या आयुष्यांत अत्यंत आणिबाणाचे गेले एका मागून एक याप्रमाणें पराभव हात गेल्यामुळें लोकांच्या मनांतील त्याच्याविषयींचा आदर कमी होऊं लागला होता, कांग्रेसमध्येंही त्याच्याविरुद्ध ठराव आले, व कांग्रेसनेंही त्याला द्यावें तितकें उत्तेजन दिलें नाहीं, यामुळें त्याची दुर्दशा झाली. उलटपक्षीं उत्तरेच्या बाजूस जनरल गेट्स हा लढत होता व त्याची बरीच सरशी होत होती. ज्या लोकांनीं वॉशिंगटनला मदत करावयाला हवी होती त्यांचा वॉशिंगटनवरील विश्वास ढळूं लागला. पण त्याच्या सैन्याचा त्याच्यावर अढळ विश्वास होता व तें शेवटपर्यंत त्याला चिकटून राहिलें. हें अशुभ वातावरण फार वेळ टिकून राहिलें नाहीं. अपयशाचे कृष्णमेघ हळू हळू वितळून अमेरिकन राष्ट्राच्या उदयानें त्याची कीर्ति पुन्हां उज्वल झाली.

फ्रान्स देशाला या नवोदित राष्ट्राबद्दल फार आदर वाटूं लागला होता व त्याला वाटेल ती मदत करण्यास फ्रान्स एका पायावर तयार होतें हें मागेंच सांगितलें आहे. अमेरिकन लोकांस इंग्रज व फ्रेंच यांचे-मधील वैर कायमच होतें हें माहीत होतें. सोळाव्या लुईचें दरबारीं इ. स. १७७६ पासूनच अमेरिकन लोकांचा वकील होता. त्याचे नांव सिलास डीन असें होतें. फ्रेंच राजाला गादीवर बसून नुकतीच तीनचार वर्षें झालीं होतीं, तरी सुद्धां सिलास डीननें, लढाई चालविण्यास लागणारी

सामुग्री अमेरिकेस मिळावी म्हणून फ्रेंच प्रधानमंडळाकडून वचन घेतलें होतें, व त्याप्रमाणें इ. स. १७७७ च्या पावसाळ्यांत एक जहाज भरून, सुमारें दोन लक्ष डॉलर किंमतीच्या बंदुका, व इतर लढाऊ सामान अमेरिकेस रवाना झालें होतें; तसेंच बॅरन स्टॉयबेन नांवाच्या सरदारासही मदतीस पाठविलें होतें. बॅरन स्टॉयबेन अत्त्यंत वाकबगार मनुष्य असल्यामुळें कांग्रेसनें त्याला सैन्यावर इन्स्पेक्टर जनरल हा हुद्दा दिला. त्याला लढाईच्या कामाचा अनुभवही दांडगा होता.

सिलास डीननंतर कांग्रेसनें आर्थरली व बेंजामिन फ्रँकलिन यांस फ्रेंच राष्ट्राबरोबर दोस्तीचा तह करण्यासाठीं व त्यांचेपासून प्रत्यक्ष सहाय्य मिळविण्यासाठीं पाठविलें होतें. ते अशावेळीं फ्रान्सला पोहोंचले कीं त्यावेळीं वॉशिंगटनचा बरेच वेळ पराभव होऊन अमेरिकन लोकांची पीछेहाट होत होती. अशावेळीं उघड तह करणें म्हणचे ब्रिटिशांबरोबर उघड युद्धाचें आव्हान स्वीकारणें होय अशी फ्रेंच प्रधानमंडळास भीति वाटली. खासगी रीतीनें फ्रान्स अमेरिकेला मदत करीतच होतें.

पण अशा आणीबाणीचे वेळीं फ्रान्समध्यें राहून मोठ्या कौशल्यानें व धिमेपणानें आपल्याला इच्छित असा फ्रान्सबरोबर उघड तह बेंजामिन फ्रँकलिन या महात्म्यानें घडवून आणला व आपलें राजनीतिपटुत्व व अचाट बुद्धिमत्ता जगाचे निदर्शनास आणली. अथांग बुद्धिवैभव, भौतिक शास्त्रांतील पारंगतता, व दरबारी थाटाची प्रौढ वागणूक यामुळें फ्रेंच दरबारांत तो सर्वांना फार प्रिय झाला होता. सहज विनोद, व मार्मिकता या गुणांमुळें फ्रेंच लोक त्याच्यावर खूष होते. मानवी क्लेशांचें निवारण करण्याची त्याची तात्परता व औदार्य यांच्यामुळें त्यावेळीं तो सर्व जगालाच प्रिय वाटत होता. अशा या धीरोदात्त पुरुषानें फ्रेंच लोकांचें हृदय आकर्षित केलें असल्यास नवल कसलें ? सुमारें एक वर्ष होतें न होतें तोंच जनरल बर्गाईन याचा पराभव होऊन त्याला अमेरिकन लोकांनीं पकडल्याची ज्या वेळीं बातमी आली, त्यावेळीं फ्रेंच लोकांस आनंद झाला. फ्रेंच खजिन्यावरील मुख्य अधिकारी यानेंही अमेरिकेंत कांहीं दूत पाठवून खास हकीगत आणविली होती, तीवरून आतां अमेरिकेस अधिक मदत द्यावयास व

उघड तह करावयास हरकत नाहीं अशी त्याची खात्री झाली, व त्याप्रमाणें तारीख ६ फेब्रुवारी १७७८ रोजीं फ्रेंच राष्ट्राशीं उघड दोस्तीचा तह झाला. या तहान्वयें, फ्रान्सनें युनाटेड स्टेटस् ऑफ अमेरिका हें स्वतंत्र राष्ट्र असल्याचें मान्य केलें; व त्याशीं मित्रत्वाचें नात्यानें वागण्याचें कबूल केलें. या तहानें आपल्या शत्रूंची संख्या कमी करण्याकरितां म्हणून तरी इंग्लंडला अमेरिकेशीं सलोखा करावा लागेल हें उघड झालें होतें या सर्व खटपटीचें श्रेय बेंजामिन फँकलिन यासच निःसंशय दिलें पाहिजे.

तो आतां बराच वृद्ध झाला होता. कारण आतां त्याच्या वयाचीं त्र्याहत्तर वर्षे पूर्ण झालीं होतीं. बेंजामिन फ्रँकलिनचा जन्म बॉस्टन शहरीं इ. स. १७०६ सालीं झाला त्याचे वडिलांचा साबू व मेणबत्त्या तयार करण्याचा एक कारखाना होता. बेंजामिन आपले वयाचे बारावे वर्षींच आपले वडील भावाचे हाताखालीं छापखान्याचें काम शिकण्याकरितां गेला. इ. स. १७२३ सालीं त्याला फिलाडेल्फिया येथें एका छापखान्यांत नोकरी लागली व तेथें तो लवकरच मोठ्या योग्यतेस चढला. इंग्लंडला जाऊन लंडन येथें त्यानें वर्तमानपत्रांचे धंद्याची माहिती घेतली व परत फिलाडेल्फिया येथें येऊन त्यानें पूअररिचर्डस आलमनाक हें पुस्तक प्रसिद्ध केलें, व पहिलें फिरतें वाचनालय स्थापन केलें. त्याचा भौतिकशास्त्राचा अभ्यासही दांडगा होता. त्यानेंच, आकाशांतील वीज व यंत्रानें उत्पन्न केलेली वीज हीं दोन्ही तत्त्वतः एकच आहेत ही गोष्ट सिद्ध केली. युनायटेडस्टेट्स्करितां स्वतंत्र राज्यघटना, इ. स. १७५५ सालींच म्हणजे राज्यक्रांति होण्याचे अगोदर बावीस वर्षे त्यानें लिहून ठेविली होती. त्यावरूनच त्याचें धोरण, बुद्धिमत्ता व अचाट कर्तबगारी दिसून येते. इंग्लंडमध्यें त्याचे अनेक जिवलग मित्र होते. तो स्पष्टवक्ता होता तरी फार प्रेमळ असे, व प्रेमळपणामुळेंच त्यानें आपल्या शत्रूचें हृदयसुद्धां आपल्याकडे ओढून घेतलें होतें खुद्द ब्रिटिश पार्लमेंटमध्यें बेंजामिन फ्रँक्लिनचे गुणांवर लुब्ध होऊन, त्याचे कार्यास मदत करणारे अनेक सभासद होते त्यानें आपला वृद्धापकालही अमेरिकन राष्ट्रघटनेला मजबुती आणण्यांत खर्च केला.

कॉंग्रेसनें ताबडतोब फ्रेंच लोकांबरोबर झालेल्या तहाला मान्यता दिली. इ. स. १७७८ च्या एप्रिल महिन्यांत काउंट डी एस्टॉंगबरोबर एक मोठें आरमार देऊन फ्रान्सनें त्याला अमेरिकेंत पाठविलें होतें. आतां इंग्लंड व फ्रान्स या दोन्ही देशांनीं लढाईची तयारी जोरांत चालविली. या सुमारास इंग्लंड नांवापुरतें स्वामित्व राखून अमेरिकन लोकांबरोबर वाटेल त्या अटींवर तह करण्यास तयार झालें होतें. लॉर्ड नॉर्थ त्यावेळचे प्रधान, यांनीं दोन बिलें पार्लमेंटपुढें आणलीं होतीं, त्यांत अमेरिकन वसाहतवाले जें जें मागतील तें तें ताबडतोब त्यांना देऊन टाकून, शांतता प्रस्थापित करण्याचा बेत करा असें होतें त्यांस राजाचीही संमति मिळविली व त्याप्रमाणें तह करण्याकरितां अमेरिकेस वकीलही पाठविण्यांत आले. पण कांग्रेसनें पहिली अट अशी घातली कीं, जर अमेरिकन राष्ट्राचें पूर्ण स्वातंत्र्य प्रथम मान्य करीत असाल, तर पुढें तुम्ही काय ह्मणतां त्याचा विचार करण्यांत येईल. आमचें नवीन प्रजासत्ताक राज्य दुसऱ्या कोणाचेंही स्वामित्व मान्य करण्यास तयार नाहीं. तिसरा जॉर्ज व त्याचें प्रधानमंडळ यांचा हटवादीपणाच अखेर अमेरिकन राष्ट्राच्या स्वातंत्र्यास पर्यायानें कारण झाला असें ह्मणावें लागतें.

परस्पर राष्ट्रांत तडजोडीचें बोलणें चालूं झाल्यामुळें इ. स. १७७८ च्या पहिल्या सहा महिन्यांत विशेष चकमकी झडल्या नाहींत. ॲडमिरल हॉव यांचें आरमार डिलावेर नदींत पडून होतें. काऊंट डी एस्टँग यांचें आरमार येत असल्याची वर्दी लागतांच ॲडमिरल हॉव आपला भाऊ जनरल हॉव याचे मदतीकरितां डिलावेर नदी सोडून न्यू यॉर्कजवळ येऊन राहिला. आतां फ्रेंच भडिमाराला तोंड देण्यासाठीं ह्मणून, फिलाडेलफिया शहर सोडून न्यू यॉर्क येथेंच लष्करी तळ देऊन राहणें इष्ट आहे असें जनरल हॉव यास वाटल्यानें, त्यानें फिलाडेलफिया शहर सोडून दिले व तो न्यू जर्सेचे मार्गानें निघाला. वाशिंगटननें ताबडतोब फिलाडेलफिया शहर हस्तगत केलें. व शत्रूचा पाठलागही चालविला.

त्यानंतर मनमथ येथील लढाईंत जनरल ली व वॉशिंगटन यांचेमध्यें कांहीं मतभेद होऊन जगरल ली यास कोर्ट मार्शल करून एक वर्षपर्यंत सस्पेंड करण्यांत आलें, त्यानंतर जनरल ली हा पुन्हां समरांगणांत उतरलाच नाहीं. दुर्दैवेंकरून स्वातंत्र्य मिळण्यापूर्वीच त्याचा अंत झाला. त्यावेळच्या अमेरिकन स्त्रिया सुद्धां किती स्वाभिमानपूर्ण होत्यां हें मेरी पिचर या स्त्रीचे उदाहरणावरून समजून येईल. ती आपल्या पतीबरोबर अनेक लढायांतून निभावून आली होती. क्लिंटन येथें तिचा पराक्रम विशेष दिसून आला, मनमथच्या लढाईंत ती जवळच्या ओढ्यांतून पाणी भरून आणून तृषार्त सैनिकांस पाजीत होती, व बंदुकीचे दारूनें हात काळे झालेल्या, व वर चरकणाऱ्या उन्हानें थकून जर्जर झालेल्या सैनिकांस धीर देऊन शांत करीत होती. एक बादलीभर पाणी घेऊन ती सैन्याकडे येत आहे इतक्यांत तिची नजर आपल्या पतीकडे गेली, तो गोळी लागून खालीं पडत आहे असें तिनें पाहिलें. तिनें प्रसंगाकडे लक्ष्य देऊन कांहीं एक शोक करीत न बसतां चटकन पतीच्या हातांतील बंदूक घेऊन ती लढूं लागली व सर्व लढाईं संपेपर्यंत एकसारखी लढत राहिली. लढाई संपतांच तिला वॉशिंग-टनला भेटविण्यांत आलें. वॉशिंगटननें तिला सार्जंटचा हुद्दा दिला व तहाह-यात पेनशन देऊन तिचा गौरव केला.

मनमथचे लढाईनंतर ब्रिटिश सैन्य न्यू यॉर्ककडे वळलें व वॉशिंग-टननें त्याचा पाठलाग केला, व तो व्हाइट प्लेनस् नामक जागीं तळ देऊन बसला. आतांपर्यंत काऊंट डी एस्टँग हा फ्रान्सहून मोठें आरमार बरोबर घेऊन अमेरिकेस मदत करण्यास निघाला होता, तो न्यू यार्कपाशीं येऊन पोहचला. पण न्यू यार्क बंदराची नाकेबंदी झाली असल्यामुळें तो ऱ्होड बेटाकडे वळला. न्यू पोर्टवर हल्ला करण्यासाठीं डी एस्टँगबरोबर जनरल सुली व्हान यास पाठविण्यांत आलें होतें. तारीख नऊ ऑगस्ट रोजीं एस्टँगचे सैन्यास जनरल हॉव यांचें आरमार दृष्टीस पडलें. एस्टँगने ताबडतोब त्यांचेवर चाल केली पण इतक्यांत एक एवढें मोठें वादळ झालें कीं, त्यानें दोन्हीं पक्षांचें फार मोठें नुकसान झालें. आपलें आरमाराचें

डागडुजीकरितां एस्टँग हा बॉस्टन येथें गेला, व हॉव हा न्यू यॉर्क येथें परतला. त्यानंतर सुलीव्हाननें न्यूपोर्टवर हल्ला केला पण त्यास मागें परतावें लागलें.

इ. स. १७७८ चें सबंध वर्ष बारीक सारीक चकमकी व कत्तली यांनीं व्यापिलें, पण मोठी अशी लढाई कोठें झाली नाहीं. या चकमकींत सरहद्दीवरील अमेरिकन लोकांनीं जो पराक्रम दाखविला व जो मोठा आत्म यज्ञ केला तो अपूर्व आहे. इंडियन लोकांची तर कांहीं कांहीं लोकांनीं अशी खोडकी जिरविली कीं पुन्हां त्यांनीं वर तोंड काढलें नाहीं. या कामीं ब्रॅडी व वेट्झेल वगैरे मंडळींनीं जो पराक्रम केला तो अवर्णनीय होय.

जॉन ब्रॅडी नांवाचा एक खंदा वसाहती-पुढारी सरहद्दीवरून प्रवास करीत असतां त्याला इंडियन लोकांनीं गोळी घालून ठार केलें. त्याच्या जेम्स नामक मुलानें आपल्या तीन सोबत्यांसह इंडियन लोकांवर सूड उगविण्याचा निश्चय केला व त्यांनीं इंडियन टोळ्यांवर हल्ले करण्यास सुरुवात केली, व पुष्कळ इंडियन लोकांचा नाश केला. सरतेशवटीं इंडियन लोकांचे तडाख्यांत ते सांपडले व झाडाला बांधून इंडियन लोकांनीं त्यांना गोळ्या घालून ठार मारिलें. पुढें जेम्सचा भाऊ सॅम्युअल यानें या कृत्याचा सूड घेण्याचें ठरविलें व अनेक वर्षें त्यानें इतकीं धाडसाचीं कृत्यें केलीं व इतक्या अडचणींतून तो पार पडला कीं त्याचेपुढें प्रथम अमेरिकेंत उतरलेल्या पुढाऱ्यांचें आयुष्य फार सुखावह होतें असें ह्मणावें लागेल.

वेटझेल बंधूंचे पराक्रमही असेच अगाध आहेत. वेटझेल् बंधूंचा पिता जॉन वेटझेल हा मूळच्या डच वसाहतवाल्यांपैकीं होता, त्यानें स्वतः राहण्यास ओहाओ व्हॅलीमध्यें एक झोंपडी बांधली व भोंबतालचें जंगल साफ करून शेतीसाठीं जागा तयार करण्याचे नादांत तो असतां इंडियन लोकांनीं टेहळणी ठेवून त्याचा खून केला. जॉन स्वतः जरी शांत वृत्तीचा माणूस होता त्याला पांच मुलगे होते. ते बापाच्या वधानें इतके चिडून गेले कीं त्यांनीं इंडियन लोकांचा सत्यानाश करावयाची दारुण प्रतिज्ञा केली. त्यांच्यापैकीं वडील बंधु मार्टिन याला इंडियन लोकांनीं कैद केलें. त्यानें कांहीं एक गडबड न करितां तो स्वाधीन झाला व

इंडियन लोकांचे सांगण्याप्रमाणें वागण्याचे कबूल करून तो त्यांचा गुलाम बनला. त्याचे मनांतून इंडियन लोकांच्या सर्व हालचाली व ठाव ठिकाणें समजावून घ्यावयाचें असल्यामुळें ही उत्तम संधीच त्याला लाभली होती. पुढें त्यानें गुप्तपणानें सुमारें वीस इंडियन लोक ठार मारले व उघडपणें तो आपल्या लोकांस येऊन मिळाला व त्यांचा म्होरक्या बनला. पुढें त्या बंधूं पैकीं प्रत्येकजण इंडियन लोकांच्या निरनिराळ्या टोळ्यांत शिरून त्यांनीं गुप्तपणें अनेक इंडियन ठार करून आपल्या पित्याचे वधाचा सूड उगवला. सर्व बंधूंपैंकी धाकटा ल्युविस यानें तर इ. स. १७८८ सालीं, जनरल हॅरमार हा इंडियन लोकांशीं तह करण्याचा घाट घालीत असतां, त्याला विरोध केला व असें प्रतिपादिलें कीं इंडियन लोकांचा निःपातच केला पाहिजे. त्यांच्याशीं तडजोडीचा तह कसला करावयाचा ? यासंबंधीं पूर्ण विचार करण्याकरितां जनरल हॅरमार यानें फोर्ट हॅरमार येथें एक सभा बोलाविली होती, त्यांत कांहीं प्रमुख इंडियन लोकांसही बोलाविलें होतें. ल्युविस वेटझेल यानें सभेस जाणाऱ्या एका इंडियनास फसवून दुसरीकडे नेऊन ठार मारिलें. त्याबरोबर त्याला पकडून कैद करून आणण्याबद्दल वॉरंट सुटलें. बरेच लोक त्याचे पाळतीवर राहून त्यांनीं त्याला तो एका मित्राचे घरीं झोंपीं गेला असतां पकडलें. व त्याला मोठमोठ्या दोरखंडांनीं बांधून ज. हॅरमार याचे हवालीं केलें. तेथें त्याला मोठ्या बंदोबस्तानें कैदेंत ठेवण्यांत आलें. वेटझेलनें प्रथम कांहीं दिवस कांहीं गडबड केली नाहीं. नंतर त्यानें व्यायाम घेण्यासाठीं हळूच वरिष्ठांची परवानगी घेतली. फक्त हातकड्या घालून व्यायाम घेत असतां एकेदिवशीं पहारेवाले पहारा करीत असतां त्यानें धैर्यानें पोबारा केला. पहारेवाल्यांनीं गोळ्या झाडल्या पण तो त्यांतून निभावला. तो दाट जंगलांत शिरला व तेथून ओहाओ नदी पोहून आपल्या एका मित्राकडे जाऊन राहिला. त्याचे मित्रानें त्या बेड्या काढून टाकिल्या. फिरून त्यानें इंडियन लोकांना ठार मारण्याचे आपले आवडत्या धंद्यास सुरुवात केली. त्यामुळें पुन्हां त्याला पकडण्यांत आलें व त्यास फांसावर लटकाविण्यांत यावयाचें होतें पण त्याचे शौर्याचा लोकमतावर असा

विलक्षण परिणाम झाला होता कीं, लोक त्याला फांसावर चढविण्याचे फार विरुद्ध होते. त्यामुळें त्याची सुटका झाली, तो इ. स. १८०८ सालीं मरण पावला.

इ. स. १७७९ चे हिंवाळ्यांत अमेरिकन सैन्यानें न्यू जर्सेमध्यें मिडल ब्रूक येथें तळ दिला. जॉर्ज वाशिंगटनचे सैन्यांतील एकूणएक शिपाई हवालदिल व नाखूष झाले होते. बिचाऱ्यांना पोटभर खायलाही मिळत नसे व पगारही नाहीं अशी त्यांची स्थिति झाली होती. सैन्यांत बेदिली उत्पन्न झाली ह्मणजे मोठ्या शिकस्तीनें वॉशिंगटन सैनिकांची समजूत करी. पण असें फार वेळ निभावेल अशी परिस्थिति नव्हती.

जून महिन्याचे आरंभीं जनरल ट्रायन यानें अडीच हजार सैन्य बरोबर घेऊन कनेक्टिकटमधील न्यू हॅवन शहरावर हल्ला केला व तें ताब्यांत घेतलें. व त्याला आग लावून देण्यांत आली. त्यानंतर त्यानें ईस्ट हॅवन व फेअरफील्ड नांवाचीं गांवें सर केलीं व त्या सर्वांस आगी लावण्यांत आल्या. हीं गांवें जळत असतां जनरल ट्रायन समोरील एका टेंकडीवर आराम खुर्चीवर पडून मनापासून हंसत, ती मौज पहात होता असें सांगतात.

त्याच सुमारास सस्कीहानामधील इंडियन लोकांनीं फार त्रास देण्यास सुरुवात केल्यामुळें त्यांचेवर स्वारी करणें आवश्यक झालें. जनरल सुलेव्हान यास या स्वारीवर पाठविण्यांत आलें. या इंडियन लोकांस ब्रिटिश लोकांची मदत होत होती. अमेरिकन सैन्यानें त्यांचा लवकरच पाडाव केला. व त्यांस पळतां भुई थोडी झाली. सुमारें चाळीस इंडियन लोकांचीं खेडीं जाळण्यांत आलीं व सस्कीहाना व गेनेसी नद्यांमधील सर्व मुलुख उध्वस्त करून टाकण्यांत आला.

दक्षिणेकडील वसाहतींत देशद्रोही लोकांचा भरणा अधिक असल्यामुळें फार त्रास होई. हे लोक अज्ञानी लोकांस थापा मारून लहान लहान टोळ्या करीत व त्यांना वसाहतवाल्या लोकांबरोबरच लढण्यास उद्युक्त करीत. दक्षिणेंत ज्यावेळीं युद्ध सुरूं झालें व ब्रिटिश सैन्यानें फोर्ट सनबरी

व ऑगस्टा हीं ठाणीं घेतलीं त्यावेळीं फार विकट परिस्थिति उत्पन्न झाली. कर्नल बॉइड नांवाच्या गृहस्थानें वसाहती सैन्याची एक टोळी वसाहतीं-विरुद्ध लढण्यास तयार करून तो ऑगस्टा येथें ब्रिटिश सैन्यास मिळण्यास जात होता, पण वाटेंत त्याला कर्नल अँडरसन नांवाच्या अमेरिकन सेनापतीनें गांठून त्याच्या सैन्याची धूळधाण उडविली. पुढें दुसऱ्या लढाईंत जनरल बॉइड हा मारला गेला व त्याचे मुमारें पाऊणशें लोक अमेरिकन सैन्याचे हातीं सांपडले. त्यांचेपैकीं पांच लोकांना देशद्रोहाबद्दल फांसावर लटकविण्यांत आलें.

मोठ्या पराक्रमानें जॉर्जियापैकीं अर्धा भाग अमेरिकन सैन्यानें शत्रूपासून बचावून वेगळा केला होता. पुढें जनरल ॲश याचे आधिपत्त्याखालीं लढाई सुरूं झाली. ब्रिटिश जनरल कँबेल यानें त्याला थोपवून धरलें. मागचे बाजूनें त्याच वेळीं जनरल प्रेव्होस्ट यानें हल्ला चढविल्यामुळें अमेरिकन सैन्याचा पूर्ण पराभव होऊन जॉर्जिया प्रांत पुन्हां ब्रिटिश लोकांच्या ताब्यांत गेला.

सुदैवानें एक गोष्ट झाली कीं या लढाईंत अमेरिकन सैन्यानें पळ काढल्यामुळें, ब्रिटिश लोकांचे हातीं कैद ह्मणून कांहीं सैन्य मिळालें नाहीं. हें अमेरिकन सैन्य चार्लस्टन येथील सैन्याचा अधिपति जनरल लिंकन नांवाचा होता त्यानें एकत्र करून मुमारें पांच हजार सैन्यानिशीं ऑगस्टा सर करण्याकरितां तो चाल करून गेला, तेथें त्याची व जनरल प्रेव्होस्ट याची गांठ पडली पण कडक उन्हाळ्यामुळें पुढें चार माहिन्यांपर्यंत दोन्हीही पक्षांस लढाई चालवितां आली नाहीं.

इ. स. १७७९ चें साल संपलें तरी लढाईचा निश्चित निकाल लागेना. फ्रेंच सैन्याचा व्हावा तसा उपयोग झाला नाहीं व दिवसोंदिवस विकट परिस्थिति उत्पन्न होऊं लागली. राष्ट्रीय सरकारच्या खजिन्यांतील शिल्लक तुटत चालली. सैन्याच्या खाण्यापिण्याची सोय काय लावावयाची व पगार कोठून द्यावयाचे हा मोठाच प्रश्न येऊन पडला. बरें शस्त्रू तरी टेंकीस येईल ह्मणावें तर तेंही चिन्ह दिसेना. ब्रिटिश सरकारनें आपल्या

८ वें) स्वातंत्र्य सूर्याचा उदय केव्हां होणार ?

सैन्यास कसलीही वाण पडूं दिली नाहीं व दिवसोंदिवस त्याची चलतच चालली असल्याचें स्पष्ट दिसून येऊं लागलें. नाहीं म्हणायला आतां ब्रिटिश सरकारचें लक्ष फ्रान्सकडेही लागल्यामुळें कदाचित् अमेरिकन लढाईकडे त्यांचें लक्ष तितकेसें टिकणार नाहीं असें मानावयाला जागा झाली होती पण प्रत्यक्ष तसा अनुभव यावयास कांहीं काल तग धरून बसणें आवश्यक होतें. आतांपर्यंत ब्रिटिश सैन्य एक लक्ष वीस हजारपर्यंत झालें होतें. व लढाईचा खर्च तीन कोटी पौंडांचे आसपास आला होता. पराजयाचे कृष्ण-मेघांनीं तेराही वसाहतींवर अभ्र धरलें होतें व स्वातंत्र्याचा सूर्योदय केव्हां होईल यासंबंधीं निश्चित अनुमान बांधतां येण्यासारखें नव्हतें.

इ. स. १७८० चा हिंवाळा अधिकच कडक पडला. त्यावेळीं जनरल वॉशिंगटन हा मॉरिस टाऊन येथें रहात होता व जवळपासच केंबाल पर्वताचे पायथ्याशीं त्याचें सैन्य तळ देऊन राहिलें होतें. बेसुमार थंडीमुळें समोरील ब्रिटिश छावणीकडे नजर लावून पहाण्यापलीकडे कांहींएक करितां येण्यासारखें नव्हतें. वेळप्रसंगीं अन्नासाठीं शेजारच्या शेतांवर जाऊन धान्य मागून आणावें लागे. अशा वेळीं सैन्यांत बंड होण्यास कितीसा अवकाश ? पण वाशिंगटनच्या सैन्याची त्याच्या वर इतकी दृढ निष्ठा होती कीं तसा प्रसंग सुदैवानें केव्हांच आला नाहीं.

कार्यकारण भाव काय असेल तो असो पण एक गोष्ट दिवसेंदिवस स्पष्ट दिसून येत होती, ती ही कीं; ब्रिटिश सैन्याची संख्या, लढाईची तयारी व तीवर होणारा खर्च हीं सर्व पाहिलीं असतां ज्या मानानें त्याचा अमेरिकेंत विजय व्हावयास पाहिजे होता त्या मानानें तो मुळींच होत नव्हता. हेसिमान सैन्य बोलून चालून जर्मनींतून भाड्यानें आणलेलें. पण खुद्द ब्रिटिश सैन्यानें तरी मनापासून लढावें ? पण तसें कांहीं होत नसे हें खास. अमेरिकन लोकांनीं स्वातंत्र्य मिळविल्यास कांहीं हरकत नाहीं असें तर त्याला वाटलें नसेल ना ? कित्येक वेळ हें सर्व सैन्य कांहीं एक न करितां स्वस्थच बसें हिंवाळ्यांत चार महिने तर सर्व कारभार बंदच राही. मुख्य सेनापति जनरल हॉवसंबंधीं म्हटलें तर तो युद्ध सुरूं होण्यापूर्वी

अमेरिकन लोकांस घ्या स्वातंत्र्य ह्मणणारांपैकीं होता व लढाई करूं नये अशा मताचा होता, इतकें असून त्यालाच सेनापति कां नेमलें हें तरी मोठें गूढच आहे. जनरल हॉव हा एक मोठा वशिल्याचा गृहस्थ होता यांत शंका नाहीं. अनौरसपणें कां होईना त्याचा संबंध थेट इंग्लंडचे राजघराण्यापर्यंत पोंचत होता.

इ. स. १७८० सालच्या जुलै महिन्यांत फ्रेंच आरमाराचा अधिकारी ॲडमिरल डी टर्ने हा एक मोठा गलबतांचा तांडा घेऊन न्यूपोर्ट येथें दाखल झाला. त्याचे बरोबर काऊंट रोशांबो या लष्करी अधिकाऱ्याचे हातांखालीं सहाहजार सैन्यही होतें. अशा तऱ्हेची दोस्त राष्ट्राची मोठी कुमक येतांच अमेरिकन लोकांस मोठा उत्साह चढला. 'लढाई मोठ्या प्रमाणावर चालूं झाली व आतां आपला खास जय होणार अशा समजुतींनें वसाहती सैन्यांत अधिक भरती होऊं लागली व पूर्वी दाखल झालेल्या लोकांचाही विश्वास दुणावला. सप्टेंबर महिन्यांत जॉर्ज वॉशिंगटन व रोशांबो यांची मुलाखत झाली व त्यांचें पुढील चढाईचे धोरणासंबंधीं बोलणें झालें.

दक्षिणेकडील प्रांतांतली स्थिति समाधानकारक नव्हतीच, कारण, वसाहती सैन्याचे लहान मोठे हल्लें संख्याबलामुळें ब्रिटिश सैन्य परतवून लावी व शिवाय देशद्रोही वसाहतवाल्यांच्या प्रयत्नामुळें, आपसांतील दुही वाढविण्याचे व वसाहतवाल्यांविरुद्ध लढण्याचे प्रयत्न होऊं लागले. या वर्षी साउथ कॅरोलिनामध्यें तर देशद्रोही वसाहतवाल्यांचे टोळ्यांनीं फारच गडबड उडवून दिली. त्याच वेळीं ॲडमिरल आरबथनॉट हा ब्रिटिश अधिकारी एक मोठा जहाजांचा तांडा घेऊन आला. व त्यानें चार्लसटनसमोर आपला तळ दिला. त्याचेबरोबर सर हेनरी क्लिंटन व सुमारें पांच हजार ब्रिटिश फौज होती.

चार्लसटनचें संरक्षण करणें फार दुरापास्त होतें, कारण त्या शहराचे रक्षणार्थ फक्त चौदाशें फौज त्या शहराचा मुख्य अधिकारी जनरल लिंकन याजपाशीं होती. ब्रिटिश फौज जमिनीवर उतरून तिनें चार्लसटन शहर माऱ्याखालीं राहील अशा बेतानें तळ दिला.

८ वें) **वानर सेनेचा पराक्रम**

त्यानंतर जनरल लिंकन याला दुसरें सातशें व्हर्जीनियन सैन्य येऊन मिळालें. चार्लस्टनला जमिनीकडून व समुद्राकडून दोन्ही बाजूंनीं वेढा पडला. नॉर्थ कूपर नदीचे बाजूस रस्ता खुला राखण्यासाठीं जनरल ऑगर-बरोबर तीनशें सैन्य देऊन लिंकननें त्याला तिकडे पाठविलें. त्यावर ब्रिटिश घोडेस्वारांच्या एका टोळीनें त्याला उधळून लाविलें. व चार्लस्टनचे बचावाची कांहींएक तजवीज होण्याचा मार्ग दिसेना. तारीख १२ मे १८८० रोजीं चार्लस्टन शहर शरण आलें व लिंकनचें सर्व सैन्य कैद झालें.

अजूनही कर्नल टॉर्ल्टन, — ब्रिटिश घोडेस्वारांचा कप्तान हा आसपासचा मुलूख उध्वस्त करून टाकीत होता. चार्ल्स्टनमधील विजयामुळें ब्रिटिश सेनेस व इंग्लंडांतील प्रधान मंडळास एक प्रकारें उत्तेजन मिळालें; व लढाई सुरूं ठेवण्यास दम आला. सर हेनरी क्लिंटन व लॉर्ड कॉर्नवालीस हे दोघे झालेल्या विजयामुळें खूष होऊन गेले. पण पुढें लवकरच त्यांना असें आढळून आलें कीं, देशाभिमानाचें वारें अमेरिकेतून पूर्णपणें नाहींसें झालें नाहीं.

थॉमस समटर न फ्रॅन्सिस मेरिअन हे दोघे वीर आतां समरांगणावर चमकूं लागले. त्यांनीं थोडेसे स्वयंसेवक जमा करून ब्रिटिश लोकांच्या लहान सहान छावण्यांवर छापे घालण्याचें काम सुरूं ठेविलें सुप्रासिद्ध लढवय्या अँडयू जॅक्सन हा यावेळीं स्वयंसेवकांत दाखल झाला. त्यावेळीं त्याचें वय अवघें तेरा वर्षांचें होतें. मेरिअनची टोळी म्हणजे पंधरा वीस तरुणांचें एक पथक होतें. व त्यांत कित्येक नीग्रो मुलगेही सामील झाले होते. त्याच्यांत पुढें अनेक तरुण येऊन मिळाले. त्यांचेजवळ दोरूगोळा व शिधासामुग्री अशी विशेष नव्हती. पण त्याचा उत्साह विशेष होता. सुसज्ज अशा शत्रुजवळ सर्व शिधासामुग्री व दारूगोळा असल्यामुळें त्या साठ्यावरच या मंडळींची सर्व मदार होती. असें म्हटलें असतां वावगें होणार नाहीं. या निर्भय तरुणांच्या तरवारीची धाड कोठल्या वेळेस पडेल, याचा नियम नसल्यामुळें शत्रुपक्षाकडील लहान लहान टोळ्यांची भीतीनें गाळण उडे. ही वानरसेना पुढें इतकी

प्रबल झाली कीं, तिनें लॉर्ड कार्नवालीसच्या इतस्ततः पसरलेल्या सैन्याच्या एकेका बाजूस चोरटे हल्ले करून त्याला अत्यंत त्रास दिला.

यानंतर वॉशिंग्टननें कॅरोलिना येथील लढाईवर जनरल गेट्स यास पाठविलें. त्याच्यावर कॉर्नवालीस चाल करून गेला. त्या दोघांची सँडर्सकीक येथें गांठ पडून, तेथें मोठें घनघोर युद्ध झालें. सुमारें एक हजार अमेरिकन सैन्य गारद झालें, आणि सुप्रसिद्ध योद्धा बॅरन डी काल्ब हा या युद्धांत पडला. या सर्व युद्धाचा आढावा घेतां वॉशिंग्टन यास असें आढळून आलें कीं. गेट्सचे हातून व्हावी तशी कामगिरी झाली नाहीं म्हणून त्याचे जागीं जनरल ग्रीन याची नेमणूक झाली.

रणक्षेत्राचे दुसरे भागांत म्हणजे फिशींग क्रीकनजीक जनरल कार्लटन या ब्रिटिश सेनापतीनें कर्नल समटर याचा पूर्ण पराभव केला. व ब्रिटिश सेनेचें नांव राखिलें. परंतु अद्यापि मेरिअन हा रणक्षेत्रावर धिंगाणा घालून ब्रिटिश सैन्यास त्रास देत होताच. इकडे ब्रिटिशांस राजनिष्ठ असलेले वसाहतवाले कर्नल फर्ग्युसन याचे सैन्याशीं सहकार्य करून लढाऊ वसाहतवाल्यांचे प्रयत्न फसविण्याचा खटाटोप करीत होतेच.

फर्ग्युसन, वसाहतवाल्यांचा मुलूख उध्वस्त करीत करीत ' किंग्ज माऊंटन ' नांवाचे ठिकाणीं आला, तेथें त्याची अमेरिकन सेनापति कॅंबेल याशीं गांठ पडली. कॅंबेलजवळ निवडक एक हजार घोडेस्वार होते; त्यांनीं शौर्याची पराकाष्ठा करून फर्ग्युसन यास व त्याचे तीनशें लोकांस ठार केलें, उरलेले आठशें लोक वसाहतवाल्यांस बिनहरकत शरण आले. त्यांचा कोणत्याही प्रकारें छळ किंवा अपमान करण्यांत आला नाहीं. पण तरुण वसाहतवाल्यांचें रक्त सळसळत होतें. आपल्यांतीलच वसाहतवाले शत्रुपक्षास सामील होतात ही गोष्ट त्यांना खपली नाहीं. शत्रू पक्षाकडील कैद्यांत जेवढे वसाहतवाले सांपडले त्यांना त्यांनीं वाजूस काढिलें; व त्यांचेपैकीं दहा लोकांस तेथल्या तेथें फासावर लटकाविलें.

स्वातंत्र्ययुद्धाची अखेर

प्रकरण ९ वें

या सुमारास वसाहतवाल्यांचे एकंदर परिस्थितीचा आढावा घेतला तर असें दिसून येईल कीं, त्यांचेजवळ पैसा बिलकूल नव्हता इतकेंच नव्हे तर, नवीन कर्ज उभारण्याची पत सुद्धां राहिली नव्हती. त्यांनीं कागदी नोटा काढून पाहिल्या पण त्यांची किंमत फार खालीं पडूं लागली. इ. स. १८८० सालीं या नोटांची किंमत शेंकडा दोन टक्के सुद्धां राहिली नाहीं. त्यामुळें स्थिर अशा चलनी नाण्यांचे अभावीं व्यापार व उद्योगधंदे गारठल्याप्रमाणें झाले. अशा आणीबाणीचे वेळीं रॉबर्ट मॉरिस व मोठमोठे राष्ट्रभक्त व्यापारी पुढें येऊन, त्यांनीं आपलें सर्वस्व राष्ट्राचे हवालीं करून वेळ निभावून नेली. वसाहतींतिल मातृ-संघानें शिपाई लोकांकरितां पुष्कळ कपडे तयार करून आपला वेळ सत्कारणीं लावण्याचें ठरविलें होतें. 'स्वातंत्र्य किंवा मृत्यु' हेंच ध्येय आतां बहुतेक स्त्रियांचे अंगीं बाणल्यामुळें, जिकडे जिकडे सैन्याचा तळ पडे तेथील तेथील स्त्रिया अन्न, वस्त्र व कपडा-लत्ता सैन्यास पुरविण्यास आनंदानें पुढें येत. वसाहतींतील स्त्रियांनीं केलेल्या अलोट स्वार्थत्यागाचा उत्कृष्ट परिणाम त्यांचे बंधू, पुत्र व जनक यांचेवर होऊन स्वातंत्र्याचा दिन लवकरच उगवला.

बेनिडिक्ट ॲर्नोल्डचा अधःपात — ज्या बेनिडिक्ट ॲर्नोल्डनें लढाईंत अतुल पराक्रम गाजवून अमेरिकन लोकांचें हृदय आपल्याकडे ओढून घेतलें होतें, ज्याचें नांव ऐकून शत्रूपक्षाचीं गाळण उडे, शेकडों गोळ्या लागून घोडा ठार झाला तरी जो लढतच होता, व ज्याला एकही गोळी लागली नाहीं, आणि म्हणूनच ज्याच्या अंगीं कांहीं दैवी शक्ति आहे असा भोळ्या लोकांमध्यें समज पसरला होता, त्याच्या दैवाची

विचित्र लीला ऐकून कोणीही सहृदय मनुष्य बुचकळ्यांतच पडेल. बेमिस हाइटस्च्या लढाईंतील अतुल पराक्रमाबद्दल ज्याला मेजर जनरलचा हुद्दा मिळाला, फिलाडेलफियासारख्या राजधानीचें संरक्षण करण्याचा मान ज्याला मिळाला, त्याचाच पुढें नैतिक अधःपात झालेला पाहून वसाहत-वाल्यांचे मनास फार दुःख झालें व त्यांचेमध्यें कांहीं काल औदासिन्य पसरलें. बेनिडिक्ट ॲर्नोल्डचें एका उमरावाचे मुलीवर मन बसलें, व फिलाडेलफिया येथें त्याचा विवाह झाला. पुढें वड्या बड्या लोकांत त्याला आमंत्रणें येऊं लागलीं. या लोकांमध्यें बरेच राजानिष्ठ व्यापारी व इतर गृहस्थ होते. त्याची रहाणी चैनीची बनली व खर्च न निभावल्यामुळें आणि व्यसनापिणामुळें तो कर्जबाजारी झाला. सैन्याच्या खर्चाचें खातें त्याच्याकडे असल्यामुळें यानें पैशाची पुष्कळ अफरातफर केली, त्याच्यावर लष्करी खटला भरण्यांत आला. व त्यांत त्याला थोडी शिक्षा झाली.

त्याच्या सुदैवानें त्याला पुन्हां लष्करी हुद्दा मिळाला व त्याची वेस्ट पॉईंटचा किल्लेदार म्हणून नेमणूक झाली व तेथील दारूगोळ्याचे कोठार व लष्करी सामानाची कोठी त्याचे ताब्यांत आली. पूर्वी झालेल्या शिक्षेचे दिवसापासूनच वसाहत सरकार व वसाहतवाले यांच्याबद्दल त्याचे मनांत तेढ उत्पन्न झाली होती व तो सुडाचा विचार करीत होता. किल्ला ताब्यांत येतांच ब्रिटिश जनरल सर हेनरी क्लिंटन याच्याशीं यानें पत्र-व्यवहार सुरूं केला. एक मोठी रक्कम घेऊन कांहीं एक हालचाल न करितां ब्रिटिश सैन्य हड्सन नदींतून वेस्ट पॉईंटपर्यंत येतांच तो किल्ला त्याचे हवालीं करण्याचें बेनिडिक्ट अर्नोल्ड यानें वचन दिलें.

नक्की व्यवस्था करण्याकरितां सर हेनरी क्लिंटन यानें जॉन अँड्री नांवाचे गृहस्थास बेनिडिक्ट अर्नोल्डकडे पाठविलें. दहा हजार पौंड लाच घेऊन वेस्ट पॉईंट किल्ला कशा रीतीनें शत्रूचे हवालीं करावयाचा याचा विचार करण्यासाठीं दोघेही रात्रीं एका जंगलांत गुप्तपणें जमले. रात्र-भर विचार करून अँड्री परत हडसन नदींतील आपले बोटीकडे फिरला. पण ही बोट वसाहती गोलंदाजांनीं अगोदर नदींतून लोटून दुसरीकडे नेऊन ठेविली होती. अमेरिकन हद्दींतून पलीकडे जाण्याचा पासपोर्ट जरी अँड्री-

जवळ होता व त्यावर अर्नोल्डची खास सही होती, तरी दोनतीन सैनिकांस त्याचा संशय आल्यावरून, त्यांनीं अँड्री याची झडती घेतली, व त्या झडतींत हा करारनामा बाहेर पडला. त्या सैनिकांनी अँड्री यास नजीकच्या ठाण्यावर नेऊन ठाणेदाराच्या हवाली केलें. पण या ठाणेदारानें मूर्खपणानें सर्व हकीकत आर्नोल्डलाच कळविली.

आर्नोल्डच्या कानीं आपल्या फितुरीचा पर्दाफाश झाला ही बातमी पडतांच, त्यानें घाईघाईनें आपल्या पत्नीस कांहीं मजकूर सांगितला. व तो तसाच हडसन नदीकडे पळून गेला, व एका बोटींत बसून पसार झाला. दुर्दैवानें अँड्री हा मात्र वसाहतवाल्यांच्या हातीं लागला. लढाईचे कायद्याप्रमाणें फितुरी करण्याचे प्रयत्नाबद्दल, ' मी शिपाईगडी आहे, मला गोळी घालून ठार मारा ' असें तो विनवीत असतांना देखील त्याला फाशीं देण्यांत आलें. बेनिडिक्ट अर्नोल्ड मात्र आपले शत्रु पक्षास मिळाला.

अशा तऱ्हेनें इ. स. १७८० चें साल संपवून नवीन वर्ष उजाडलें. स्वातंत्र्याच्या संपादनासाठीं केलेल्या खटाटोपापासून कांहीं निश्चित लाभ होईलच अशी अजून खात्री वाटेना. शिवाय बेनिडिक्ट अर्नोल्डच्या कथेनें कोणत्या वेळीं कोण फितूर होईल याविषयीं बेभरंवसा वाटूं लागला होता, अशावेळीं नवीन आशेचे किरण क्षितिजावर चमकूं लागले. फ्रान्स देशाप्रमाणें हालंडलाही अमेरिकन स्वातंत्र्ययुद्धाबद्दल सहानुभूति वाटूं लागली होती. व त्याचेकडून थोडी कां होईना निश्चित मदत येऊं लागली होती. बेंजामिन फ्रँकलिननें ज्याप्रमाणें फ्रेंच राष्ट्राकडून व्यापारी तह घडवून आणिला होता; तशाच प्रकारचा व्यापारी तह हालंडशींही घडवून आणण्याचा प्रयत्न वसाहतींतर्फे चालूं होता. ब्रिटिश वकिलांच्या नजरेस वसाहतवाल्यांची ही कारवाई आली होती. पण खुद्द हालंडच बळकट असल्यामुळें या माहितीचा कांहीं उपयोग झाला नाहीं. ब्रिटिश वकिलांनीं हालंडला धमकावण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. व शवटीं तारीख वीस डिसेंबर रोजीं त्यांनीं हालंडशीं युद्धच जाहीर केलें.

इंग्लंडनें हालंडशीं युद्ध जाहीर केलें या गोष्टीचा अमेरिकन चळवळीवर जितका लवकर परिणाम व्हावयास पाहिजे होता, तितका लवकर तो

झाला नाहीं यांचें कारण वसाहतवाल्यांची स्थिति दिवसेंदिवस खालावत चालली हाती हें होय. वसाहत-सैन्यांत असंतोष उत्पन्न झाला. व सैनिकांनीं बंड करण्याचा बेत केला. बिचाऱ्यांनीं कितीतरी दिवस थंडीवाऱ्यांत अन्न-पाण्यावांचून कंठले व पुढें त्यांना दम निर्घेना. ब्रिटिश सेनापति सर हेन्री क्लिंटन यानेंही फितुरीचा कारवाई सुरूच ठेवली होती. इ. स. १७८१ सालच्या जानेवारी महिन्याच्या पहिले तारखेस वसाहती सैन्य बंड करण्याचे इराद्यानें मोकाट सुटलें. व त्यानें फिलाडेलफियावर आपला मोर्चा वळविला. प्रिन्स्टननजीक त्याला सर हेनरी क्लिंटनचे लोक मिळाले. व त्यांनीं वसाहतवाल्या सैन्यानें पुन्हां ब्रिटिशांविरुद्ध लढूं नये, या अटीवर त्याला मदत करण्याचें व पैसा वगैरे देण्याचें आश्वासन दिलें. पण उलट, बंड करण्यास निघालेल्या या वसाहती सैन्यास हेनरी क्लिंटनच्याच लोकांच्या देशद्रोहीपणाबद्दल राग येऊन त्यांनाच पकडून त्यानें जनरल वायन याजकडे आणिलें व हेर समजून त्यांना फासावर लटकाविण्यांत आलें. या वसाहती सैन्याचे सत्कृत्याबद्दल काँग्रेसनें त्याला बक्षिसें दिलीं, तींही या स्वाभिमानी सैन्यानें नाकारिलीं. काँग्रेसनें लढाईचे कामीं जी हेळसांड चालविली होती तिला मात्र वरील प्रकारानें आळा बसला व वॉशिंग्टनला त्याबद्दल किंचित् बरें वाटलें.

वसाहतवाल्या सैन्यानें वरीलप्रमाणें जी शिस्त मोडली त्यामुळें फार वाईट परिणाम झाला. लहान सहान कारणावरून संप करण्यास इतर ठिकाणचे सैनिकांस उत्तेजन मिळाल्याप्रमाणें झालें. जानेवारीचे मध्यास पॉमटन् येथील न्यू जर्से ब्रिगेडनें कांहीं कारणावरून हत्यारें खालीं ठेविलीं. वॉशिंग्टननें या प्रकाराचा कायम बंदोबस्त करण्याचें ठरविलें. त्यानें दुसरीकडून पांचशें सैन्य एकदम बोलावून या सैन्यास निःशस्त्र केलें व त्यांचेपैकीं बारा पुढाऱ्यांस पकडलें व त्यांचेच हातून त्यांच्यापैकीं दोघांस फांसावर लटकाविण्याचें काम करून घेतलें. त्यामुळें त्याची सर्व सैन्यावर उत्तम जरब बसली.

या प्रकारानंतर वॉशिंग्टननें काँग्रेसला सैन्यांतील लोकांच्या खाण्या-पिण्याचा व कपडयांचा बंदोबस्त उत्तम राखून सैन्यांत उत्पन्न होणाऱ्या असंतोषास आळा घालण्याबद्दल आग्रहाचीं पत्रें लिहिलीं, व नंतर काँग्रेसनें स्वदेशाकरितां प्राण देण्यासही तयार झालेल्या आपल्या वसाहत बंधूंबद्दल योग्य ती खबरदारी घेण्याचें आश्वासन दिलें.

रॉबर्ट मॉरिस, ज्याने आपलें सर्वस्व लढाईचे खर्चाकरितां अर्पण केलें होतें, त्याला काँग्रेसनें खजिन्याचा अधिकारी नेमलें, व त्याच्याच देख-रेखीखालीं ' बँक ऑफ नॉर्थ अमेरिका ' ही संस्था चालूं केली. परराष्ट्रीय कर्ज आतांच देऊन टाकणें शक्य नव्हतें, पण एकंदरींत सर्व कर्जाबद्दल हमी घेणारे लायख देशभक्त व श्रीमंत गृहस्थ पुढें आल्यामुळें तितकी ओढाताण झाली नाहीं.

बेनेडिक्ट अर्नोल्ड न्यू यॉर्क येथें पोहोचतांच त्याला दहा हजार पौंड बक्षीस म्हणून ब्रिटिश सेनापतीकडून मिळाले. इतकेंच नव्हे तर, ब्रिगेडियर जनरलचा हुद्दा ब्रिटिश सेनेंत मिळाला. त्याचे हातांखालीं कांहीं जहाजें मिळालीं व १६०० सैन्यही मिळालें. व्हर्जीनियावर स्वारी करण्याकरितां त्याला पाठविण्यांत आलें. वॉशिंग्टन व मेजर ली या दोघांनीं आर्नोल्ड यास पकडण्याची फार खटपट केली. एकदां त्यांनीं सैन्यांतील जॉन चँपे यास बळेंच पळून जाऊन शत्रूस फितूर होण्याचें सोंग करून अर्नोल्डपर्यंत पोहो-चण्यास सांगितलें, जॉन चँपे याचे बरोबर दुसरे तीन निवडक लोक देण्यांत आले होते. त्यांनीं योग्य तो बहाणा करून अर्नोल्ड यास फसवून अमेरिकन हद्दींतून आणण्याचा पुरता कावा केला होता. पण ऐनवेळीं अर्नोल्ड यास दुसरीकडे स्वारी करण्याचा हुकूम मिळाल्यामुळें तो बेत फिसकटला. अर्नोल्डनें ' जेम्स ' नदी ओलांडून व्हर्जीनियावर म्हणजे आपल्याच जाति-बांधवांवर हल्ला केला. त्याला स्वारीवर पाठविण्यांत उपयुक्ततेपेक्षां वसाह-तवाल्यांस हिणवून त्यांचा तेजोभंग करण्याचा हेतु प्रमुख होता. देशभक्त अर्नोल्ड व शीलभ्रष्ट राष्ट्रद्रोही अर्नोल्ड यामध्यें फरकही दिसून येऊं लागला. आतां त्याचे अंगीं पराक्रमापेक्षां सूडाची बुद्धीच जास्त परिणत झाली होती. मानसिक दौर्बल्य व हिणकस मनोवृत्ति त्याचे कृत्यांत पुरेपूर

दिसून येऊं लागली. जाईल तेथें आगी लावीत सुटणें, स्वकीयांचा अनवश्यक छळ करणें, शेती व खाजगी मालमत्ता विनाकारण उध्वस्त करणें अशी शूर पुरुषांस अनुचित कृति त्याचे हातून होऊं लागली व मानवी अधःपाताचा तो मूर्तिमंत पुतळाच आहे कीं काय, असा वसाहतवाल्यांचा त्याचेविषयीं ग्रह होऊं लागला. एकंदरींत त्याच्या दुष्ट कृत्यांनीं त्याची तात्कालिक कां होईना चलतीच चालल्याप्रमाणें दिसूं लागलें. बराचसा मुलूख बेचिराख केल्यानंतर त्यानें हॅमटन रोड्सनजीक पोर्ट्समाऊथ येथें तळ दिला. मुलूख उध्वस्त करून वसाहतवाल्यावर दरारा बसविण्याचे त्याच्या कामावर खूष होऊन हेन्री क्लिंटन यानें आर्नोल्डचे मदतीस जनरल फिलिप्स यास दोन हजार सैन्य बरोबर देऊन पाठविलें. त्या दोघांनीं व्हर्जीनियांतील अत्यंत सुपीक भागांत शिरून पिकांची व मालाची भयंकर नासाडी आरंभिली, जिकडे तिकडे आग लावीत ते शिरले. आपल्या बरोबर जनरल फिलिप्स यास पाठविण्यांत व त्यालाच मुख्य अधिकार देण्यांत सर हेनरी क्लिंटन यानें आपणावर जितका विश्वास दाखवावा तितका दाखविला नाहीं याचें अर्नोल्ड यास फार वैषम्य वाटत होतें. पण लवकरच जनरल फिलिप्स यास मृत्यु आल्यामुळें थोडे दिवस तरी बेनिडिक्ट आर्नोल्ड हा व्हर्जीनियांत ब्रिटिश सैनेचा मुख्य अधिकारी म्हणून वावरला खरा. तारीख २० मे रोजीं लॉर्ड कॉर्नवालीस पीटर्सबर्ग येथें येऊन पोहोंचला व त्यानें अर्नोल्ड यास रजा दिली, त्यानंतर अर्नोल्ड यास दुसरें कमिशन मिळालें. त्यानें आपलें रहातें गांव न्यू लंडन इकडे मोर्चा वळविला. वाटेंत फोर्ट ग्रीसवोल्ड किल्ल्यावर हल्ला करून त्यानें तो सर केला, व कर्नल लिडयार्ड नांवाच्या त्या किल्ल्याच्या रक्षकास व त्याचेबरोबरचे सत्तर लोकांस ते शरण आले असतांही, ठार मारण्यांत आलें. त्यानंतर त्या शहरांतील एकूण एक इमारतींस आग लावण्यांत आली. गावांतील मुख्य चर्चचे टावरवर बसून आर्नोल्ड सर्व प्रकार पहात होता. गावांत कत्तल चालूं असतांच घोड्यावरून फिरून त्यानें सर्व प्रकार अवलोकन केला. गावांत कत्तल चालूं असतांना एका तरुणीनें आप बापाच्या वधाचा सूड म्हणून त्याचेवर बंदूक झाडली, पण नेम चुकल्यामुळे



एका शूर कुमारिकेनें पितृवधाचा सूड घेण्याकरितां बेनिडिक्ट आर्नोल्डवर गोळी झाडली.

पान १८६.

अर्नोल्ड जिवानिशीं वांचला. त्यानें त्या तरुणीच्या शौर्याची तारीफ केली. व तिला कांहीं एक शिक्षा न करितां जळत्या गावांतून तो तसाच परत फिरला.

सँडर्स क्रीकचे लढाईंत अमेरिकन लोकांचा पराभव झाल्यानंतर अमेरिकन सैन्याचें आधिपत्य जनरल ग्रीन याजकडे देण्यांत आलें. नॉर्थ कॅरोलिनामधील शार्लोटी या गांवाजवळ त्यानें सैन्य जमविण्यास सुरुवात केली, त्यावेळीं जनरल डॅनियल मॉर्गन नांवाचा योद्धा तरुण असून फार प्रसिद्धीस आला होता. त्याला ग्रीननें मदतीस घेतलें, व ब्रिटिश सैन्यावर हल्ले करण्यास प्रारंभ केला. व कौपेन येथें ब्रिटिश सेनापति टार्लटन याचा पूर्णपणें पराभव केला. टॉर्लटनचे पराभवानंतर कॉर्नवालिस यास चिंता वाटूं लागली व त्यानें ताबडतोब डॅनियल मॉर्गनचा पाठलाग केला. दुसरी चकमक यारकिन येथें झाली. तेथें कॉर्नवालिस यास बराच वेळ अडकून पडावें लागलें पण लढाईत निश्चित निकाल कोणाचेच बाजूनें झाला नाहीं.

इ. स. १७८१ च्या मे महिन्यांत लॉर्ड कॉर्नवॉलिस व्हर्जीनियाकडे बळला. व त्यानें तेथील सैन्याचें स्वतः आधिपत्य स्वीकारिलें. अर्नोल्डनें जेम्स व्हॅलीचा पुरा नायनाट केला होता. वॉशिंग्टननें व्हर्जीनियाचा बंदोबस्त मार्क्विस लाफायेटकडे सोपविला होता. पण त्याचेजवळ पुरेसें सैन्य नसलेमुळें त्याला कॉर्नवॉलिसचे सैन्यावर हल्ला करण्याचें धैर्य होईना. तारीख ६ जुलै रोजीं लाफायेटचे सैन्याची ग्रीन्स स्प्रिंग्ज येथें ब्रिटिश सैन्याशीं अचानक गांठ पडली. आयत्यावेळीं माघार घेतल्यास संपूर्ण नाश होईल हें जाणून लाफायेटच्या सैन्यानें एकदम कॉर्नवॉलिस सैन्यावर तुटून पडण्यास सुरुवात केली. अचानक हल्ला आल्यामुळें शत्रूपाशीं किती सैन्य आहे याचा कॉर्नवॉलिस याला अंदाज बांधतां आला नाहीं. त्यानें तेथून शिस्तीनें माघार घेतली. अमेरिकन सैन्याचें अंगांत पाठलाग करण्याची ताकद नव्हतीच.

त्यानंतर कॉर्नवॉलिस पोर्ट्समाऊथ येथें जाऊन बसला, पण त्यास यॉर्कटाऊन येथें जाण्याबद्दल सर हेनरी क्लिंटन याचा हुकूम झाल्यामुळें यॉर्क नदी व चेसापीक नदी यांचे संगमानजीक जाऊन त्यानें तळ दिल

लाफाएटनें जलदी करून कॉर्नवालीसचे सैन्यापासून फक्त आठ मैलांचे अंतरावर आपलें सैन्य आणून भिडविलें. ताबडतोब त्यानें, आपलें सैन्य तेथें आणून शत्रूस एक सपाट्यानें तडाखा लगावण्याचा आपला मनोदय वॉशिंगटनला कळविला. काऊंट डी ग्रासे याचें आरमार अमेरिकन आरमारास मदत करण्याकरितां निघालें होतें व तें लवकरच चेसापीक नदींत यावयाचें होतें. यॉर्क नदींत याचवेळीं कोणी तरी आपलें आरमार आणील तर फार बहार होणार होती. म्हणजे शत्रूस जमिनीचे बाजूस सैन्यानें व नदीचे बाजूनें आरमारानें कोंडून पुरा विजय मिळविण्याची लाफायेटची योजना होती.

वॉशिंग्टननें आपल्या युद्धकौशल्याची सर्व जगास पूर्ण साक्ष पटवून दिली. त्याचें लक्ष जरी व्हर्जीनियाकडे लागलें होतें, व तेथें कॉर्नवॉलिसला पुरें कोंडतां येईल हें त्याला माहीत होतें तरी न्यू यॉर्कजवळ सर हेनरी क्लिंटन याचें जबरदस्त सैन्य असल्यामुळें शत्रूचा पूर्ण पराभव करणें शक्य झालें नसतें. त्यानें एक योजना केली आपलें सर्व सैन्य एकवटून आपण न्यू यॉर्कवर जोराचा हल्ला करणार असल्याचा बाहणा करून त्यानें त्याप्रमाणें हालचाली करण्याचें काम चालूं केलें सर हेनरी क्लिंटन याचें लक्ष वॉशिंग्टनचे हालचालीकडे लागतांच त्यानें न्यू यॉर्ककडे आपलें सर्व सैन्य नेऊन जोराची लढाईची तयारी चालविली. थोडेसें सैन्य न्यू यॉर्कचे आसपास खोट्या हालचालीकरितां ठेवून थेट वॉशिंगटन व्हर्जीनियाकडे निघाला. विल्यमबर्ग येथें त्यानें मार्क्विस लाफायेटची गांठ घेतली व लढाईचा सर्व बेत समजून घेतला. तेथेंच त्याला समजलें कीं, काऊंट डी ग्रास्से यांचे वीस जहाजांचे आरमाराचा तांडा चेसापीक व यॉर्क नद्यांचे तोंडाशीं दबा धरून अगोदरच बसला आहे. म्हणजे यावेळीं वसाहतवाल्यांस कॉर्नवॉलिस पाहिजे तशा अगदीं माऱ्याचे ठिकाणीं सांपडला होता. याच वेळीं काऊंट डीबरास हा आठ जहाजें व दहा मालबोटी इकडून तिकडे नेण्यासाठीं यार्क नदींत येऊन बसला होता. त्याचे जवळ यार्कटाऊनचे वेढ्याला उपयोगी पडतील अशा पुष्कळ तोफा पण होत्या.



स्वातंत्र्याच्या युद्धाची समाप्ती - लॉर्ड कॉर्नवालीस शरण येतो.

पान १८९.

९ वें) ब्रिटिश सत्तेला जोराचा धक्का ०

सप्टेबर महिन्याचे पांच तारखेस ब्रिटिश ॲडमिरल ग्रेव्हज् यानें काऊंट डी बरास याचे आरमारावर हल्ला केला. पण या लढाईंत ब्रिटिश आरमाराचें जबरदस्त नुकसान झालें व तें न्यू यॉर्क बंदरांत जाऊन स्वस्थ बसलें. तारीख २८ सप्टेबर रोजीं वसाहती सैन्यानें कॉर्नवालीसचे सैन्याचे अगदीं जवळ तळ दिला. व खंदक वगैरे खणून वेढ्याचें काम चालूं झालें. तारीख ६ ऑक्टोवर रोजीं शत्रूपासून अवघ्या सहाशें यार्डपर्यंत खंदकाची रांग पुढें गेली व तेथून शत्रूवर एकसारखा तोफांचा भडिमार सुरूं झाला. तारीख ११ आक्टोबरपर्यंत वसाहती सैन्य फक्त तीनशें यार्डांवर येऊन ठेपलें व तोफांचा जोराचा भडिमार कॉर्नवालिसचें सैन्यावर सुरूं झाला. पुढील दोन तीन दिवसांत कॉर्नवॉलिसचे सैन्यानें वेढ्यांतून बाहेर पडण्यासाठीं जोराचे हल्ले चढविले पण उपयोग झाला नाहीं. ता. १७ ऑक्टोबर रोजीं लॉर्ड कॉर्नवालीसकडून शरणाचिट्ठी आली. तारीख अठरा रोजीं तहाच्या अटी निश्चित करून नंतर भडिमार बंद करण्यांत आला. तारीख १९ रोजीं दोन प्रहरीं मेजर जनरल ओहॅरा, फ्रेंच व अमेरिकन ऑफिसरासमोर सात हजार दोनशें सत्तेचाळीस ब्रिटिश व हेसिअन शिपाई हत्यारें स्वाधीन करण्याकरितां घेऊन आला. तेथें त्यांनीं ब्रिटिश निशाण वसाहती ऑफिसरांचे ताब्यांत दिलें. व सर्वजण कैदी झाले. लार्ड कॉर्नवॉलीस यानें आजारीपणाचें ढोंग केलें होतें, पण त्याचीं हत्यारेंसुद्धां जनरल लिंकन यानें काढून घेतलीं. खुद्द वॉशिंग्टनलाहीं या महायोद्धयाचा पराभव झालेला पहाण्यांत आनंद वाटेना, त्याचप्रमाणें आठशेंचाळीस आरमारी फौज वसाहतवाल्यांस शरण आली; व पंचाहत्तर हजार पितळी तोफा आणि एकतीस लोखंडी तोफा या वेढ्यांत मिळाल्या. अशा रीतीनें लॉर्ड कॉर्नवॉलिस शरण आल्यापासून ब्रिटिश सत्तेला अमेरिकेंत जोराचा धक्का बसून ती कायमची नष्ट झाली.

तारीख तेवीस ऑक्टोबर १७८१ रोजीं लॉर्ड कॉर्नवालीस आपल्या सर्व सैन्यासह शरण आला. व सर्व युद्ध संपलें अशी बातमी फिलाडेलफिया येथें येऊन पोहोंचली. थोड्याच वेळांत सर्व फिलाडेलफिया शहर विजयोत्सवानें दुमदुमून गेलें. "सर्व माणसांचा दर्जा जन्मतः एकसारखाच आहे" असें तत्व ज्या शहरानें पृथ्वीचे पाठीवर प्रथमतःच प्रतिपादन

केलें त्या बंधुप्रीतिच्या फिलाडेलफिया शहरांत प्रथम विजयोत्सव व्हावा हें उचितच होय. दुसरे दिवशीं सकाळींच काँग्रेसचें खास अधिवेशन झालें, काँग्रेसचे सदस्यांस सेनापति जॉर्ज वॉशिंग्टनकडून आलेला खलिता वाचून दाखविण्यांत आला. त्यांत विनयपूर्ण शब्दांत शत्रूच्या पराजयाची संपूर्ण हकीकत निवेदन केली होती. सर्व सभासदांस आनंदाश्रू आवरेनात. सद्-गादित अंतःकरणानें व अश्रुपूर्ण नयनांनीं ते डच् लूथर्न चर्चमध्यें परमेश्वराच्या प्रार्थनेसाठीं जमले. दोन प्रहरीं तेथेंच मोठ्या थाटानें आभारप्रदर्शन झालें. देशाच्या एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत प्रजासत्ताक राज्याच्या जयजयकाराच्या आरोळ्या ऐकूं येऊं लागल्या. अगदीं म्हातारे कोतारेसुद्धां दास्यविमोचनाच्या आनंदानें बेहोष होऊन नाचतां बागडतांना दिसूं लागले. कारण आतां ब्रिटिश सत्तेची अमेरिकेंतून पुरी हकालपट्टी होणार हें निश्चितच झालें होतें.

शरण आलेल्या ब्रिटिश फौजस ' पेन्सिलव्हॅनिया ' मधील ' लँकॅस्टर ' गांवीं नेण्यांत आलें होतें. तह पूर्ण होण्यावर तिची सुटका अवलंबून होती. वॉशिंग्टन हडसन नदीवरील न्यू जर्से येथील कँपांत जाऊन राहिला. कॉर्नवॉलिसच्या सैन्याच्या पराभवाची बातमी ऐकून यूरोपांतील बहुतेक राष्ट्रांच्या प्रजाजनांस आनंद झाला. खुद्द इंग्लंडचे राजास व प्रधान मंडळास या पराभवानें फार वाईट वाटलें व तें साहजिकच होतें. पण त्यांतल्यात्यांत कांहीं ब्रिटिश प्रजाजनांस सुद्धां अमेरिकेबद्दल नैसर्गिक सहानुभूति असल्यामुळें दुःख झालें नाहीं. हें जेव्हां राजाचे व प्रधान मंडळाचे नजरेस आलें, त्यावेळीं मात्र त्यांच्या दुःखावर डागण्या बसल्याप्रमाणें झालें अमेरिकेच्या विजयाबद्दल खुद्द इंग्लंडांत सुद्धां, बऱ्याच उदार मतवादी लोकांस सहानुभूति वाटत होती.

अमेरिकेतील पराभवानें इंग्लंडांतील प्रधानमंडळाची संख्या ताबडतोब कमी होऊं लागली व लवकरच मुख्य प्रधान लॉर्ड नॉर्थ ब त्याचे सहकारी मित्र यांना राजीनामा देणें भाग पडलें. नवीन प्रधानमंडळ अस्तित्वांत आलें त्यांत, अमेरिकेच्या स्वातंत्र्याच्याविरुद्ध कोणी नव्हतें, व असून

उपयोगही नव्हता. लढाईच्या खर्चामुळें टेंकीस आलेल्या प्रधानमंडळाला भीक नको पण कुत्रा आवर असें होऊन गेलें होतें.

इ. स. १७८२ चें मे महिन्यांत अमेरिकेतील मुख्य सेनापति सर हेनरी क्लिंटन यांस परत बोलाविण्यांत आलें. नवीन सेनापति गाय् कार्लटन हे अमेरिकन स्वातंत्र्याच्या आड येणारे नसल्यामुळें त्यांची नेमणूक सहजच झाली.

जॉर्ज वॉशिंग्टनचें धोरण उदार व शांतपणाचें होतें. आणि जरी न्यू यॉर्कचे आसपास कांहीं झटापटी होत होत्या तरी तिकडे लक्ष न देतां त्यानें सामोपचारानें वागून नवीन कटकटी उत्पन्न होऊं दिल्या नाहींत. या संक्रमणाचे कालींही त्याच्या अभिजात थोरपणास व खानदानीचे मनोवृत्तीस न शोभण्यासारखें एकही कृत्य त्याचे हातून घडलें नाहीं.

आपल्यास अनुकूल असा तह लवकरच घडवून आणण्यासाठीं कॉंग्रेसनें जोराची खटपट चालविली. जून महिन्यांत रिचर्ड ऑस्वॉल्ड यास ब्रिटिश पार्लमेंटनें पॅरिस येथें वसाहतीचे वकील सर बेंजामिन फ्रँकलिन व जे यांच्याशीं तहाच्या वाटाघाटीसाठीं पाठविलें. त्याच सुमारास हालंडचे दरबारीं, अमेरिकन वकींल जॉन ॲडॅम्स हाही पॅरिस येथें दाखल झाला. तारीख तीस नोव्हेंबर १७८२ पर्यंत तहाच्या वाटाघाटीचा नक्की खर्डा तयार होऊन त्यावर ब्रिटिशांतर्फे ऑसवॉल्ड यानें सही केली. व बेंजामिन फ्रँकलिन, जे, व ॲडाम्स यांनीं युनायटेड स्टेट्सतर्फे सह्या केल्या.

इ. स. १७८३ चे एप्रिल माहिन्यांत कॉंग्रेसनें ऑसवॉल्ड-फ्रँकलिनचे तहास मान्यता दिली, परंतु पुढें वरेच दिवस तहाचा जाहिरनामा बाहेर पडला नाहीं त्याचें मुख्य कारण असें कीं, अंतरराष्ट्रीय राजकारणाचे गुंतागुंतीमुळें इग्रज मुत्सद्यांचें लक्ष चलबिचल झालें होतें. आतां इंग्रज मुत्सद्यांस वाटूं लागलें कीं, फ्रान्स आयत्या वेळीं अमेरिकनांचे मदतीस धावून गेल्यामुळें आपला पराजय झाला. झाली ती गोष्ट होऊन गेली, पण आतां अमेरिकेशीं तेढ धरून तरी काय उपयोग ? फ्रेंच लोकांबरोबर अमेरिकनांचे स्नेह-संबंध राहणें नैसर्गिक आहे, पण आपणही खटपट करून त्यांना प्यार व्हावें व हळू हळू फ्रान्सशीं असलेल्या त्यांच्या मैत्रींत फूट

पाडावी अशा तऱ्हेची स्पर्धाजनक वृत्ति त्यावेळच्या प्रधानमंडळाच्या अंगीं बाणली होती.

कांहीं झालें तरी आपण ब्रिटिश व अमेरिकन एका रक्ताचे आहोंत व आपली भाषाही एक आहे. मतभेदामुळें लढाई झाली तरी तेवढ्या पुरतींच. कांहीं झालें तरी इंग्लंड हा अमेरिकनांचा मायदेश आहे अशा तऱ्हेची साखर वसाहतींतून पेरण्याची खटपट सुरूं झाली. उद्योगधंदे व व्यापारास परत लवकरच दोन्ही देशांमधें सुरुवात व्हावी अशा तऱ्हेची आतुरता ब्रिटिश अधिकाऱ्यांकडून दाखविण्यांत येऊं लागली.

फ्रेंच लोकांसंबंधाचें अमेरिकन लोकांचें प्रेम सहजासहजीं कमी होण्यासारखें नव्हतें. नफेवाजी, जुलूमजबरदस्ती आणि अन्याय यांच्या पासून अमेरिकन लोकांचा फार छळ झाला होता. लढाई संपतां संपतां ब्रिटिश लोकांनीं जाळपोळ व नासधूस केलेलीं शेतें अजून अमेरिकन लोकांचे नजरेआड झालीं नव्हतीं, त्यामुळें ब्रिटिशांचे साखरपेरणीचे कामीं त्यांना लवकरच यश येणें शक्य नव्हतें. तशांतून आतां इंग्लंड व फ्रान्स यांमध्यें प्रत्यक्ष लढाई सुरूं झाल्यामुळें तहाचें काम मागें पडत चाललें होतें. शेवटीं तारीख ३ सप्टेंबर १७८३ रोजीं लढाईत पडलेल्या सर्व राष्ट्रां• मध्यें मिळूनच तह झाला. त्या दिवशीं पॅरिस येथें इंग्लंड, फ्रान्स, हालंड, स्पेन व युनायटेड स्टेटस येथील वकिलांनीं तहनाम्यावर सह्या केल्या व कायम शांततेचा तह घडून आला. त्याच दिवशीं युनायटेड स्टेटसला कायम स्वातंत्र्य मिळालें असें मानिलें पाहिजे.

इ. स. १७८३ चा तह या नवीन राष्ट्रास समाधानकारक झाला असें ह्मटलें पाहिजे. त्यांत त्यांला पूर्ण स्वातंत्र्यहि मिळालें. या तहांत ग्रेट-ब्रिटननें स्पेनला फ्लॉरिडा प्रांत परत दिला. मिसिसिपीचे पूर्वेकडील सर्व मुलूख व दक्षिणेकडे फक्त मेक्सिकोपर्यंतचा सर्व मुलूख युनायटेड स्टेट्सला मिळाला. मिसिसिपी नदींतून व ग्रेटलेक्स मधून नौकानयनाचा हक्कही युनायटेड स्टेट्सला मिळाला. सेंट लॉरेन्स नदीवरील पूर्ण ताबा, कानडाचा सर्व प्रांत आणि नोव्हास्कोशिया हीं ब्रिटिशांकडेच असावींत असें ठरलें.

ब्रिटिश लोकांनीं अमेरिकन किनारा हळूं हळूं खाली करून देण्यास सुरुवात केली. इ. स. १७८३ सालीं सर गाय् कार्लेटन याला न्यू यार्क खालीं करून देण्याबद्दल नोटीस मिळाली. या महत्वाचे हालचालीची तयारी होण्यास सुमारें तीन महिने लागले. तारीख २५ नोव्हेंबर रोजीं ब्रिटिशांनीं आपलें बिऱ्हाडबाजलें न्यू यॉर्क शहरांतून कायमचें उचललें. व त्यांचे जहाजांचीं शिंडें अगदीं लहान लहान दिसूं लागलीं. न्यू यॉर्क शहराचे इमारतींचे छपरांवरून, खिडक्यांतून व गोद्यांतून डोकावून पाहणाऱ्या प्रेक्षकांना शत्रू परतताना पाहून, त्यांनीं केलेल्या मर्कटलीला, जाळपोळ, जुल्मजबरदस्ती व प्राणनाश यांची फिरून आठवण झाली असेल, व ' इडा पिडा टळो व तुमचें पुनरागमन कधींहीं न होवो ' असा त्यांनीं आशीर्वाद दिला असेल ! तारीख १४ डिसेंबर १७८२ रोजीं चार्लसटन ब्रिटिशांनीं खालीं करून दिलें. अशा तऱ्हेनें त्या दिवशीं फ्लॉरिडापासून तों तहत पेनोब स्कॉट पर्यंत एकूणएक अमेरिकन किनाऱ्यावरून ब्रिटिशांनीं कायमचें काळें केलें व अतःपर कोणी आपल्यास धाकदपटशा दाखवील, त्रास देईल अगर फूट पाडून आपणांस गुलामगिरींत राबवील अशी भीति उरली नाहीं.

आठ वर्षांच्या अविश्रान्त श्रमाचें चीज आज स्वातंत्र्याचे रूपानें पदरीं पडल्यामुळें व इतर राष्ट्रांच्या बरोबर आपणांस वागतां येईल या मोहक कल्पनेनें सर्व लोक खूष झाले होते. तारीख ४ डिसेंबर रोजीं, ज्यावेळीं वॉशिंग्टन विश्रांति घेण्याकरितां ह्मणून घरीं जावयास निघाला त्यावेळीं त्याचे इष्ट मित्रांस भडभडून आलें; त्यावेळीं वॉशिंग्टनला मुळींच बोलवेना. त्याचा कंठ भरून आला. सद्गादित अंतःकरणानें कसेतरी चार शब्द तो बोलला. आणि त्याची नाव सुरूं झाली. आतां त्याचे वयास बावन्नावें वर्ष लागलें होतें. लढाईचे कटकटींनें त्याचा जीव बेजार झाला होता. व अकालीं वार्धक्याची छटा त्याचे चेहेऱ्यावर दिसून येत होती. त्याच्या एकनिष्ठपणामुळेंच त्याचे अतिशय हाल झाले होते. आज सहा वर्षानंतर तो परत आपले माऊंट व्हर्नान येथील ' रीं परत जात होता.

निघण्याचे दिवशीं त्यानें आपले सैन्याशीं व एकूण एक अधिकाऱ्यांशीं हस्तांदोलन केलें. त्याच्याबरोबर ज्या वीरांनीं अनेक हाल सोशिले होते त्यांना या वेळीं रडूं कोसळलें. त्यानंतर तो पायींच 'व्हाइट हॉल' नगर मंदिराकडे गेला. त्याचेबरोबर नागरिकांचे थवेच्या थवे चालत होते. त्यानंतर ॲनॉपॉलिस येथें कॉंग्रेस भरली होती, तेथें तो हजर झाला. आठ वर्षें खर्च केलेल्या सर्व पैशाचा हिशेब अगदीं पैन पै चोख ठेवला होता, तो त्यानें कॉंग्रेसला सादर केला. निघतांना त्याचे रस्त्यावर वृद्ध वृद्ध नागरिक त्याला आशीर्वाद देण्यास उभे होते, ते धांवून पुढें आले. लहान लहान मुलें त्याचा जयजयकार करून ओरडूं लागलीं. तरुण कुमारिकांनीं त्याचे रस्त्यावर फुलेंही पसरून ठेविलेलीं होतीं.

निघण्याचे दिवशीं ह्मणजे तारीख तेवीस डिसेंबर रोजीं त्यानें ॲनॉपॉलिस येथें कॉंग्रेससमोर सविस्तर हकीकतीचें भाषण केलें. त्याचें भाषण अत्यंत हृदयस्पर्शी व विद्वत्तापूर्ण होतें, तरी पण त्यांत त्याच्या विनयशील स्वभावाची ओळख पूर्णपणें पटत होती. त्या दिवशीं त्यानें अमेरिकन सैन्याचा सेनानायक या हुद्याची तलवार खालीं ठेविली. त्यावेळचा प्रेसिडेंट मिफिन यानें त्याचे यशोवर्णनात्मक यथोचित भाषण करून त्याचा मोठा गौरव केला. व शांतपणें कांहीं दिवस पूर्ण विश्रांति घेण्याकरितां या भाग्यशाली वीरास मोकळें केलें. गेल्याच वर्षी या वीरास अमेरिकेचा राजा करावें अशी जोराची चळवळ सुरूं झाली होती, पण त्या थोर गृहस्थास संयुक्त संस्थानांचा राजा होण्यापेक्षां साधारण नागरिक राहण्यांतच अधिक अभिमान वाटत होता.

युद्धस्य कथा रम्या, ही गोष्ट खरी आहे. लढाईच्या हकिकती सामाजिक प्रगतीच्या मंद इतिहासापेक्षां अधिक मनोरंजक वाटतात ही गोष्ट जरी खरी आहे तरी गेल्या आठ वर्षांत अमेरिकेच्या सामाजिक जीवनांत कसेकसे फरक घडून आले यांचें अवलोकन केल्या शिवाय पुढील कालांत घडलेल्या गोष्टींवर नीट प्रकाश पडणार नाहीं. अमेरिका आतां स्वतंत्र देश झाला होता. ज्या महाभागांनीं या लढ्यांत प्रवेश केला होता त्यांना लढ्यांत पडतांना पुढें नक्की काय

घटना करावी लागेल याचा मुळींच अंदाज नव्हता असें म्हटलें तर अतिशयोक्ति होणार नाहीं. सुरुवातीस तर अडवणूक करून ब्रिटिश लोकांस जेरीस आणूं, व ते लवकरच म्हणजे वर्ष सहा महिन्यांचे आंत आपल्या मागण्या मान्य करितील व आपल्यास ब्रिटिश साम्राज्याखालीं सुखानें व समाधानानें राहतां येईल असाच पुढाऱ्यांचा कयास होता. एक दोन दूरदृष्टि गृहस्थां शिवाय पूर्ण स्वातंत्र्याचा दिवस उगवेल अशी प्रथम कोणास कल्पनाही नव्हती. तेरा वसाहतींत मिळून एकंदर मुलूख तरी कितीसा होता ? पण पुढें थेट मिसिसिपीपर्यंतचा व दक्षिणेकडे मेक्सिको पर्यंतचा मुलूख ताब्यांत आल्यामुळें पुढाऱ्यांच्या चित्तवृत्ती किंचित-काल भांबावल्यासारख्या झाल्यास आश्चर्य मानण्यासारखें कांहीं नव्हतें. व अशा अनिश्चित राज्यपद्धतींत ५--६ वर्षें या नवीन राष्ट्रास काढावीं लागलीं. व त्याच कालांत नवीन सुकर अशी राज्यघटना तयार करावी लागली. लढाईच्या वेळीं खवळलेल्या मनोवृत्तींच्या एकतानतेनें जरी तात्पुरतें ऐक्य वसाहतींत झालें होतें, तरी एकंदर वसाहतींची घटनाच युरोपांतील निरनिराळ्या लोकांची बनलेली हाती व त्यांच्यांत धार्मिक मतांचें बंड फार होतें. त्यामुळें लढाईनंतरच्या शांततेच्या कालांत त्यांची दिलजमाई होणें कांहींसें कठिण झालें. त्यांच्यांत विचारवंत असे पुढारी व उदार धोरणाचे मुत्सद्दी नसते तर मिळालेल्या स्वातंत्र्याचा त्यांना मतभिन्नत्वामुळें उपभोग घेतां आला असता कीं, नाहीं हा मोठा जबरदस्त प्रश्न होता. आपलीं स्वतःचीं मतें वाजूस ठेवून सुद्धां पुष्कळांनीं सार्वजनिक प्रश्नांवर सार्वजनिक मताधिक्याचा स्वीकार करतांना अलोट स्वार्थत्याग दाखविला. त्यामुळें लढाईनंतर ६।७ वर्षांनीं तरी त्यांचें एकमत होऊन त्यांना आपला अध्यक्ष नेमतां आला, व त्याचे ठायीं अतुलशक्ति निर्माण करितां आली.

या सात वर्षांमध्यें अनेक सामाजिक व व्यापारी उलाढाली घडून राष्ट्रीय जीवनांत विलक्षण फरक पडला. ज्या कॉंटिनेंटल कॉंग्रेसनें लढाईच्या वेळीं सर्व राज्याचीं सूत्रें हातीं घेतलीं ती तर आयत्यावेळीं बोलाविलेली एक लोकसभा होती, तिला पूर्वीचा इतिहासही नव्हता व अनुभवाची तर

गोष्टच काढावयास यको. तिच्या हातीं सत्ताही बेताबाताचीच होती, त्या-मुळे प्रत्येक बाबतींत मोठा गोंधळ उडे व त्याचा सामाजिक जीवनावर अनिष्ट परिणाम घडूं लागला.

वसाहतींच्या कालीं लोकांमधील सुबत्ताही ब्रिटनला दिलेल्या कच्च्या मालाच्या अदलाबदलींत त्याचेकडून मिळणाऱ्या पक्क्या मालावर अवलंबून होती. याच अदलाबदलींत वसाहत वाल्यांना शेतीचीं आऊतें, कामकरी लोकांचीं हत्यारें, उद्योगधंद्यांस लागणारें सामान, इतकेंच नव्हे तर कपडालत्ता बूटजोडे व इतर नित्य उपयोगाच्या सर्वच वस्तू मिळत. ब्रिटिश भांडवल-वालेही अनेक निमित्तानें व फायद्याच्या आशेनें नव्या देशांत आपलें भांड-वल आणून ओतीत होते. व या पैसेवाल्या लोकांच्या अनुकरणानें व नैसर्गिक सुबत्तेनें देशांत चैनीची राहणी सुरूं होत होती. लढाइ सुरूं होतांच ही चैनीची राहणी बंद पडली. चोरून मारून शत्रूशीं व्यापार होत होता, पण ब्रिटिश जहाजांनीं इतर देशांतून येणाऱ्या जहाजांवर नियं-त्रण ठेवल्यामुळें देशांत तयार मालाचा पुरवठा होईनासा झाला. देशाच्या या टोंकापासून त्या टोंकापर्यंत सर्वच ठिकाणीं लढाई सुरूं असल्यामुळें धान्य व निर्वाहाचे नित्य पदार्थ पिकवितांना शेतकरी लोकांस अडथळा येऊं लागला. केव्हां शत्रूचे लोक येऊन लुटालूट करितील किंवा स्वत:-च्याच सैन्याचा तळ येऊन पडल्यामुळें त्याला आयत्या वेळीं कसली गरज लागेल याचा अंदाज बांधतां न आल्यामुळें जमिनींचें उत्पन्न घटत चाललें, त्यांतही युरोपांतून येणाऱ्या शेतीच्या आउतांचा तुटवडा भासूं लागला. त्यामुळें सर्व लोक हवालदिल झाले निश्चित अशी चलनी नाण्यांची पद्धत नसल्यामुळें व दररोज चलनाचा भाव खालीवर होत चालल्यामुळें व्यापाऱ्यांस आपण करीत असलेल्या व्यापारांत फायदा होईल कीं तोटा होईल यासंबधीं अंदाज बांधतां येईना. त्यामुळें बेभरंवसा उत्पन्न होऊन व्यापारही संपुष्टांत येत चालला. नाण्याचा भाव घसरत चालल्यामुळें कर्जाची देवघेव बंद झाली. कित्येक वेळीं कर्जफेडीचें काम घटलेल्या बाजारभावामुळें अत्यंत सुलभ होऊन जाई. सरकारी कर्ज-रोखे ज्या सावकारांनीं खरेदी केले त्यांना फार मोठ्या ठोकरा लागल्या,

त्यामुळें सरकारी कर्जरोख्यांस कोणी विचारीना. ब्रिटिश लोकांशीं राजनिष्ठ असलेल्या लोकांची हकालपट्टी होऊ लागल्यामुळें वसाहतीतील महत्त्वाचे नागरिकांची संख्या घटूं लागली. या गटांत मोठमोठे सरकारी नोकर, व्यापारी सावकार, धंदेवाले व विद्वान लोकही होते. राजनिष्ठेची बाब सोडून दिली तरी सामाजिक दृष्टीनें त्यांचा उपयोग निःसंशय मोठा होता. या सर्व कारणांमुळें कलहास सुरुवात होतांच सर्व जनसमूहाची स्थिति कष्टमय होऊन गेली. ज्यांनीं या लढाईची तयारी केली त्यांना या गोष्टीची कल्पना नव्हती असेंही नाहीं. त्यांनीं ब्रिटिशांच्या आर्थिक, राजकीय आणि न्याय यासंबंधींच्या जुलमांतून बाहेर निघाल्याखेरीज आपली सर्वांगीण उन्नति होणार नाहीं ही गोष्ट पुरी ताडल्यामुळें वाटेल तो स्वार्थत्याग करण्यास ते तयार झाले होते, इतकेंच.

ज्यावेळीं तंटा सुरूं झाला त्याचे अगोदर तेराही वसाहती ह्मणजे ब्रिटिश राज्याचे निरानिराळे प्रांतच असल्यामुळें, या वसाहतींना स्वतःचे पतीवर कर्ज काढतां येत नसे, कागदी नोटांचा प्रसार करतां येत नसे, आणि वसाहतींतील व परराष्ट्रांशीं होणाऱ्या व्यापाऱ्यांचें नियंत्रणही करतां येत नसे. ब्रिटन करील तो कायदा, ब्रिटनचा फायदा तोच वसाहतींचा फायदा ! ब्रिटिश लोकांना ज्या मालाची गरज लागेल तोच माल वसाहतींनीं पिकवावा, त्यांच्या जहाजांतून ते देतील त्या किंमतीस इंग्लंडांत पाठवावा व पैशांच्या मोबदलल्यांत त्यांचाच माल ते सांगतील त्या किंमतींत खरेदी करावा. हा जुलूम वसाहतवाल्यांना सहन होण्यासारखा नव्हता. आज निर्वाहाच्या एका पदार्थावर कर बसव तर उद्यां दुसऱ्या पदार्थावर कर बसव अशा तऱ्हेनें करांची वाढ होत चालली. पण ते बसविण्यांत वसाहतवाल्यांचें मत कोणींच विचारीना. कपडा तयार करूं नका; टोप्या तयार करूं नका; कातड्याचे जिन्नस तयार करूं नका; लोखंड बनवा पण तें आह्मांस देऊन आमच्याकडून त्यांचीं हत्यारें विकत घ्या अशा तऱ्हेतऱ्हेच्या नानाविध जुलुमास कंटाळून त्यांनीं अर्ज-विनंत्या केल्या; डेप्युटेशन्स पाठविलीं; पण सनदशीर प्रयत्नांस बिलकुल यश न आल्यामुळें शेवटीं त्यांना हत्यार हातीं घ्यावें लागलें. व भावी कालांत होणाऱ्या हालअपेष्टेची नांट कल्पना असून सुद्धां तिकडे डोळेझांक करावी लागली.

ब्रिटिश अंमलाखालींच संकुचित स्वातंत्र्याची वसाहतवाल्यांची मागणी होती, पण त्यांच्या सुदैवानें पूर्ण स्वातंत्र्य त्यांना लाभल्यामुळें त्यांच्यावर तात्पुरती मोठीच जवाबदारी येऊन पडली. स्वातंत्र्य युद्धांत राजाची, गव्हर्नरांची, बोर्ड ऑफ ट्रेडची सर्वांची सत्ता झुगारून, शेतकरी हाच राज्याचा खराखुरा घटक बनला व त्याचेच तंत्रानें राज्यकारभार सुरूं झाला. कुलीनतेच्या, प्रतिष्ठितपणाच्या व आनुवांशिक श्रेष्ठपणाच्या भ्रामक कल्पना नष्ट होऊन कर्तबगारी ही एकच मोठेपणाची खूण ठरली.

वसाहतींचा विजय होण्यास काय कारणें घडली हें तरी मोठेंच गूढ आहे. खुद्द तेराही वसाहतवाल्यांना आपल्याला असा निःसंशय विजय मिळेल अशी केव्हांही पूर्ण खात्री वाटत नव्हती. इंग्लंडची शक्ति किती अपरिमित होती हें वसाहती पूर्ण जाणून होत्या. ब्रिटिश सैनिक संख्या बलानें वसाहती सैन्यापेक्षां किती तरी पटीनें अधिक होते; त्यांच्याजवळ हत्यारें पहिल्या प्रतीचीं; सैन्यांत शिस्त उत्तम; त्यांना असंतोष कधीं माहीत नाहींत नाहीं, ब्रिटिश अधिकाऱ्यांस अनुभव दांडगा, जगाच्या एकूण एक पृष्ठभागावर त्यांचीं कांहीं तरी कुलंगडीं चाललेलींच होतीं. ब्रिटिश राजघराणें अतिशय जुनाट असल्यामुळें त्याच्या सत्तेचीं पाळेंमुळें अगदीं खोल गेलीं होतीं. तीं सहजासहजीं कशीं उपटून निघालीं या-प्रश्नास समर्पक असें उत्तर अद्यापही सांपडलें नाहीं.

उलटपक्षीं अमेरिकन राष्ट्राचें सर्वच कांहीं अजब! तेराही वसाहतींचे परस्परांशीं संबंध बेताबाताचे, दळणवळणही फार कमी, आयत्यावेळीं बोलाविलेल्या लोकसभेवर लढाई चालविण्याचा व राज्यकारभाराचा बोजा पडलेला, मुख्य अधिकाऱ्यास विशेष अधिकार नव्हता, पैशाची सदाच अडचण, लढाईच्या साहित्याची वाण, पगाराची टंचाई, अशा परिस्थितींत 'आंधळ्यांच्या गाई देव राखतो' या न्यायानेंच, पृथ्वीवरील अत्यंत बलाढ्य राष्ट्राविरुद्ध असतांना दुर्बल राष्ट्राला यश यावें हा अजब चमत्कार नव्हे काय? अशा वेळीं ज्या राष्ट्राचे प्रजाजनांस आपल्यावर ईश्वरी कृपा आहे असें वाटल्यास त्यांत गौण असें काय आहे?

९ वें) स्त्रियांची स्वातंत्र्य युद्धांतील कामागिरी

स्वातंत्र्याचे युद्धांत स्त्रियांनीं फार मोठी कामागिरी केली आहे. ही कामगिरी विविध प्रकारची आहे. शेती करणें, कपडे तयार करणें, रुग्ण-शुश्रूषा करणें या कामापासूस तों बातम्या काढणें व प्रत्यक्ष लढाईत भाग घेणें, येथपर्यंत सर्व कामें लढाईचे काळांत स्त्रियांनीं केलीं आहेत. परकीय मालावरील बहिष्काराचे चळवळींत फार मोठ्या प्रमाणांत त्यांनीं कार्य केलें. प्रत्येक घरीं ब्रिटिश माल वापरावयाचा नाहीं हा निश्चय स्त्रियांनीं स्वतः पाळला होता, व पुरुषमंडळींसही या कामीं आग्रहानें सहाय्य देणें भाग पाडिलें होतें. तत्कालीन युरोपीय राष्ट्रांपेक्षां अमेरिकन स्त्रियांची परिस्थिति निराळी होती. त्या परिस्थितीनेंच त्यांना पुरुषाचे बरोबरीस आयुष्यांतील बहुतेक व्यवसायांमध्यें स्थान दिलें होतें. घरच्या पुरुषांचे बरोबरीनें काम उरकण्याची ताकद व संवय त्यांना असल्यामुळें, गृहराज्यांत त्यांचा दर्जा तत्कालीन युरोपीय स्त्रियांपेक्षां मोठा होता. त्या कालीं अमेरिकेंत प्रवास केलेला एक फ्रेंच गृहस्थ अमेरिकन स्त्रियांसंबंधीं लिहितांना म्हणतो, " युनायटेड स्टेट्समध्यें पुरुष वर्ग स्त्रियांसंबंधीं फाजील दाक्षिण्य दर्शवीत नाहीं तरी त्यांचे ठाईं पुरुषांचेविषयीं पूर्ण आदरबुद्धि असलेली दिसून येते. स्त्रियांनीं अंगावर घेतलेलीं कामें त्या पार पाडतील यासंबंधीं पुरुष वर्गांत विश्वास दिसून येतो; व त्यांचे स्वातंत्र्यासंबंधीं एक प्रकारची पूज्यबुद्धि पुरुषवर्गांत वास करीत असतांना दृष्टीस पडते. " असा विशिष्ट फरक दोन खंडांमधील स्त्रियांमध्यें कां उत्पन्न झाला हें सहज समजून येण्यासारखें आहे. युनायटेड स्टेट्समध्यें कोणतीहि मोठी चळवळ अगर संघटना स्त्रियांचे मदतीवाचून पार पडलेली दिसत नाहीं. मुलांचें शिक्षण असो; आरोग्य खातें असो; कोणतीही औद्योगिक अथवा सामाजिक चळवळ असो; मद्यपानबंदी अथवा गुलामगिरीच्या व्यापाराची बंदी असो; सर्व चळवळींत अमेरिकन स्त्रियांनीं आपली योग्य जबाबदारी पार पाडली आहे. आणि या सर्व गोष्टी घडण्यास कारण काय तें या नवीन खंडाच्या इतिहासावरूनच सहज समजून येणार आहे.

वसाहतींचे प्रारंभाचे कालीं ज्या ज्या वेळीं अमेरिकन स्त्रियांना आपल्या वडिलांबरोबर, बंधूंबरोबर, पतीबरोबर अथवा मुलांबरोबर राहणें भाग पडे, त्या त्या वेळीं त्यांना सतत आत्मसंरक्षणाची विद्या शिकणें भाग पडे. तरवार–बंदुकीसारखीं हत्यारें वापरण्याचा त्यांना पुष्कळ सराव असे. पति किंवा दुसरा कोणी संरक्षक बरोबर नसतां ज्या ज्या वेळीं इंडियन लोकांच्या टोळ्याकडून हले होत त्या त्या वेळीं स्वसंरक्षण करण्याची जबाबदारी स्त्रियांवरच पडे, त्याचप्रमाणें हिंस्र पशूंपासून बचाव करणें त्यांना भाग पडे, हिंवाळ्याच्या कडक थंडींत कुटुंब पोसण्या-साठीं कष्ट करणें त्यांना भाग पडे. वसाहतींच्या संस्थापकांचेंही काम हलकें सलकें नसे. त्यांना घरें बांधावीं लागत, झाडें तोडावीं लागत; शिकार व शेती करावी लागे, निर्वाहाच्या एकंदर वस्तू स्वतः करण्याचें काम पडे, जोडे शिवणे, कपडा तयार करणें, अन्न शिजवणें, कपडे धुणें हरएक कामें त्यांना करावीं लागत. आपल्या पतीचा संसार सुखी करण्यासाठीं वसाहती स्त्रियांनीं हरएक प्रकारची घस सोसल्यामुळें त्यांचा कौटुंबिक व सामाजिक दर्जाही वाढला. अमेरिकन स्त्री जशी सहचारिणी होती तशी सहकारिणीही बनली. त्यामुळेंच अमेरिकन स्त्रियांमध्यें स्वातंत्र्यवृत्तीचा कल अधिक दिसून येतो. स्वतंत्रपणें मोठमोठीं शेतें पिकविण्याच्या व उद्योगधंदे चालविणाऱ्या अनेक स्त्रियांचीं उदाहरणें अमेरिकन इतिहासांत दिसून येतात. विशेषतः अमेरिकेंत नीळ पिकविण्याचे आणि रेशीम तयार करण्याचे धंद्यास प्रथम अमेरिकेंतील स्त्रियांनींच सुरुवात केली. इतक्या सर्व चळवळी अमेरिकन स्त्रिया स्वतः करीत म्हणून त्या फटकळ किंवा उच्छृंखल असतील असें म्हणावें तर तसें मुळींच नाहीं. सुगृहिणी व उत्तम माता होण्यांत त्यांना अभिमान वाटतो. गृह, पति व मुलें यांच्या ठाईंचा अमेरिकन स्त्रियांचा आदर कोणत्याही रीतीनें कमी न होतां तो वाढतच गेला आहे.

स्वातंत्र्याच्या लढाईंत गुंतलेल्या प्रत्येक सैनिकाची बायको, मुलगी अथवा बहीण कोणीना कोणी तरी युद्ध चालूं रहावें म्हणून प्रत्यक्ष काम करून मदत देत असे. जेम्स ओटिस याची बहीण व जेम्स वॉरन याची

९ वें) बंदुकीचे गोळ्यांसाठीं कथला-जस्ताचीं भांडीं !

चायको मर्सीवॉरन ही निरनिराळीं नाटकें व फार्स लिहून उपरोधिक भाषेंत न्यू यॉर्कसारख्या ठिकाणीं नाटकांतून वगैरे देशभक्त लोकांची चेष्टा चाले, तीस उत्तरें देत होती. तिच्या लेखांचा फारच प्रसार झाला व जागृतीचें काम उत्तम झालें. वर्तमान पत्रें व मासिकें यांतही पुष्कळ अमेरिकन स्त्रिया लेख लिहून स्वातंत्र्याची घोषणा चालूं ठेवीत होत्या. त्या काळचा एकंदर आयुष्यक्रम परदेशांतून येणाऱ्या तयार वस्तूंचे अभावीं कंठणें फार कठीण गोष्ट झाली होती तरी सुद्धां आयुष्यांतील गरजा कमी करून व अत्यंत मोठ्या प्रमाणावर उद्योग करून राष्ट्रीय संसाराच्या व युद्ध करीत असलेल्या सैनिकवर्गाच्या एकूण एक गरजा भागविण्याचा त्यांनीं प्रयत्न केला. वस्त्रप्रावर्णाचे बाबतींत तर एकूण एक गरजा त्यांनीं भागविल्या, लढाई चालूं होती तोंपर्यंत देशाच्या या टोंकापासून तो त्या टोंकापर्यंत, चरक्यांचा मंजुळ नाद व मागांचा खडखडाट ऐकूं येत होता.

त्या वेळेचा पत्रव्यवहार वाचला ह्मणजे शेतीवरील पेरणीकापणीचीं कामें स्त्रिया संभाळीत होत्या हें स्पष्ट दिसून येतें, संसारांत वापरलेलीं कथलाचीं-जस्ताचीं भांडीं त्यांनीं बंदुकीच्या गोळ्या करण्याकरितां काढून दिली. विलायती चैनीच्या एकूणएक जिनसांस फाटा दिला. स्वदेशांतच सर्व जिनसा तयार करून घेऊन त्यावर आपली गरज भागविण्याचा निर्धार केला, व सैन्याच्या गरजा भागण्याकरितां दारोदार हिंडून पैसा व इतर जरूरीच्या वस्तू त्यांनीं जमा केल्या आणि सैन्यास पुरविल्या.

कित्येक वेळ स्त्रियांना ब्रिटिश सैन्याच्या लुटालुटीच्या कार्यक्रमास व जाळपोळीच्या उद्योगांस योग्य उत्तर द्यावें लागे. कॅथरीन श्युलर नांवाच्या बाईनें ब्रिटिश शिपाई आपल्या शेतांत उतरून फराळ करीत बसले आहेत, हें पाहतांच शेतांतील उभ्या पिकास आग लावून दिली, व अशा रीतीनें आपला स्वाभिमान दाखविला. नासधूस झालेलीं शेतें व घरें पुन्हां दुरुस्त करून ठाकठीक करणें हाही एक उद्योग त्यावेळीं स्त्रियांना करणें भाग पडे. शिस्तीचे बाबतींतही त्यांचें उदाहरण घेण्यासारखें होतें. त्यांनीं निरनिराळ्या कमिट्या स्थापिल्या. त्यांचें काम सर्व ठिकाणीं फिरून, व्यापाऱ्यांना

नफेबाजी बंद करण्याबद्दल व ब्रिटिश वस्तूंची विक्री न करण्याबद्दल ताकीद देण्याचें होतें. एक वेळ स्त्रिया एका चहाचे दुकानांत घुसल्या, तेथील व्यापाऱ्यास तो ऐकत नाहींसें पाहून, त्यांनीं धुडकावून हुसकून दिलें व स्वतःच मनांत येईल त्या किमतीस त्याचा चहा विकूं लागल्या. फॉल-माउथ येथील एका हॉटेलांत शिरून जॉन ॲडाम्स तेथिल मालकिणीस ह्मणाला, 'एकादा गृहस्थानें जकात चुकवून चहा आणला असला, तर तो पिणें तरी रास्त आहे कीं नाहीं!" ती बाई ह्मणाली, "नाहीं. नाहीं. कोणताच चहा पिणें योग्य नाहीं! आह्मी सर्वांनींच तो सोडला आहे, व तुह्मासही तो येथें शिजवून मिळणार नाहीं. तुह्मांस एक पेलाभर कॉफी देतें पाहिजे असेल तर!"

व्हर्नॉंजीया वसाहतींतिल ॲमिलिया नांवाचे गांवीं तरुण मुलींनी संघ स्थापन केला होता, व असा नियम केला होता कीं, जो तरुण अमेरिकन सैन्यांत दाखल होऊन पुरेशीं वर्षें देशाची नोकरी करणार नाहीं त्याच्याशीं विवाहाची गोष्ट सुद्धां काढावयाची नाहीं मग तो कितीही श्रीमंत किंवा विद्वान असो!

लढाईच्या प्रथमवर्षीं फिलाडेलफिया येथील एका बाईनें एक पत्र लिहिलें आहे त्यांतील मजकूर खालील प्रमाणें आहे. – "मी काय केलें आहे तें तुला कळवितें. माझ्या एकुलत्याएक बंधूस मी लढाईवर पाठविलें आहे. त्याच्यासाठीं मी प्रार्थना करीत असते कीं 'आमच्या घराण्यास साजेल असाच पराक्रम त्याचे हातून होवो.' मला जरी वीस पुत्र असते तरी त्या सर्वांना मी लढाईवर पाठविलें असतें घरांतील, व जेवणाचा खर्च मी शक्य तितका कमी ठेवला आहे. गेल्या क्रिस्टमसपासून तर मी चहाला शिवलेंच नाहीं. मला घालायला एकादा सुंदर झगा किंवा टोपी सुद्धां मी ठेविली नाहीं. माझ्या आयुष्यांत मी एका गोष्टीकडे बिलकुल लक्ष्य दिलें नव्हतें. मला विणायला येत नव्हतें, पण आतां मी सैनिकांकरितां अमेरिकन लोंकरीपासून पायमोजे विणत असते, व अशा रीतीनें लोकोपयोगी कृत्यांस मी अल्पस्वल्प मदत करिते. 'मरण फक्त एकदांच येतें' आणि

तें स्वातंत्र्यांत आलेलें बरें, गुलाम म्हणून कंठावयाच्या आयुष्याला कवडंचिहि किंमत नाहीं, मला लिहावयाला आनंद वाटतो कीं, माझ्या इतर अमेरिकन मैत्रिणींचीं ही अशींच मतें बनत चाललीं आहेत. मातृभूमीचे प्रेमाखातर आह्मीं सर्वांनींच जत्रा, मेजवान्या व इतर करमणुकीचे प्रकार बंद ठेविले आहेत, चहा पिणें व इतर श्रीमंती चोचले आह्मी सोडून दिले आहेत. आह्मा स्त्रियांचीं जर मतें अशी होत चाललीं आहेत, तर आमच्या पुरुष वर्गाचे मनांत कसल्या कल्पना प्रज्वलित झाल्या असतील बरें? स्वातंत्र्याकरितां मरण आलें तरी हटावयाचें नाहीं असा त्यांचा एक विचार झाला आहे. ”

खुद्द मुख्य सेनापतीची पत्नी मार्था वॉशिंग्टन, जखमी झालेल्या शिपायांच्या खस्ता खात रात्रंदिवस खपत असे. ॲडिंग्टन व्रूस नामक लेखकानें, मिसेस ट्रूपे नांवांची बाई तिला भेटावयास गेली होती त्यासंबंधीं लिहिलें आहेः—

“ आह्मांपैकीं पुष्कळ बायांस लेडी वॉशिंग्टन यांस भेटण्याची इच्छा होती. एवढ्या मोठ्याची पत्नी तेव्हां तिला भेटण्यास जातांना अर्थात् नीटनेटका पोषाक करून जाणें इष्ट असें आह्मी ठरविलें. व त्याप्रमाणें जावयास निघालों. लेडी वॉशिंग्टनची व आमची ओळख करून देण्यांत आली, पण आश्चर्याची गोष्ट ! त्या बाई एक झगा घालून विणकाम करीत बसल्या होत्या. त्यांनीं आमचें योग्य आदरातिथ्य केलें. पण तें करितांना सुद्धां विणकामाचा त्यांचा हात थांबलेला नव्हता. आह्मीं नटून मुरडून भेटावयास गेलेल्या स्वस्थ बसून होतों, व इकडे तर ही थोर स्त्री सैनिकांकरितां पायमोजे विणीत बसली होती, त्यामुळें आमचें मन आह्मास खाऊं लागलें. इतकेंच नव्हे तर, दोनप्रहरीं आमचें मन न दुखवितां त्या सहज प्रेमळपणें म्हणाल्या, “ या अशा आणीबाणीचे वेळीं, थोरामोठ्यांनीं अत्यंत उद्यमशील बनून इतर स्त्रियांस उत्तम उदाहरण घालून दिलें पाहिजे. इंग्लंडशीं लढाई चालू असेपर्यंत, ज्या प्रेमाच्या माणसांपासून आमचा उगम आहे, त्या आमच्या पुरुषवर्गास लढाईवर सुखांत ठेवण्याकरितां, आह्मीं कसूर करतां

कामा नये. ज्या वस्तू आह्मांस तयार करितां येत नाहींत त्या वापरण्याचा मोह आवरून त्यांपासून स्वातंत्र्य मिळविलें पाहिजे. आमचे पिते, पति व पुत्र देशाभिमानाची ज्योत प्रज्वलित करीत आहेत, तर आह्मी उद्योगधंद्याची ज्योत प्रज्वलित केली पाहिजे." वरील सर्व विवेचनावरून देशांत चाललेल्या एकूणएक गोष्टींची स्त्रियांस त्यावेळीं माहिती होती ही गोष्ट निर्विवाद दिसून येते.

अमेरिकोविरुद्ध लोकमत तयार करण्याचे ब्रिटिश प्रयत्न—

शत्रूचा पाडाव करण्याच्या ज्या अनेक युक्त्या आहेत, त्यांत शत्रूची निंदा करीत सुटणें व त्याच्यासंबंधीं खोट्यानाट्या बातम्या पसरविणें, या युक्तीचाही अवलंब योग्य प्रमाणांत वसाहतवाल्यांविरुद्ध केला जात होता. या युक्तीचा आद्यजनक कोण याचा निश्चित निकाल इतिहासकार लावतील तेव्हां लावोत पण दोनशें-अडीचशें वर्षांपासूत तरी टोरी वर्तमानपत्रें या युक्तीचा अवलंब करीत आलीं आहेत. स्वातंत्र्य युद्धाचे आरंभीं आरंभीं भ्रामक बातम्या छापण्याचा व वसाहतवाल्यांची दिशाभूल करण्याच्या प्रयत्नांचा उपक्रम टोरी वर्नमानपत्रांनीं सुरू केला होता. मोठमोठ्या शहरांतून, नाटक-तमाशांतून देशाभिमानी लोकांची व स्वदेशीच्या उपक्रमाची चेष्टा करण्यांत येऊं लागली होती, नाटकांतील पदेंही इच्छित हेतूनें बनविण्यांत येत.

" स्वातंत्र्याचे लढाईमुळें, जुनी सामाजिक व्यवस्थेची घडी बिघडून सबगोलंकार मातला आहे. जुने आचारविचार नष्ट झाले आहेत. हें सर्व ईश्वरी नियमांचे विरुद्ध वर्तन आहे. ज्या समतेचा पुरस्कार होत आहे ती तत्वतःच चूक आहे, व असत्य आहे तीमुळें सरकारसंबंधीं प्रजेचा योग्य तो आदर राहणार नाहीं. राज्यकर्ते हे केवळ मनुष्यप्राणीच आहेत व ते प्रजेचे नोकर आहेत अशीं तत्वें प्रतिपादने करण्यामुळें राजसत्तेचा अपमान व अनादर होत आहे " वगैरे अनेक प्रलाप टोरी वर्तमानपत्रांनीं काढण्यास सुरुवात केली होती. कित्येकवेळ पाद्री लोकांस सामील करून

वेऊन त्यांचे तोंडून आपल्यास पाहिजे ते उद्‌गार ब्रिटिश अधिकारी काढवीत. जोनाथन बूचर नांवाचा पाद्री प्रतिपादन करी कीं, खुद्द परमेश्वरानेंच मनुष्यप्राण्यावर राज्य करण्याकरितां राजे लोकांना उत्पन्न केलें आहे. त्यांचे सत्तेविरुद्ध ब्र काढणें म्हणजे परमेश्वराचा उपमर्द होय. पवित्र शास्त्रास ही गोष्ट बिलकूल सम्मत नाहीं वगैरे वगैरे.

त्यानंतर ज्यावेळीं प्रत्यक्ष स्वातंत्र्याचे लढाईस सुरुवात झाली, त्यावेळीं हीं पत्रें म्हणूं लागलीं; " कांहीं बदमाष व कपटी लोकांनीं बंडाची कल्पना काढून, बहुजन समाजाच्या अज्ञानाचा ते फायदा घेत आहेत. " " बंडखोर लोक मनुष्य मात्राची दिशाभूल करून, त्यांना खड्यांत पाडण्याचा प्रयत्न करीत आहेत. " " कृष्णकृत्यें करणारे पाजी लोक, अप्रसिद्ध पोटभरू वकील, नादार दुकानदार, गुन्हेगार व छपवून माल विकणारे, नीच, दरवडेखोर, मानवी समाजांतील कचरा, गाळ " वगैरे वगैरे शेलकी शेलकीं विशेषणें त्यावेळचें वर्तमान पत्रांत देशभक्तांविरुद्ध प्रसिद्ध होत. सुप्रसिद्ध देशभक्त सुलिव्हान जो स्वातंत्र्याच्या जाहीरनाम्यांत प्रमुख होता, त्याबद्दल न्यू यॉर्क गॅझेटमध्यें खालील अर्थाची कविता तारीख २३ मे १७७८ सालीं आली होती. ' दशसहस्र, अतिनिंद्य लोकांमध्यें सुलिव्हान तूं महानीच मनुष्य आहेस, बहुतेक सर्व वसाहतींत तूं खलाशी, शेतकरी, वकील, कोणत्याना कोणत्या तरी मिषानें फिरून आला आहेस, बहुतेक वसाहत तुझीच आहे व त्यांत तूंच अट्टल बदमाष शोभतोस. ' वगैरे.

' जोनाथन ओडेल ' वॉशिंग्टनबद्दल खालील कवित्व करितो. ' एक अमानुष कार्य तूं अंगावर घेतलें आहेस. तें राजा, देश व कायदा या सर्वांविरुद्ध आहे. तूं चोरी केलीस, खोट्या गोष्टीस उत्तेजन दिलेंस, सारासार विचाराचा अतिक्रम केलास, अत्यंत पवित्र बंधनें तोडलींस, तुझ्याच हातानें अनेक भगिनींस तूं वैधव्यांत लोटलेंस, व वृद्ध पित्यांना पुत्रशोक करावयास लाविलें आहेस, हिरव्या कुरणावर आतां गाई चरतांना दिसेनाश्या झाल्या आहेत, शहरें उध्वस्त होऊन पडलीं आहेत; हें सर्व तुझ्यामुळेंच झालें, वॉशिंग्टन, विधवा व पोरकी मुलें याचा जाब तुला विचारीत आहेत ! '

थॉमस पेनला त्यांनीं ' भाडोत्री ' ग्रंथकार झटलें. लढ्यांत भाग घेणाऱ्या एकूण एक अधिकाऱ्यांस त्यांनीं कांहींना कांहीं अपशब्द बहाल केला. वॉशिंग्टला त्यांनीं ' भिकारड्या लोकांचा प्रमुख, भुकेनें खंगलेला व व खरजुला, इजिप्तमधील एकूणएक उवा त्याच्या झग्यांत भरलेल्या आहेत. गॉथ व हनस लोकांचा सेनापति, जंगली व खेडवळ लोकांचा झोरक्या, भटें-शिंपी व जोडेशिवे यांचे सैन्यावरील मुख्य अधिकारी, कांटक, सिंहाच्या गुहेंतील उंदीर-' वगैरे अनेक नामाभिधानें दिलीं आहेत. वंडखोरांचीं विशेषणें,:—' राजद्रोह महत्वाकांक्षा, ढोंगीपणा, कपट, खोटेपणा, परनिंदा, दंगाधोपा, क्रूरता, लुच्चेगिरी, असूया, छळ, धर्मभोळेपणा, ' एकूण काय इंग्रजी भाषेंतील कोणताही अपशब्द प्रतिस्पर्ध्यास लावण्यास प्रामाणिक इंग्रजी पत्रें विसरलीं नाहींत.



युद्धकालीन आर्थिक-परिस्थिती.

प्रकरण १० वें.

स्वातंत्र्याच्या जाहीरनाम्यानंतर झालेल्या सप्तवार्षिक महायुद्धांत दोन्हींही राष्ट्रांत कोणाचा जय होईल हें खास सांगतां येण्यासारखें नव्हतें. लढाईचें स्थलापासून इंग्लंड देश फार लांब म्हणजे ३००० मैल असल्यामुळें, शिपाई, हत्यारें दारूगोळा वगैरे युद्धसामुग्री पाठविणें म्हणजे मोठ्या खर्चाची बाब झाली होती. शिवाय वेळही फार मोडत असे. त्याकाळीं इंग्लंडहून अमेरिकेंत जाण्यास दोन अडीच महिने सहज मोडत असत. राष्ट्रीय कर्जाचा बोजा इंग्लंडवर फारच वाढत होता. इंग्लंडचें उत्पन्न बरेंच मोठें होतें खरें, पण शांतता बिघडली किंवा कोठें लढाई सुरूं झाली कीं त्यांत बरीच खोट येई. त्याकाळीं इंग्लंडजवळ मोठें व सुसज्ज असें पुष्कळ सैन्य व जगांत पहिल्या नंबरचें आरमार जय्यत तयार होतें. वसाहतींजवळ लढाऊ आरमार बिलकूल नव्हतें. पैशाचहि तरतूद नव्हती. तेराही वसाहतींनीं कमी अधिक प्रमाणांत जमा केलेल्या स्वयंसैनिकांच्या टोळ्या हेंच काय तें वसाहतींचें बल. या सैन्यास शिस्त फार कमी प्रमाणांत होती. तरी पण अमेरिकन सैन्यांत उत्तम नेम मारणारे लोक होते. तसेंच अमेरिकन लोक हाडापेरानें मजबूत व परिस्थितीमुळें अधिक काटक होते यांत शंका नाहीं. अमेरिकन सैन्यास दुसरा फायदा म्हणजे त्याला आसपासच्या एकंदर भू-भागाची नीट माहिती होती, तिचा उपयोग आडून छापे घालण्यांत व वेळप्रसंगीं पळून जाण्यास होण्यासारखा होता. दुर्दैवाची गोष्ट म्हणजे सर्व वसाहतींत असावी तितकी एकी नव्हती नाहीं तर युद्ध तीन चार वर्षें तरी अगोदर आटोपलें असतें. कॉंटिनेंटल कॉंग्रेस म्हणून ज्या संस्थेखालीं सर्व राष्ट्र एकत्र झालें होतें, तिला खरी सत्ता कांहींच नव्हती. ती फक्त वादविवादाची एक संस्थाच असल्याप्रमाणें होती. तिला ठराविक कार्याकरितां मदत मागतां येई पण सत्तेनें एकादी गोष्ट करतां येत नसे किंवा एकादा तात्पुरता कर सुद्धां

वसविता येत नसे. आपल्या प्रांताचे आसपास लढाई येऊन ठेपली कीं, वसाहती सैन्य जमवूं लागत व मदत करण्यास जाऱ्या होत. पण पर वसाहतींत जर कांहीं मोठी स्वारी करण्याचा प्रसंग आला तर सैन्य जमवून धाडण्यास कुचराई करीत. सर्व वसाहती मिळून एकच देश आहे ही कल्पना त्यांचे अंगीं नीट बाणली नव्हती. प्रत्येक वसाहत जमलेला वसूल तेथल्या तेथें खर्च करून टाकी, पण सर्वांचा मिळून एक खजिना असावा ही कल्पनाच त्यांना शिवली नव्हती. वसाहतींचा विजय होण्यास खरें कारण झालें असेल तर शत्रूकडील सैन्यांतील ढिलाई हेंच म्हणतां येईल. वसाहतवाल्यांनीं एकी करून जितकी उत्तम संघटणा करावयास पाहिजे तितकी त्यांचेकडून केव्हांही झाली नाहीं.

शत्रुपक्षानें कर बसवून अशी परिस्थिति उत्पन्न करून ठेवली होती कीं, कर म्हणतांच प्रजाजनांचे अंगावर कांटा उभा राही. त्यामुळें नवीन कर बसवून पैसा वसूल करणें काँग्रेसला फार जड झालें होतें. कर चुकविण्याकरितांच पुष्कळशा वसाहतवाल्यांस स्वराज्य पाहिजे होते. व अशा लोकांनीं स्वराज्याखालील कर स्वखुषीनें भरणें दुरापास्त होतें. कर्जरोखे काढून वसाहतींचा व काँग्रेसचा खर्च भागविणें, हाच उपाय शिल्लक होता. या उपायास तरी व्यापारी वर्गाचा विरोधच होता. एकंदरींत सर्वसाधारण लोकांत कर्जरोख्यांबद्दल अद्यापि अविश्वास उत्पन्न झाला नव्हता. लढाई सुरूं होण्यापूर्वीच सहा वसाहतींनीं कर्जरोखे काढले सुद्धां होते. इ. स. १७७५ च्या जून महिन्यांत अमेरिकन सैन्यावर कमांडर इन चीफ्ची नेमणूक झाल्यानंतर वीस लक्ष डॉलरचे कर्जरोखे काढण्यांत आले. त्यानंतर जुलई महिन्यांत १० लक्ष डॉलर व लगेच पुन्हा तीस लक्ष डॉलरचे कर्जरोखे काढण्यांत आले. स्वातंत्र्याचे जाहिरनाम्याचे पूर्वी एक कोटी चाळीस लक्ष डॉलरचे रोखे काढले. या रोख्यांना व्याजही नव्हतें व फेड नक्की केव्हां करण्यांत येईल, हेंही त्यांत निर्दिशत केलें नव्हतें, पण त्यानंतर अधिक कर्जरोखे काढिल्यास त्यांना कोणी विचारीनासें होईल व आपली पत राहणार नाहीं हें काँग्रेसला माहीत होतें. अर्थातच मग दुसरीं साधनें अमलांत आणण्याचा काँग्रेसनें विचार केला.

बेंजामिन फ्रँकलिननें फ्रान्सपासून साठ लक्ष डॉलर कर्ज मिळविलें. जॉन जे यानें स्पॅनिश सरकारकडून कर्ज मिळाविण्याची व्यवस्था केली. अशा व दुसऱ्या साधनांनीं सुमारें साडेतीन कोटी डॉलर कर्जाऊ मिळाले. त्यानंतर त्यावेळीं सर्वमान्य अशा ' लॉटरीनें ' म्हणजे सोडत काढून पैसा जमविण्याचा उपक्रमही अमलांत आला. काँग्रेसनें एक लक्ष तिकिटें छापून काढलीं व पंधरा लक्ष डॉलर जमा करण्याचा प्रयत्न केला. या सोडतीच्या अटी फारशा समाधानकारक नव्हत्या. रोख पैसा देऊन तिकिटें विकत घ्यावयाचीं, व बक्षिसें मात्र ४ टक्के व्याजाचीं पांच वर्षें परतफेडीच्या कॅशसर्टिफिकिटांमध्यें मिळावयाचीं, अशा अटींवर फारशी तिकीटविक्री होईना. नंतर प्रत्येक वसाहतींकडे पैसा मागण्यांत आला, पण वसाहतीचे खजिन्यांत फारसा पैसा नव्हता, व लढाईकरितां पैसा दिल्यास अधिक कर वसविल्याशिवाय खर्चाची तोंडमिळवणी करणें शक्य नव्हतें. कर वसविण्याचें ठरल्यास लोकांमध्यें असंतोष उत्पन्न झाल्याशिवाय राहणार नाहीं हें प्रत्येक वसाहतीस माहीत होतें.

वसाहतींकडून सुमारें साठ लक्ष डॉलर मदत मिळाली पण तो पुरेशी नव्हती. काँग्रेसनें वसाहतींकडे शिफारस केली कीं, जे लोक इंग्रजांस मदत करितात अशी शंका येईल त्यांची मालमत्ता जप्त करून लढाईच्या खर्चाकरितां पाठवावी. तसेंच ज्या इंग्रज व्यापाऱ्यांनीं ब्रिटिश सरकारास देणें असेल, तें वसाहती कर्ज रोख्यांतच वसाहतींनीं वसूल करावें. अशा कांहींशा अप्रशस्त रीतीनें सुद्धां एक कोटी साठ लक्ष डॉलरपेक्षां अधिक उत्पन्न होऊं शकलें नाहीं.

इसवी सन १७७८ सालीं पुन्हां सहा कोटी तीस लक्ष डॉलरचे कर्जरोखे काढण्यांत आले. त्यानंतर असें आढळून आलें कीं, बाजारांत कागदी डॉलरची किंमत त्याच्या दर्शनी किंमतीच्या पंचमांशानें सुद्धां नाहीं. मग वसाहतींना पैसा नाहीं तर नाहीं निदान धान्य व लढाऊ सामान यांचा पुरवठा केला तरी चालेल अशी विनंति करण्यांत आली. अशा रीतीनें मका, गहूं, मांस, गवत वगैरे निरनिराळ्या वस्तूंचा सांठा काँग्रेसचे

सैन्यास मिळूं लागला पण या वस्तू एका वसाहतींतून दुसऱ्या वसाहतींत नेण्याचा खर्च त्यावेळच्या दळणवळणाच्या परिस्थितीमुळें फारच होई, म्हणून ही पद्धतही त्याज्य ठरली. त्यानंतर कॉंग्रेसनें असा हुकूम काढला कीं सैन्याचा तळ जेथें असेल तेथल्यातेथेंच सांपडतील त्या वस्तू स्वतःचे अधिकाराखालीं लोकांपासून घ्याव्या. मात्र त्या वस्तूंच्या किंमतीबद्दल त्यांना रीतसर पावती लिहून देण्यांत यावी. हा कांहींसा एकतंत्री कायदा व्हॅली फोर्स येथें हिवाळ्यांत सैन्याचे मुक्कामांत जे अपरिमित हाल झाले त्यानंतर अमलांत आला. लढाईचे वेळीं ब्रिटिश अधिकारी वसाहतींतील धान्य व इतर सामुग्री रोख पैसे देऊन खरेदी करीत ही गोष्ट लक्षांत घेतली ह्मणजे वसाहती सैन्याचे तुटपुंज्या तयारीचें स्वरूप ध्यानांत येईल.

इ. स. १७७९ सालीं वसाहत सरकारनें पुन्हा दहा कोटि डॉलरचे कर्जरोखे काढले, त्याचा परिणाम ताबडतोब दिसूं लागला. कारण या कर्जरोख्यांची किंमत दर्शनी किंमतीच्या पांच टक्के इतकी सुद्धां राहिली नाहीं. त्यानंतर वसाहत सरकारतर्फे जॉन जे यानें एक प्रसिद्धिपत्रक काढिलें त्यांत त्यानें असें आश्वासन दिलें होतें कीं, एकंकर कर्जरोखे वीस कोटि डॉलर पेक्षां अधिक किंमतीचें काढण्यांत येणार नाहींत, आणि सर्व वसाहतींनी मिळून तें सर्व कर्ज फेडण्याचें आश्वासन दिलेलें आहे. आणि सर्व वसाहती मिळून हें कर्ज फेडण्याचें मुळीच अशक्य नाहीं. आपल्या ताब्यांत असलेला अवाढव्य मुलूख व त्यांतून निघणारें मुबलक उत्पन्न ध्यानांत घेतां व वाढल्या लोकसंख्येचा कर देण्याची ऐपत पहातां, कर्जरोख्यांची फेड खालीनें होण्यासारखी आहे. त्यामुळें लोकांनीं अविश्वास दाखवूं नये. तर सर्व लोकांनीं यावेळीं राष्ट्रीय कर्जासंबंधीं योग्य विश्वास दाखविला पाहिजे. कर्ज सर्वांच्या हिताकरितां सर्वांनीं मिळून काढिलें आहे. आणि तें फेडलें जावें ही सर्वांची इच्छा आहे. म्हणून अविश्वासास कारणच उरत नाहीं, वगैरे जॉन जेचा संदेश जरी स्फूर्तिदायक व गंभीर स्वरूपाचा होता तरी त्यामुळें रोख्यांची किंमत उतरण्याचें मात्र थांबलें नाहीं. इ. स. १७८० सालीं ज्यावेळीं कर्ज-

१० वें) सट्टेबाज व्यापाऱ्यांची नफेबाजी

रोख्यांचा भाव शंभरांस एकवर आला त्यावेळीं कांग्रेसनें शिफारस केली कीं, वसाहत सरकारनें हे रोखे शेंकडा अडीच भावांत खरेदी करण्यास सुरुवात करावी. याप्रमाणें सुमारें १२ कोटी डॉलरच्या रोख्यांची अनायासें वासलात लागली. बाकीच्या रोख्यांपैकीं वराच भाग इ. १७९० सालीं शेंकडा एक भावानें वसाहत सरकारनें खरेदी केला. अशा रीतीनें लढाईचें कर्ज त्याचा भाव घटून जवळ जवळ आपोआपच नाहींसें झालें.

पैशाचीं किंमत कमी होत चालल्यामुळें वसाहतींतील व्यापारही नीट चालेनासा झाला होता. शेतकरी धान्य विकीनात, व्यापारी माल मागवीनात, त्यामुळें पैशाचे अदलाबदलीनें होणारा व्यापार बंद पडून मालाचीच अदलाबदल होऊन व्यापार होऊं लागला. लढाई बंद झाल्यावर इंग्रज व फ्रेंच सैन्यानें दिलेलें, चांदीचें व सोन्याचें नाणें एवढेंच काय तें चलन वसाहतींत राहिलें होतें. व तेंच कायदेशीर चलन म्हणून चाललें होतें. कागदी नोटांचा भाव पडल्यामुळें फार चमत्कारिक अनुभव व्यवहारांत येऊं लागला. मूळ कर्ज कोणी कर्जदारानें खरोखरच्या नाण्यांत घेतलें असल्यास तो धनकोच्या अगावर तितक्या दर्शनी किंमतीच्या नोटा फेकून मोकळा होई. कारण वसाहतीनें काढलेल्या नोटा कायदेशीर चलन मानलें गेलें होतें. बाजारांत रोज निरनिराळ्या वातम्या उठवून व नोटांचा भाव कमी अधिक होईल असें करून सट्टेबाज व्यापाऱ्यांनीं अशा अडीअडचणीचे वेळीं नफेबाजी सुरूं केली होती.

वॉशिंग्टननें कांग्रेसला लिहिलेल्या एका पत्रांत असें म्हटलें होतें कीं, " आपसांतील मतभेद, नोटांच्या किंमतींतील घट, सट्टेबाज लोकांनीं व्यापारांत चालविलेली नफेबाजी, या कारणांनीं आमच्या शत्रूंचा आत्मविश्वास वाढतो आहे. "

शेवटीं शेवटीं कागदी नोटा हा निव्वळ थट्टेचा विषय झाला. व्हर्जीनिया वसाहतीनें काढलेल्या नोटांची किंमत हजारास एक इतकी उतरली होती. कित्येक वेळीं न्हावी लोक या नोटा भिंतीस चिकटवून आपलीं दुकानें सुशोभित करीत. समुद्रावरील खलाशी बंदरांत उतरले म्हणजे त्यांना पगारांचे ऐवजीं नोटांचीं पुडकीं देण्यांत येत. या उतरलेल्या भावांतील

नाटांचे कित्येक खलाशांनीं पोषाक बनविले आणि ते घालून ते गांवभर फिरत व मौज करीत. व्यापारी लोक कमी भावांत नोटा खरेदी करीत, नंतर एकादा मोठा विजय अमेरिकन सैन्यास मिळाल्याची बातमी पिकवीत किंवा फ्रान्समधून बरेंच सोन्याचें नाणें यावयाचें आहे असें लोकांस सांगत त्यामुळें नोटांचा भाव किंचित् चढला कीं त्या विकीत व मोठा फायदा मिळवीत. लढाईत जर कोणाचें आंधक नुकसान झालें असेल तर तें शिपाई लोकांचें. प्राणांची पर्वाहि न करतां ज्यांनीं माय-देशाचे उत्कर्षासाठीं सैन्यांत नांव नोंदविलें, त्यांना लढाई बंद झाल्यावर आपले पगार कागदी नोटांत मिळाले, अथवा दूरच्या प्रदेशांतील कुठल्या तरी जमिनीवर कागदी मालकी हक्क मिळाला. लढाई बंद झाल्यावर मिसिसिपीपर्यंत मुलुख वसाहत सरकारचे ताब्यांत आल्यानें शिपायांस मोठमोठ्या जमिनी देण्याचें ठरविण्यांत आलें. मात्र या जमिनी पड होत्या व अत्यंत दुर्गम अशा मुलखांत असल्यानें त्यांचा तात्कालिक फायदा शिपाई लोकांस मिळाला नाहीं.

स्वातंत्र्य लाभल्यानंतर अमेरिकन लोकांचा व्यापार इंग्लंडनें लाद-लेल्या अडचणींतून कायमचा मुक्त झाला खरा पण त्याच्यापासून फायदा न होतां नुकसानच होऊं लागलें. जॉन जे नांवाच्या गृहस्थानें वसाहती व्यापार हातीं आल्यानें काय फायदे होतील याचें खालील वर्णन केलें आहे. " आमचा व्यापार फक्त ब्रिटनशींच आहे, आम्हाला आमचा माल तेथें नेण्यास भाग पाडिलें होतें आणि ब्रिटिश लोक ठरवतील त्याच किंमतीस माल विकावा लागे. आम्हाला आमचा मालही ब्रिटिश व्यापाऱ्या-कडूनच घेण्यास भाग पाडलें होतें. आणि ब्रिटिश व्यापारी किंवा कारखानदार यांच्याशीं स्पर्धा होईल असा कोणताही माल उत्पन्न करण्यास अडथळा केला जाई. आतां आम्ही स्वतंत्र आहों, सर्व जग व्यापार करण्यास आम्हाला खुलें झालें आहे. आतां आम्हांस ज्यांच्या-पासून सर्वांत स्वस्त माल मिळेल त्यांच्यापासून खरेदी करतां येईल. व ज्यांच्यापासून सर्वांत अधिक फायदा मिळेल त्यांनाच आपला माल विकतां येईल. "

थोडा कालपर्यंत तरी जॉन जेचें हें ह्मणणें मनोराज्यच ठरलें. लढाई चालू असतांना ब्रिटिश पार्लमेंटनें अमेरिकेचा इंग्लंडशीं व वसाहतीशीं असलेला व्यवहार सक्तीनें बंद केला. व त्याचे बंदोबस्तासाठीं ब्रिटिश आरमाराची तुकडी ठेवण्यांत आली होती. अमेरिकन जहाजवाल्यांनीं लढाईचे वेळीं आपल्या जहाजावर दारूगोळा व हत्यारें ठेवण्याचा परवाना मिळविला होता. त्यांनीं ब्रिटिश जहाजें अमेरिकेचे किनाऱ्यावर अडकून धरण्याची उत्कृष्ट कामगिरी बजाविली. त्यांनीं सुमारें सहाशें व्यापारी व लढाऊ जहाजें यांचा पाडाव केला. या जहाजांचे किंमतींतून ब्रिटिश लढाऊ जहाजांनीं केलेल्या अमेरिकेच्या नुकसानीची भरपाई करून घेण्यांत आली.

वसाहतीच्या काळीं मुख्यतः सर्वच व्यापार इंग्लंडशीं चाले, किंवा ब्रिटिश वेस्ट इंडीजशीं चाले. लढाईनंतर ब्रिटिश बंदरांत व वेस्ट इंडीज-मध्यें अमेरिकन जहाजें आणण्याची बंदी झाली. त्यामुळें अमेरिकन व्यापारास जोराचा धक्का बसला. सुप्रसिद्ध ब्रिटिश मुत्सद्दी पिट यानें ब्रिटिश जहाजें अमेरिकन बंदरांत व अमेरिकन जहाजें ब्रिटिश बंदरांत सारख्याच अटीखालीं नेण्यास प्रत्यवाय नसावा, याबद्दल पुष्कळ खटपट केली. इतर सर्व देशांचीं जहाजें ब्रिटिश बंदरांत येतात त्याच अटीवर व तितकेच कर भरून अमेरिकन जहाजें ब्रिटिश बंदरांत येण्यास काय हरकत आहे ? असें पिट् प्रतिपादन करीत होता. परंतु ब्रिटिश व्यापाऱ्यांनीं ही गोष्ट हाणून पाडली. ते ह्मणत ' अमेरिकन जहाजें फार थोड्या किंमतींत बांधलेलीं असतात व त्यांना खलाशीही स्वल्प पगारांत मिळतात, त्यामुळें आमच्या दर्यावर्दी व्यापारास अमेरिकन जहाजवाले लवकरच धोका आणतील. इतर देशांतील जहाजवाले व अमेरिकन जहाजवाले यांच्यांत फरक आहे ! '

ब्रिटिश प्रजाजनांना अमेरिकन जहाजें खरेदी करण्यास बंदी करण्यांत आली होती. नॅव्हिगेशन कायद्यामुळें अमेरिकन जहाजांना परकीय लेखण्यांत येई इतकेंच नव्हे तर प्रत्येक अमेरिकन वसाहत स्वतंत्र समजण्यांत येई. व ज्या वसाहतींतील जहाज असेल तेथील माल त्या जहाजानें आणला पाहिजे, इतर ठिकाणचा मालआणतां कामा नये असा निर्बंध

घातला होता. त्याचप्रमाणें फक्त जहाजें बांधण्यास लागणारें सामानच अमेरिकन जहाजांनीं इंग्लिश बंदरांत उतरलें पाहिजे असा निर्बंध घातला होता. त्याचप्रमाणें इ. स. १७८३ सालीं वेस्ट इंडीजमध्ये कोणत्याही बंदरांत अमेरिकन जहाज येऊं देतां कामा नये असा निर्बंध घालण्यांत आला होता. युनायटेड स्टेट्समधून मासे-मांस वगैरे कोणताही माल, मग तो ब्रिटिश जहाजांतून जरी आणला असला, तरी येऊं देऊं नये असा निर्बंध घातला होता. लढाईपूर्वी म्हणजे अवघ्या दहावर्षांपूर्वी युनायटेड् स्टेट्सपैकीं जवळ जवळ एकतृतीयांश व्यापार ब्रिटिश वेस्ट इंडीजशीं होता, तो आतां साफ बुडाला. जमेका व बहामा येथील पंधरा हजार नीग्रो लोक, त्यांना मिळणाऱ्या अन्नाचा पुरवठा युनायटेड् स्टेट्समधून बंद झाल्यामुळें मृत्युमुखीं पडले. आपण केलेल्या निर्बंधामुळें आपल्याच वसाहतींतील १५००, लोक मृत्युमुखीं पडले याचा ब्रिटिश व्यापाऱ्यांचे मनाव कांहींही परिणाम झाला नाहीं.

ब्रिटिश सरकार विकत घेत असलेल्या जिनसांचा खप बंद पडला. नीळ, दर्यावर्दी सामान, कच्चें लोखंड यांना कोणी विचारीना. इंग्लंडशीं होणारा व्यापार जो बुडाला त्याची भरपाई फ्रेंच, स्पॅनिश व इतर देशांशीं होणाऱ्या व्यापारानें होईना. युनायटेड स्टेटसनें इंग्लंडशीं व्यापारी तहाची वाटाघाट केली. पण ब्रिटिश व्यापाऱ्यांनीं जोर धरला व या तहाचे वाटाघाटींत तुम्हीं तेराही वसाहती एकमेकांपासून अलग आहांत तेव्हां अशा सुसंघटित नसलेल्या कांग्रेसशीं कसलाही तह करण्यांत आम्हाला फायदा नाहीं, असा जबाब ब्रिटिश मुत्सद्यांकडून मिळाला.

दुसरीकडे स्पेननें मिसिसिपी नदींत नौकानयनाचे हक्क, स्पेन व अमेरिकन वसाहती यांना समसमान असावेत, असा तहांत करार असून सुद्धां, मिसिसिपीचे दोन्हीं तीरांवर व्यापार करण्याचा फक्त आपलाच हक्क आहे असा हट्ट धरिला. ॲलिघेनी पर्वताकडील रहिवाशांनीं आपला व्यापार करण्याचा मार्ग बंद झाल्याबद्दल कांग्रेसकडे तक्रार केली, व मिसिसिपींत व्यापाराचा हक्क नष्ट झाल्यास आम्हीं निराळे होऊं अशी धमकी

दिली. त्याला वॉशिंग्टननें जबाब पाठविला कीं, आम्हीं आज सर्व एक असतांना ही दशा आहे मग उद्यां तेरा झाल्यानंतर आमची काय दशा होईल त्याचा विचार करा !

निरनिराळ्या वसाहतींनीं निरानिराळी व्यापारपद्धति अमलांत आणली होती. व त्यांचे आपआपसांत खटके उडत- मॅसच्युसेट्स व न्यू जर्से यांनीं खुल्या व्यापाऱ्याचे तत्त्व स्वीकारलें, व्हर्जीनियानें बाहेर जाणाऱ्या तंबाखूबर व आंत येणाऱ्या मद्य वगैरे पदार्थांवर जकात बसवून पुष्कळ वसूल येईल असा बंदोबस्त केला. पेनासिल्व्हॅनिया, न्होड आयर्लंड, व न्यू यॉर्क यांनीं चैनीचे पदार्थांवर ह्मणजे चहा, कॉफी, साखर इत्यादि पदार्थांवर फर बसविले. व वसाहतींत तयार होणाऱ्या मालाप्रमाणें बाहे-रून येणाऱ्या मालावर कर बसवून आपल्या धंद्याचें रक्षण करण्यास प्रारंभ केला. न्यू यार्क व पेनासिलव्हॅनिया यांनीं ब्रिटिश जहाजांतून येणाऱ्या एकूण एक जिनसांवर दुप्पट जकात बसविली. अशा तऱ्हेनें अटलांटिक महासाग-राचे किनाऱ्यावरील तेरा वसाहतींत जकातीच्या तेरा पद्धती चालू होत्या, व त्यांचा परस्परांशीं मेळ नव्हता. पोटोमॅक नदींतून होणाऱ्या वाहतुकी-संबंधीं व्हाजैनिया आणि मेरीलँडमध्यें वाद चालूं होता. डिलॉवेर नदींतील व्यापाराबद्दल पेनसिलव्हॅनिया व डिलावेर हीं संस्थानें भांडत होतीं. या सर्व वसाहतींत जकातींचे बाबत एकच पद्धति सर्वमान्य होईपर्यंत ग्रेट ब्रिटन व स्पेनशीं व्यापारी तह घडवून आणणें फार दुरापास्त होतें.

कारखान्यांची वाढ—स्वातंत्र्य मिळाल्यामुळें लोकरीचा कपडा बीव्हरच्या कातड्याच्या टोप्या वगैरे वस्तू देशांतल्या देशांत किंवा पर-देशांतही पाठविण्यास असलेले निर्बंध नाहींसे झाले होते. लोखंडाचे तयार भाग बनविण्यास मोकळीक मिळाली होती, लढाईचे वेळीं बाहेरून येणारे सर्वच जिन्नस बंद झाल्यामुळें बहुतेक पदार्थ देशांतल्या देशांत तयार होऊं लागले होते. तोफा, बंदुका, नांगर वगैरे वस्तूंबद्दल आतां इंग्लंडवर अवलंबून राहवें लागत नसे. त्या वस्तू ईस्ट ब्रिजवॉटर, कँटन, स्प्रिंग-फील्ड, व ईस्टन वगैरे ठिकाणीं आतां उत्तम तयार होऊं लागल्या होत्या.

स्टार्लिंग वर्क्स नांवाच्या कारखान्यांत उत्तम तोफा ओतवूं लागले, तसेंच हडसन नदींत जहाजें येऊं नयेत ह्मणून या किनाऱ्यापासून तों त्या किनाऱ्यापर्यंत एक जंगी साखळदंड बांधला होता, त्यांतील प्रत्येक दुवा अमेरिकेंतच तयार झाला होता. प्रिन्सिपिआ येथें, लढाईंत वापरलेले अनेक तोफांचे गोळे ओतविले होते इतकेंच नव्हे तर खुद्द वॉशिंग्टन हा या कारखान्याचा मोठा भागीदार होता.

मीठ तयार करण्याचा धंदा याच सुमारास वसाहतींत सुरूं झाला होता. आतांपर्यंत तें वेस्ट इंडीज व पोर्तुगालमधून येई. सर्व मीठ समुद्राचें पाणी उकळून व आटवून तयार होई. अमेरिकेंत वापरला जाणारा सर्व कपडा गेलीं दहा वर्षें अमेरिकेंतच तयार करवून घेणें भागच पडलें होतें. त्यामुळें अमेरिकन कापडाचे व्यापारास ऊर्जितावस्था आली होती. लढाईंतील पुष्कळशा शिपायांच्या अंगावरील कपडे त्यांच्याच घरच्या मेंढ्यांच्या लोंकरीपासून घरच्याच बाया माणसांनीं विणलेले होते.

इ. स. १७६५ सालीं न्यू यॉर्कच्या गव्हर्नरनें बोर्ड ऑफ ट्रेडला केलेल्या रिपोर्टांत खालील विधानें आहेत. "येथील सर्व रहिवाशांच्य पायमोज्यांस पुरे इतकी लोकर येथें पैदा होत नाहीं, तरी पुढील दहा वर्षांत ती तितकी उत्पन्न होईल असे पद्धतशीर प्रयत्न येथील रहिवाशांनीं चालविले आहेत." न्यू यॉर्क येथील कला, शेती आणि काटकसर यांस उत्तेजन देणाऱ्या एका संस्थेनें तागाचें सूत, कपडा व पायमोजे करणारास बक्षिसें देण्याचें ठरविलें आहे. पायमोजे तयार करण्याकरितां लागणाऱ्या यांत्रिक चौकटी, लोखंडाच्या बनविणाऱ्या पहिल्या तीन गृहस्थांस सुवर्ण-पदक द्यावयाचें ठरविलें आहे. धुवट कपडा तयार करणाऱ्या कारखान्यास तीस पौंड बक्षीस मिळणार आहे. बॉस्टन येथें तर एक विणकामाची शाळाच काढण्यांत आली आहे. या संस्थेचा चालक विल्यम मोलिनो ह्मणतो कीं, आह्मी ३०० बायका व मुलें यांना ही कला उत्तम तऱ्हेनें शिकवित आहेत. तेथें १२ माग सतत लोकरीचें, तागाचें व शिडास लागणारें कापड तयार करीत आहेत. तेथेंच कपड्यास धुवट करण्याचें, तजेला आणण्याचें व रंगविण्याचें काम चालूं आहे." इ. इ.

शेतीवर अवलंबून असणारे कित्येक धंदे ब्रिटिश लोकांच्या मेहेरबानीवर होते. त्यांचें स्वातंत्र्याचे उदयानंतर नुकसान होऊं लागलें. टरपेंटाईन तयार करण्याचा व नीळ पिकविण्याचा धंदा पूर्वीइतका उत्तम चालेना. देवदारी सोट वसाहतीचे काळांत ब्रिटिश जहाजांचे शिडाकरितां राखून ठेवण्यांत येत, तें नियंत्रण आतां राहिलें नव्हतें. तरी सुद्धां ते तोडल्यानें टरपेंटाईन तेलाच्या उत्पन्नाची भरपाई होईना. पुढें लवकरच या मालास युरोपांत गिऱ्हाईक मिळूं लागलें व अमेरिकेंतही धंद्याची व लोकसंख्येची वाढ होऊं लागल्यामुळें पुढें लवकरच या धंद्याचा जम बसूं लागला.

जमिनीचे मालकीबद्दल व धाऱ्याचे पद्धतींतही मोठमोठे फेरफार झाले. पूर्वीची जमीनदारीची पद्धत नष्ट करण्यांत आली. पुष्कळ जमीनदारांनीं मोठमोठ्या जमिनी वसाहती न करितां किंवा लागवडही न करितां पाडून ठेविल्या होत्या त्या जप्त करण्यांत आल्या. मोठमोठ्या लॉर्ड लोकांच्याही जमिनी जप्त झाल्या. जेफरसननें खटपट करून त्या सर्व प्रत्यक्ष लागवड करणाऱ्या लोकांसच ठरीव कर घेण्याचें ठरवून देऊन टाकिल्या. अशा रीतीनें देशांतील धान्याचें उत्पन्न वाढूं लागलें व त्याबरोबरच जमीनधाऱ्याचें उत्पन्नही वाढलें.

गुलामगिरीविरुद्ध चळवळ—आफ्रिकेंतून शिद्दी गुलाम आणून त्यांना वसाहतींत कामास लावण्याचें धोरण तात्पुरतेंच अमलांत रहावें असें वसाहतींतील सर्व लोकांचें मत होतें. युरोपांतून पुरेसे वसावतवाले आल्यानंतर व येथीलही लोकसंख्या वाढल्यानंतर मग गुलाम आणण्याचें बंद करण्यास हरकत नाहीं, असें लोकमत प्रचलित होतें. दाक्षिणेंतील वसाहतींत गुलाम लोक कामास लाविल्यापासून जरी बराच फायदा मिळे, तरी त्यांची संख्या वाढल्यापासून होणाऱ्या अडचणींची तुलना करितां एकंदरींत गुलामांचा व्यापार बंद करण्यापासूनच अधिक फायदा दिसून येत होता. साउथ कॅरोलिना, मेरीलँड व मॅसॅच्युसेटस येथील वसाहतींनीं गुलाम देशांत येऊं देण्यावर जबरदस्त कर बसविला होता, तो इतका कीं, त्यांची आयात होणें अशक्य व्हावें. पण ब्रिटिश व्यापारी धोरण

गुलामांचे व्यापारास अनुकूल असल्यामुळें, गुलामांविरुद्ध कायदा वसाहतींत झाला कीं त्याला पार्लमेंटकडून व्हेटो ह्मणजे हरकत येई. इ. स. १७१३ ते १७३३ सालांचे दरम्यान रॉयल आफ्रिकन कंपनी, दरसाल पांचपासून दहा हजार गुलाम आणून अमेरिकेंत विकी. या कंपनीचे चालकांचें व भागीदारांचें ब्रिटिश सरकारांत फार वजन होतें. १७३३ सालीं या कंपनीचा लायसेन्स खलास झाल्यावर खासगी व्यक्तींनीं हा धंदा आरंभला. इ. स. १७१० सालींच दर गुलामामागें पांच पौंड जकात ठेवण्याची सूचना व्हर्जीनियानें केली होती. पण तेथील ब्रिटिश गव्हर्नरनें ती फेटाळून लाविली. त्यानंतर त्याच वसाहतींत इ. स. १७३३—६६—६९ सालींही जकातीच्या सूचना आल्या होत्या. साऊथ कॅरोलिनानें दहा पौंडांपासून १०० पौंडांपर्यंत जकात प्रत्येक आयात होणाऱ्या गुलामावर ठेविली होती. व या जकातीच्या पैशांतून युरोपांतून येणाऱ्या त्यांच्या वसाहतवाल्यांस मदत करण्याची त्यांची योजना होती. इ. स. १७६० सालीं कॅरोलिना वसाहतीनें गुलामांची आयात अजिबात बंद केली. आणि त्या गोष्टीस तेथील गव्हर्नरची संमति मिळून सुद्धां प्रीव्ही कौन्सिलनें हरकत घेतली, इतकेंच नव्हे, तर गव्हर्नरास असला लांडा कारभार केल्याबद्दल जोराची थप्पड बसली

इ. स. १७७२ सालीं व्हर्जीनिया वसाहतीनें एक लांबच लांब अर्ज पार्लमेंटास सादर केला. आफ्रिकेचे किनाऱ्यावरून शिद्दी लोक पकडून आणून त्यांना अमेरिकेंत गुलाम ह्मणून विकणें हें फार अमानुष असें कृत्य आहे तसेंच त्यामुळें एकादे वेळीं आपल्या संबंध वसाहतींवर मोठें संकट कोसळून त्या वसाहतीच आपल्या ताब्यांतून जाण्याचा संभव आहे, ह्मणून असल्या अनीतिमूलक व्यापाऱ्याचा आम्ही वसाहती नायनाट करण्याचा प्रयत्न करीत असतांना सुद्धां आम्हांला जो वरचेवर अडथळा करण्यांत येत असतो त्याचा प्रतिकार करण्याची आम्ही अत्यंत नम्रतेनें आपले चरणीं विनंति करीत आहों, ' असें त्या अर्जांत म्हटलें होतें.

उत्तरेकडील वसाहतींत गुलामांचीं संख्या फारशी नव्हती, तेथें बहुतेक मुदतबंदीचे युरोपियन मजूरच असत, तरीपण तेथें सुद्धां, गुलामांचा व्यापार फायदेशीर होई. तेथें जकात भरून लोक गुलाम आणवीत पण

तेथल्याच कायद्यानें असें ठरविलें होतें कीं गुलाम बाहेर पाठवितांच ही जकात मालकास परत मिळेल. त्यामुळें बॉस्टन व न्यू पोर्ट हीं गुलामगिरीच्या व्यापाराचीं महत्वाचीं केंद्रें बनलीं होतीं. तेथें गुलाम आणून सांठवीत, व गिऱ्हाईक मिळतांच त्यांस विकून टाकीत. गुलामांची आयात बंद करण्याची खटपट करणारे सर्वच उच्च हेतूनें प्रयत्न करीत होते, असें मात्र म्हणतां येणार नाहीं. कांहीं गृहस्थांनीं दाक्षिणेकडील संस्थानांत गुलामांचे कळपच्या कळप वाढविले होते. व ते त्यांची अगदीं गुरांच्या कळपाप्रमाणेंच जोपासना करीत व त्यांना विकीत. गुलामांची आयात बंद झाल्यावर आपल्या मालास उत्तम गिऱ्हाईक मिळेल असें वाटून कांहीं अट्टल-बदमाषांनीं साधुत्वाचें ढोंग आणलें होतें, हें येथें नमूद केलें पाहिजे.

स्वातंत्र्याच्या जाहीरनाम्याचे मूळ प्रतींत इंग्लंडचे राजावर असा आरोप करण्यांत आला होता कीं, " आपण मानव धर्माविरुद्धच क्रूर युद्ध करीत आहांत, एका दूर देशांतील लोक, ज्यानीं तुमचा यत्किंचित्ही अपराध केला नाहीं त्यांच्या जीविताचें व त्यांच्या स्वातंत्र्याच्या एकंदर सर्व हक्कांचें अपहरण करून त्यांना गुलाम बनवून त्यांना पृथ्वीचे दुसऱ्या भागांवर विकीत आहांत व इतक्या लांबीच्या प्रवासांत त्यांच्यावर मरण ओढवीत आहांत " वगैरे वगैरे.

इ. स. १७८० सालीं जे नीग्रो गुलाम लढाईवर जातील त्यांची गुलामगिरींतून पूर्ण मुक्तता करण्याचें आश्वासन काँग्रेसनें दिलें, वॉशिंग्टनचे विनंतीवरून कांग्रेसनें मुक्त केलेल्या सर्व गुलामांचे मालकांस नुकसानभर-पाई देण्याचें अभिवचन दिलें. लढाईवर गेलेल्या मुदतबंदी मजुरांसही लढाई संपतांच मुक्त करून नागरिक बनाविण्यांत आलें, त्यामुळें लढाई संपतांच मुक्त असे नीग्रो गुलाम स्वतंत्र फिरतांना दिसूं लागले.

इ. स. १७१३ ते १७८० चे दरम्यान दरसाल अंदाजें वीस हजार गुलामांची विक्री होत असे. इ. स. १७७१ सालीं गुलामांचा व्यापार करणारीं दोनशें तरी ब्रिटिश जहाजें होतीं, तीं लंडन, ब्रिस्टोल व लिव्हरपूल येथील होतीं. लिव्हरपूलला आज जें वैभव प्राप्त झालें आहे तें मुख्यत्वें-करून गुलामांच्या व्यापारानेंच झालें आहे, लिव्हरपूल येथें एकदां एक

नाटक चाललें असतां प्रेक्षकांनीं नटाची टवाळी केली तेव्हां तो चिडून म्हणाला, " ऐट कशाला करितां ? तुमच्या घरांचा दगड नि दगड गुलामांच्या रक्तानें बसविलेला आहे.! " वास्तविक पाहतां अमेरिकेंतील न्यू पोर्ट व न्होड आयलंड शहरांबद्दल सुद्धां असेंच म्हणतां येईल. तेथील धार्मिक सुधारणा करणारांचे मनांत गुलामगिरीच्या व्यापाराची अनीतिमूलकता बिलकूल आली नाहीं; अगदी मातृदेशांतल्या पद्धतीवरहुकूम, त्यांची धर्मभावना व द्रव्यतृष्णा यांमधील अंतर जसेंच्या तसें कायम राहिलें.

दलित मानव वर्गाचे इतिहासांत या जिवंत नरमांसविक्रीयाइतकी किसळवाणी दुसरी गोष्ट असेल असें वाटत नाहीं. या आफ्रिकेंतून पकडून आणलेल्या मानवी जनावरांना जहाजाच्या तळघरांत कोंडून ठेवीत. तेथें भरपूर अंधार असे व हवेचें तर नांवच काढावयास नको, त्या जहाजांवरील पिण्याचें पाणी संपलें, किंवा खाण्याचे जिनसांचा तुटवडा भासूं लागला, किंवा प्लेगपटकीसारखा अजार उद्भवला तर मग सगळेच्या सगळे नीग्रो समुद्रांत फेंकून देत. एकाद्या गुलामानें किंचित् जर कां प्रतिकार केला, तर त्याचे हातपाय, डोळे, कान, कशावर गदा येईल हें सांगण्यापेक्षां कल्पनाच केलेली बरी. सुप्रसिद्ध इंग्रजी चित्रकार टर्नर यानें काढिलेलें ' स्लेव्हाशिप ' हें चित्र पाहिलें ह्मणजे, खवळलेल्या समुद्राचे पृष्ठभागावर नीग्रो गुलामांचीं प्रेतें इतस्ततः तरंगत असतांना कोणाही सहृदय पुरुषाचें अंतःकरण तीं अवलोकन करितेवेळीं खळबळून गेल्याशिवाय राहणार नाहीं. स्वातंत्र्याचे लढाईचे पूर्वी गुलामांची संख्या पांच लक्षांचे घरांत गेली होती.

कॉनफेडरेशन कीं फेडरेशन ?

प्रकरण ११ वें.

संस्थानांचा संघ कीं संघटित संस्थान ?

ज्या वेळीं स्वातंत्र्याचा जाहीरनामा सर्व वसाहतींनीं काढला, त्या-वेळीं युनायटेडस्टेट्सकरितां एक राज्यघटना तयार करण्या-विषयीं कमिटी नेमण्यांत आली होती. ही घटना करणें फार जबाबदारीचें व अवघड काम होतें, सर्व संस्थानांवर लटकत असलेली ब्रिटिशांची तलवारच या संघटनेस कारणीभूत झालेली होती. तरीपण प्रत्येक वसाहतीला मर्यादित कां होईना पण बराच काल स्वातंत्र्यांत राहतां आल्यामुळें एका नवीन राज्यव्यवस्थेला मान वांकविण्याचें जड जात होतें. इ. स. १७७६ चे जुलई माहिन्यांत घटना कमिटीनें आपला रिपोर्ट सादर केला त्यानंतर वादविवादांत एक महिना गेला. त्यानंतर पुढील वर्षापर्यंत लोकमत अजमावण्याकरितां वेळ घेण्यांत आला.

इ. स. १७७७ चे एप्रिल महिन्यांत संघटना कमिटीनें रिपोर्टाचें काम पुन्हा हातीं घेतलें. त्यावेळीं लढाई जोरानें चालूं झाली होती. प्रत्येक संस्थानांत ब्रिटिशांची सत्ता नाहींशी होऊन लोकसत्ताक राज्यव्यवस्था स्थापन झाली होती. त्यावेळीं राष्ट्रीय एकीकरणाचे विचारांस बरीच चालना मिळाली होती. परंतु असे कित्येक लोक होते कीं, त्यांना आपा-पल्या संस्थानापुरतेंच स्वातंत्र्य पाहिजे होतें. इतर संस्थानांच्या राज्य-घटनेशीं, विचारांशीं व संस्कृतीशीं आपलें जमेल असें त्यांना वाटत नव्हतें.

इ. स. १७७७ चे नोव्हेंबर महिन्यांतील १५ वे तारखेस संघटणा कमे-टीचे रिपोर्टावर मतें घेऊन कॉंग्रेसनें ती घटना मान्य केली. त्यावेळीं बराच वादविवाद झाला. त्यानंतरची पुढची पायरी म्हणजे प्रत्येक संस्थानाकडे नवीन संघटना मान्यतेसाठीं पाठवावयाची. व त्यांची मान्यता मिळावीण्यास

सुमारें १७७८ च्या जून महिन्यापर्यंतचा काल लागला. प्रत्येक संस्थानाकडून निरनिराळ्या उपसूचना आल्या. अशा रीतीनें आलेल्या निरनिराळ्या उपसूचनांचा विचार करणें हें एक मोठें कामच झालें व त्यामुळें कांग्रेसला आपलें काम झपाट्यानें आवरतां येईना. प्रथम आठ संस्थानांनीं मान्यता दिली. मेरीलँड वसाहतीची समजूत करून मान्यता मिळवीपर्यंत १७८१ चा महिना उजाडला. ह्मणजे लढाईचा जवळ जवळ शेवट होईपर्यंत कॉनफेडरेशनच्या तत्वाचा खल चालला होता.

आतांपर्यंतच्या हकिकतीवरून वाचकांना कळून चुकलें असेल कीं, स्वातंत्र्याच्या लढाईला सुरुवात मोठासा विचार करून झाली होती असें नाहीं, ती एक वावटळच उठल्याप्रमाणें झालें होतें. मुत्सद्देगिरीपेक्षां शिपाईगिरीच्याच जोरावर लढाई चालूं होती. लढाईंतील जे शूर शिपाई इतर वसाहतींतील शिपायांशीं खांद्यास खांदा लावून लढत त्यांचीच राज्यव्यवस्थेच्या कामीं जितकी दिल--जमाई व्हावयास पाहिजे तितकी ती होत नसे. निर-निराळ्या वसाहतींतील लोकांच्या परस्थांविषयीं परस्पर विरोधी कल्पना पाहिल्या ह्मणजे निराशा वाटूं लागे.

ज्या तऱ्हेची घटना कमेटीनें तयार केली होती ती अगदीं सहज सर्व वसाहतींना मान्य होण्यासारखी होती, पण ती मान्य मात्र लवकर झाली नाहीं. प्रत्येक संस्थानाचा परस्परांविषयीं अविश्वास, संशय, दिरंगाई, परांङ्मुखता अशा अनेक कारणांनीं ही घटना लांबणीवर पडली. एकराष्ट्रीयत्वानें उत्पन्न होणारी सत्ता हातीं नसल्यामुळें, लढाईचे वेळीं स्थापन झालेल्या तात्पुरत्या सरकारास बंदोबस्त ठेवणें फार दुर्घट झालें. त्यावेळच्या कांहीं धोरणी व उदार मुत्सद्यांनीं जर जिवापाड मेहनत केली नसती तर सर्व स्वातंत्र्याची लढाई ह्मणजे पोरखेळ झाला असता व अपयश खात्रीनेंच आलें असतें.

स्वातंत्र्याचें लढाईंत विजय प्राप्त झाला त्यावेळपर्यंत युनायटेड स्टेट्सचे राज्यघटनेस कॉनफेडरेशनचें ह्मणजे संस्थान संघाचें निश्चित स्वरूप आलें होतें. पूर्ण सत्ताधारी अशा लहान लहान तेरा संस्थानांची ती

एक जूट होती. सर्व कार्यकारी व कायदेकानू करण्याची सत्ता कांग्रेसकडे होती. संस्थानें लहानमोठीं होतीं त्यामानानें प्रत्येक संस्थानाचे दोनपासून सातपर्यंत प्रतिनिधी कांग्रेसमध्यें असत. त्या सर्वांची मिळून एकच सभा होती. कांग्रेसचे हातीं जी सत्ता सर्व संस्थानांनीं दिली होती तेवढीच सत्ता कांग्रेसला उपभोगतां येई. मुख्य अधिकार प्रत्येक संस्थानास स्वतंत्र असत.

कांग्रेसचे हातीं लढाई किंवा तह करणें, व्यापाराचे नियंत्रण करणें, परराष्ट्रांत वकील पाठविणें, नाणें पाडणें व त्याची किंमत नियंत्रित करणें, परस्पर संस्थानांत हद्दीचे तंटे उत्पन्न झाल्यास निवाडा करणे व इतर सार्वजनिक हिताचीं कृत्यें करणें यासंबंधीं सत्ता होती. सर्व संस्थानांकरितां मिळून एक कोर्ट किंवा न्यायाधीश नव्हता. कोणताही कायदा करणें असेल तर त्यास निदान नऊ संस्थानांची सम्मति आवश्यक होती. मतें देतांना प्रत्येक संस्थानास एकच मत होतें व ही संघटणा अमर्याद कालपर्यंत टिकावी असें ठरविण्यांत आलें होतें.

ही नवीन घटना अमलांत आणण्याचे कामीं फार मोठाल्या अडचणी येऊं लागल्या. इ. स. १७८१ सालीं मेरीलँडनें आपली मान्यता दिल्यानंतर तेराही संस्थानांची एकवाक्यता होऊन कॉनफेडरेशनची राज्यघटना अमलांत आली. पूर्वीच्या लढाऊ सरकारनें राजीनामा देऊन दुसरे दिवशीं त्याच मेंबर लोकांनीं नवीन घटणेंत प्रवेश केला. अजून लढाई संपली नव्हती. नवीन घटणा त्यावेळच्या परिस्थितीस अनुसरून असावी तितकी सुसूत्र आहे असें दिसेना. कारण पहिल्याप्रथम या घटनेनें स्वातंत्र्याचे जाहीरनाम्यांतील कांहीं अटींनांच बाध येऊं लागला. असे दिसून आलें कीं कॉंग्रेसला मिळालेली सत्ता अगदीं अपुरी आहे, ती लोकांपासून न मिळतां तेरा संस्थानांकडून मिळालेली आहे. आणि हीं तेरा संस्थानें पहावींत तर सर्वतंत्र स्वतंत्र. जी राज्यघटना एकराष्ट्रीयत्वाचें उच्च हेतूंना धरून घडविण्यांत आली, तिच्यांतील कलमें एकराष्ट्रीयत्वाचे विरुद्ध आहेत, असें दिसून येऊं लागलें. सुदैवानें लवकरच लढाई आटोपली म्हणून बरें झालें, नाहीं तर या तात्विक वादानें आपसांत मतभेद व घोटाळे उत्पन्न होऊन लढाईचे कामांत व्यत्यय आला असता.

नवीन राज्यकारभारावरील पहिली जबाबदारी राष्ट्रीय कर्जकेड करण्याची होती. ही कर्जाची रक्कम आतांपर्यंत अडतीस कोट डॉलरपर्यंत फुगली होती. प्रत्येक संस्थानास कर्जफेडीस पुरे इतका पैसा नवीन कर बसवून उत्पन्न करण्याची शिफारस करण्याची सत्ता काँग्रेसचे हातीं नव्हती, तरी पण वेळ प्रसंग पाहून कांहीं संस्थानांनीं आपल्या वाट्याइतका कर्जाचा भार आपखुषीनें पत्करिला. कांहीं संस्थानें कुचराई करूं लागलीं व कांहींनीं तर राष्ट्रीय कर्ज फेडण्याचें साफ नाकारिलें. अशा तऱ्हेनें नवीन सरकारला पहिल्याप्रथमच आपलें कार्य करण्यास मोठा अडथळा उत्पन्न झाला, आणि कर्जफेडीची बाब तर अगदीं महत्वाची होती. तिच्यावर तर सर्व राष्ट्राची व नवीन सरकारची पत अवलंबून होती. शिपायांचे पगार थकले होते, ते रिकाम्या खजिन्यांतून कसे द्यावयाचे हाही एक महत्वाचा प्रश्न होता.

रॉबर्ट मॉरिस नांवाच्या एका अतिधनाढ्य गृहस्थानें आपलें सर्वस्वी कांग्रेसला अर्पण करून तिचा अडचणीचे वेळीं थोडासा बचाव करण्याचा प्रयत्न केला. पण त्यामुळें त्याला स्वतःला दारिद्र्यांत रहावें लागलें, आणि कांग्रेसला तेवढ्या पैशानें आपली गरज भागविणें शक्य नव्हतें. नवीन संघटणा अमलांत येऊन तीन वर्षें झालीं तरी या नवीन सरकारला सांपत्तिक स्थिति सुधारतां आली नाहीं. त्यानंतर अशी भीति वाटूं लागली कीं, राज्यघटनेंत महत्वाच्या सुधारणा करून कांग्रेसचे हातीं अधिक सत्ता दिल्याशिवाय निभाव लागणें शक्य नाहीं. इ. स. १७८३ पासून १७८७ पर्यंत या राज्यघटनेचीं शकलें होऊन ती पूर्वीप्रमाणें विस्कळीत होते काय अशी चिंताजनक परिस्थिति उत्पन्न झाली होती. एकदां वॉशिंग्टननें बोलून दाखविलें कीं, स्वातंत्र्य मिळविण्यासाठीं लढाईंत इतक्या जीवांचा संहार करून आपण इतर राष्ट्रांकडून हंसून घेण्यापेक्षां दुसरें कांहींही मिळविलें नाहीं. हल्लींची आपली राज्यव्यवस्था ह्मणजे एका फाटक्या गोधडीप्रमाणें आहे. जर या राज्यव्यवस्थेंत महत्त्वाच्या सुधारणा सुधारणा घडवून आणल्या नाहींत तर, एकराष्ट्रीयत्व मिळविण्याकरितां आपण सर्वांनीं जो स्वार्थत्याग केला व इतकें रक्त सांडलें त्याचें कांहींएक चीज होण्याचा संभव नाहीं. याचें आपणांस वाईट वाटत आहे.

११ वें) नवीन प्रदेशांच्या वाढींची योजना

कॉनफेडरेशनचे हातीं असलेली सत्ता जरी अगदीं अपुरी होती व त्याचे मार्गांत अडचणी जरी अपरिमित होत्या तरी त्यानें दोन महत्वाच्या गोष्टी केलेल्या आहेत. पहिली गोष्ट ह्मणजे ओहाओ नदीचे उत्तरेकडील व पश्चिमेकडील प्रांतांत प्रवेश करून तेथील वस्ती वाढविण्याचे कामीं व लवकरच हा सर्व प्रदेश लागवडीस आणण्याचे कामीं फार खटपट केली. जॉर्ज रॉबर्ट क्लार्क यानें ब्रिटिश लोकांपासून ऑलिघेनी पर्वत व मिसिसिपी नदी यांचे दरम्यानचा सर्व प्रदेश युनायटेड स्टेट्स्तर्फे जिंकला होता. तेथें जंगल अत्यंत होतें व जमीनही सुपीक होती. हा मुलुख तेरा वसाहतींपेक्षां किती तरी मोठा होता. तेथें इंडियन लोकांच्या टोळया शिकार भरपूर असल्यामुळें फिरत असत, पण त्यांची कायम वस्ती या प्रदेशांत नव्हती. लढाईनंतर अमेरिकन लोकांचे ताब्यांत हा मुलुख पूर्णपणें आला त्यामुळें युनायटेड स्टेट्सची हद्द अटलांटिक महासागरापासून मिसिसिपी नदीपर्यंत वाढली होती. परंतु इतक्या अवाढव्य मुलखांत बंदोबस्त कसा राखावयाचा, वस्ती कशी करावयाची व तो लागवडीस कसा आणावयाचा हा मोठा प्रश्न होता. थॉमस जेफरसननें या नवीन प्रदेशाचे बंदोबस्तकरितां व वाढीकरतां एक योजना तयार केली होती. ती पुढें कांग्रेसनें मान्य केली. या योजनेप्रमाणेंच या एकंदर मुलुखाचीं पांच दुसरीं संस्थानें बनविण्यांत आलीं होतीं. त्यांचीं नांवें :— ओहाओ, इंडियाना, इलिनॉय, मिचीगन, व विसकॉनसिन याप्रमाणें होतीं. या नवीन संस्थानांचा दर्जा पूर्वीच्या तेरा संस्थानांप्रमाणेंच सर्व बाबतींत रहावयाचा होता. तेथें राहण्यास जाणारे लोकांना उत्तम शिक्षण देण्याची योजना केलेली होती, व तेथें मुदतबंदीचे मजूर अथवा गुलामगिरींतील मजूर कामास लावण्यांत येणार नव्हते. या प्रांतावर जनरल आर्थर सेंट क्लेअर नांवाच्या लष्करी अधिकाऱ्याची नेमणूक करण्यांत आली होती. हा त्यावेळीं कॉंग्रेसचा अध्यक्षच होता. त्यानें मारिट्टा येथें आपलें ठाणें दिलें. व या अवघड कामास मोठ्या उत्साहानें प्रारंभ केला.

दुसरी महत्वाची गोष्ट कॉंग्रेसनें केली ती चलनाच्या नाण्याची शास्त्रशुद्ध व सोपी अशी पद्धति अमलांत आणणें ही होय. आतांपर्यंत

प्रचलित असलेल्या चलनीं नाण्याच्या पद्धती घोटाळ्याच्या, अवघड व अडचण करण्याच्या होत्या. पूर्वी तेराही संस्थानांत गिनी, पाऊंड, शिलिंग, पेन्स वगैरे इंग्लंडांतील नाणीं चालत असत. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर चालू नाण्याचे पद्धतींत कांहीं तरी सुधारणा करण्याची इच्छा साहजिकच उत्पन्न झाली. याही कामीं थॉमस जेफरसन यानें पुढाकार घेतला होता. लढाईमुळें व इतर देशांशीं व्यापार असलेमुळें आणि स्वतःची अशी पद्धति नसल्यामुळें बहुतेक सर्व प्रकारचीं नाणीं वसाहतींत चालत असत. इतकेंच नव्हे तर, कोठल्याही दोन वसाहतींत एकाच नाण्याची किंमत सारखी नसे इंग्रजी नाण्याखेरीज फ्रेंच क्राऊन्स, स्पॅनिश रिल्स, व डॉलर्स, हेंवानांतील नाणीं वाटेल तें वसाहतींत चालत असे. कधींकाळीं नाण्यांचे अर्धे अथवा चतुर्थांश भाग सुद्धां चालत असत.

नाण्याच्या सुधारणेचे काम मुख्य फडणीस रॉबर्ट मॉरिस याचेवर सोंपविलें होतें. त्यानें इंग्लंडमध्यें चालत होतीं त्या नाण्यांच्या अंदाजें तशींच नाणीं पाडण्याची शिफारस केली होती. पण जेफरसन यास ती बिलकुल आवडली नाहीं. डॉलर हें स्पॅनिश नाणेंच आधारभूत समजून दशांशांत हिशेब करितां येईल अशी पद्धति अमलांत आणण्याकरितां त्यानें डॉलरचे शंभर भाग करावे असें सुचविलें. त्यानंतर य, विषयीं बराच वादविवाद होऊन एकमत होण्याची आशा दिसेना. पण जेफरसननें नेट धरून कांग्रेसकडून आपल्या योजनेस संमति मिळविली.

कॉनफेडरेशन स्वरूपाच्या राज्यव्यवस्थेखालीं कारभार चालविणें अत्यंत अवघड गोष्ट होऊन बसली. अजूनही बारीकसारीक तंटे व धुसफूस निरनिराळ्या वसाहतींत चालूंच होती. विचारी अशा मुत्सद्यांना आढळून आलें कीं जर संघटित अशी राज्यव्यवस्था पाहिजे असेल तर हल्लींची राज्यघटना अगदीं निरुपयोगी आहे. तिच्यांत महत्वाचे फरक शक्य तितक्या लवकर घडवून आणले पाहिजेत. या कामीं खुद्द वॉशिंग्टननेंच पुढाकार घेतला. त्यावेळीं वॉशिंग्टनपेक्षां बुद्धिवान लोक नव्हते असें नाहीं पण वॉशिंग्टनच्या अंतःकरणाची कळकळ व कार्यप्रवणता इतरांमध्यें नव्हती. तसेंच

वॉशिंग्टनवर लोकांचा अढळ विश्वास असल्यामुळें त्याचे शब्दांस मान होता, त्यामुळेंच पुढील राज्यघटनेचें काम कांहींसें सुकर झालें.

इ. स. १७८६ सालीं वॉशिंग्टननें ॲनापॉलिस येथें एक सभा बोलाविली. तींत राष्ट्रांतील निरनिराळ्या मुत्सद्यांना आमंत्रण दिलें होतें. व तींत राज्यकारभारा संबंधीं व व्यापारी धोरणासंबंधीं राष्ट्राच्या गरजा काय आहेत हें समजून घेण्याचा प्रयत्न केला होता. या सभेस पांच संस्थानांतून निरानिराळे सभासद आले होते. देशांत येणाऱ्या निरनिराळ्या मालावर काय जकात घेतली जावी, यासंबंधीं या सभेंत बराच उहापोह करण्यांत आला. व हें जकातीचें धोरण अमलांत आणण्यांत कॉनफडेरेशन घटनेची कोणकोणतीं कलमें आड येतात तें विशद करून सर्व सभासदांस सांगण्यांत आलें.

याच पद्धतीनें दुसऱ्या अनेक सार्वजनिक बाबींची चौकशी करण्यांत आल्यानंतर, आपल्यास हव्यां त्या सुधारणा करण्याचे मार्गांत आपली राज्यपद्धति कशी आड येते यासंबंधीं पुष्कळच सभासदांची खात्री झाली. या सभेंत पुरेशा संस्थानांतून प्रतिनिधी न आल्यामुळें तिला खरें प्रातिनिधिक स्वरूप येऊं शकलें नाहीं तरी पण तिची उपयुक्तता लोकांस पूर्णपणें पटल्यामुळें पुढील सालीं मोठ्या प्रमाणावर असलीच एक सभा बोलावण्यांत आली, व सर्व वसाहतींना आपापले प्रतिनिधी पाठविण्याविषयीं आग्रहाचें आमंत्रण देण्यांत आलें. कांग्रेसनेंही याकामीं पुढाकार घेऊन निरनिराळ्या संस्थानांस आपआपले प्रतिनिधी पाठविण्यास कळविलें.

पुढील वर्षांचे सभेंत न्होड आयलंडखेरीज इतर सर्व संस्थानांचे प्रतिनिधी हजर होते. खऱ्या अडचणी काय आहेत यासंबंधीं एकमत होतच होतें. खाजेन्यांत शिल्लक नाहीं, व इतर राष्ट्रांपाशीं पत नाहीं, लोकांचें देणें देण्याचे तगादे लागलेले, काँग्रेसला कर बसविण्याची सत्ता नाहीं, इतर रीतीनें उत्पन्न मिळविण्याचें साधन नाहीं, या सर्व गोष्टींचा पगडा सभासदांचे मनावर बसून नवीन राज्यपद्धति अमलांत आणण्यासंबंधीं त्यांचें अनुकूल मत होऊं लागलें होतें. शेवटीं इ. स. १७८७ च्या

मे महिन्यांत राज्यकारभारांत इष्ट फरक घडवून आणण्यासाठीं फिलाडेलफिया येथें या सभेचें एक अधिवेशन भरलें.

या सभेस जॉर्ज वॉशिंग्टन हा व्हर्जीनिया संस्थानतर्फे प्रतिनिधि या नात्यानें हजर होता. अर्थात् त्यालाच अध्यक्ष निवडण्यांत आलें. या सभेस दुसरे पन्नासवर प्रतिनिधी हजर राहिले होते. बहुतेक सर्वांची समजूत अशी होती कीं, चालू राज्यघटनेंत कांहीं इष्ट फरक घडवून आणावयाचे आहेत. कांहीं प्रमुख मंडळींखेरीज, या सभेंत आजिबात नवीनच राज्यपद्धति सुचविण्यांत येणार आहे, याची कोणास कल्पना सुद्धां नव्हती. ही प्रमुख मंडळी म्हणजे वॉशिंग्टन, फ्रँकलिन, मॅडिसन इत्यादि होती. त्यांनीं थोड्याच वेळांत चालू राज्यघटना आजिबात बदलून दुसरीच म्हणजे फेडरेशनच्या (संघटित संस्थान) पद्धतीवर राज्यघटना पाहिजे अशी सूचना आणली. ही सूचना आजिबात नवीन असल्यामुळें तींवर कडाक्याचा वाद झाला. नंतर एक कमिटी नेमण्याचें ठरून त्या कमिटीकडे हल्लींची राज्यघटना शक्य तोंपर्यंत मोठमोठे फेरफार करून राखतां आल्यास पहावी, नाहींतर नवीन राज्यघटना तयार करावी, असा अधिकार देण्यांत आला. सप्टेंबर महिन्यांत कमिटीची नवीन राज्यघटना तयार झाली. ही राज्यघटना बऱ्याच अंशीं हल्लीं युनायटेड्स्टेट्समध्यें चालूं असलेली राज्यघटना होय.ह्याही राज्यघटनेवर बराच वादविवाद, दुरुस्त्या,उपसूचना वगैरे होऊन शेवटीं गव्हर्नर मॉरिस यानें केलेला मसुदा मान्य करण्यांत आला. व हा मसुदा पुन्हां कमिटीकडे पसंतीकरितां व फेरतपासणीकरितां धाडण्यांत आला. या कमिटीचा अध्यक्ष हॅमिल्टन हा होता. त्यानें एकंदर राज्यघटनेच्या मूळहेतूसंबंधीं पूर्वीच्या घटनेस एक पुस्ती जोडली होती. तींत काँग्रेसला लोकांकडून सर्व सत्ता मिळाली आहे असें तत्व प्रतिपादन करून, संस्थानांकडून मिळालेल्या सत्तेस बाजूस सारिले त्यामुळें अर्थात् मुख्य अधिकारी काँग्रेस बनली. व राष्ट्राचें एकीकरण आपोआप साधलें.

अशा तऱ्हेनें सर्व राज्यघटनेचा मसुदा फेडरेशनचे तत्वावर करण्यांत आल्यावर त्या घटनेची एक एक नक्कल प्रत्येक संस्थानचें मत अजमा-

वण्याकरितां व मान्यता मिळविण्याकरितां पाठविण्यांत आली. एकराष्ट्रीयत्वाखालीं आपल्या हातांत चालूं असलेली सत्ता एकदम सोडण्यास बहुतेक संस्थानांचीं मनें कचरत होतीं. इतकेंच नव्हे तर एकराष्ट्रीयत्वाचे तत्वावर केलेला कायदा सर्वांना सुखकर होईलच असाही अद्यापि त्यांना भरंवसा वाटत नव्हता. ग्रेट ब्रिटनची सत्ता नाहींशी होऊन वसाहती स्वतंत्र संस्थानें बनलीं, इतक्यावरच त्यांची स्वातंत्र्याची तहान भागली होती. इ. स. १७८७ च्या साधारण देशभक्तास एकराष्ट्रीयत्वाची नीटशी कल्पना नव्हती, त्यामुळें एक राष्ट्रीयत्वांत काय जोम असतो तें केवळ विचारी अशा थोड्याशा मुत्सद्यांखेरीज इतरास पटणें त्यावेळीं तरी शक्य नव्हतें.

या नवीन संघटणेबरोबर पक्षभेदाचे राज्यकारणास अमेरिकेंत सुरुवात झाली असें ह्मटलें पाहिजे. फेडरल घटणेचा पुरस्कार करणाऱ्या पक्षाला फेडरॅलिस्ट असें ह्मणूं लागले व दुसऱ्या पक्षास अँटी फेडरॅलिस्ट किंवा रिपब्लिकन ह्मणूं लागले. फेडरल पक्षानें आपलें फेडरलिस्ट नांवाचें एक नियतकालिक सुरू केलें. त्यांत अँटी फेडरॅलिस्ट पक्षाचे शंकांस बिनतोड अशीं उत्तरें प्रसिद्ध होऊं लागलीं. या नियत कालिकाचे चालक मॅडिसन, जे, व हॅमिल्टनसारखे राजनीतिशास्त्र प्रवीण लोक होते. हॅमिल्टन यास तर अमेरिकेंतील राजनीतिशास्त्राचा आद्यगुरु समजण्यांत येतें. त्यानें ज्या मजबूत पायावर हल्लींच्या युनायटेड स्टेट्सची राज्य घटना तयार केली तिच्याबद्दल युनायटेड स्टेटस त्याची सदैव ऋणी राहिल यांत शंका नाहीं.

निरनिराळ्या संस्थानांतील परिस्थिती अजमावितां अद्यापि नवीन घटनेस बराच विरोध दिसून येत होता. फेडरॅलिस्ट नियतकालिकानें जरी मतप्रसाराची पुष्कळ खटपट केली होती व तिला ठिकठिकाणीं कल्पनेबाहेर यश येत होतें, तरी केवळ दुराग्रहामुळें अनुकूल नसणाऱ्या लोकांची संख्या कांहीं कमी नव्हती. आणि दुराग्रहाचें समाधान कशानें करावयाचें ?

प्रथम डिलावेर संस्थानानें आपली बहुमतानें पूर्ण संमति जाहीर केली. पेनसिलव्हॅनियानें नंतर थोड्याच दिवसांनीं आपली संमति जाहीर

केली. पेन्सिलव्हॅनियांत दोन तृतीयांश लोक फेडरेशनला अनुकूल झाले तर एकतृतीयांश प्रतिकूल होते. त्यानंतर न्यू जर्सीनें एकमतानें आपलें अनुकूल मत जाहीर केलें. त्यानंतर जार्जिया व कनेक्टिकट यांनीं अनुकूल मतें दिलीं. मॅसच्युसेटमध्यें नवीन घटनेस पूर्ण विरोध दिसूं लागला. तेथील लोक देशाभिमानांत कोणासही हार जाणारे नव्हते. लोकानुवर्ती राजकारभाराचें तत्वही त्यांना पूर्ण सम्मत होतें. पण प्रेसिडेंटचे हातीं सर्व सत्ता गेल्यास तोही राजाप्रमाणें प्रबल होऊन बसेल अशी त्यांना शंका येत होती. विचारे नुकतेच एका एकतंत्री राजाचे तावडींतून बाहेर आले असल्यामुळें त्यांना वाटत असलेली भीति निराधार आहे असें ह्मणतां येण्यासारखें नव्हतें. तेथेंही पुष्कळ स्वमतप्रसार करून मतें मोजण्यांत आलीं. व अगदीं थोड्याच अधिक मतांनीं नवीन घटनेस एकदांची संमति मिळाली. यानंतर न्यू हॅमशायरनें अगदीं थोड्याशा मताधिक्यानें आपलें अनुकूल मत जाहीर केलें. अनुकूल मत देणारें हें नववें संस्थान मिळाल्यामुळें नवीन राज्यघटना कायद्याप्रमाणें अमलांत येण्यास अडचण राहिली नाहीं. खुद्द व्हर्जीनियांत सुद्धां एकमत झालें नाहीं. तेथें वॉशिंग्टन व मॅडिसन अनुकूल होते पण जेफरसन व पॅट्रिक हेनरी प्रतिकूल होते. शेवटीं तेथेंही अल्पमताधिक्यानें अनुकूलता मिळाली.

व्होड आयलंड व नॉर्थ कॅरोलिना हीं दोन संस्थानें विरुद्ध होतीं. पण नॉर्थ कॅरोलिनामध्यें दुसरे वेळीं मत अजमाविलां तें अनुकूल झालें. व्होड आयलंड सर्वांपेक्षां कमी महत्वाचें संस्थान होतें. पण हटवादीपणांत त्याच्या तोडीला कोणी उतरलें नाहीं. शेवटीं त्या संस्थानांतील दोन शहरांनीं अनुकूल मत देतांच तीं शहरें वेगळीं करून मॅसच्युसेटला जोडण्याची धमकी देण्यांत आली व दुसरा भाग कनेक्टिकटला जोडण्याची धमकी देतांच, आपलें अस्तित्वच नाश पावत आहे असें पाहून तेथील जनता शुद्धीवर येऊन तिनें एकदाचें फेडरल घटनेला अनुकूल मत दिलें. अशा रीतीनें कॅनडासेरीज इतर सर्व इंग्रज भाषा बोलणारे लोकांचें एक नवीन राष्ट्र युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका, या नांवानें जन्मास आलें.

११ वें) मुख्य राजसत्तेचे तीन विभाग

ही जी नवीन राज्यघटना अमलांत आणण्यांत आली तिचीं मूलतत्वें तरी काय होतीं हें जाणण्याची उत्सुकता सर्वांस असणें स्वाभाविक आहे, ह्मणूनच तिचें थोडक्यांत दिग्दर्शन केलें पाहिजे.

मुख्य राजसत्तेचे तीन विभाग केले होते. ते येणेंप्रमाणें कायदे करण्याची सत्ता, अंमलबजावणीचा अधिकार, न्याय देण्याचा अधिकार.

कायदे करण्याची सत्ता कांग्रेसला देण्यांत आली होती, कांग्रेसमध्यें सीनेट व प्रतिनिधी अशीं दोन अंगें होतीं. सीनेटचे सभासद प्रत्येक संस्थानचें कायदेमंडळ निवडून देई व त्यांचा अधिकार सहा वर्षें चालावयाचा होता. प्रत्येक संस्थानचें–मग तें लहान किंवा मोठें असो–दोनच सभासद सीनेटमध्यें असत. प्रातिनिधी मंडळांतील सभासद प्रत्येक संस्थानेच लोकांतर्फे निवडले जात. व त्यांची संख्या संस्थानचे संख्येप्रमाणें कमीअधिक असे. प्रातिनिधी मंडळाच्या सभासदाची मुदत दोन वर्षांची असे. सर्व देशाकरितां कायदे करण्याची सत्ता कांग्रेसला होती व कोणत्याही सार्वजनिक महत्वाचे बाबींत कांग्रेसला हात घालतां येई.

युनायटेड स्टेट्सचे ज्या अधिकाऱ्यांस अंमलबजावणीची सर्व सत्ता असे, त्यांची निवडणूक प्रत्येक चार वर्षांनीं होई. ती निवडणूक प्रत्येक वसाहतींतील लोकांनीं त्या कामाकरितांच खास निवडून दिलेले लोक करीत. तेच लोक युनायटेड स्टेटसच्या उपाध्यक्षाचीही निवडणूक करीत. प्रत्येक संस्थाननें अध्यक्षांच्या निवडणुकीकरितां निवडून दिलेल्या लोकांची संख्या तेथील सीनेटर व प्रतिनिधी मंडळाइतकीच असे. अध्यक्षाचें मुख्य काम ह्मणजे कायदेमंडळानें केलेल्या कायदेकानूंची नीट अम्मलबजावणी होते आहे की नाही हें पाहण्याचें आहे. अध्यक्षांस लष्कर व आरमार यांचेवरील प्रमुख अधिकार आहे. कायदेमंडळानें केलेल्या कोणत्याही कायद्यास फेटाळण्याचा अधिकार अध्यक्षांस आहे. पण ज्यावेळीं दोन तृतीयांश बहुमतानें एखादा कायदा पास होतो तेथें अध्यक्षांस तसा अधिकार नाही. मंत्रिमंडळाचे सभासद व परदेशांत

वकील नेमण्याचा अधिकार अध्यक्षांस आहे. मात्र त्या नेमणुकीस सेनेटची अनुमति पाहिजे. त्याचप्रमाणें तह घडवून आणण्याचा अधिकारही सीनेटच्या अनुमतीनें अध्यक्षास आहे. उपाध्यक्ष हा नेहमीं सीनेटचा अध्यक्ष असतो. पण अध्यक्ष मृत झाला असल्यास, त्यानें राजीनामा दिल्यास, अथवा त्याला नोकरिवरून बडतर्फ केल्यास तात्पुरते अध्यक्षांचे अधिकार उपाध्यक्षाकडे येतात.

या फेडरल राज्यघटनेप्रमाणें न्यायखात्याची मुख्य जबाबदारी सुप्रीम कोर्टाकडे सोपविली आहे. त्याचे हाताखालीं दुय्यम कोर्टें असतात. न्याय्यखात्यांतील मुख्य अधिकाऱ्यास चीफ जस्टिस् असें ह्मणतात. युनायटेड स्टेट्सचे कायद्याविरुद्ध, राज्यघटनेविरुद्ध, व तहाविरुद्ध चौकशी करणें न्यायकोर्टाचे अमलांत येतें. फक्त सरकारी अधिकाऱ्याचे दुर्वर्तनाशिवाय इतर कोणत्याही गुन्ह्याची ज्यूरीनें चौकशी होऊं शकते. राजद्रोह फक्त युनायटेड्स्टेट्स्शीं प्रत्यक्ष युद्ध केल्यास अथवा युनायटेडस्टेट्स्च्या शत्रूंस मदत केल्यास होतो. तसेंच दोन लायख साक्षीदारांशिवाय राजद्रोहाचा गुन्हा शाबीत करतां येत नाहीं.

प्रत्येक संस्थाननें ठेवलेल्या रेकॉर्डवर पूर्ण विश्वास ठेविला जातो, तसेंच एका संस्थानच्या मनुष्यास दुसऱ्या कोणत्याही संस्थानमध्यें स्वतःच्या संस्थानाइतकेच मूलभूत हक्क उपभोगतां येतात. जीं नवीन संस्थानें या फेडरेशनमध्यें दाखल करिण्यांत येतील त्यांनाही जुन्या संस्थानाइतकेच हक्क व जबबादारी प्राप्त होईल. प्रत्येक संस्थानामधील राज्यव्यवस्था लोकमतानुवर्ती असेल. चालू राज्यव्यवस्थेंतील कांहीं कलम फिरवावयाचें झालें तर, त्याला सीनेटच्या व प्रतिनिधी मंडळाच्या दोन तृतीयांश इतकें बहुमत पाहिजे व प्रत्येक संस्थानांतल्या कायदेमंडळांनील तीन चतुर्थांश बहुमत पाहिजे. वरील पद्धतीनें आतांपर्यंत पंधरावीस उपसूचना पास झाल्या आहेत. त्यांत धार्मिक स्वातंत्र्य, अध्यक्ष व उपाध्यक्ष यांच्या नेमणुकीच्या पद्धतींत सुधारणा, गुलामगिरी बंदी वगैरे मोठमोठ्या उपसूचना आहेत.

युनायटेडस्टेटस्‌चा पहिला अध्यक्ष, जॉर्ज वॉशिंग्टन—

युनायटेडस्टेटस्‌चे पहिल्या अध्यक्षाची निवडणूक फेडरल राज्यघटनेस अनुसरून व कांग्रेसनें केलेल्या ठरावाप्रमाणें,इ.स. १७८९ च्या जानेवारी महिन्यांतील पहिल्या बुधवारीं होण्याचें ठरलें. या निवडणुकीकडे सबंध युनायटेडस्टेटस्‌चें लक्ष लागून राहिलें होतें. जॉर्ज वॉशिंग्टनचें नांव पहिल्या अध्यक्षाचे जागीं सुचविण्यांत आल्याबरोबर जिकडे तिकडे आनंदीआनंद झाला. उपाध्यक्षाचें पद अडाम्स यास मिळालें.

वॉशिंगटन यास आपल्या निवडणुकीचा निकाल समजल्या नंतर तो न्यू यॉर्ककडे जाण्यास निघाला. त्याचे मार्गावर जिकडे तिकडे त्याचा जयजयकार होत होता. मेरीलँड संस्थानानें त्याचें जॉर्ज टाऊन येथें जंगी स्वागत केलें. फिलाडेलफिया येथें एक्झिक्यूटिव्ह कौन्सिलनें व युनिव्हर्सिटीनें त्याचें स्वागत केलें. सिन्सिनॅटी शहरातफेंही त्याचें थाटाचें स्वागत झालें. ट्रेंटन येथील लढाईत ज्या शूरवीरानें जिवाकडे न पाहतां लढून त्या शहराची मुक्तता केली तेथील नागरिकांस या शूर योध्याचें स्वागत करण्यास केवढा बरें आनंद वाटला असेल?असानपिंक येथें त्याचे अभिनंदनार्थ मोठी कमान उभी करण्यांत आली. पांढरे शुभ्र पोषाक करून त्याचे रस्त्यावर फुलें पसरून कुमारिकांनीं आपलें त्याच्यावरील प्रेम व्यक्त केलें. अशा थाटामाटानें प्रवास करीत तो न्यू यॉर्क येथें येऊन पोहोंचला, व आपल्या जबाबदारीचे हुद्यावर रुजू होण्याचे पूर्व तयारीस लागला.

तारीख तीस एप्रिल १७८९रोजी जार्ज वॉशिंगटननें,आपल्या राहत्या घरांतून मोठ्या समारंभानें निघून न्यू यॉर्क येथील वॉल स्ट्रीट नामक रस्त्यावर नवीन बांधलेल्या फेडरल हॉलमध्यें, प्रेसिडेंटचे अधिकार ग्रहण करण्याकरितां प्रवेश केला. तेथें मुद्दाम तयार केलेल्या जागेंत उभें राहून चॅन्सलर लिव्हिंगस्टोन यानें कथन केल्याप्रमाणें त्यानें शपथविधि केला. शपथ–विधि होतांच लिव्हिंगस्टोननें नागरिकांकडे तोंड करून ' युनायटेड स्टेट्‌सचे अध्यक्षांना दीर्घायुष्य लाभो ' असा जयजयकार केला. त्या जयजयकाराचे आरोळीनें सर्व शहर दुमदुमून गेलें. तो दिवस सर्व नागरिकांनीं सणाप्रमाणें पाळला.

नगरांत जिकडे तिकडे आनंदीआनंद दिसून येत होता. रस्त्यांतून व घरांवरील गच्च्यांतून नागरिकांची गर्दी जमलेली दिसून येत होती.राष्ट्रीय निशाणें सर्व ठिकाणीं फडकत होतीं. तोफांची सरबत्ती ऐकू येत होती.

त्यावेळीं लोकप्रतिनिधिसभा व सीनेट ही दोन्हींहीं भरविण्यांत आलीं होतीं. शपथाविधि व सार्वजनिक स्वागत आटोपतांच वॉशिंगटननें सीनेटमध्यें प्रवेश केला व आपलें प्राथमिक भाषण सुरूं केलें व अशा रीतीनें फेडरल घटनेप्रमाणें नवीन राज्यकारभारास सुरुवात झाली.

भाग पाहिला समाप्त.

सूचि

अ

अध्यक्ष २३२
अमेरिकन सैन्याची तयारी. २०७
अमेरिकेशीं तडजोड १५२
अमेरिगो व्हेसपूसी ४
असानपिंक २३३
ॲडमिरल टर्नें १७८
ॲनापॉलिस ७७
अनी हचिनसन ४८
अँड्रयू जॅकसन १७९
आजिबवे इंडियन ८८
ऑसवे गोचा पाढाव ९१

आ

ऑलिव्हर क्रॉमवेल ५१ ७१

इ

इरॉकॉय इंडियन ८७
इलिनॉय ८० २२५
इंग्लंडचा मुलुख १२०
इंग्लंडची परिस्थिति २०७
इंडियन लोकांशीं व्यापार ५
इंडियन हल्ले ७४ ७५
इंडियनांचा जय ९२
इंडियाना २२५

ई

ईस्ट इंडिया कंपनी १३६

उ

उद्योगधंद्यास मदत २१६
उपाध्यक्ष २३२

ए

एकीची जाणीव २०८
एलिझाबेथ राणी ८

ओ

ओंटारिओ ८०
ओसवाल्ड १९२
ओहाओ २२५
ओहाओ कंपनी ८२

क

कच्च्या मालाचें संरक्षण.
कर्जरोखे १९७.२०८
कनेक्टिकट ३५
कमांडर पेरी ८३
कलोनियल काँग्रेस १३३.१४३
कॅथालिक लोक ३८
कॅनडा काबीज ९६.९७
कॅप्टन स्मिथ ३३
कॅरोलिना ७०.२१८
काउंट डी एस्टांग १७१
काउंट डी बरास १८८
काकवीवर नियंत्रण
कागदी नोटा ११६.२११
कार्टियर १९

कातडीं कमावणें १००
कापसाची लागवड ५८
कारखान्यांस उत्तेजन १०१
केप कॉड ३४
केपाफियर १२
कोलंबस २०३
कॉनफेडरेशन २२१
काग्रेसची सत्ता २२३
काँग्रेसचें अधिवेशन १९० २२८
कंकॉर्डची लढाई १४०
क्राउन पाईंट ९३ १४२
क्विबेक २४ ९६ ९८ १४५

ख

खिळ्यांचा धंदा १०९

ग

गव्हरनरचें पत्र २१६
गाय कार्लटन १९१
गुलामगिरी ६७, १४५, २१८, २२०

घ

घटना कमिटी रिपोर्ट २२१
घरगुती कपडा २१६

च

चलनाची पद्धति २२९
चवदावा लुई ८१
चहावरील जकात १३६
चहा लोकमत २०२
चॅप्लेन ५
चामड्यांचें नियंत्रण १०७
चिओकी इंडियन ९७
चेटक्यांची हूल ५२ ७५
चेसापीक नदी १८७
चोरट्या धंद्यास ऊत ११४

ज

जकाती १२२
जनरल अडाम्स १४३
,, क्लिंटन १४२
,, गेज १३५
जनरल ट्रायन १७५
,, बर्गाईन १६४
,, ब्रॅडी १७३
,, व्हिलियर्स ८६
,, सुलिव्हान १७२
,, हॉव १४२ १६६ १७१
जहाजें बांधणें ७० १०१ ११२
जॉर्ज टाऊन २३३
जॉर्ज वॉशिंगटन ८३ १३३ १५३
जॉर्जिया ४५ १७६
जॉन ॲडाम्स
जॉन कारव्हर
जॉन कॅबट ३ ८०
जॉन जे २१७
जॉन ब्रडी १७३
जॉन ब्रिनथॉप १९०
जेम्स ओगलथॉर्प ४५
जेम्स ओटिस १३३
जेम्स टाऊन ३२ ५४
जेफरसन ६६ १३३, १४३, २२५, २२६, २३०

ट

टरपेंटाईन २१७
टाउन शेंड ॲक्ट १३६

टिकांडे रोगा ९३ १४१ २६२
टेनेसी ९७
टोप्यांचा धंदा १०७
ट्रायन १५९
ट्रेंटन १५५ १५६ २३३

ड

डच व्यापारास निर्बंध ११२
डॅनियल मार्गन १८७
डॉलर २२६
डिट्रॉईट ९७ ९८
डिनिस डायाझ २
डिलंवेर ११ १५७ २२९
डयुकेन किल्ला ८४
डयूकेनवर स्वारी ९४

त

तरुणीचा निश्चय २०२
तहाच्या वाटाघाटी १९२
तागाची लागवड १०४
तुर्कांचें आधिपत्य २
तुरुंगांतील मजूर ४५
तोफांचा कारखाना २१६
तंबाखू ५५ ६० ११०
तांदुळाचें पीक ६१
तांबें ६९

थ

थामस पेन १५१ २०६

द

दारूचा व्यापार १२२
देशाभिमानी स्त्रीचें पत्र २०२
देवमाशांची शिकार ६९

ध

धबधब्याची शक्ति ११०
धर्म वेड ७५
धंद्याची पिच्छेहाट ७९

न

नवीन संस्थानें २२५
नॅथानल ग्रीन १४१
नॅरागान सेट ३६
नॉव्हिगेशन कायदा १०३, १११.
नायगारा ८१ ९५
निर्गत जकात १०१
निग्रो मजूर ५ ५० ५५ ६५
नूनेा ट्रिस्टाम २
नॉर्थ कॅरोलिना १३५
नॉन इंटर कोर्स १२५
नोटांवर निर्बंध १२३
नोव्हा सेंका २५
नोव्हास्कोशिया २३
न्यू आमस्टर डाम ३९
न्यू इंग्लंड ३५, ५१
न्यू फाउंडलंड ८ १९
न्यू ह्मिाउथ ३५
न्यू फान्स १९
न्यू यॉर्क ९२, १३२, १४५, १६२
१९३ २३३

प

पक्क्या लोखंडावर निर्बंध ११०
पहिला अध्यक्ष २३३

पहिला इंडियन वाटाड्या ४७
पहिला छापखाना ४९
पहिली इंग्लिश बालिका १५
पॅट्रिक हेनरी १३३ १७३
पॅरिसचा तह ९७
पाद्र्यांचा उपदेश २०५
पार्लमेंटचे अधिकार १२०
पिकॉड इंडियन ३६
पिट १२०, १२७, २१३
पूर्वेकडील व्यापाराचे मार्ग २
पैशाचा तुटवडा १७६
पॉंटिआक ९८
पोटोमॅकनदी ३८
पोर्ट रायल ७६
पोर्टोबेलो २९
पोलादी जनसा २१५
फ्रिमाउथ कंपनी ३१, ३२

फ

फिलाडेलफिया १३२ १७१
फेडरॅलिस्ट २२१
फेडरेशन २२८
फोर्ट डयूकेन ८९
फोर्ट नेसिसिटी ८५
फोर्ट वॉशिंगटन १९३ १९४
फोर्ट शूलर १६३
फोर्ट हरमार १७४
फ्रान्सशीं स्पर्धा ८२
फ्रान्सिस ड्रेक ९ ५९
फ्रेंच लढाई ८०
फ्रेंच वसाहती १८
फ्रेंच सत्तेचा नाश ९९
फ्रेंचांचा मुलुख ८२
फ्रेंचांची चिथावणी ७४
फ्रेंचांची मदत १६१
फ्रेंचांशीं तह १६९
फ्रेंचांशीं युद्ध ९०
फ्रोबिशर ७, ८
फ्लॉरिडा ४ ३१ ११८

ब

वटाट्याची लागवड ५८
बहामा ३
बॅरनडी काल्व १८०
बॅरन स्टॉयबेन १६९
बहिष्काराचा परिणाम १२६
बादशहाकडे अर्ज १३३
बालबोआ ४
बार्थोलोमो गानसाल्ड १६
बार्थोलिमो डायास २
बाल्टीमोर १५५
बॉस्टन ५४, १३२, १५०
बॉस्टनची कत्तल १३५
बॉस्टनची पार्टी १३७
बेंजामिन फ्रॅंकलिन, ७८, ८३, १३१
१४३, १५२ १६९ १७० १९२
२२६
बेनिंगटनची लढाई १६३

बेनिडिक्ट आर्नोल्ड १४१, १४५, १८२ १८६
बोर्ड ऑफ ट्रेड ७९, १०३
बंकर हिलची लढाई १४३
बंडाचा वणवा १३१
ब्रँडीवाईनची लढाई १६६
ब्रिटिश कारवाई २०४
ब्रिटिश धोरण १०२
ब्रिटिश भांडवल १९६
ब्रिटिश मालास विरोध १३४
ब्रिटिशांविरुद्ध लढाई १३९
ब्रिटिश सैन्य १२०
ब्रिस्टोलची चकमक ७२

भ

भुताटकी ७६

म

मक्याचें पीक ५७
मर्कंटाईल थियरी १०२
मच्छीमार ६८
मर्सीवॉरन २०१
मागेलान सामुद्रधुनी ४
मारिट्टा २२५
मालमत्ता जप्त २०९
मासळीचा व्यापार १२२
मॅडिसन २२६
मॅनहॅटन ३५
मॅसाचु सेटस् १०, ३१, १३५, १३८
मिचिगन ८०, २२५
मिठाची पैदास २१६
मुदतबंदीचे मजूर ६३
मुलांची फसवणूक ६४
मेजर स्टार्बो ९३
मेथॉडिझम् ४६
मेफ्लॉवर ३४
मेरी पिचरचें शौर्य १७२
मेरीॲंड वसाहत २२३, २३३
मॉटरियाल २० १४५
मॉरिस टाऊन १५८, १७७
मोहीगान्स ३६

य

युनायटेडस्टेट्स ऑफ अमेरिका २३०
यार्क नदी १८७

र

राजद्रोह २३२
राज सत्तेचे विभाग २३२
राज्य घटना २२६, २२८
राष्ट्रीय कर्ज फेड २२४
रॉले शहर १४
रॉजर विल्यम ७१
रॉबर्ट मॉरिस १८५, २२४, २२६
रॉयल आफ्रिकन कंपनी २१८
रिपब्लिकन २२९
रोमन साम्राज्य १
रोयानोक बेट ११
न्होड आयलंड ४९ २३०

ल

लढाईचे कर्जाची फेड २११
लांकडाचा व्यापार ६७
लाफायेट १६२, १८७, १८७
लाब्राडोर ४

लॉंग आयलंड १५३
लॉर्ड कॉर्नवालिस १४८
लॉटरीनें पैसा २०९
लॉर्ड नॉर्थ १९७
लॉर्ड रोबरव्हाल २०
लिव्हर पूलचे वैभव २१९
लुइस बर्ग ९३
लुशिआना २९
लेक्सिंगटन १४०
लोकप्रतिनिधि सभा २३४
लोकरीचा फायदा १०६
लोकरीची पैदास २१६
लोकसंख्येची वाढ ५५
लोखंडाचे कारखाने ६९, १०९
लंडन कंपनी ३१, ३२

व

वसाहत कंपन्या ३०
वसाहतकिडून मदत २०९
वसाहतीचा निष्काळजीपणा १०८
वसाहतीचे शौर्य ११९
वसाहतीबद्दल धोरण ९९
वसाहतींचें एकीकरण ८७
वसाहतींतील अडचणी २८
वसाहतीतिल आयुष्यक्रम ४७
वसाहतवाल्यांचें दुर्वर्तन १२
वॉलपोल १२०
वॉशिंगटन ८४ ८५ ९० ४३
४४ ४७ १६८ १८४ १९२
२०५ २११, २२२, २३३
वॉशिंगटनची पत्नी २०३
वॉस्कोडीगामा २
विल्यम पेन ४०
विल्यम रॉजर्स ३६
विश्वबंधुत्व ४०
विसकॉनसिन ८० २२५
वेटझेल बंधु १७३
वेस्ट इंडीज ३, ११
व्हर्जीनिया ११, ३३
व्हर्जीनिया असेंब्ली १३३
व्हली फोर्ज १६८
व्हाइट मार्श १६७

श

शपथविधि २३३
शाळागृहें ७७
शिपायांची देणगी २१२
शिक्षणाची वाढ ७७

स


सन्स ऑफ लिबर्टी १३४
समटर १७९
स्वातंत्र्याचा जाहीरनामा १५०
स्वातंत्र्य दिन १५०
स्टार्लिंगवर्क्स २१६
सप्तवार्षिक युद्ध २०७
समता व स्वातंत्र्य ४४
सर वॉल्टर राले ९, १०
सर्वस्वाचें अर्पण २२४
सॅम्युअल ॲडाम्स १३७ १४३
सॅनफ्रान्सिस्को ९
सॅव्हाना ४६
साखरेचा कायदा १२१
सिनसिनॅटी २३३
सीनेट २३०, २३४

सुताचे सामने १२५
सूत काढण्याची सक्ती १०४
सुप्रीम कोर्ट २३४
सेंट जॉन्स २३, १४५
सेंट लॉरेन्स २७, ८०, ९५
सोसायटी ऑफ फ्रेंडस ४४
स्टँप ॲक्ट १२३, १२४
स्पेनचा मुलूख ९९
स्पॅनिश वसाहती २७
स्पेनची स्पर्धा ५५
स्पेनचा हट्ट २१४
स्त्रियांची आयात ४९
स्त्रियांची कामगिरी १९९
स्त्रियांचा दर्जा १९९
स्त्रियांचा स्वार्थत्याग १८१
स्वातंत्र्याची कल्पना १४९

ह

हॅमिल्टन २२९
हारवर्ड कॉलेज ४९
हॅलिफॅक्स ९२
हॉलंडशीं तह १८३
हिंदुस्थानचा मार्ग ९
हंफ्रे जिलबर्ट ९
हूरॉन ८०
हेसियन सैन्य १४८

REFBK-0004707



शुद्धिपत्र

पान	ओळ	अशुद्ध	शुद्ध
१	१६	मॅडिट	मॅड्रिड
२	२२	इ. स. १८४६	इ. स. १४४६
३	१०	नावाने	नावानें
४	२०	मागलान	मागेलान
६	१	गंठली	गांठली
६	२७	है	होता
११	२	डिलावेट	डिलावेर
१४	२३	फसले	फसेल
१८	९	बिटनी	ब्रिटनी
२२	१३	इंग्लिग	इंग्लिश
२३	१	फेंच	फ्रेंच
२७	५	स्थानें	संस्थानें
२९	१०	पोर्टबेली	पोर्टोबेलो
३०	२५	जामीनीहीही	जमिनीही
३२	१०	हा	ही
३३	२२,	ातके	तितकें
३३	२६	नसल.	नसेल
३६	४ १३	राबर्टाविल्यम	विल्यम राजर्स.
४८	१२	स्त्रियाचा	स्त्रियांचा
५८	८	प्रेसब्रिटेारयन	प्रेसबिटेरियन
६२	१३	समजुतीनेही	समजुतीही

पान	ओळ	अशुद्ध	शुद्ध
८०	१८	ओटारिओ	ओंटारिओ
८१	२४	मिसिसिपाचे	मिसिसिपीचे
८२	२७	प्रदशापर्यंत	प्रदेशापर्यंत
८२	२७	रस्त्यांचा	रस्त्यांची
८२	२८	तयारीत	तयारी
१०२	१०	भांढवल	भांडवल
१११	२	इंध्लंड	इंग्लंड
१११	१०	पर्यवसाग	पर्यवसान
१२१	१९	केकेल्या	केलेल्या
१२२	१५	फायद	फायदा
१२८	२२	मूलभून	मूलभूत
१३४	२५	पावून	पाठवून
१३५	७	माडली	माजली
१३७	३	घातल	घातला
१४२	१६	लानलें	लागलें
१४६	१	क्विबे	क्विबेक
१५३	२४	आपल्य	आपल्या
१६१	१६	नेलेले	गेलेलें
१६४	४	शूल्डर	शूलर
१६८	१२	हात	होत
१७०	७	फँकलिन	फ्रँकलिन्
१७२	२	जगरल	जनरल
१७७	१२	पर्तताचे	पर्वताचे
१७७	२२	हेसिमान	हेसियन

पान	ओळ	अशुद्ध	शुद्ध
१७८	१	घ्या स्वातंत्र्य	स्वातंत्र्य घ्या.
१८७	२८	दिल	दिला.
१८९	१३	करूग	करून
१८९	१६	ऑकिसरांचे	ऑफिसरांचे
१८९	२१	पितळी तोफा	बंदुका
१९६	१	यका	नको
१९६	२७	मुलभ	सुलभ
२०४	१६	लाकांची	लोकांची
२१२	१	नाटांचे	नोटांचे
२१४	१२	मनाव	मनावर
२१६	१५	रहिवाश्याच	रहिवाशाच्या
२२०	९	विक्रीया	विक्रया
२२२	९	जनिक्क	जनिक
२२४	१२	सर्वस्वी	सर्वस्व
२२४	२२	राज्यव्यवस्थेंत	राज्यव्यवस्थेंत
२३०	८	विचारे	विचारे
२३२	५	नोकरविरून	नोकरविरून